४९ ह्मणेरायाजेंमीकरीन तेंतुवांकरावेंप्रमाण माझेंकर्तृत्वअप्रमाण मीजाईनते
समयीं ५० रावह्मणेजेंतूंकरसी तेंमीनमोडीननिश्चयेंसी भाष्यदेउनतयेसी प
ट्टमहिषीआणिलीघरा ५१ जान्हवीसंगेंउल्हास ह्मणवतमानीस्वर्गास वर्षघटे
निमिष तीसींप्रेमेंभोगितां ५२ गर्भिणीजालीराणी पुत्रप्रसवलीसगुणी परीतोबा
ळतात्काळनेउनी गंगागर्भीटाकिला ५३ सप्तपुत्रऐसेचटाकिले शंतनुभिडेनेनबो
ले आठवापुत्रयथाकाळें प्रतिसूर्यजन्मला ५४ तोगंगाजळींटाकावा तोंवसू
धापतीआलाआडवा ह्मणेएवढातरीनटाकावा महांतापसेअसुरिणी ५५ वंश
वृक्षनिर्मूळकरणी केवळतीक्ष्णकुठारिणी तूंनारीनव्हेससर्पिणी पिलींप्रसउनि
भक्षिलीं ५६ देवतटिनीबोलेवचन वसूशापजालाविमोचन मीजातेंआतांये
थून तूंमजविणराज्यभोगी ५७ आठवापुत्रहाउत्तम तुजपुढेंदेईनभीष्म ऐसेंबो
लोनसप्रेम गुप्तजालीजान्हवी ५८ सांगातेंनेलाकुमर मगतळमळीराजेश्वर भो
गवाटतीजैसेविखार गंगेविणारायातें ५९ रायेंकेलाविवेक ह्मणेसर्वऐश्वर्यक्ष
णेक मगइंद्रियेंनियमुननैष्ठिक राज्यनितीनेचालवी ६० गंगोवियोगेंआकळे
मनीं नपाहेदुसरीकामिनी छत्तीसवर्षेंयाप्रकारेंकरुनी शंतनुराज्यलोटीहो ६१
भागीरथीचेतीरींत्वरित रावमृगयाकरितजात गंगाआठउनिमनांत सद्गदितपा

ह्मातसे ६२ तोंभागीरथीचेंजळ स्वल्पयाहेझ्ळझ्ळ चकितपाहेभूपाळ ह्म
णेमूळशोधूंआतां ६३ हरिद्वारापर्यंत रावचालिलाशोधित तोंप्रवाहकोंडिलें
अर्जुन शरसंधानींभीष्मदेवें ६४ पुत्रआपलानकळे परिमोहेंअंतरभरलें भू
षणीभूषितस्वरूपचांगलें रावबोलेतेवेळे ६५ ह्मणेंकोणाचातूंसुत मजस्नेह
उपजलाबहुत तोंभीष्मदेवजालेगुप्त गंगाजळींतेवेळे ६६ राजाखेदपावलाब
हुत गंगाआठविलीमनांत नेत्रींआलेअश्रुपात ह्मणेंधांवेवल्लभे ६७ आठवापुत्र
देईन ह्मणोनबोलिलीसवचन सत्यकरीमजभेटून कठिणमनकरूंनको ६८
हातींधरूनसुत गंगाप्रगटलीअकस्मात जैसेंपरमआराध्यदैवत निधानदेतअ
पूर्नी ६९ वस्त्राभरणींभूषित मुक्तमाळापदकेंझळकत ऐसाआणुनियांसुत दे
तीजालीरायातें ७० ह्मणेंसांभाळीआपलानंदन यासवसिष्ठापासोनविद्यादान
भार्गवरामापासून धनुर्विद्याशिकलाअसे ७१ मंत्रविद्येविषयींप्रवीण जालाबा
चस्पतीपासींपूर्ण सोमवंशींविजयध्वजजाण नेईनंदनगृहातें ७२ युवराज्यपास
देई सागरांतमेदिनीसर्वही तुझीआज्ञापाळवीलपाहीं नाहींज्ञानींदुसरा ७३
ऐसेंबोलोनदेवतटिनी गुप्तजालीतेचक्षणीं हातींकुमरधरुनी शंतनुआलाह
स्तनापुरा ७४ सकळप्रजाराजेयेउन भीष्मासकरितीनमन भेरीमंगळतुरेंवाज
उन राज्यभारओपिला ७५ सर्वांविषयींचतुर कार्यमंत्रीदक्षफार आवरिला
सर्वराज्यभार व्यंगनपडेकोठेंही ७६ विशेषवेतनमानबहुत देउनसेवकांमो
हिलेंसमस्त याचकांदानेंकेलेंतृप्त दरिद्रनाहींशोधितां ७७ अवलोकुनगंगानं

दन राजासदांआनंदघन ह्मणेंआयुष्यपरिपूर्ण चतुराननदेवोया ७८ शंतनुराव
एकेदिनीं मृगयाजोंकरीतवनीं तोंदिव्यसुवासघ्राणीं येवोनियांझगटत ७९
ह्मणेकोठेंआहेसुवासवस्त ह्मणूनतटाकशोधितजात तोंपुढेंदासनगरदेखत
नौकारक्षितदासकुमरी ८० रूपपाहतांसतेज भुलोनजायमकरध्वज अंगींचासु
वाससहज जायीएकयोजना ८१ राजाह्मणेतयेसी तूंकोणयेथेंनौकारक्षि येँ
शीह्मणेपांथिकासीं दासकुमरीमीअसे ८२ मन्मथबळेंभुललाशंतन मगदासगृहीं
जाउनभेटेंस्नेहादरेंपूर्ण दासह्मणेधन्यभाग्यभाझें ८३ मगह्मणेकुंभिनीपाळक
तुजपासींमागणेंआहेएक येरूह्मणेमीतुझारंक टाकीनप्राणओवाळुनी ८४
परमसुंदरतुझीनंदिनी तीकरीमाझीपट्टराणी दासह्मणेतेक्षणीं विचारअसेंयेक
पै ८५ इचेपोटींहोईलपुत्र तोवंशवर्धनीनृपछत्र ऐशीभाष्यद्यावीपवित्र ऐकून
नृपशंकाकरी ८६ भीष्माऐसापुत्रपाहीं ब्रह्मांडांतदुजानाहीं तनमनधनसर्वही
ओवाळावेंत्यावरुनी ८७ मौन्येचरावउठोन स्वग्रामासआलापरतोन मनीलाग
लेंसत्यवतीचेंध्यान नबोलेचकोणासीं ८८ शंतनुरावचिंतातुर भीष्मेंऐकतांसा
चार पुसेरायासयेउनविचार नमस्कारकरूनियां ८९ मजसारिखापुत्रअसतां
तुह्मांकायपडिलीचिंता शक्रासदुर्लभजावस्ता आणूनदेईनक्षणार्धें ९० मगबोलेनृ
पवर तुजसारिखानाहींपुत्र परीतुजबंधूअसावेसाचार पाठिराखेवाटतें ९१ ए
कडोळाएकचरण एकपाणीएकवसन याचेंसुखमानीतोविवेकहीन चतुरन
व्हेसर्वथा ९२ संसारक्षणकसाचार एककुमरतोनव्हेकुमर एकास्तंभेअवघेंघर

तगेलकेसेंसांगपां ९३ ऐसेंबोलतांशंतन भीष्मासकळलेंवर्तमान प्रधानासपाचारु
न गंगात्मजसांगतसे ९४ रायासनाहींविषयस्वार्थ परीपत्नीपाहिजेधर्मार्थ गृहस्व
मिणीनसतांगृहांत वाटतशून्यअवघेंगृह ९५ तरीवधूपाहासुंदर ऐसेंऐकूननृप
वर पुरोहितपाचारूनसमग्र एकांतींसांगेतयातें ९६ सत्यवतीदासनंदिनी विलं
बनकरावायेक्षणीं तीकरूनद्यावीमजराणी दुसरीनलगेसर्वथा ९७ ऐसाहावृत्तां
त भीष्मासजाणवितीपुरोहित अवश्यह्मणोनिदेवव्रत दासगृहींपातला ९८ कैवर्त
कसामोरायेत मानेंबैसविलेंसमस्त दासह्मणेदेवव्रत तूंसोइराआमुचा ९९ सत्य
वतीआमुचीजननी विलंबनकरावायेक्षणीं दासह्मणेमाझेमनीं चिंताएकवर्त
तसे १०० महाराजतूंदेवव्रत माझेमाथांठेवीहस्त तरीमगबोलेनमात रागमनांत
नधरावा १ इचेपोटींहोईलकुमर तोछत्रपतीवंशधर ऐसेंऐकतांगंगाकुमर गर्जोनि
यांबोलतसे २ हाअप्रमाणहोईलशब्द तरीम्लेंछमुखींप्रवेशोवेद ह्मणतीधन्यध
न्यब्रह्मवृंद देवव्रतसत्यवचनी ३ यावरीबोलेकिरात तुझेपुढेंहोतीलसुत तेहि
रोनघेतीलसमस्त युद्धव्यवहारकरूनी ४ तूंसत्यवक्तामहाराज कैसेंहोतीनेणोआ
त्मज बळाद्भुतसतेज ज्येष्ठाधिकारीराज्यातें ५ ऐसेंऐकतांभीष्म करिताजालाअ
चाटनेम जोकोणानचलेनिःसीम त्रिभुवनांतऐकतां ६ यावरीआजन्मपर्यंत मी
ब्रह्मचारीव्रतस्थ गंगेसमानस्त्रियासमस्त त्रिभुवनीचाम्याकेल्या ७ मन्मथाचा
केलाशिरच्छेद पायींबांधिलेंयेथूनिब्रिद माझावाग्नेमप्रसिद्ध ब्रह्मांडभरीउभवि
ला ८ संततीविणमीप्रसिद्ध पावेनमीस्वर्गमोक्षपद ऐसेंऐकतांसभावृंद जयज

यकारकरतीहो ९ दिव्यसुमानाचेसंभार वर्षतीवरूनसुरवर. माथेंतुकवितीऋषे
श्वर पितृभक्तधन्यहा १० तत्काळसत्यवती दिधलीभीष्माचेहातीं तेणेंवाहोनकन
करथीं हस्तनापुरींआणिली ११ तंवतेसमयींमुहूर्त दोघांसीलग्नलावित पिता
परमसंतोषित देवव्रतनामसाजे १२ भीष्मकेलाभोंगनेम ह्मणोननामतुझेंभीष्म
इच्छामरणपावसीपरम इहपरत्रधन्यतूं १३ सत्यवतीसीभोगितांभोग रायासीउणा
वाटेस्वर्ग तोपुत्रजालासवेग चित्रांगदयानावें १४ आणिकएकसंवत्सरा गरोदर
जालीसुंदरा विचित्रवीर्यदुसरा पुत्रजालासुलक्षणी १५ जातकर्मादिप्रकार
शंतनुकरीसमग्र भीष्मेंयाचकसत्वर तृप्तकेलेसर्वदानीं १६ बालत्वक्रमलेंसं
पूर्ण प्राप्तजालेंतारुण्यपण तोंशंतनुदेहठेउन स्वर्गाप्रतीपावला १७ तेव्हांउत्तरक
र्मेंसमस्त भीष्मअंगेंसंपादित चित्रांगदज्येष्ठसुत भीष्मेंअंकींबैसविला १८ चित्रां
गदेंपुरुषार्थकरुन जगज्जिंकिलेंसंपूर्ण दिव्यवस्त्रआणित्याहिरोन रायांपासून
पराक्रमें १९ जिंकूनियादवेंद्र वस्त्रआणित्याअपार भीष्मपाठिराखामहाशूर उणें
नपडेकोठेंही २० तोंएकदांकाळेंकरुनी गंधर्वराजेयेउनी हस्तनापुरींसमरंगणीं
युद्धकेलेंअपार २१ कपटविद्येंकरून घेतलाचित्रांगदाचाप्राण भीष्मभयेंतेथून प
ळोनगेलेस्वर्गलोका २२ जालाएकचिहाहाकार शोककरीसत्यवतीअपार मगवि
चित्रवीर्यसत्वर राज्यस्थानीस्थापिला २३ सर्वशास्त्रींकेलानिपुण धनुर्वेदअभ्या
सीसंपूर्ण सर्वविषींभीष्मआपण अंतर्बाह्यरक्षित २४ विवाहकरावायावरी गं
गात्मजेंचिंतीअंतरीं तोंवार्तासांगीतलीऋषेश्वरीं दिव्यकुमरीकाशीश्वराचा २५

अंबाअंबालिकाअंबिका स्वयंवरमांडलेंत्यांचेदेखा राजेमिळालेनाहींलेखा ऐक
तांभीष्मआवेशें २६ प्रतापेंजिंकोनिस्वयंवरीं आणित्याकाशीराजाचाकुमरी शा
ह्मणवकुळींचेतेअवसरीं राजेयुद्धाप्रवर्तले २७ वातापुढेंजलदजाळ तैसेराजे
विभांडिलेसकळ त्यामाजीशाल्वेंतुंबळ युद्धकेलेंभीष्मासीं २८ महापंडितापुढेंयु
क्ती अबळाचाजेविनचलती तैसीशाल्वाचीजालीरीती पाठीदेउनीपळाला २९
असोविजयीजालादेवव्रत कुंजरपुरापातलात्वरित कन्यासत्यवतीहस्तेंवोपित
कनिष्टबंधुकारणें ३० विवाहआरंभीतेकाळीं वडीलअंबाकायबोलली शाल्वापासीं
वृत्तिगुंतली मनींघातलीम्याबाळ ३१ ऐसेंऐकतांजान्हवीसुत अपश्यरथींबैस
वित संगेसेनासमस्त शाल्वापासींपाठविली ३२ भीष्मेंशाल्वविभांडिला तेणेंखे
दपरमपावला तोंदळभारेंसीतेवेळा अंबाआलीशाल्वापासीं ३३ सभेंतबोलेयेउ
न तुझेठयींगुंतलेंमाझेंमन भीष्माचानिरोपघेउन आलेंतुजवरावया ३४ शाल्व
ह्मणेंतुजजिंकून गेलागंगात्मजघेउन मजयुद्धींपराभउेन नेलेंजाणतुजलागीं ३५
आतांगेलियाप्राण तुजशींनकरीकदांलग्न एकेंस्पर्शितांअन्नपूर्ण इतरांजाणउच्छि
ष्टतें ३६ परमखेदपावोन अंबानिघालीतेथून कुंजरपुरालागुन येतीजालीतेधवां
३७ इकडेअंबिकाअंबालिकादोनी व्यासादिकाऋषीबोलाउनि विचित्रवीर्यासीं
लग्नलाउनी भीष्मकरीसोहाळा ३८ संपादिलेचारदिन तोंअंबाआलीपरतोन
ह्मणेमीमाळघालीन गंगात्मजातुजलागीं ३९ वरावयामजलागुन तुंवांमजआ
णिलेंहिरोन मीतुझीपत्नीहोईन वाढवीनवंशातें ४० भीष्मह्मणेमातेसमान तु

जसहितसर्वस्त्रियाजाण उठजाईयेथुन आपल्यापितृगृहास ४१ तिणेंतपकरूनि
खडतर प्रसन्नकेलारेणुकापुत्र जेणेंएकवीसवेळासर्वत्र पृथ्वीकेलीनिःक्षत्रिय ४२
प्रसन्नजालाजमदग्न येरीसांगेसर्ववर्तमान तुझाशिष्यगंगानंदन वरदेयीकरूनि
यां ४३ मगअंबेसघेउनसांगातें भार्गवआलागजपुरातें समाचारकळलागंगात्म
जातें येतसामोरागजपुरासी ४४ करूनियांसाष्टांगनमन नगराआणिलेरेणुकानं
दन स्नाभिषेककरून सर्वोपचारेंपूजिला ४५ मगह्मणेंपरशुधर ईसवरीतूंसत्वर
भीष्मबोलेजोडूनिकर स्त्रियासर्वममसाता ४६ परमकोपलाजमदग्न मोडिसीमा
झेंआज्ञावचन मजसीकरीयुद्धकंदन किंवालग्नलावीईसीं ४७ भीष्मबोलेधरूनच
रण मीअवश्ययुद्धकरीन मगसिद्धकरोनदोनस्यंदन नगराबाहेरपातले ४८ ह्मणे
स्वामीनीटकावेबाण तोंभार्गवेंचापओढुन दोनशरसोडुन भुजादोनीभेदिल्या ४९
भीष्मउतरूनरथाखालता गुरुचरणींठवीमाथा ह्मणेंमाझेक्षत्रियाचेबाणआतां
केवीसहासीविप्रवर्या ५० पुढतीरथारूढहोउन युद्धकरीगंगानंदन पंचबाणेंसंपूर्ण
शरीरभेदिलेंभार्गवाचें ५१ तेवीसदिवसपर्यंत युद्धजालेंअद्भुत मेरूमांदारभिडत ते
विंदोघेदिसती ५२ कींइंद्रआणिचंद्रजाण कींरमानाथआणिउमारमण शस्त्रजाळें
संपूर्ण भरतीगगनदोघेही ५३ सागरआणिअंबर कींवारुकीआणिसहस्त्रवक्त्र
कींवसिष्ठआणिविश्वामित्र तैसेदोघेभांडती ५४ कौतुकपाहतीनिर्जर भीष्मेंभार्ग
वकेलाजर्जर हृदयींखंडितांनिर्वाणशर ध्वजस्तंभींटेकला ५५ ऐसेंगंगात्मजेंदे
खुन धांवलासद्गदहोउन नेत्रासजीवनलाउन घालींस्वहस्तेंवारा ५६ सावध

जालापरशधर हृदयींधरिलागंगापुत्र ह्मणेंमाझीविद्यासमग्र तुझेठायींविरली
५८ पुनःह्मणेपरशराम पूर्णझालामाझानेम अंबेतूंपितृग्रहासपरतोन देहदंडी
करींतप ५९ गजपुरांतआलाभीष्म स्वस्थानागेलाभार्गवराम मगतेअंबेनेपरम
घोरवनसेविलें ६० ह्मणेभीष्माचाघेईनप्राण घोरतपासआचरोन मगवायूसाध
नेकरून देहद्याकिलाअंबेने ६१ इकडेद्रुपदेंत्रिनेत्र प्रसन्नकरूनमागेपुत्र मेगबो
लिलापंचवक्त्र ऐकसादरजन्मेजया ६२ पूर्वींस्त्रीमगपुरुषजाण ऐसाहोयीलतु
जनंदन तीचअंबास्त्रीहोउन द्रुपदउदरींजन्मली ६३ देशार्णवदेशींचाहिरण्यनृ
पती त्याचीकन्याकेलीशिखंडीप्रती लग्नजालेंएकांतीं स्त्रीपातलीभोगकामा
६४ शिखंडीनामठेवित लोकांतगुप्तकेलीमात पुरुषवेषत्यासदेत जालाकृतयें
रतो ६५ नाहींपुरुषत्वकामविकार वोळखिलेंस्त्रीशरीर राजकन्याउठोनसत्व
र जातमाहेराआपुल्या ६६ सांगेपितयासवर्तमान तेणेदळसिद्धकरून पांचा
ळपुरासयेउन मांडिलेंभांडणद्रुपदासी ६७ ह्मणेस्त्रीचाकरुनस्कत कैसाकेला
रेअनर्थ मीकरीनतुझाघात कींमाझाप्राणवेचीन ६८ इकडेशिखंडीरात्रींउठोन
पळतघेतलेंघोरअरण्य एकांतींकरितांरुदन तोंकुबेरगणपातला ६९ त्याचेंस्थ
णाचेंनामस्थूळकरण पुसतीशिखंडीलागुन तेणेंजालेंनेंमुळींहुन वर्तमाननि
वेदिलें ७० स्थूळकरणह्मणेतुझेंस्त्रीपण मीघेतोंआठदिवसजाण माझेंपुरुषत्व
तूंघेउन कार्यसंपादिजायकां ७१ मगस्त्रीपणदेउनत्यासी पुरुषहोउनआलो
नगरासी वर्तमानसांगेद्रुपदासी येरूमनीसंतोषला ७२ मगहिरण्याकडेपाठ

विलेचार ह्मणेपाहायेउंनसमाचार माझाअसतांपुत्र कायअनर्थमांडलाहा ७३ ते
पाहातीस्त्रियापाठउन तोंशिखंडीदेखिलामदन जालेंस्त्रीचेंसमाधान सेनाघेउ
नघ्यशरगेला ७४ लोटलियाआठदिवस शिखंडीगेलाकुबेरवनास उदयाआलेंभा
ग्यविशेष कुबेरआलाकाननात्या ७५ तोस्थूळकरणस्त्रीवेषधरुन बैसलालज्जि
तआकर्षुन कुबेरेंजाणोनवर्तमान शापदेताजाला ७६ शिखंडिचाहोयजोंदेहां
त तोंवरीअसोत्यासपुरुषत्व तूंस्त्रीहोउनबैसतेथं वचनअसत्यनव्हेकदां ७७ तोशि
खंडीयेउन धरीकुबेराचेचरण येरुह्मणेंपुरुषत्वेंकरुन स्फरेंनांदेनिजगृहीं ७८ शिखं
डीआलापरतोन द्रुपदाससांगेवर्तमान सदाशिवजालापूर्वींप्रसन्न चरित्रजाणत्या
चेंहें ७९ एवंभीष्मवधकरूनमनांत अंबाशिखंडीजालासत्य सिंहावलोकनेंसमस्त
कथाऐकेमागली ८० उभयदारांसहित विचित्रवीर्यक्रीडाकरित पुढेंसंताननस८
तांअकस्मात रोगरायातेंलागला ८१ उदंडवैद्यआणून भीष्मकरीऔषधप्रयत्न
परीआयुष्यसूर्यअस्तमान पावताजालातेकाळीं ८२ विचित्ररावपावलामरण स
त्यवतीआणिगंगानंदन शोकार्णवींजालींनिमग्न वंशसंतानबुडालें ८३ उत्तर
कार्यसंपूर्ण करितांजालागंगानंदन सत्यवतीकरीरुदन भीष्मकंठींसोबोनी
८४ मगभीष्मेंविवेकयुक्ती शांतकेलीसत्यवती मातभीष्मासह्मणेएकांती वं
शवाढवीपुढेंतं ८५ तूंआपलेंकरूनलग्न वाढवीवंशसंतान भीष्मह्मणेमातेसमा
न नारीमात्रसर्वही ८६ चळतीमेरुमांदार वरुणदिशेउगवेमित्र मर्यादासांडीलसा
गर परीनेममाझाटळेना ८७ वायूपडेमोडूनचरण कुंभिनीसांडीलसहस्रवदन

परीमाझेंनेमवचन नटळेकल्पांतीं ८८ तरीअपतकाळींअपधर्मेसाचार पूर्वींचकरि
तीशास्त्रकार प्रार्थूनियांऋषेश्वर क्षत्रियकुळंवाढवावीं ८९ एकवीसवेळांनिक्षत्री
परशुरामेंकेलीधरत्री राजांगनीब्राह्मणश्रोत्री प्रार्थूनियांवश्यकेळे ९० सत्यवतीह्मणे
भीष्मास तुजसांगतेंएकरहस्य कुमारीदशेंतजालाव्यास यमुनाद्वीपींमजपासूनी ९१
महायोगीपाराशर सुगंधकेलेंमाझेंशरीर कुमारत्वनमोडतांसाचार व्यासमहाराज
जन्मला ९२ तरीतयासींप्रार्थून वाढवावेंवंशसंतान ऐसेंऐकतांगंगानंदन आनंदें
टाळीपिटिली ९३ ह्मणेमातेनलावींव्यवधान प्रार्थीआतांकृष्णद्वैपायन येरीकर
पादप्रक्षाळून करीध्यानव्यासाचें ९४ निशांतींप्रगटेआदित्य कींकुंडांतूननिघेआरा
ध्यदैवत तैसासत्यवतीपुढेंप्रगटत साक्षातव्यासनारायण ९५ चंद्रसूर्यकृशान
एकेठायींजालेसंपूर्ण तैसेंस्वरूपदेदीप्यमान पाहातांमननिवतसे ९६ अवलो
कितांव्यासध्यान दुःखदोषजायविरोन जाचेंकरितांस्मरण सकळविघ्नेनाशती ९७
भीष्मेंधरिलेदृढचरण मगतोकृष्णद्वैपायन मातेसकरीनमन ह्मणेस्मरणकांकेलें ९८
ह्मणेपुत्रासंकटपडलें ह्मणोनितुजबोलाविलें दोघेअनुजतुझेपडले काळानळींजाउ
नी ९९ तुटलावंशखुंटलेंसतान तुजअधिकारअसेपूर्ण तरीदेउनीवीर्यदान
पुत्रवंत्यादोघीकरी २०० भारतवल्लीखंडोन गेलीविचित्रवीर्यापासोन तरीशुक्र
जीवनघालून वृद्धीपुढेंकरावी १ अवश्यह्मणेकृष्णद्वैपायन शुचिर्भूतस्त्रिया
होउन माझेंतेजपरमदारुण साहिलेंपाहिजेनिर्भयें २ सत्यवतीह्मणेसुता
तूंचितयासधैर्यदेता उशीरनलावींआतां फलोसत्तीहोउदे ३ एकांतींआसन

घालुनी व्यासबसलेअनुष्ठानी निबिडरात्रीचेमाध्यान्ही स्नुषेससांगेसत्यवती ४ करु
नियांमंगळस्नान करावेंहरिहरपूजन देउनियांअपारदान विप्रभोजनमनेच्छा ५
तैसेंचकरीअंबिका चातुर्यकासारमराळिका कींचटतचालिलीकनकालतिका
व्यासकल्पद्रुमावरी ६ उग्रतेजदेखतांवेगीं कंपसुटलाअंबिकेलागीं व्यासप्रवर्तले
सुरतसंगीं नेत्रझांकीनारीती ७ वीर्यनिक्षेपूनउदरीं व्यासआलेबाहेरी जननीह्मणेसां
गनिर्धारीं पुत्रकैसाउपजेल ८ व्यासह्मणेसुतसुलक्षण नवनागसहस्त्रबळीपूर्ण प
रीइणेंझांकिलेनयन पुत्रअंधहोईल ९ सत्यवतीह्मणेकर्मगहन अंधासकायराज्या
सन मगह्मणेसुताकृपाकरून अंबालिकेसपुत्रदेई १० निकेंह्मणूनपराशरनंदन त
त्काळपावलाअंतर्धान तोंधृतराष्ट्रजन्मलाचक्षुहीन नयनागसहस्त्रबळी ११ पुत्रदे
खतांदृष्टी सत्यवतीजालीकष्टी मगह्मणेकैसीकरावीगोष्टी धांवेजगंजेठीव्यासदेवा
१२ तत्काळप्रगटलाकृष्णद्वैपायन बैसलाएकांतींजाउन अंबालिकाशृंगारकरून
व्यासाजवळपातली १३ नृसिंहदेखतांइंदिरा कापूंलागलीथरथरा तैसीभोगाप्रव
र्ततांसुंदरा व्यासतेजनसोसे १४ शरीरजलेंपंडुरवर्ण बाहेरआलाभोगदेउन माता
ह्मणेबोलेवचन सुलक्षिणीकपुत्रकैसा १५ परमसुलक्षणराजपुत्र होयीलधर्मात्माअति
पवित्र मातेचादोषेंशरीर कर्पूरवर्णहोयील १६ धृतराष्ट्रासशतपुत्र पंडुसहोतील
पंचकुमर त्यापांडवांसश्रीकरधर साह्यहोयीलसर्वस्वें १७ व्यासस्वस्थानासपाव
त पुढेंअंबालिकाजालीप्रसूत कर्पूरगौरतैसासुत पंडुराजजन्मला १८ सर्वलक्षणी
संपूर्ण परिबाळदेखतांपंडुरवर्ण स्मरेव्यासालागुन तत्काळप्रगटलाजगद्गुरु १९

ह्मणेएकअंधएकपंडुरवर्ण अंबिकेलापुनःभोगदेउन तृतीयपुत्रसुलक्षण नि
र्मिआतांगुणालया २० एकांतींबैसलेंकानीन कुमारिदशेजालाह्मणोन काननीह्म
णेव्यासालागुन अर्थपूर्णतोचिअसे २१ अंबिकेससांगेसत्यवती तूंजायधैर्यधरीए
कांती अवश्यह्मणोनदासीप्रती शृंगारकरूनपाठविलें २२ नेजनसोसेआपणासी
ह्मणोनपाठविलेंदासीसी तंवतेआनंदमयमानसी सुरतानंदेंरिझविते २३ नधरीउग्र
तेचेंभय कायावाचामनेपाहे संतोषविलेऋषिवर्य स्तवनअंगमर्दनें २४ परिचारि
काज्ञानीहीन हृदयींनिर्मळशुद्धमन दोघीपरीसतिचान सुखीजालाव्यासदेव २५
बाहेरअलाकानीन मातापुसेपुत्रालागुन तोह्मणेभक्तराजपूर्ण होयीलपरिक्षेत्रपा
लटलें २६ आतांसिमाजालीयेथून गुप्तजालाद्वैपायन पुढेंविदुरजन्मलापूर्ण त्रिकाळ
ज्ञानीभक्तजो २७ सर्वगुणींपुर्तो जन्मलाऐसाक्षत्ता धर्माचाअवतारतत्वता विवे
कीआणिनिपुणपै २८ मांडव्येंशापदिधला ह्मणोनिदासीउदरींजन्मला जन्मेजय
ह्मणेतेवेळा शापाचाकोणहेतु २९ वैशंपायनह्मणेएकसादर मांडव्यमहाराजमुने
श्वर तरुतळींउभानिरंतर एकचरणीएकवचनी ३० उर्ध्वबाहूअहोरात्र तोंनृप
भांडारींपडलेतस्कर वस्तहरित्याअपार पळतीसत्वरतेथूनी ३१ पाठीधांवतीरा
जदूत तस्करजालेभयाभीत ऋषीचेपाठींलपत संकोचितेहोउनियां ३२ मांड
व्यहेंकांहींनेणे तंवतेथेंआलेंधावणें चोरसंग्रहिलेयेणें तापसीवेषेंचोरहा ३३
तस्करांसहितमांडव्यासी मारीतआणिलेराजद्वारासीं शूळींघातलामहाऋषी त
स्करासहितेराजाज्ञें ३४ शूळींघातलातपोधन परियोगबळेंरक्षिलापूर्ण तैसाचकरी



अनुष्ठान शूळींआसनचळेना ३५ तोंपक्षीवेषेंसर्वेदमुनी पुसतीमांडव्यालागुनी
कोण्याकर्मेंकरुनि पावलासीदुःखातें ३६ येरुह्मणेअन्यायनसतांमातें शूळींदिधलें
नृपनाथें हेंसांगतीराथातें ऋषीनेणतादंडिला ३७ राजाधांवलासहपरिवारीं मांडव्य
देखुनरुदनकरी ह्मणेअपराधनेणतांनिर्धारीं मजघडलाऋषिवर्या ३८ मगसूत्रधारी
आणुनी शूळकाढिलाकर्वतूनी ऋषितत्काळदेहत्यागुनी यमपुरीसपातला ३९ यमा
सह्मणेतेवेळीं मजकांतुवांदिधलेंशूळीं येरुह्मणेपतंगींकांघातली कंटकाग्रातुवां
पूर्वी ४० त्यादोषेंसबळ तुजप्राप्तजालाशूळ ऋषिकोपलातत्काळ शापदेततयातें ४१
दोषवडुतलहान मेरूऐसानदंडगहन परमहिंसकतूंदुर्जन जगद्भक्षकादुष्टात्म्या ४२ दासी
पोटींहोतुजजनन वर्तेसीदरिद्रेंकरुन यमधरीमगचरण उःशापवचनबोलावें ४३ उ
पजगीव्यासवीर्येंकरुनी परीमहाभक्तत्रिकाळज्ञानी रतहोशीलकृष्णभजनी पंडिताचार्य
विवेकी ४४ ह्मणोनिमहाज्ञानीविदुर व्यासवीर्येंधर्मावतार पुढेंकथापरमसुंदर ब्रह्मानंदेंप
रिसिजे ४५ ब्रह्मानंदायतिवर्या श्रीधरवरदापंढरिराया पांडवपाळकाकरुणालया जगदे
द्वागन्गद्गुरु ४६ सुरसपांडवप्रतापग्रंथ आदिपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ
षष्ठाध्यायींकथियेला ४७ स्वस्तिश्रीपांडवप्रतापग्रंथ आदिपर्वटीकाश्रीधरकृत वंशाव
ळीभीष्माचीजन्ममात धृतराष्ट्रपंडुविदुराची ४८ इतिश्रीपांडवप्रतापआदिपर्वषष्ठोध्या
यःसमाप्तः॥ श्रीः ॥ श्रीः ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ ७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥


कुंती
यम
वायु
इंद्र
अश्विनीकुमार

श्रीगणेशायनमः श्रीकृष्णनाथायनमः पुण्यतोयगुह्यगुण अप्रमेयचारीवस्तपूर्ण भा
रतसमुद्रगोरूनारायण अंतनकळेशोधितां १ जन्मेजयह्मणेवैशंपायना विचित्रवीर्याचाअं
गना तिघेपुत्रप्रसवल्याजाणा पुढेंरचनाबोलकैशी २ येरूह्मणेंतिघेपुत्र व्यासवीर्यपरम
चतुर विद्याअभ्यासपरमअपार भीष्मकरवीतयातें ३ पंडुधृतराष्ट्रदोघेजण जालेवेद
शास्त्रप्रवीण सकळविद्येविषयींनिपुण विदुरज्ञानीसाधूतो ४ चौदाविद्याचौसष्टकळा
धनुर्वेदमंत्रमाळा अस्त्रविद्यागुणागळा पंडुराजनिपुणतो ५ यथाकाळींमेघवर्षती अष्टा
दशधान्येंपिकती वृक्षींसदांफळेंविराजती नाहीगणतीउद्याना ६ त्रिकाळगाईसक्षीर शो
धितांतिळभरीनाहींदरिद्र आधिव्याधिरहितसमग्र प्रजाअपारसुखेंसदां ७ चारीआश्रम
चारीवर्ण सर्वविद्येंतसकळनिपुण कोणासहीनसेमरण हरिकीर्त्तनघरोघरीं ८ वेदशास्त्र
ध्वनीं ब्राह्मणगर्जतीदिवसरजनीं पतिव्रतासकळकामिनी पुरुषस्वपत्नीरतसदा ९ प्रजाऋ
षिप्रधानउत्तम त्यांसपुसेयेकांतींभीष्म राज्यासयोग्यपरम कोणअसेसांगपां १० अंधलें
उणाधृतराष्ट्र क्षेत्रविरुद्धउणाविदुर सकळह्मणतीराज्याधिकार पंडुरायासीदेईजे ११ सर्व
विषयींचतुरविदुर भीष्मपुसेक्षणक्षणांविचार कनिष्टह्मणोनिअव्हेर सहसाहीकरीना
१२ प्रबुद्धजालेतरुण आतांकरावें यांचेंलग्न सकळकर्त्तागंगानंदन विचारकरीविदुरा
सी १३ चित्रपटींरेखिल्यातिघीजणी बहुतवाखाणिल्याविचक्षणीं येकगांधारीसौवळनंदि
नी वसुदेवभगिनीकुंतीदुजी १४ मद्रदुहितामाद्री तिघीविख्यातपृथ्वीवरी विदुरह्मणेंमाझे
विचारीं योग्यतिघीयांचपें १५ भीष्मासांगतीऋषेश्वर गांधारीनेंअर्चिलाअपर्णावर शत
पुत्रहोतीलनिर्धार दिल्हावरत्रिनेत्रें १६ भीष्मऐकतांसंतोषत ह्मणेवंशवृद्धीव्हावीबहुत

प्रज्ञाचक्षूतेंनिश्चित भार्यातीचकरावी १७ पुरोहितसुबुद्धपाठविला गांधारपतिसभेटला
भीष्मवाक्यतेवेळां शिरींवंदीआवडी १८ अंधत्वदोषनधरूनचित्तें कन्यानेमिलीधृतराष्ट्रातें
गांधारीनेंऐकतांगोष्टते पदरनेत्रानें बांधिला १९ सेनेसहितशकुनी रथींबैसउनआपुलीभगि
नी कुंजरपुरानेउनी देतसुलग्नींअंधातें २० चारदिवसउत्साहथोर याचकसुखवीकेलेफार
अंदणदिधलेंसाचार कुबेरसंपत्तिसारिखें २१ परमपतिव्रतागांधारी सौंदर्यासउणीनिर्ज
रनारी पतिसेवेंसादरअहोरात्रीं वाढवीप्रीतीविशेष २२ आतांशूरसेनवसुदेवपिता कुंती
जाणतयाचीदुहिता स्नेहवादेंकन्यात्वता पंडुरायादिधलीती २३ पितृगृहींअसतांकुंती
तोंउदयापावलागभस्ती अनुसूयानंदनगृहाप्रती दुर्वासमुनीपातले २४ कुंतीपित्यानेंठेवि
लीमंदिरीं कुंतीअहोरात्रसेवाकरी जेंजेंमागेजाअवसरीं तेंतेंदेउनतोषवित २५ संतोषोनअ
त्रिपुत्र कुंतीसवोपिलेपंचमंत्र कर्णींसांगोनपवित्र मस्तकींहस्तठेविला २६ अपधर्महोतांप्रा
प्त पंचमंत्रेंस्वरुपदैवत दिव्यतेजेंप्रगटत पुत्रदेतीसुरलें २७ मित्रआणिपवन वीडौजअ
श्विनौकुमरपांचजण जात्वेंकरशीआवाहन होईलप्रसन्नदैवततें २८ व्यासबीजप्रणवध्यान
हृदईधरीकुंतीआपण लोभीजीवेसिंआवरीधन तेविजतनकरीसदां २९ आश्रमासगेलादु
र्वासमुनी एकेपर्वकाळींदेवत्तटिनी तिराआलीकुंतीकामिनी दुजेंकोणीनसेतेथें ३० ह्मणेमं
त्राचीपाहूंप्रतीत जपेंआवाहनिलाआदित्य तोंप्रत्यक्षसवितामूर्त्तिमंत उभाठाकलातत्काळ
३१ अर्कह्मणेंकुरंगनयनी कांपाचारिलेंनितंबिनी येरीघाबरलीअधोवदनी मंजूळवाणीबो
लत ३२ कोणासहीनकळत मजवरूनव्हावेंगुप्त नभंगावेंकुमारत्व नव्हावेंश्रुतउभयपक्षीं
३३ कुंतीसह्मणेंआदित्य गांठींमहत्पुण्याचेपर्वत तेंकांमाझेंदर्शनसत्य भाग्यअद्भुततुझें

अ० १ हे ३४ माझासंगहोनांजाण कुमारत्वनभंगेपूर्ण पुढेंमहाभूभुजयेउन तुजवरीलआदरें अ० १
३५ मगकुंतीसदिधलीमेदी स्मरतमदेंपडलीमिठी पुत्रउपजलातत्काळपोटीं मतिसूर्यदुस
रातो ३६ किरीटकुंडलेंकटीमेखळा सर्वभूषणेंतेजागळा स्रुवर्णकवचस्वयंभूलेइला तेजदश
दिशानसमाये ३७ भयआणिसंतोष कुंतीअंगींउपजेविशेष स्वस्थानागेलाचंडांश सशंकि
तकुंतीमनीं ३८ बाळटाकुनीगंगाजीवनीं कुंतीप्रवेशलीपितृसदनीं बाळानबुडवीकदापिपा
णी रक्षितीजालीजान्हवी ३९ उत्तुंगलहरीउसळत त्यावरीचंबाळअसेखेळत तोंराधापतिकिरा
त प्रीतींउचलीबाळातें ४० कडेघेतलाबाळसत्वर उचंबळलास्नेहसमुद्र रुंजीघालितीनेत्र
भ्रमर मुखकमळींतयाचा ४१ पाहतांबाळकाचावदना पूर्तीनपावेकिरातनयना बोलाउं
नराधाअंगना वोटींघातलातयेचे ४२ राधेनेपाळिलेंतयातें ह्मणोनिराधेयह्मणतातयातें
वसुसेननामकीरातें ठेविलेंसाचेंआवडी ४३ साक्षात्कारेंकरुन ऋषिकरवितीवेदाध्ययन
धनुर्वेदसिकलापूर्ण जालानिपुणवेदशास्त्रीं ४४ अर्जुनापासूननव्हावामृत्य ऐसेंजाणोनियां
आदित्य सूर्योपस्थानपुत्रजपत प्रगटेअर्कत्यापुढें ४५ कर्णाचेकर्णीसांगत सूर्योपस्था
नजपीनित्य याचकदेखतांत्वरित उदारहोईसर्वस्वें ४६ परिआंगींकवचजडलेंअहर्निशीं तें
सहसानेदीकोणाशी शत्रूशस्त्रेंनिश्चयेसी मरणनुजनव्हेकदा ४७ ऐसेंसांगूनतेवेळीं स्व
स्थळागेलाअंशुमाळी असोमहाउदारकर्णबळी सुर्यउपासकनिश्चयें ४८ आपुलापुत्रपा
र्थ अनुष्ठानींबैसलासूर्यसुत इंद्रधरुनीहेंमनांत कर्णाआलाछळावया ४९ ब्राह्मणरूपधरु
२ नमघवा ह्मणेंकर्णरायासुदेवा दीनवचनेंमागतोंयेधवां कवचेंदेईअंगिचीं ५० दधिचीनि
जहस्थीप्रत कपोत्यासशिब्रीमांसदेत त्याहूनतूंदाताअद्भुत देईकवचेंअसई ५१ ऐसेंऐकतां

वचन महाराजउदारअर्कनंदन त्वचेसहितकवचकाढुन ब्राह्मणासदीधलें ५२ आश्चर्यक
रीनिर्जरपती प्रसन्नहोउनदिधलीदिव्यशक्ती ह्मणेंसंकटमांडल्याप्राणांतीं समरंगणीप्रेरावी
५३ ऐसेंबोलूनदेवराणा गेलाआपुलेस्वस्थाना कर्णाचियाउदारपणा तुळनानाहींत्रिभुवनीं ५४
मंत्रअस्त्रेंशस्त्रेंमंडित दुजानाहीरणपंडित धनुर्धरामाजीविख्यात जामदग्नीदुसरातो ५५
ज्याचेसौंदर्यपाहतांअद्भुत लाजूनिगेलारतिकांत चंद्रअधोवदनीहोत कर्णस्वरूपदेखुनी ५६
स्त्रियादृष्टींदेखतांकर्ण अंगींच्यातत्काळद्रवेमदन उपमेएकरुक्मिणीरमण मगदुसरानसेची
५७ क्षत्रियासविद्यादान कदानेदीजामदग्न धनुर्वेदपहावयापूर्ण कर्णगेलाविप्ररूपें ५८
नमस्कारूनतेवेळीं पुढेंउभाबद्धांजुळी रेणुकानंदनह्मणेंतेकाळीं बोलेंवर्णकोणतुझा ५९
येरूह्मणेंमीश्रेष्ठवर्णदेख राहेह्मणेंभृगुकुळटिळक कविगुरुसमानत्याचातर्क विद्यासकळशि
कलातो ६० इंद्रचिंताकरीमनांत पार्थासहापुढेंअनर्थ अपाययोजीअमरनाथ तोंअपूर्ववर्त्तलें
६१ कर्णाचेंअंकींदेख शिरठेउनीक्षत्रियांतक निद्रालागलीमुहूर्त्तएक तोंशचीनायकपातले
६२ खालेंभ्रमरहोवूनतेअवसरीं काष्ठवत्कर्णाचीमांडीकोरी रक्तप्रवाहचालिलाधरणीवरी
परीनहालेअनुमात्र ६३ मांडीअवघीकोरूनक्षोभें भार्गवाचेकर्णासझोंबे जागाजालासवेगें
तोंरक्तप्रवाहदेखिला ६४ कर्णासह्मणेंयेवदाधीर धरिलासितूंनव्हेसिभूसुर महाक्षत्रियपर
मधीर नामसांगेआपुलें ६५ येरूह्मणेंमींवीरकर्ण मगह्मणेंरेणुकानंदन तुझेकीर्तीनेंभरलें
त्रिभुवन उदारपणअगाध ६६ क्षत्रियांसविद्यापाहीं मीसर्वथादेतनाहीं तूंचोरूनशिकलासि
लवलाहीं परीशेवटींनिर्फळ ६७ तुझीविद्याभिरवेलसर्वगई परिपार्थापुढेंनिर्फळसर्वही
आज्ञामागोनिकर्णलवलाहीं स्वस्थळासीपातला ६८ सिंहावलोकनेंकरुन मागेंपाहाकथा

प्र नुसंधान पंडूचें आरंभिलें लग्न ऐका कथानक श्रोते हो ६९ पद्मनाभ पद्मजजनक त्याचे प अ
दपद्मीं उद्भवली देख तीचा तनय भीष्म सुरेख विचार करी विदुरासी ७० कुंतीभोजापासी
ब्राह्मण साधावया लग्न कारण पाठवीत गंगानंदन सुलग्न मुहूर्त पाहोनी ७१ कुंतीभोजास
भेटला विप्र सांगे सर्वही समाचार ह्मणें धन्य भाग्य साचार पंडु जामात जाहला ७२ वसुदेव
पिता शूरसेन कुंती संगें ला घेउन पंडु सहित गंगानंदन तेथें आला दळभारें ७३ विधियुक्त जा
लें लग्न दिधलें अपार अंदण हस्तनापुरा परतोन वोहरें घेउन पातला ७४ यावरी पंडूस अं
गना दुसरी भीष्म करी ते अवसरीं मद्ररायाची माद्री परम सुंदर पृथ्वींत ७५ भीष्में पाठवि
ला पुरोहित कन्येसहित मद्रनाथ गजपुरास येउन त्वरित विधियुक्त लग्न केलें ७६ विदुर अ
नुमतें गंगानंदन अश्वमेध आरंभी यज्ञ अपार दळभार घेउन पंडु चालिला दिग्विजया ७७
जगतीस सेना वसन नेसउन जिंकील संपूर्ण भीष्म भयें करुन करभार देती भूभुज ७८ छ
पन्न देशींचे राजे सहज जिंकित जात पंडुराज कोणी युद्धासी बांधिती पैज हारी येतां भेटती
७९ कोणी नाम प्रताप ऐकोन अगोधर भेटती येउन अनर्त देशिचा नृप पूर्ण बलभीम जिं
किला ८० शाकलद्विपिंचा प्रतिधान गंधर्व देश जिंकिला संपूर्ण सवा लक्ष पर्वत घेउन राजे
सांगातें चालविले ८१ हिमवंत स्वेत पर्वत किंपुरुषखंड जिंकिले समस्त गोरक्ष पर्वत सुवर्ण
प्रसवत द्रव्य अमित मेळविलें ८२ जेथिंचा पाट निश्चित शरयू आयुध्ये पुढें विराजत ते
मानससरोवर अद्भुत पंडु विस्मित देखतां ८३ दिव्य रत्नाचा खाणी तेथें प्रवाळ वल्ली तेजाद्भुत
गजमोती पसरली बहुत जेवीं गगनीं उडगणें ८४ करीशावक खेळती कस्तुरी मृग विराज ३
ती कर्पुर कर्दळी डोलती कोकिळा कुंजती सुस्वरें ८५ जासजे आवडे वस्त ते अवश्य याची

तेथ सागर वलयांकित पृथ्वी समस्त पंडु नृपनाथें जिंकिली ८६ एवं दिग्विजय करून समस्त
गजपुरा आले पंडु नृपनाथ दळभारेंसी गंगासुत भेटावया जात सामोरा ८७ समोर देखतां देव
व्रत पंडु रथा खालें उतरत भिष्माचीं पदाब्जें नमित आलिंगिती आवडी ८८ पंडुसहित देवव्र
त मिरवत आले गजपुरांत सत्यवतीस नमुन सांगत वर्तमान सर्वही ८९ द्रव्य रत्नें अळंकार
वस्त्रू आणि त्या अपार नगरांत न मावे मग बाहेर पर्वताकार रचियेल्या ९० मग धृतराष्ट्राचे हा
तीं शतयाग करवी पंडु नृपती तो पसारा सांगतां नाही मिती पुढें ग्रंथ परिसिजे ९१ यावरी पं
डु नृपनाथ उभय दारां समवेत मृगया मिषें वास करित कानमामाजी स्वइच्छें ९२ हिमवंत गि
रिचे पाठारीं कित्येक दिवस वास करी उभय दारां समवेत कांतारी क्रीडा कौतुकें विचरत ९३ भो
ग सामग्री समस्त प्रज्ञाचक्षु पुरवित लेह्य पेय खाद्य चोष्य बहुत भक्ष भोज्य षड्रसपैं ९४
शुष्क सुपक्क स्निग्ध विदग्ध हीं चतुर्विध अन्नें प्रसिद्ध धृतराष्ट्र करूनि पाठवी सिद्ध दूतां हा
तीं सर्वदां ९५ महापार्श्व राजनंदिनी भिष्में आदरें आणुनी विदुरास केली पत्नी यथासांग
विवाह ९६ तिचे पोटीं परम चतुर विनय नामें जाहला कुमर पिता या तुल्य विवेक समुद्र सारा
सार जाणता ९७ धृतराष्ट्रास शत पुत्र होते जाले महावीर वैश्या गर्भीं जन्मला निर्धारें युयुत्स
व यावेगळा ९८ पांच देवांचे वीर्यें वनांत पंडुस जाले पांच सुत धृतराष्ट्रास एक शत ए
कदांच जाहले ९९ जन्मेजय ह्मणें वैशंपायना तीक्ष्ण प्रज्ञा कुठार धरणा संशय कानन खंड
ना कथा कैशी सांगिजे १०० एकदांच शत पुत्र गांधारी कैशी प्रसवली कोणे परी पंच पु
त्र कुंतीचा उदरीं देव कैसे अवतरले १ मग ह्मणें वैशंपायन एकदां गांधारीची भक्ती देखू
न प्रसन्न जाले कृष्णद्वैपायन ह्मणें शत पुत्र तुज होती २ व्यास वदोन गेलिया वरी गर्भि

णीझालीगांधारी पंचविंशतीमासावरी प्रसूतनोहेसर्वथा ३ तोंवार्तासांगतीविप्र कुंती-
सजालेपुत्रयुधिष्ठिर जैसाउदयाचळींबाळमित्र तेवितेजस्वीजन्मला ४ ऐसेंऐकतांगांधा-
री ईर्षाउपजलीभारी अंधासनकळतांनिर्धारीं उदरींताडितीपाषाण ५ तोंलवथवीतरक्त
वर्ण पिसवीपडलीपोटांतुन जालेंदेखोनिगर्भपतन सौबळीरडेआक्रोशें ६ जालाथोरआकां
त तोंव्यासपातलेअकस्मात ह्मणेंमाझेंवचननव्हेव्यर्थ चिंताग्रस्तहोउंनको ७ उदकेंकरु
नीप्रोक्षित तोंशतभागजालेतेथें फणसगर्भींचेगरेनिघत तैसेंनिवडतवेगळे ८ अंगुष्ठ
पर्वप्रमाण शतकुंभींघृतभरुन त्यांतघातलेभिन्नभिन्न व्यासदेवआज्ञेनें ९ शतपुत्रांवरी
त्यांतचीनिघालीएककुमारी दुःशिळानामेंनिर्धारीं परमप्रियसर्वांतें १० व्यासदेवेंमंत्रुन ये
कांतींकुंभठेविलेनेउन कुंभाप्रतीदीपठेउन रक्षणनारीबैसविल्या ११ नवमासभरतांपूर्ण
प्रथमउपजलादुर्योधन रासभध्वनीऐसापूर्ण टाहोफोडिलातेकाळीं १२ मेघवर्षेरक्तधारीं
प्रळयवायूसुटलातेअवसरीं थरथरांकांपेधरत्री आलेशाहरेजनातें १३ दिक्दाहहोतके
सा शून्यजाल्यादशदिशा दिवाभीतेंबोभाटतीदिवसा श्वानेंरडतीदीर्घस्वरें १४ गर्जनाऐ
कतोअंबरीं रासभटाहोफोडितीनगरीं भालुकाथुंकतीवोखट्यास्वरीं गजपुरींतीगजबज
ली १५ भविष्यसांगतीऋषिसकळी वडीलसुतसर्वांचेमुळीं करीलस्ववंशाचीहोळी सकळ-
रायासमवेत १६ महाविष्णुशींकरीलद्वेष दीर्घदुःखदेईलवडिलांस परमाग्रहीतामस
कोपसागरदुरात्मा १७ नायकेश्रेष्ठांचेंवचन यावरीबोलेविदुरसूजाण प्रज्ञाचक्षोऐकव
चन त्यागकरींज्येष्ठाचा १८ वांचवणेंअसेलआपलेंकुळ तरिहाटाकावाचांडाळ जैसाबोटा
सडंकितांव्याळ बोटतत्काळखंडिती १९ त्यागूनमोहअनुमान गंगाजळींदेईटाकुन सर्वां



चेंहोईलकल्याण आनंदघनलोकहोती १२० हृदईआलिंगुनदुर्योधन धृतराष्ट्रबोलेगर्जोन
मींतुमचेंवचनप्रमाण कदापीहीनायके २१ मुख्यधुरंधरवडीलनंदन मीत्यावरूनवोवाळी
नप्राण अरिष्टेंउदयतीकाळेंकरुन शांतआपणहोतीतीं २२ असोदुर्योधनजन्मलायेरीती
मगएकामागेंएकनिपजती परमपुष्टबलाढ्यहोती धार्तराष्ट्रअवघे २३ गांधारीअसतांग
र्भिण रायासपीडितांमीनकेतन अंधेंकेलेंवेश्यागमन तोयुयुत्सुजन्मला २४ असोइकडे
पंडुराजवनीं मृगयाखेळतांदिव्यकाननीं मृगमृगिसींसुखेंमैथुनीं क्रीडतांवेधुनपाडिला २५
तवतोकुरंगरूपतापसी पंडुधांवोनआलात्यापासीं ऋषिह्मणेरेपापराशी महाहिंसकपापि
ष्टतूं २६ मैथुनींजोगुंतला कींभोजनाबैसला दुश्चितपाठमोरानिजला वधितांक्षत्रियांस
कळंकतो २७ कुरंगकरीहहःकार मीकर्दमनामाजाणविप्र लोकत्रांकेसाचार मृगवेषध
रियेला २८ पूर्णनहोतांमैथुन पापियाघेतलाआमचाप्राण राजाह्मणेंम्यानेणोन मृगह्म
णोनवधियेला २९ विप्रह्मणेंघेशापदारुण तुजस्त्रीसंगहोतांयेथुन तत्काळचीजातीलप्रा
ण पळमात्रनलगतां ३० ऐसेंबोलोनिदोघीजणीं प्राणदिधलेतेचक्षणीं पंडुराजउद्विग्न
मनीं म्लानजालाअतिदुःखें ३१ ब्रह्महत्येचेंपापपूर्ण वरिविशेषअंतरलेंमैथुन दोघीस्त्रि
यांसपाचारुन वर्तमानसर्वसांगे ३२ आक्रोशेंबोलेनृपवर मजकायकरावाराज्यभार
तुह्मांऐशास्त्रियासुंदर कायकरावेंमजआतां ३३ मजकायआतांहस्तनापुर मजकासया
वस्त्रेंअळंकार व्यर्थगेलाजन्मसंसार नाहींपुत्रसंतानही ३४ आतांतुह्मींदोघीनगरासीं
जावेंसत्यवतीपाशीं अंबिकाअंबालिकानेजोराशी त्यांसमीपअसावें ३५ भीष्मआणी
विदुर यांचीशेवाकरावीसादर तुमचाआमचानिर्धार ऋणानुबंधतुटलाकीं ३६ मीसेवीन

अ० ५

दुरकानन देहअनुतापें दंडिन पावेन परलोकसदन तें साधन करीन मी ३७ तों कुंती आ
णि माद्री विनविती त्या जोडल्याकरीं आह्मी सेवा करून अहोरात्री जवळी राहूं शिष्पलें ३८
आह्मी दारा तूं कांत हे भाव विसरोन समस्त अष्टभोग टाकून रत होउं सेवेशीं शिष्पलें ३९
त्याचें ऐकतां निश्चय वचन अवश्य ह्मणे अंबालिकानंदन चित्रीची नारी नर जाण तैसीं व
र्तूं लागली ४० आपलीं वस्त्रें भुषणें समस्त पंडु ब्राह्मणा काढून देत जैसा चंपक सुमनें व
र्षत उदारत्वें पांथिका ४१ बांधूनियां वल्कलांबर भस्में चर्चिलें कलेवर ऐसा देखून पंडु नृ
पवर कुंती माद्री काय करी ४२ आम्रवृक्ष आपली पाडा येतां फळें सकळी टाकी तेंवी टा
किली वस्त्रें भुषणें त्यांनी ४३ पाचारून ऋषेश्वर वांटी वस्त्रें अळंकार वेढूनियां वल्कलां
बर पतिसन्निध तिष्ठती ४४ चातुरंग दळ बहुत त्यास आज्ञापी नृपनाथ गजपुरा जाऊन
समस्त भीष्म धृतराष्ट्रा सांगिजे ४५ आमचा ऐसा जाहला विचार आपुला सांभाळी राज्य-
भार आतां भेट हे निर्धार साधूं परत्र यावरी ४६ रुदन करीत गेले समस्त जाणविती
भीष्म धृतराष्ट्रांत वर्षला एकचि आकांत शोका अंत नाही तेथें ४७ इकडे घेऊन उभय पत्नी
पंडु प्रवेशे महाकाननी वल्कलें वेष्टून तृणासनीं शय्या करती उघडेची ४८ नागेश गिरी
वोलांडून विलोकिती चैत्ररथ वन काळकुट गिरिवरी जाण दारासहित वोळघला ४९ पु
ढें हिमाचळीं वास करिती जेथें दुग्धवर्ण भागीरथी जीचा बिंदुमात्रें उद्धरती महापातकी हिंस
क ५० तेथें तापसांचें वृंद गांइ गांई होती आनंद पुढें इंद्रद्युम्न सरोवर अगाध पंडुराव पा
हातसे ५१ पुढें स्वर्गासी लगटला शतशृंग पर्वत देखिला जेथें ऋषींचा वसे मेळा वेदध्वनीं
गर्जती ५२ जेथें दिव्यवृक्षीं सदा फळ गंधर्व गायन निर्मळ जें ऐकतां मंजुळ पंचप्राण तोषती

५३ जेथें चंद्र सूर्यकांत पाषाण विमानी दिसती सुरगण भूमिका सुवर्णसमान नवरत्न
वाळुका जेथें ५४ जेथें मणिमय मंडप झळकती अष्टनायका सदां क्रीडती प्रत्यक्ष वेदाच्या
मूर्ति येती जाती सर्वदा ५५ असो संतसंगती नृपनाथ श्रवण मननें काळ क्रमित उभय का
ळीं होम देत अतिथी पुजा यथाविधी ५६ देखोन पंडुचें तप खडतर ऋषि आश्चर्य करिती-
थोर मोठा तपस्वी पंडु नृपवर ब्रह्मऋषी सारिखा ५७ तपोबळें करून वेगें ऋषि चालिले
स्वर्गमार्गें पंडू त्यांचेच संगें चाले मागें हळुहळू ५८ ऋषि पंडुस ह्मणती समस्त परम क
ठिण स्वर्गपथ महापुण्याचे पर्वत गांठिसी त्याणेंच चढावे ५९ येथें ढावन चले मन पवनासी
तूं दारासहित केवि येसी त्याहीवरी निपुत्रिकासी मार्ग सहसा फुटेना ६० देव ऋषि दारा पित
र यांचे ऋणांतून मुक्त साचार तोच येथें चढला नर इतरां मार्ग न चले हो ६१ आतां नाना
उपाय करुन वाढवीं आपुलें संतान जैसें द्वैपायनापासून आलें जनन तुमचें तें ६२ उद
रीं होतील सुत ते सत्क्रिया आचरतील समस्त मग शापापासून होउन मुक्त स्वर्गपथें चा
लावें ६३ ऐसें ऐकोन गजपुरपती खेद पावला परम चित्तीं नमस्कारून ऋषिपंक्ती स्त्रियां
सहित परतला ६४ येकांत वनीं बैसोन कुंती प्रती बोले वचन तूं महाऋषी सप्रार्थून संत
ती वाढवावी माझी ६५ शंका न धरावी मनांत आह्मीं जालों व्यासापासून तैसेंच तूंही क
री त्वरित तरीच मुक्त तुह्मी आह्मी ६६ शास्त्रीं सांगीतले विचार बहुपरीचे असती पुत्र
त्यांत ऋषिवीर्य पवित्र दिव्य सुत उपजवी ६७ कुंती ह्मणे पित्याचे घरीं असतां बाळपणीं
निर्धारीं दुर्वासदेवाची सेवा करी पितृआज्ञें करूनियां ६८ सेवेनें संतोषले अत्रिपुत्र म
ज दिधले पंचमंत्र पुढील भविष्य जाणता पवित्र महाउदार ऋषी तो ६९ एकमंत्राची प्रचीत

पाहिलीकुमारदर्शन प्रसन्नजालाआदित्य कर्णतत्काळजन्मला ७० तोंराधेचेघरीं वाढेपु
त्र आतांउरलेचारमंत्र तुमचीआज्ञाहोईलपवित्र तरीबाळजन्मवीन ७१ ऐसेंऐकतांपंडु
राज हृदईंधरिलीतत्काळभाज ह्मणेतूंचउद्धरसीमज उभवींध्वजसोमवंशीं ७२ दरिद्रीया
सजोडलेंधन. मरतीयासअमृतपान कींजन्मांधासआलेनयन तैसापंडूसंतोषला ७३
तृषाक्रांतसोडितांप्राण मुखीं घालिजेशीतळजीवन कींदुकळआलियादिव्यान्न पंडुतैसा
आनंदला ७४ असोतेपृथादेवीआपण सारुनियांगंगास्नान करूनपंडुरायासनमन क
रीआवाहनधर्माचें ७५ आदरेंजोडूनियांहस्त नेत्रलाऊनमंत्रजपत तोंसूर्यप्रभेसमअ
कस्मात सूर्यरूपउतरला ७६ दिव्यअंगकनकवर्ण किरीटकुंडलेंकनकवसन कनकांग
देंवोपदेतीपूर्ण कनकदंडकमळकरीं ७७ कुंतीचेपरमदिव्यस्थानीं रूपरतकरितांभास्कर
नंदनी वीर्यपडतांतेचक्षणीं युधिष्टिरजन्मला ७८ गगनीवाणीदेवगर्जेत सार्वभौमहा
होईलसत्य पुण्यश्लोकदयावंत धर्मपुत्रधर्मात्मा ७९ गांधारीगर्भिणीअसतां वर्षएक
पूर्णभरतां धर्मजन्मलातत्वता कुंतीउदरींअगोधर ८० तिथिवारनक्षत्र शुभकर्णयोगप
वित्र सोमवंशपंडुपुत्र छत्रपतीजन्मला ८१ धर्मराजदेखोनदृष्टी पंडुचाआनंदनमावेसृ
ष्टीं ह्मणेयासपाठिराखाउठाउठी वल्लभेवेगेंप्रसवेंकां ८२ यावरीवसुदेवभगिनी वायुमं
त्रजपेतेक्षणीं लोकप्राणेशयेउनी रूपरतयुक्त्याप्रवर्त्तला ८३ रूपरतसंपतांसमग्र पुत्रएक
बळसमुद्र तेजस्वीजेसाभास्कर भीमसेनजन्मला ८४ मातृहस्तींनमावेबाळ हातींचानि
सटलातत्काळ खालेंपडतांसबळ शीळाचूर्णजाहली ८५ सिंहगर्जनेऐसाटाहोगर्जत कुं
तीथरथरांभयेंकांपत गगनींदेवभारीविस्मित होतपुष्पवृष्टीतेव्हां ८६ देववाणीगर्जे

त वळियाबाळपंडुरूत पुर्विंएकहनुमंत भीमसेनदुसरातो ८७ पूर्वीऐसाजाहलानाहीं
पुढेंकदांनहोयपाहीं दैत्यराक्षससर्वही संहारिलेनिजबळें ८८ याचेबळेंसर्वेश्वर उतरील
सकळभूभार भविष्यऐकूनपंडुनृपवर परमानंदपावला ८९ मगह्मणेंअंगनेप्रती आतां
प्रार्थीअमरपती एकवर्षपर्यंतनिश्चिती मीआराधीनइंद्रातें ९० ऊर्ध्वजोडूनपाणी उभारा
हिलाएकचरणी पृथेसहितअनुष्ठानीं एकवर्षपर्यंत ९१ मगप्रगटलेदेवराज कांकामि
नीबोलाविलेंमज येरीह्मणेंपुत्रदेतेजःपुंज कौसल्यादेवकीसारिखा ९२ पाकशासनह्मणेंकु
रंगनयनी बोलशीत्याहूनविशेषगुणी उपमेसएकचक्रपाणी ऐसापुत्रदेईन ९३ कुंती
आणिअमरपती रूपरतानंदींनिमग्नहोती तोंनरेश्वरदिव्यमूर्त्ती पार्थजन्मपावले ९४ नरआ
णिनारायण द्विधारूपेंरमारमण भूभारउतरावयालागुन मृत्कलोकीं अवतरले ९५ गंभी
रगिरागर्जत आकाशवाणीबोलत जैसेशास्त्रामाजीवेदांत तैसापार्थसोमवंशीं ९६ पूर्वींए
कवीरभार्गव दुसराभूमीवरीराघव सोमवंशींनरपार्थिव पार्थवीरजाणिजे ९७ निवांतक
वचवधूनी संतोषवीवज्रपाणी खांडववनींदेऊनअग्नी तृप्तकरीलपुरुषार्थे ९८ संग्रा
मपाहूनविशेष आनंदपावेलव्योमकेश पाशुपतदेईलनिर्दोष महाअस्त्रेंतेकाळीं ९९
कृष्णमित्रअद्भुत ध्वजींठेवीलअंजनीसुत ऐकूनपंडुऋषिसमस्त जयजयकारेंगर्जती
१०० भूपाळजिंकूनिसमरंगणीं बांधीलनिजाज्ञेचेदावणीं भूपवृंदांचाकोटीवेधुनी क
रभारभारेंआणील १ सुरेशदुंदुभीत्राहटी वर्षतदिव्यसुमनवृष्टी स्वर्गींचीजितुकीदेव
सृष्टी तितुकीपहावयापातली २ ऐसाजन्मलावीरपार्थ तोंमाद्रीचेंमनदुश्चित मजउद
रींनाहींनसुत ह्मणोनिखेदकरितसे ३ पंडूह्मणेंकुंतीतें तुवांतोषविलेंबहुआह्मातें परि

खेदजालामाद्रीनें तोपरिहारींवल्लभे ४ आणोनियांपतिमानस एकमंत्रदिल्हामाद्रीस समवेतबीजन्यास जपकरवितीतिजहातीं ५ तोंअश्विनीकुमारतेथें आले त्वरेनदेऊनतये वेळे पुत्रआवळेजावळे जन्मतेजालेतेधवां ६ नकुळआणिसहदेव एकरूपएकठेव एवंपंचपुत्रांचेंवैभव पंडुराजभोगिलें ७ धर्मभीमअर्जुन तिघेकुंतीचेनंदन नकुळसहदेवसुजाण माद्रीउदरींजन्मले ८ जालेंपांडवांचेंजनन जेबोलिलेकृष्णद्वैपायन तेंचप्राकृतभाषें करुन तुह्मांपुढेंनिरोपिलें ९ शतशृंगपर्वतीं राहिलेपंडुनृपती सुधारसाहोनिनिश्चिती कथापुढेंगोडअसे १० पांडुरंगनगरपुण्यरूप श्रीविठ्ठलमूर्तीसमीप निपजलापांडवप्रताप ग्रंथपरमगोडहा ११ मूळभारतप्रमाण तेचिकथायेथेंसंपूर्ण निर्मत्सरहृदयकरुन पंडितींभक्तींपहावें १२ ब्रह्मानंदाअवधूता श्रीधरवरदापंढरीनाथा पुढेंवदवीरसाळकथा व्यासभारतअद्वय १३ सुरसपांडवप्रतापग्रंथ आदिपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थसप्तमोध्यांईकथियेला १४ इतिश्रीपांडवप्रतापग्रंथ आदिपर्वटीकाश्रीधरकृत धृतराष्टपंडूविदुरविवाहकृत पांडवकौरवजन्मकथनकेलें॥१५ इतिश्रीमहाभारतटीकापांडवप्रतापादिपर्वे सप्तमोध्यायः संपूर्णमस्तु श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥

श्रीगणेशायनमः श्रीकृष्णायनमः कुंतीमाद्रीउदरगगनांत उदयपावलेपंचआदित्य कीं
पंचशावकेंशीऐरावत पंडूविचरेकाननी १ वस्त्रेंभूषणेंविण दिसतीपरमशोभायमान
क्रीडाकरितीकौतुकेंकरुन मातापितासंतोषतीं २ ऋषीआणिऋषिकामिनी देवस्वरूपहेंह्मणूनी
फळेंमुळेंउपचारदेउनी क्रीडाकौतुकविलोकितीं ३ पंचकुमरासमवेतकुंती दिव्यवनींकौतुकें
विचरती माद्रीआणिपंडुनृपती अन्यकाननींवसतीहो ४ वृक्षभेदितगेलेगगन माजीनदिसेंसूर्य
किर्ण वसंतअवतरलासंपूर्ण शोभेउद्यानफळेंपुष्पें ५ कोकिळांचेरुस्वर कमळींभ्रमराचेझं
कार हंसहंसिणीप्रीत्याथोर करतानंदेंक्रीडती ६ करीआणिकरिणी मृगआणिकुरंगिणी च
क्रवाकत्यामधुनी अतिसंतोषेंविचरतीं ७ बापनोनचुकेहोणार हृदयपेदाराकामविकार रक्षि
लाहोतादिवसफार तीतकाळउठिला ८ ध्यावयापंडुचेप्राण मनीउद्भवलापंचबाण आधींचतेंएं
कांतवन वनितामंडणमाद्रीसवें ९ मरणविसरोनीपतंग दीपावरीपडेसवेग तैसेंमाद्रीचेंअंग
पंडुराजेंस्पर्शिलें १० वामहस्तेंआकळूननारी सव्यहस्तेंहसडलीनीरी हाहाह्मणेतदामाद्री भर
णतुह्मासीयाकर्मे ११ परीनायकेचीनृपती बळेंप्रवर्तलाकरतीं वीर्याहोतांअधोगती गेलेप्राण
निघोनियां १२ माद्रीशरीरावरीअद्भुत पसरलेंपंडुनृपाचेंप्रेत दीर्घस्वरेंरुदनकरित ऐकतांकुं
तिधांवली १३ कुंतीसह्मणेमाद्री कुमरठेउनबाहेरदुरी तूंजवळयेईझडकरी अनर्थथोरजाहला
१४ अंतरेंठेउनपंडुसुत जवळयेतांदेखिलेंप्रेत हाहाःकारकुंतीकरित नाहींअंतशोकातें १५ मगह्म
णेमाद्रीप्रती मीबहुतदिवसरक्षिलानृपती मुर्खेतुंवाआजिएकांती परमप्रळयकेलाहो १६ माद्रीह्म
णेमीवारिलेंबहुत परिनायकेचीनृपनाथ अहोहोणारबलवंत हरिहरासीटळेना १७ आतांव
ह्मभासांगातेंजाण मीकरीनहोसहगमन कुंतीह्मणेंतूंअज्ञान मीचजाईनसमागमे १८ माद्रीबोले

प्रार्थून माझाकामनजालापूर्ण ऐसाचहृदईंधरून प्रवेशकरीनसहगमनीं १९ मजकरितांजालें
मरण तरीमीचत्याचीसांगातिण नकुळसहदेवदोघेंजण करीपालनतुमाते २०तुवांदिधलेंतुझें
चनंदन मीप्रार्थूकासयालागुन हेंबोलूननलगतांक्षण माद्रीनेप्राणसोडिलें २१ कुंतीह्मणेकर्म
गहन क्षणातगेलीसृष्टीठाकुन अपारमिळालेऋषिजन शांतवितीकुंतीतें २२ ऋषीह्मणती
पंडुभूपाळ आमचेसंगतीक्रमिलेबहुकाळ परमप्रतापीपुण्यशीळ भाग्येंलाधलासुपुत्रातें २३
समागमेंकुंतीआणिकुमर दोनींप्रेतेंघेउनिसत्रऋषीश्वर रुधिलदेशअपार हस्तनापुरापातले २४
नगराबाहेरगंगातीरीं ऋषिमेळाराहिलातेअवसरी प्रेतशिबिकाभूमीवरी उतरिलीकीतेकाळीं
२५ पंचकुमरेंसीकुंती दोनींप्रेतेंआणिलींनगराप्रती राजहेरींखरीतगती वार्तानेलीनगरांत
२६ भीष्मविदुरधृतराष्ट्र ऐकोनिअवघासमाचार कृपाचार्यआणिविदुर सकळस्त्रियांसींजाण
विती २७ अंबिकाअंबालीकासत्यवती हृदयपिटीतधांवती सकळस्त्रियासहगांधारीसती कुं
तीपासींधावत २८ गजबजलेंहस्तनापुर बाहेरधांवतीनारीनर दाटीजालीअपार जावयामा
र्गफुटेना २९ भीष्मविदुरधृतराष्ट्र धांवलेवेगेंनगराबाहेर चतुरंगसेनाअपार गंगातीरा
धांवली ३० तापसीमेळापाहूनसमस्त साष्टांगेंनमितगंगासुत गर्जोनतापसीबोलत ऐ
कासमस्तपौरजहो ३१ शतशृंगीबहुतकाळ तपआचरलाहाभूपाळ पंचदेवतास्वरूप
अचळ पंचपुत्रजाहले ३२ पंडुपावलानिधना पांडवआणिलेस्वस्थानां आतांयावरीक
रूनकरुणा पालनकरावेंसर्वांहीं ३३ पंडुनेसोडूनप्राण आजिजालेसत्तरशदिन उत्त
रकार्ययथाविधिकरुन करापाळनपांचांचें ३४ ऐसेंबोलूनतेवेळां गुप्तजालातापसांचामे
ळा आश्चर्यघाटेसकळां ह्मणतीधन्यतपस्वी ३५ भीष्मह्मणेंआज्ञादेऊनदर्शन पूजानघे

44467

तां गेले निघोन ईश्वर पुरुष भाग्यपूर्ण चाड कायसी आम्हांची ३६ आली राजे आणि दीन दोनी दृष्टी त्यांचे समान द्रव्य संपत्ती तृणवत् पूर्ण वैराग्यभाग्यें सभाग्य ३७ असो हृदयी धरुनी पंडुस्मरन धृतराष्ट्र आक्रोशें रडत कुंतीचा गळां मिठी घालित सत्यवती गांधारी ३८ अंबा अंबालिका सत्यवती शोकसमुद्रीं करितीं वस्ती असो बारा दिवस भागीरथी तीरीं शिबिरें उभविलीं ३९ भार्येसहित पंडुचें शरीर अग्नींत घालितां सत्वर चंदन काष्ठें कर्पूर शीघ्र याचीं रचियेली ४० मलयागर कृष्णागर तुळसी बिल्व काष्ठें पवित्र कस्तुरी चंपक समग्र स्वबासवस्त्र बहुतची ४१ गंगेत न्हाण्यून झडकरी मृगचर्मीं नीचंदन कस्तुरी दिव्यावरीं अलंकारीं श्रृंगारिलीं दोघेंहीं ४२ छत्र चामर मकर बिरुदें श्रृंगारून उभी केलीं सिद्ध राजचिन्हें नानाविध विद्युल्लाय झळकती ४३ गर्जती वाद्यांचे गजर गंगानदी पाहून पवित्र चिता रचून सत्वर शरीरें दोन्हीं वोपिलीं ४४ तेरा दिवसपर्यंत दानें केलीं यथोक्त न्यून काहीं न पडे तेथें धन अमित वांटिलें ४५ मग प्रवेशलीं नगरांत मुख्य राजगृहीं कुंती राहत संपत्ती भरल्या अमित वर्णितां अंत न लगेची ४६ पांडव जें जें मागती तें तें देऊन करिती तृप्ती धृतराष्ट्र येऊन गृहाप्रती सांभाळीत क्षणक्षण ४७ घडीघडी येउन गंगासुत बाळकांचें लळें पुरवित विदुर अहोरात्र वसत पांडवगृहीं आवडी ४८ सत्यवतीस एकांतीं व्यास देव येऊन सांगती येथून संतोषगभस्ती मावळत चालिला ४९ क्लेशकाळ येथून बहुत धर्म क्रियालोपे समस्त घडेल अनाचार अत्यंत वैराग्य विवेक लोपेल ५० अविद्येचे धुळारें उठती तेथें कोणा कोणी नोळखती बहुतांचि नाश पीआली पतिता न देती दर्शन ५१ पृथ्वी ग्रासील दुरलें धन यथाकाळीं न वर्षे घन मंत्र वीर्यें होती अप्रमाण औषधें गुण-

त्यागिती. ५२ देवता सांडिती देवपण राहती होऊन पाषाण कली उपजेल दारुण भृशुज सर्व संहरती ५३ गांधारीचा वडील स्मरत तो कुरुकुळ जाळील समस्त तरीं तूं माने लरिन निघे आतां येथूनी ५४ हे एकदांच मरती समस्त यांची माया सोडी यथार्थ पुढें दिसतो महा अनर्थ ऊठ त्वरित आताची ५५ सत्यवती ह्मणे व्यासातें हा मळयन देखवे मातें मी येईन तुजसांगातें सार्थक आपुलें करावया ५६ उभय स्नुषा हातीं धरुन पुसे भीष्म विदुरास येऊन व्याससंगें करून वनवनीं सुखी राहूं ५७ सत्समागमें शास्त्रश्रवण आचरूं खडतर तपपूर्ण साधूं परत्रसाधन नराहूं आतां क्षणभरी ५८ भविष्य आणोन समग्र आज्ञा देत भीष्म विदुर व्याससंगें तिघीं सत्वरें बद्रिकाश्रमा गेलिया ५९ श्रवण मनन निजध्यास साक्षात्कारें जाला समरस गंगेत शरीर टेऊन निर्दोष कैवल्य पद पावल्या ६० यावरीं प्रज्ञाचक्षु राजेश्वर कौरव आणि पंडुकुमर मौंजीबंधन वेदसंस्कार करीत तेव्हां सवीसी ६१ भोजन पानें भूस्करी चाढिती वस्त्राभरणें मिरवती दिवसेंदिवस वाढती शुक्लशशी सारिखे ६२ नानायानीं आरूढती लोक फिरतां विलोकिती कुमार दशेने खेळ खेळती नानागती विचित्र ६३ दक्ष पांडव आगळे होती डावमात्रें कौरव हरती जैसा नाजुक अजात ऐरावती भीमसेन तेविं दिसे ६४ पळतां अचघे मागें सांडी झोंबींत अवघ्या एकला पाडी मुष्टीनें ताडी तां तडी शीघोन हरी आणित ६५ माणीक गोटिया रत्नकंदुक भोंवरें चक्रें विदया स्करेख सर्व खेळीं हरी आणि अधिक अजा शब्द बाहेनया ६६ ऐसा करुन भीमसेन शकुनी दुर्योधन कर्ण दुःशासनादिक मिळोन हस्त पाद कचळिती ६७ मुसांडी घेऊन प्रबळ मस्तकें फोडून पाडी सकळ चरणाकर खुळे केवळ अंगें चूर करी त्यांचीं ६८ एकाकार गारीत गगनीं ऐकास आप

टीतमेदिनी बाहीबहुसालकवळुनी अगाधडोहीं बुडवीन ६९ नाकीं तोंडीं पाणीभ
रत मगबाहेरयाकीमेनवत वृक्षावरी कौरवचढन फळें तोडितां देखिले ७० लनाम=
हरें वृक्षमोडी एकदांचतितुके खालें पाडी टेकावरून वळें वोढी पाठीखरडीसर्वांचा ७१ आ
पणयेडकाहोत थडका कौरवांसदेत धर्मासराजाकरित आपणहोतकुंजरपुढें ७२ चो
रकरूनकौरव आपुलेचरणीबांधीसर्व शिळेवरतीघेतधांव तेव्हांमस्तकेंफुटतीहो ७३
कौरवांसह्मणें अवधारा असंख्यमुष्टीघातेंमजमारा मगतीं मूर्खें आठऊनवैरा हाण
तांमागेंनपाहती ७४ हणताभागतीत्याचेकर मगत्यांसह्मणेंवृकोदर आपलेंउसणेंघ्या
समग्र व्याजासहितयेधवां ७५ मगमुष्टिप्रहरें हाणीबळी तेणेंकुंभिनीडळमळी मुर्छित
पडतीकौरवसकळी उसणेंदेतांनयाचें ७६ ह्मणेंउसणेंघेतांहांसता देतांकारेअवघेरड
ता मगह्मणेंउठाआतां रडीखेळतानकाखेळूं ७७ धर्मासभवानीकरित कौरवओढूनआ
णीवस्त्र नखेळताबडवित सोडवीनधर्मतेव्हां ७८ पिशाळगर्जीकरूनी आपणबैसेअ
नुष्ठानी कौरवआहूतीमानुनी अग्नींतदकलीवळानें ७९ मत्स्यावतारहोयभीमसेन
ह्मणेंशंखासुरहादुःशासन मत्स्याकारनळपोन पाईंधरूनवोढीतया ८० कूर्मपृष्ठीकरू
नआपुली ह्मणेंमुष्टिघातेंमारासकळी मारितांमुष्टीफुटल्यातेवेळीं परिसहसाडळमळी
नां ८१ आपणवराहहोत ह्मणेंहेहिरण्याक्षसमस्त त्याचेहृदयींवळंबहुत मुसंडीघेत=
नाटोपे ८२ आपणनरसिंहहोत दुःशासनासआडवेघेत ह्मणेंनखेंपोटफोडूंयेथ किं
वापुढेंविदारूं ८३ आपणत्रिविक्रमदुःशासनबळी ह्मणेंआतां घालितोंपाताळीं आपण
भार्गवहोऊनह्मणेंसकळां कौरवक्षत्रियमारीन ८४ आपणराघवहोयदेखा जयद्रथा

करीशूर्पणखा पार्थहालक्ष्मणसखा नासिकाछेदीलपुढेंहा ८५ कृष्णावताराचाखेळ माजेल
तेव्हांरणमंडळ तेव्हांदाखऊंसकळ रथीं घननीळाबैसउनी ८६ तेरावर्षेंपर्यंत बौध्यरूपध
रूंयथार्थ पुढेंकलीमाजीसमस्त कौरवम्लेंच्छसंहारूं ८७ ऐसाभीमखेळखेळत कौरवविप
दपावतीसमस्त इळनचालेपाहतीतटस्थ नदासविताबोलून ८८ दुर्योधनसंतापत शकु
नीससंकेतदावित येरूत्याचाहस्तदडपित याचेंउसणेंपुढें घेऊं ८९ कौरवजाऊनअंधास
सांगती निजांगींचीं क्षतेंदाविती नसेवूह्मणतांआह्मामती वोढूननेताभीमसेन ९० धृत
राष्ट्रासशकुनीसांगत आतांनवांचतीतुझेसुत खेळतांमेलेकींजीत भीमसेननपाहे ९१
धृतराष्ट्रनेंनआणीमना ह्मणेंपंडुगेलास्वर्गभुवना विपरितबोलतांजनां माजीभेददिसे
ल ९२ मनांतह्मणेंदुर्योधन हाएकमारावाभीमसेन मगउरलेचौघेजण यांचालेखाकाय
मा ९३ दुर्योधनकर्णदुःशासन चौथाशकुनीएकांतबैसून ह्मणतीनानाउपायकरून
भीमसेनमारावा ९४ एकह्मणतीपाशघालावें दुजाह्मणेंविषचाल्लावें एकह्मणेमहासर्प
आणावे फरयावेदंशवळेनी ९५ शकुनीह्मणेंमगटनहोय ऐसाकरावाकाहींउपाय
भीमासमोदकवाटतीप्रिय विषमिश्रितकरावेते ९६ वनक्रीडेसजाऊनियां त्यासद्यावेभ
क्षावया अपध्यामानलीहीक्रिया ह्मणतीमगटबोलूनका ९७ सूत्रधारासांगेदुर्योधन
गंगातीरींनिर्मावेंदिव्यसदन गुप्तवोवऱ्यांनिद्रास्थान माड्याबहुतनिर्माव्या ९८ सांगीतल्या
हूनविशेषसूत्रधारीं क्रीडाधामरचिलेंगंगातीरीं दुर्योधनविनवीजोडल्याकरीं ह्मणेचला
जळक्रीडे ९९ अजातशत्रूधर्मराज अवश्यह्मणोनउठिलेतेजःपुंज बंधूचौघेसहज स
मागमेंचालती १०० पञ्चसेचतुर्विधान्नें सर्वेंघेतलीं दुर्योधनें विषमोदकभीमाकारणें

८

अतिमयत्नें करविलें १ वचनाग सोमल अहिफेण जे पाळराज विषें दारुण ज्यांचा वास॰
येतां पूर्ण तत्काळ मरण जीवासी २ ऐशीं विषें मेळऊन देख भीमालागीं वळिले मोदक इ
कडे सेनेसहित सकळिक गंगातीरा पातले ३ नाना यानीं बैसले फेरुन वहनें श्रमले मग ज
ळक्रीडे प्रवर्तले कौरव पांडव तेधवां ४ परस्परें जळसिंपिनी अगाध नीरीं बुड्या देती एका
सएक शोधिती हाका फोडिती आवेशें ५ भीमास बुडवावया जळीं कौरव झोंबती सकळीं
येरू पृष्ठी घेऊन बळी वारणापरी पोहत ६ नाना जळचरें धरिती वोढून बाहेर काढिती तों
अस्तापावलागभस्ती कडेस येती सर्वही ७ परमस्नेहाळु दुर्योधन पक्षे वोपी पांडवां कारण
सकळपरिवार गौरऊन अन्नपानें सुखी केले ८ यावरी एकांतस्थानी पांडव कौरव बैसले भो
जनीं सुवर्णतांटें झळकती सदनीं रत्नवाटिया प्रकाशती ९ सुस्वाद नेने वेळीं एकपंक्तीं वा
ढिली सकळां ज्यास जो पदार्थ आवडला तो तो वाढिती साक्षपें १० आपुले हस्तें दुर्योधन
भीमसेना वाढीत अन्न असंख्य मोदक वाढून मधुरान्नातें भक्षवी ११ तृप्त होऊन भीम
सेन येकांतसदनीं केलें शयन अर्धनिशा लोटतां पूर्ण सर्वगात्रीं भेदलें विष १२ उडोन गेलें
सर्वस्मरण एकवटले पंचप्राण सुयोधन कर्ण शकुनी दुःशासन जवळी आले तेधवां १३
दळलत्ता महर्षहुन करून बांधले माघारे हस्त कंठ चरणासी गांठी देत केली मोट सर्वां
गाची १४ वोपें मिळोन तेवेळां सबळ शीळा बांधली गळां गंगाजळीं बुडविला मध्यभा
गीं नेउनी १५ वाहवत गेला भीमसेन परम आनंदला सुयोधन इकडे प्रवाहें जात कुंतीनं
दन समुद्रजीवनीं मिळाला १६ तों बहुत विखारीं जळीं वोढुन पाताळा नेला भीमसेन स
र्पदंशें संपूर्ण विष अंगीचें उतरलें १७ गंगामृतें जाला शीतळ विखारें विष शोषिलें सकळ

सावध झाला कुंतीबाळ तोडी तसे पाश बंधनें १८ देखतां भीमाचें परम बळ दंशु सर्प पळा
ले सकळ वासुकीस जाणविती तत्काळ प्रचंड पुरुष एक आला १९ बांधून गंगाजळीं टाकि
ला प्रेतत्व जाउन सावध झाला वासुकी परिवारें निघाला तेथें आला पहावया २० सावध देखून
भीमसेन ह्मणे महापुरुषा तूं आहेस कोण कोण्या दुर्जनें तुज मारुन गंगाजळीं टाकिलें २१ येरू
ह्मणे मी पंडुनंदन वासुकी देत आलिंगन बोले तूं श्रीकृष्णप्रिय पूर्ण चाल आमुच्या सदनासी २२
मग गृहासी नेउन नागराज करी पूजन ह्मणे महाविषें संपूर्ण अंग तुझें जळतसे २३ येव्हां पत्र ह्म
णे वासुकीस त्यास पाजावा सुधारस समयोचित देणें निर्दोष महायश जोडे तेणें २४ कन्यादान त
रुणास मिष्टान्न वाढिजे रोगिष्टास द्रव्य वोपिजे दरिद्रीयास महायश जोडे येणें २५ नातरी का॰
मातुरास संन्यास देणें क्षुधातुरास उपवास करवणें धालियास दिव्यान्न वाढणें समयोचित हें
नव्हे २६ तृषाक्रांतास घृतपान नवज्वरितास दुग्धार्पण सीतें पिडल्यास लावणें चंदन समयो
चित हें नव्हे २७ तरी यासि सुधारसपान यासमयीं उचित पूर्ण मग वासुकी भीमास नेऊन अ
मृतकुंडें दावित २८ अष्ट कुंडें भरली अमृतें भीम हळु हळु नेला तेथें विकळ शरीर झा
लें होतें सर्पें धरिलें सावरुन २९ एक कुंड दाविलें भीमास ह्मणती प्राशिकां सुधारस तों आ
ठही कुंडें सावकाश शोषिलीं क्षण न लागतां ३० समाचार सांगती सेवक आश्चर्य करी भोगी
नायक ह्मणे यास बळ चढलें अधिक पहिल्याहून शतगुणीं ३१ तृप्त झाला धर्मानुज मग शे
जेवरी निजवी नागराज भीम चिंतारहित सहज काळजी कांहीं असेना ३२ इकडे कौरव उ
ठोन प्रातःकाळीं स्नानें करून गंगाजळीं दळसमवेत सकळी नगरामाजी प्रवेशती ३३ आनं
दपरम कौरव मानसी मग बोलती येरयेरांसी पांडव बंधू होती आह्मासी पारिमार्गी स्नेहनसे ३४

भावंडे टाकूनमागेंसमस्त आपणयेकलागेलानगरांत भीमनिष्ठुरअत्यंत सुहृदसंगनावडे
३५ आमचेंमनयावरीबहुत याचें आह्मांकडेनाहींचित्त चतुरपणेंडोलतबहुत कर्णयथा
र्थह्मणतसे ३६ ऐशाकपटयुक्तीबोलूनजाणा आणविती धर्मार्जुना तेनदेतीप्रतिवचना
चिंताक्रांतमानसीं ३७ जैसेदिपाविणसदन तैसेम्लानदिसतीचौघेजण हृदयझालेंउद्वि-
ग्न परिबोलूननदाखविती ३८ वहनेधांवडीततेवेळे कौरवस्वसदनींप्रवेशले इकडेधर्म-
दुःखेंतळमळे भीमसेनाआठऊनी ३९ धर्मपुसेकुंतीप्रत भीमआलाकायगृहांत कींकां-
हींकार्यार्थ तुवांप्रेरिलासांगपां ४० माताह्मणेनाहींआला धर्माचाकंठदाटला अश्रुधाराश्रव
तीडोळां धनंजयाचातेधवां ४१ नकुळसहदेवतळमळती भीमातुझीकायझालीगती घा
तकेलाअर्धरात्रीं अंधपुत्रेंवाटतें ४२ जननीपीटीवक्षस्थळ शोकेंआंगटाकीविकळ विदुरपा
तलातत्काळ स्थीरस्थीरह्मणतसे ४३ यादवीविदुरासह्मणत दुर्योधनेंकेलाघात येरूह्मणेंन
बोलेमात करितीलनिःपातउरलियांचा ४४ धीरधरूनियांचित्तीं हृदयींचिंतीकमळापती स्वस्ती
क्षेममागती भीमभेटेलतुजला ४५ त्रिकाळज्ञानीमहाराजविदुर त्याचेवचनेंराहिलेंस्थीर इ
कडेंवासुकीसदनींवृकोदर अष्टदिवसनिद्रस्थ ४६ उदयाचळीउगवेतरणी भीमतेसाबैसलाउ
ठोनी वासुकीह्मणेंसखयायेक्षणीं सोयराहोयआमुचा ४७ मगआपुलीकन्यापद्मावती तीदिध-
लीभीमसेनाप्रती तिचेंस्वरूपरतिपती देखुनीयांतटस्थ ४८ बहुतदेऊनआंदण गौरविलाभी
मसेन वासुकीह्मणेंत्वरेंकरून हस्तनापुराजाइजें ४९ माताबंधूविदुरभक्त तुजकारणेपरमदुः
खित शोकसमुद्रांतूनत्वरित काढीसत्वरजाऊनीं ५० भीमासकरऊनमज्जन दिधलेंदिव्या
न्नभोजन अलंकारवस्त्रेंदेऊन गौरऊनबोळविला ५१ सांगातेंदेऊनरक्षकसर्प पावविला

गजपुरासमीप भीमनिर्भयनिःशंक नगरामाजीप्रवेशला ५२ अवघींबैसलींचिंताग्रस्त तोंभी
मदेखिलाअकस्मात हर्षेंअंगींरोमउभेठाकत माताबंधूधांवलीं ५३ साष्टांगेंसीनमस्कार
कुंतीसघालीवृकोदर वसुदेवभगिनीसत्वर गळामिठीघालीतेव्हां ५४ विदुरआणिध
र्म यासिसाष्टांगेंनमीभीम आवडीदिधलेंक्षेम नमायेप्रेमदशदिशा ५५ प्रार्थूननकु
ळसहदेवराय वंदितीतेव्हांभीमाचेपाय कंठीमिठीघालूनिमोहें प्रेमेंकरुनीस्फुंदत ५६
सकळांबैसऊनवृकोदर विदितकेलासमाचार वासुकीकृपाळूथोर उपचारकेलातेणेंम
ज ५७ कुंतीवांचलाह्मणून भूषणेंटाकीवोवाळुन करुनियांअपारदान याचकब्राह्म
णसुखीकेलें ५८ विदुरमतेंकुंतीनंदन सदावर्ततीसावधान नकरितीकौरवासीभाषण
संगेगमनसोडिलें ५९ पांचजणेसदांएकेठाईं वेगळेनहोतीकदाही सखोलबुध्दीसर्वदाही
मर्यादेनेंवर्तती ६० कृष्णचरित्रकरितीश्रवण सदाकृष्णमूर्तिचेंभजन अखंडकृष्णना
मस्मरण सदाध्यानकृष्णाचें ६१ कृष्णप्रतिमाकरून त्रिकालपूजितीपांचहीजण कृ
ष्णमंत्राचेंअनुष्ठान करितीगायनकृष्णाचें ६२ नानाकळाराजयुक्ती विदुरशिकवीधर्माप्र
ती बहुभाषासंकेतरीती पढवीतत्यातेंतेधवां ६३ स्वदेशभाषादुर्जनांत बोलावयाशंका
वाटत यालागींबर्बरभाषासिकवित विदुरतेव्हांपांचातें ६४ यावरीपुढेंऐकाकथा अंधम
नांतहोयकल्पिता धनुर्वेदशिकवावायासमस्तां राजगुरूठेउनी ६५ शतकौरवआणि-
वेश्यासुत कर्णपांडवांसहितएकशेंसात इतक्यासकृपाचार्यशिकवित धनुर्वेदसर्व
दा ६६ कृपाचार्यगौतमपुत्र शरस्तंभींजन्मलापवित्र राजाह्मणेंतेंचरित्र वैशंपाय
नांसांगेंकां ६७ वक्ताह्मणेंसत्तक्रपीत गौतममुनीपरमविख्यात तपस्व-

इतरआचरत जान्हवीतीरींसर्वदा ६८ मुखींचतुर्वेदाचेंपारायण पृष्ठीसतदांधनुष्य
बाण क्षत्रियधर्मब्राह्मणपण शापेशरेंसमर्थजो ६९ जैसाधनुर्धरभार्गवराम तैसाचजा
णिजेगौतम मगवाभयाभीतपरम तपाहानीकरूंइच्छी ७० धनुष्यबाणघेऊनी विपि
नीहिंडतगौतममुनीं ज्वाळावतीकन्यानिर्मुनी अमरनाथेंपाठविली ७१ तिचेंविलोकितांवद
नं अंगीद्रवलामीनकेतन चापशरभातागळोन भूमीवरीपडियेला ७२ वीर्यद्रवलेंअद्भुत
शरस्तंभावरीपडत दोनभागेंझालेंरेत कुमरकुमरीजन्मली ७३ इंद्रेंठकविलेंपरम जाणो
नतपागेलागौतम मृगयामिषेंराजोत्तम शंतनूतेथेंपातला ७४ अग्निहोत्रपात्रेंटाकुनी
गेलातेथेंगौतममुनी कुमरकुमरीतान्ही शंतनूरावदेखतां ७५ ब्रह्मवीर्यहेंअद्भुत
कृपेंरावदोघांउचलित कृपाकृपीनांवठेवित पालनकरीतदोघांचें ७६ वर्तमानजाणू-
नि गौतममुनीं रायासभेटलायेउनी मगद्रोणाचार्यालागुनी कृपयादिधलीसंभ्रमें ७७ कृ
पाचार्यआपुलासुत शस्त्रविद्यादिधलीबहुत धनुर्वेदशिकवीत मंत्रअस्त्रविद्येसी ७८
कृपयाद्रोणाचीरामा तीसीपुत्रझालाअश्वत्थामा पुढेंऐकेंराजोत्तमा कथाकैशीवर्तली ७९
कृपाचार्यगुरुकृपार्णव विद्यासिकतीकौरवपांडव आणीकहीराजकुमरसर्व देशोदेशी
चेपातले १८० भीमार्जुनाचीप्रज्ञाफार कृपाचार्यसांगेअनुमात्र जैसाबहुतक्षुधा
तुर अल्पत्यासीवादिजे ८१ शिष्याचीप्रज्ञागाढी गुरूचीसर्वज्ञताथोडी तरिवि
द्याब्धिचीपैलथडी सर्वथाहीनदेखिजे ८२ तोंनीजभाग्येंअकस्मात द्रोणाचार्यआले
तेथें त्याद्रोणाचीकथाकिंचित ऐकरायाआदरें ८३ तपियाशिरोमणीभारद्वाजपूर्ण
गंगाद्वारींकरीअनुष्ठान तोंघृताचीदेवांगनाजाण पर्वकाळींझालीस्नाना ८४ स्नानक



रुनहेमवसन नेसतांदेखेभारद्वाजपूर्ण हृदयींचेतलामीनकेतन अहिरवळेंज्याप-
री ८५ सुरतानंदआठवित अधोमुखेंचालिलेंरेत ऋषीपर्णद्रोणींधरित तेथेंचद्रोण
जन्मला ८६ पितयापासूनसंस्कार वेदशास्त्रपढलासमग्र अग्निवेषनामाअग्निकुमर धनु
र्वेदपढेतेथें ८७ तोंतेथेंरावद्रुपद पढूशिकलाधनुर्वेद गुरुबंधूजोडलाप्रसिद्ध पांचाळ
रायासारिखा ८८ दोघांविद्याझालीपूर्ण द्रुपदगेलाआज्ञामागुन तोंगुरुबंधूबोलिलाद्रोण
द्रुपदाप्रतीतेधवां ८९ जनकेंराज्यदेपितांद्वतें संभाळावेंआह्मातें द्रुपदह्मणेंगुरुबंधूतें
विसरूंसर्वथानघडेंहे ९० अहिछत्राद्रुपदगेला पितात्याचापरत्रपावला द्रुपदराज्यकरूंला
गला पितयाऐसेसर्वही ९१ इकडेंद्रोणप्रजोत्पत्ती करावयावरिलीशारद्वती कृपयातेंचनि-
श्चिती शंतनूरायेंदिधलीहो ९२ कृपयेचेंपोटींजन्मलासुत जन्मकाळींगाहोंफोडित उच्चै
श्रवाजैसागर्जत देवसर्वतापले ९३ तोंरुद्राचाअंशपूर्ण विद्यासमुद्रबळगहन अश्व
त्थामाअभिधान देवींठेविलेंतेधवां ९४ चिरंजीवकेलापूर्ण विद्याअपारशिकवीद्रोण तोंपर
शुरामेंनिःक्षत्रियकरुन पृथ्वीब्राह्मणादिधलीकीं ९५ सभाग्यकेलेब्राह्मण हेंऐकोनिनिघालाद्रो
ण महेंद्रपर्वतीजाउन भार्गवरामाभेटला ९६ कल्याणरामपुसत कायइच्छाआहेमनांत
येरूह्मणेंदरिद्रेंसंतप्त कुटुंबाताहितजाहलों ९७ भार्गवह्मणेंसर्वही ब्राह्मणासदिधलीमही
पूर्वींतुह्मींआलांनाहीं आतांकायदेऊंतुह्मां. ९८ सकळपृथ्वीभाग्यभरून कश्यपासदिधली
दान आतांशरअस्त्रविद्यापूर्ण उरलीजाणमजपासीं ९९ दोहिंतजेआवडें तेंचमागारेकडें
येरूह्मणेंअस्त्रविद्येचेंगाढें भाग्यदेपीमजलागी २०० अवश्यह्मणेरेणुकानंदन मगशिष्यके
लाद्रोण अस्त्रविद्यासूर्यपूर्ण हृदयाकाशींउजळला १ ह्मणेंक्षत्रियआणिब्राह्मणा वाचूनविद्या-

नसांगेकोणा मगद्रोणेंघेऊनआज्ञा निजाश्रमापातला २ पिडलादरिद्रेंकरून जवळीधनवंताचे
नंदन सुवर्णवाटितक्षीरपान स्वेच्छाकरितीकौतुकें ३ तेंदृष्टींदेखोन अश्वत्थामाकरीरुदन
ह्मणेमजकरवीक्षीरपान ह्मणोनिआळीघेतली ४ मगपिष्टोदकशुभ्रकरून मातापाजीतयालागु
विदुराप्रतीआदरेंपूजिती येउनीभेटलीकुंती द्रौपदीसतीनमीतेव्हां ६ धर्मह्मणेदिवसधन्य आजि=
आलेंपितृदर्शन वडिलातुझेंस्नेहेंकरून आह्मींबाळकेंसुखीअसों ७ धेनूदूरिवनाजाय परिवत्सा=
पासीगुंतलास्नेहें कींकुर्मिणीदुरोनीपाहे पिल्याकडेस्नेहानें ८ किंवातेक्रौंचपक्षिणी समुद्रवेष्टीपिलीं
ठेउनी चाराघ्यावयालागुनी जायषण्मासपर्यंत ९ परीक्षपक्षणाआठउनीबाळक पाहेऊर्ध्वकरूनिमु
ख त्यास्नेहेंतीदसदेख तेचिरितीतूंआह्मातें ११० तूंआमुचीस्नेहाळजननी रक्षिसीबाळपणापासुनी
तुह्मियावोसंघाघालुनी स्वर्गागेलापंडुराव १११ घिवरतुंवाकोरविले लाक्षासदनांतरक्षिले बोल=
तांनेत्रींअश्रुआले धर्मरायाचेतेधवां ११२ विदुरह्मणेऐकनिश्चितें दुर्जनाचेनेणवेमत उत्तमबो=

त्नघात करील कोणा नेणवे १३ पुढें काळ दिसतो कठिण नारदस्वामी गेले सांगोन तें वेदव्यासें कथिलें
पूर्ण हृदयीं धरी गोष्टी तें १४ आणीक ही संत महंत तुज सांगती हे चि हित मीही तुज शिकवी यथार्थ
बुध्दी वादतो च की १५ धृतराष्ट्र आणि दुर्योधन घरीं मांडला उत्साह यज्ञ बोलाविलें भेटी लागुन कुंती-
द्रौपदी सहित १६ दुर्योधन करी खंती धरी भेटीची बहु प्रीती ऐकतां पांच ही बंधू ह्यां सती हस्तीहस्तमें
उनी १७ आश्चर्य वाटे बहुवस गोडिस आलें महाविष महासर्पें शांति निःशेष धरिली न वल वाटतें १८
शीतळ जाला वडवानळ अमृता ऐसें हळाहळ व्याघ्रें धरिलें निर्मळ शांति आजी वाटते १९ नम्र जालीव
ज्रधार क्षारसिंधु जाला मधुर दुर्योधनाची प्रीती साचार तैसी आजी वाटते २० विदुर ह्मणें सावधान
तुह्मा समीने तों बोलाउन परि तेथें मिळतील दुर्जन मज वचन बोलतां नये २१ त्यासी खेळों न को यथार्थ
बळें मांडितील कपट द्यूत आलिया ही भाणांत पण कांहीं न करावा २२ सहस्त्र गोष्टीची गोष्ट यथार्थ खेळों
न को बारे द्यूत अवश्य ह्मणोन कुंतीसुत धर्मराज उठिले २३ द्रौपदी पाठवी सांगोन म्या आजि देखिलें
दुष्ट स्वप्न कौरवीं पांडव करुन दीन सभांगणी बैसविले २४ सभेसी मज नेउन गांजून करूं इच्छितीन
ग्न मग बोलें अर्जुन स्वप्न असे व्यर्थ पें २५ जागृती आठवी मनी तोच भास दिसे स्वप्नी असो आज्ञा हो
ता सेवकजनीं भेरी ठोकिल्या गमनार्थ २६ निघाले चातुरंग दळ दणाणीलें उर्वीमंडळ वाद्यघोषें निर्मळ त-
त्काळ नभ सकळ कोंदलें २७ कुंती आणि याज्ञसेनी निघाल्या बैसुन सुखासनी जाचे वहना पुढें वेत्र
पाणी लक्षावधी धांवती २८ मागें पुढें वेष्टीत भार रथारूढ चालती पंडुकुमर एके रथीं धर्म विदुर बो
लत जाती प्रीतीनें २९ पृथ्वीवर पसरे सागर तैसी सेना चालिली अपार शतबंधूशीं सत्वर येत सामोरे दु
र्योधन ३० वहनारवालें उतरोन धर्म आणि सुयोधन देत प्रीतीं आलिंगन अनुक्रमें समस्तांसी ३१
मोहोत्साव करित नेले आपुल्या मंदिरांत नाना प्रकारें धर्माचें चित्त तोषवीत सुयोधन ३२ शतबंधूस

मवेत दुर्योधन सदां तिष्ठत नाना उपभोग समर्पित समयोचित ह्मणोनी ३३ शांति अवलंबुन शुध्द
यात्रेंत हिंडती जैसे मैंद कीं वाटपाड्या नीरजनी सिध्द होउनिया बैसावे ३४ गावांत असतां ओ आण
सावचोर बोलती गोड वचन कीं मुखीं घालितां पूर्ण बचनाग गोड वाटे ३५ कीं विषकुंभ भरला समस्त
तोंडीं किंचित् घालिती अमृत कीं बक बैसला समस्त गंगातीरीं क्षणभरी ३६ तैसा तो कापट्य सागर
लटिका वरदावी आदर एके दिवसीं सारून विहिताचार सभे बैसले समस्त ३७ कृपाचार्य द्रोण भीष्म
श्रेष्ठासनीं बैसविले धर्म धृतराष्ट्र विदुर उत्तम अश्वत्थामा बैसला ३८ दुर्योधन कर्ण शकुनी दुःशास
नादि बंधु घेउनी शाल्व बाल्हिक विकर्ण येउनी सभास्थानी बैसले ३९ जयद्रथ भूरिश्रवा समस्त पृ-
थ्वीचे राजे विराजित दुर्योधन ओंभईदेत काय बोलत मातुळासी ४० दिवस न कंठे वाटे थोर युगास
मान जाहला प्रहर सभा रंग दिसे साचार ऐसा प्रकार करावा ४१ शकुनी बोले तत्काळ मांडावा कांहीं
द्यूत खेळ धर्मराज प्रवीण कुशळ हृदय जाणें सर्वांचें ४२ पण करुन खेळा सवेग आतां भरेल सभा
रंग सभानायक चतुर सांग साक्षी समस्त सांगती ४३ द्यूत खेळें आळस हरत हारियेता हाव भर
त हारविलें ते हर्षयुक्त द्यावें दुःख न मानितां ४४ जिंकिजे प्रतापें करून तें अवश्य द्यावें आपण
न बोलावें दुष्ट वचन शेवटासी न यावें ४५ युध्द आणि द्यूती क्षत्रिमार्गें न सरती न खेळतां सत्य जाती
यश आणि प्रताप ४६ कनक पाश विशाळ आणून ठेविले अढळ पाश देखतां तत्काळ बुध्दी चळली स
र्वांची ४७ भ्रूसंकेत दावी दुर्योधन त्वरा करी शकुनी येउन विदुर ह्मणे द्यूत निंद्य पूर्ण खेळतां हानि सुकृ-
ताची ४८ हरिकीर्तन पुराण श्रवण शास्त्र चर्चा वेदाध्ययन वासुकी संजय सुखें करुन सादर होउन ऐकि
जे ४९ अवलक्ष्मीचें स्थान द्यूत खेळणारा अपेश येत आगटाई यथार्थ वास असे अवदशेचा ५०
दीपाचे प्रतिछायेस बैसणें रात्रीं दधिभोजन करणें यागींचा पुरोडाश घेणें अवदशा आणवरे तेथें ५१

सनकर्मीं आरत अवलक्ष्मी तेथें वसत कागगृहीं रजस्वला होत अवदशा वसे तयें सदा ५२ गध्याकाव्या-
लिड्गिन्य वसतें मलिन अस्नात हीं आठ स्थळें निश्चित सज्जननरवा ळितो ५३ धृतराष्ट्राचिया मनांत पांड
वजिंकावे खेळून द्यूत यास्तव ह्मणे विदुरें जंगागत उत्तम बुध्दी स्वीकारा ५४ कर्ण शकुनी दुर्योधन ह्मणती
विदुर बोले जें वचन तें अभाग्याचें पथ्य संपूर्ण खेळावें जाण द्यूत आधीं ५५ पाशा पाहतां समस्त मुख
स्तंभा सर्व होत कर्वतून राक्षस दंत चौधार रेखेन साधिले ५६ स्थूळ लांब वीतीप्रमाण सुवर्ण रसें आ
रक्त चिन्ह देखतां सर्वा भरले मौन कोणा इषण न देवी ५७ भीम ह्मणे दुर्योधनासत्य धर्मासीं तूंन कोखे-
ळूं धृत कयोधन ह्मणे यथार्थ बोलसी मात वृकोदरा ५८ आह्मी तुह्मी सभाजन कौतुक पाहूं दुरून श
कुनी धर्म दोघे जण परस्परें खेळती ५९ विदुर ह्मणे मनांत हारें मांडला अनर्थ पृथ्वीचा नृपास अंत आ
लया वरी न लवतां १६० नारद व्यास उत्की उत्तम विसरला कीं यथार्थ धर्म कृष्णमाया घोर परम न कळे वि
दाण तयेचें ६१ सत्य धारी यादवेंद्र उतरावया पृथ्वीचा भार उपाय योजी श्रीधर न चले अनुमात्र कोणा
चें ६२ धर्में यक्किनां फासे भीमें हाक फोडिली आवेशें टाळी वाजवी तेणें कांपत से भूमंडळ दिग्गजजैसें
६३ हाकें सरसा अवधारा स्वारा डावहोय खरा थरथरां कांपे वरकधरा हारी कौरवा येत से ६४ भी
साची हाक भीम कौरव जिंकी धर्म दुर्योधन ह्मणे परम खोटें कर्म वोडवलें ६५ धर्मास ह्मणे दुर्योधन
हाक फोडी नो भीमसेन फासे पडती उलथोन न खेळूं आह्मी सर्वथा ६६ माझा वाटचा तुह्मासी शकुनी प्रे
रिला खेळावयासी हार जित लागली त्यासी माझी ऐसी जाणिजे ६७ धर्म ह्मणे भीमसेना क्षणभरी तुह्मी
धरा मौना हाक न फोडीं सर्वांज्ञा माझी आज्ञा पाळी हे ६८ हातीं पाश घे शकुनी धर्मा पैज बोल वचनी त्वां जि
किल्या ये क्षणीं राज्य वोपूं गजपुरिचें ६९ आह्मीं जिंकिल्या यथार्थ बोलिले त्वां द्यावें सत्य यावरी धर्म पैज
बोलत सभा सत ऐकती ७० हारावणा श्यामध्यमणी देख जाचें तेज सूर्य सम्यक तें देईन मी निःशंक फा

सें हाळी शकुनी तो ७१ जिंकिले ह्मणे त्याक्षणां मध्यमणी दिधला सुयोधना दुसरे डाईं जाणा विजयरथ
समर्पिला ७२ तिसरे डाईं साचार दिधलें अक्षय भांडार त्यामाजी सिध्दी निरंतर वेचितां न सरे कल्पांती ७३
हाव चढे धर्मासी परम चतुर रंभा उर्वशी तैशा दिधल्या लक्ष दासी जाचिया रूपा समदन भुले ७४ चौसष्ट क
ळा प्रवीण मृगमद सुवास पूर्ण चौथे डाईं जाण दुर्योधना दिधल्या ७५ परम चतुर लक्ष दास पांचवे डाईं दे
निःशेष शकुनी दुर्योधना सहर्ष गगना माजी न समाये ७६ दश लक्ष कुंजर सहित पाखरा शृंगार हिरे दां
तीं जडले अपार सहावे डाईं देत से ७७ दश लक्ष दिव्य रथ जाची प्रभा सेनें वर पडत तेही दुर्योधनास
देत मागें पुढें न पाहतां ७८ पवना होन वेग गाढे गंधर्वी पार्थास दिधले घोडे जाचें अंगकांतीचे पाडें चांद
णें हा पृथ्वीवरी ७९ वरी रत्न जडित जीन क्षीरसागरीं आणिले धुऊन कीं चंद्र कीर्णें आठुन शामकर्ण घडिले
१८० कीं शुभ्र रजताचे साचार नवनीताचे सकुमार जान्हवी उदक निरंतर पाजुनियां वाढविले ८१
ऐशा अश्वांचा समस्त लक्षानुलक्ष नव्हे गणित आठवे डाईं देत दुर्योधना तेधवां ८२ कुटिल बोल बोल
ती ते क्षणी द्युतरूपें युध्द समरंगणीं टाकून जाता हा मी क्षेत्र धर्मा निर्धारें ८३ सौबळ धर्मास ह्मणत उ
दार आहे कीं धर्माचें चित्त लोभ न धरी यथार्थ तृणवत् मानि कां ८४ टाकट उष्ट्र खेचर खर आठवे डा
ईं दिल्हे समग्र भ्रमे भ्रमला सें युधिष्ठिर आधीक हावें भरत से ८५ जाळ देखुन लवला हे पतंग पडे मा
गें न पाहे सर्व उपेक्षून जाये सती जैसी पति सवें ८६ तैसें धर्मास जालें सत्य मागें पुढें न पाहे भ्रांत
अक्षय भांडार कृष्णें दें न नवमा डाईं दीधलें ८७ धृतराष्ट्रास ह्मणे विदुर दुर्योधन तुझा पुत्र परम
चांडाळ अपवित्र घात करील कुळाचा ८८ हा जन्मला जे व्हां चांडाळ अपचिन्हें प्रगटली पुष्कळ त्याचा त्या
स करीता काळ प्राणा सहित सांगीतले ८९ त्यासांगीतला बुध्दिवाद परी तूं न ऐकसी बुध्दिमंद दुष्ट फळें
[illegible] भोगीसी आतां शेवटीं ९० अझून तरी फतमोडी चांडाळ हा शकुनी दवडी दुर्योधना घालून बेडी बं
दिशाळे टाकीं [illegible] ९१ आजा टे भीष्म द्रोण मी [illegible]

धाकेंरदवराया १२ महजमागतामुखंकरून सर्व हिंदेतांपंडुनंदन धूतखेळोनदुर्जन आणिलेमर
णगर्तीसी १३ ऐसीविदुराचीवचनें ऐकोनिदुर्योधनें म्हणेरेविदुरावडिलपणें अमर्यादेनंजल्पसी
१४ पांडवाचें कल्याणइच्छिसी आमुचाघातरेचिंतिसी जैसीसर्पिणमर्शीपिल्यांसी पापराशीतैसातूं १५
मुजडनखेंपादेख परीबुध्दिहीनज्ञानमूर्ख ओमर्यादासोडूननिःशंक बोलसीयेथेंअपवित्रा १६ ऐ
सेंबोलावेंवचन जेणेनिवतीसभाजन नकळेतरीधरूनिमौन मूतप्रायअसावें १७ बोलोंनेणसीपामरा
उठजाआपुल्याघरा तुजरक्षिलेंयाअवसरा राजबंधुम्हणोनियां १८ विदुरम्हणेरेमज्ञा का कुयोधनाऐ
कधीटका दग्धपर्णीपुत्राशीका मापहोईलधृतराष्ट्र १९ दैपाग्नीवाटलाप्रबळ पतंगप्रायपडालसकळ
माझीबुध्दीकेवळ विषप्रायवाटेतुम्हा २० पांडवांचीलाभलीसंपत्ती मूर्खाकुरववाटेचित्ती परिसांगतोतु
म्हानिश्चिती लाभत्यासजालाजाणपां १ त्याचीसंपत्तीत्यासजाईल परीनीवैरपृथ्वीहोइल ईश्वरीमाया
गहनसबळ अन्यायकरवीतुजहातीं २ त्याचेत्याससर्वयाल काळांतरेंप्राणहीवोपाल अमर्यादेंआठेलद
ळ परिकुणफिटेना ३ पितामुझाजीर्णरडुत पांडवांघरींपडेलयथार्थ व्यासाश्रमींअग्नित दग्धहोईल
शेवटीं ४ प्राणत्यागितांकुयोधन मरआठवीसीमाझेंवचन धूतनव्हेतुझाप्राण भीमग्राहिकपातला
५ माझांवचनेंवाटतीकठिण परिपुढेंगोडअमृताहून औषधआधींकडवटपूर्ण रोगहरणपुढेंकरी ६
जसीनावदसाकर मुखींघालितांखडखडीफार परिपुढेंगोडअपार वचनेसाचारमाझीतैसी ७ तुरट
वाटेअमळक परिपुढेंगोडीअधिक माझींवचनेदुःखमोचक न्यायनिष्ठुरतैसीच ८ पितापदवीपुत्रा
लागुन त्यासिवाटेविषासमान परिपुढेंगोडीजाण महिमापूर्णवाढेजेव्हां ९ असोऐसेंबोलून विदुरेंध
रिलेंमौन न शकुनीम्हणेधर्मालागुन तुवांघूतयज्ञआरंभिला १० पूर्णनहोतांपूर्णाहुती जगींवाटेल
अपकीर्ती उदारपणधरीचित्तीं धैर्यनसांडीसर्वथा ११ शुभडावपडतांएकसरां इतुकेंहीनेसीआपुल्या

धरी धर्मपेटलाअविचारी शपथकायबोलत १२ पूर्वसमुद्रधरून पश्चमसमुद्रपर्यंतपूर्ण खिल्लारेंभरलींसघन दि
ल्हींतुह्मातिनकीं हीं १३ तोहीडावजिंकिला पुढेंधर्मकायबोलला देशदुर्गगडतेवेळां सर्वराज्यवोपिलें १४ ब्राह्मणादि
धलेंवृत्तिधन तेवेगळेंकरून पूर्ण तेरावेडावीजाण सर्वदेशसमर्पिले १५ द्रौपदीचेपंचपुत्र जिंकिलेनलगतांक्षणमा
त्र चौघेबंधुपवित्र आपणपांचवाशेवटीं १६ ह्मणेतुमचेनीचभल्ल तैसेपांचबंधूयथार्थ तोहीडावजिंकिलासमस्तजा
लाअनर्थह्मणतीपैं १७ शेवटींद्रौपदीचाडाव घालूनखेळेधर्मराव जैसेंपिशाचभुलोनिसर्व शकुनिजायआपलें १८ द्रौप
दीऐशीसुंदरी त्रिभुवनांतनाहींदुसरी इंद्रनीळकीळगाळूनिनिर्धारीं वोतिलीनेरुकाळ १९ जीचेअंगींचासुवास जाय
अर्धयोजनआसमास जैसेंश्रीकृष्णरूपविशेष तैसीचद्रौपदीजाणिजे २० एवंविसावेडावीपूर्ण जिंकिलेंद्रौपदीनिधान
हाहाःकारकरितीसज्जन महाअनर्थभाविती २१ ऋषिवस्त्रस्थळेंपीटिती भूपाळकपाळेंबडविती भीष्मद्रोणाचेनेत्रीं
येनी अश्रुपातढळढळां २२ कर्णदुर्योधनशकुनी यांचाआनंदनमायेत्रिभुवनीं अंधअल्हादलामनीं ह्मणेंसंपदाजनन
ठेविजे २३ वीसडावसंपूर्णजाले आतांआणीकदोनउरले अरण्यवासपुढेंबोलिले अज्ञातवासदुसरा २४ जालियाव
स्त्रहरण पुढेंआहेतेंनिरोपण व्यासशिष्यवैशंपायन जन्मेजयाप्रतिसांगे २५ ब्रह्मानंदेश्रीधर तेचकथावर्णीतसा
चार श्रवणकरोतपंडितचतुर विवेकसारसज्जन २६ सुरसपांडवप्रतापग्रंथ सभापर्वटीकाश्रीधरकृत नारदव्यास
बोधअसतांघूत धर्मराजखेळले २७ इतिश्रीपांडवप्रतापादिपर्वविंशतितमोध्यायः श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीमज्जगदी
श्वरार्पणमस्तु शुभंभवतु ५ ५ ५ ५
५ ५ ५ ५ ५

कौरवसभा
पांडव
दुःशासन
द्रौपदी
श्रीकृष्ण

अ०

श्रीगणेशायनमः अजातशत्रुधर्मराज धर्मपरायणधर्मात्मज स्वधर्माचरणदेवद्विज भजननसांडीसर्व
था१ कौरवपरमदुर्जन कपटद्यूतत्यांसिखेळोन राज्यसेनादेशधन द्रौपदीसहितजिंकिलें २ पांचपांडवपंचा
नन कपटकूपींपडिलेयेउन कीतेपंचमराळनेउन पंकगर्तेतरोविले ३ विदुरासम्हणेंदुर्योधन पांडवजिं
कोनिकेलदीन जैसेदग्धवनीहरिण तेअहानक्षुधितपें ४ द्रौपदीजालीआमचीदासी ऊठबोलाऊनिआणि
सभेसी तिचेपतिव्रतापणजनासी दाखऊंआजीतत्वतां ५ विदुरम्हणेपापखाणी तुजनिकटआलीप्राणहा
नी कायअपवित्रबोलसीवाणी महादुर्जनाकपटीया ६ दुर्योधनम्हणदेखा हापांडवाचापाशिराखा कु
त्रिमसांगतविवेका हि तशत्रुघातक ७ प्रातकाम सूतपुत्रजाण त्यांससांगेदुर्योधन आणीपांचाळीबाला
उन शीघ्रसोड्डनसभेसी ८ हेरमचेशाळामंदिरीं म्हणेंअहोद्रुपदराजकुमरी दुर्योधनंतेथवरी बोलाविलेंजा
णपा ९ धर्मेहारविलेंसमस्त कोणाचाशब्दनचालेतेथं द्रौपदीम्हणेमनांत मांडिलाअनर्थनिर्धारें १० वा
टेकाळजींघातलीसुरी कींसौदामिनीपडिलीगिरीं कींसकुमारकमळिणीवरी वज्रघायपडियला ११ मग
द्रौपदीम्हणेंतयासी जाऊनिसांगेंभीष्मद्रोणासी तुम्हीश्रेष्ठअसतांसभेसी विपरीतकरणीकायहे १२
धर्मेहारविलेंआपणास तरितोतुमचाजालानिःशेष धर्मासआणिआम्हास मगसंबंधकायसा १३ मींपंचपु
रुपांचीललनापाहीं मजसर्वथाजिंकिलेंनाहीं नारदेनेमिलेंसर्वही सीमाकेलीअलोट १४ पांचांठाईवांटि
ले वर्षे दोनमासद्वादशदिवस यानमीस्त्रीभीमाचीनिःशेष तरीधर्मेकवीहारवी १५ सभेसियेऊनसूतनं
दन सांगसुयोधनावर्तमान ऋतुस्नातद्रौपदीनिधान केसीआणूंसभेंत १६ त्यासनिर्भर्च्छीदुर्योधन
मगदुःशासनादुःशासन म्हणेंधावआणीवोढून केशीधरूनयेथवरी १७ आमचीतेजालीदासी मगतिचीभीडका
यसी दुःशासनधांवल्यांवेगेंसी द्रौपदीपासींपातला १८ हरिणीवरीक्रोधयुक्त महाव्याघ्रजेंविंझेपावत कींत
स्कर अग्निरत्न राजभांडारींएकल्याचा १९ कींमेदिनीगर्भरत्न हारूंधांवलाद्विपंचवदन तैसायाजसेनीज

वळयेउन कायबोलेदुरात्मा २० ऊठआतांवेगेंयेथुन राजापाचारितोतुजलागुन तुझेभ्रतारदासकरून आ
म्हींजिंकूनठेविले २१ तूंआमचीदासीनिर्धारें ऊठसभेचालसत्वरें तुझेंभाग्यउमटलेंचतुरे दुर्योधनावरीआ
तां २२ आयुष्यांतियमदूत तैसाद्रौपदीसभासत कंठहोऊनसद्गदित कायमातबोलिली २३ म्हणेंदेवरातूं
अवधारी सभेसकैसीनेतानारी ज्येष्ठसहोदराचीसुंदरी गांधारीसमतुम्हातें २४ देवराऐकेंयेसमयीं मा
झाकैवारीतूंचिहोई निर्दोषपदरींयशघेई केवळशिष्टाईकरीतैसी २५ देवरातूंहोयमाउली लज्जारक्षीआ
जिआपुली माझाद्रुपदराजयेवेळी तूंचिहोईदयाळा २६ किंवाशस्त्रघेऊनतत्वतां वधीमजयेथेंचिआतां लोकः
धन्यम्हणतीऐकतां वाणितीलकीर्तीतुझी २७ निर्दयबोलेपापराशी ऊठवाचाळेचालसभेसी तुजओढोनि
नेईनकेशीं जालीसदासीआमचीतूं २८ हिंसकासकैंचीदया मार्गभ्रासकैंचीमाया उपरतीपैशुन्यवादिया
कदाकाळींघडेना २९ धनलुब्धासनावडेधर्म जारासिकायसेंसत्कर्म साधुनिंदकानावडेप्रेम भजनमार्गेक
दाहीं ३० शांतनव्हेकदाविखार दुर्जननबोलेकधींचमधुर ध्यानकरूंबैसलेखर काळत्रईघडेना ३१असो
ओढवलाकाळकठिण पांचाळीउठिलीतेथुन गृहांतचालिलीदेखोन दुःशासनधांवला ३२ अर्धयोजनआ
समास जीचेतनुचाजायसुवास चहूंकडेफांकेजीचाप्रकाश तिचेकेशधरियेले ३३ हाकफोडीश्रीकृष्णा
भगिनी असडूनिपाडिलीमेदिनीं ब्रह्मांडडळमळिलेंतेक्षणीं उसळेपाणीसागरींचें ३४ रोहिणीवरवासर
मणी खचोंभावितीतेव्हांधरणी वैकुंठकैलासतेक्षणीं डळमळिलेंअतिदुःखें ३५ केशींअकर्षोनिवेल्हाळ
सभेसिचालिलाचांडाळ जैसाहरिणीसधरूनशार्दूळ घेऊनिजायत्वरेनें ३६ रुदनकरीतअधोवदनी नय
नोदकेंभिजतीकुंभिनी म्हणेंवीरगुंठीकरेंकरुनी हळूचालीधरीकां ३७ भूषणेंजालींविगलित ठाईंठाईंग
ळोनपडत मुक्तेंवाटेसविखुरत तेजेंकविगुरूसारिखीं ३८ म्हणेंराजसासखयादेवरा हळूचचालेंनकरीत्वरा
केशवोढतीएकसरा सुटाळमुष्टीधरीकां ३९ उभाराहेंएकक्षण कासावीसजालेमाझेप्राण रसनाअधरगेलें

वाळोन जीवनेवीणयेधवां ४० द्रोणगुरूचीतुह्मासआण धांवडूंनकामजलागुन तुटोनिपडोंपाहतीचरण प
ि कुलक्षणनायके ४१ सभेसआणिलीसुंदरी उजेडपडिलासकळांवरी विद्युल्लताजैसीअंधारीं नभमंडळींप्र
काशे ४२ देखतांद्रौपदीनिधान संतभक्तींझांकिलेनयन परमसंतोषलेदुर्जन स्वरूपदेखोनतियेचें ४३ जिचीया
स्वरूपावरून कुर्वंडीकरिजेरतीरमण अपर्णेचीअपरप्रतिमाजाण गुणनिधानद्रौपदी ४४ पाकशासनकम
ळजन्मा त्यांचीनकरवेजसीप्रतिमा रंभाउर्वशीतिळोत्तमा चरणांगुष्टींनतुळती ४५ कृष्णाचऐसीकृष्णभगिनी
कींवोतिलीइंद्रनीळगाळुनी खंजनमृगमीनलोचनावरुनी वोवाळुनीटाकावे ४६ दंतजेविंहिरेखाणी बोल
तांउजेडपडेमेदिनीं जीचामुखप्रकाशदेखोनी रोहिणीवरलज्जित ४७ कर्णह्मणेंद्रौपदीस तूंदुर्योधनाचेअं
कींबैस भोगींआतांराज्यविलास सोडींआशापांडवांची ४८ ऐसेंऐकतांपद्माक्षी भीमार्जुनाक्रोधेंलक्षी परि
पक्षहीनअंधपक्षी तैसेदीनदिसतीते ४९ भीमासनावरेक्रोधकदा सावरूनिकरेंअकर्षीगदा ह्मणेंकौर
वांचाशिरच्छेदा करीनआतांक्षणाईं ५० पांचाळीनेंपाहतांविलोकुन माझेंहृदयजालेंशतचूर्ण वडवानळ
जाळीतृणकानन तेविंदुर्जनमारीनहे ५१ धर्मह्मणेंऐकभीमा त्याणीपणकरूनजिंकिलेंआह्मां क्रोध
आवरीकरीक्षमा वेगेंपाहेविचारून ५२ तुजक्रोधनावरेचकदा तरीमाझियेमस्तकींमेरीगदा परीस्वध
र्मसत्यमर्यादा सर्वथाहीनसांडीतूं ५३ चळतीलमेरुमंदर पृथ्वीसोडीलभूधर हेंअघटितघडेलसाचा
र परंतुधीरनसोडावा ५४ पश्चमेसउगवेलजरीरोहिणीपती शिळेवरीकमळेउगवती हेंहीघडेपरिनवर्त
तीं भगवद्भक्तअसत्यपैं ५५ भीमह्मणेंएकांती वडिलींतुजसांगितलीनीती नारदव्यासाचियायुक्ती रत
द्यूतींहोऊंनको ५६ वर्जितांखेळोनियांकपटद्यूत व्यसनींपाडिलेसमस्त तुझेतोडीनआतांहस्त गदाघायें
तत्काळ ५७ अवश्यह्मणेंमहाराजधर्म गदाउचलीक्रोधेंभीम तोंसद्विवेकीपार्थपरम हस्तधरितभीमाचा
५८ ह्मणेंयाब्रंह्मांडमंडपांत धर्माऐसासत्यशांत नाहींनाहींहोयथार्थ साक्षदेतसरस्वती ५९ जोनिश्चयें २

गंगेचालोट तोविवेकरत्नाचामुकुट कींभक्तिवैराग्यरणींसुभट दिव्यहिराजन्मला ६० सद्बुद्धीसरोवरींचाराजहंस
भक्तिउद्यानीचातापस जोअजातशत्रुनिर्दोष पंडुसमानआह्मातें ६१ तेणेंशब्दगोविलानेमा तोविनिश्चयतुः
ह्मांआह्मां धर्मासमारूनभीमा अपकीर्तीचकरावी ६२ संसारमृगजळन्याय याचाभरवसाअसेकाय येअ
वनीसबहुतराय भोगूनिगेलेपुढेंजानी ६३ भीमाचाक्रोधाग्निअत्यंत चालिलाविवेकवनजाळित रूशब्दवर्षे
लामेघपार्थ तेणेंशांतजालातो ६४ धर्माचेचरणवंदुनी भीमबैसलास्वस्थानी तोंदुःशासनकेशकवळोनी
झोंकादेतद्रौपदीते ६५ इंदुवदनापद्मलोचनी पद्मजनकाचीभगिनी सकुमारएकवसनी जाचिलीदुर्जनीं
तेधवां ६६ पूर्वीजालाराजसूययज्ञ सेवटींजालेंअवभृतस्नान तेव्हांकेशमोकळेकरून वीरगुंठीबांधिलीजे
६७ तेहस्तीदृढधरूनदुःशासन झोंकेदेतसेहिंसकदुर्जन तेव्हांद्रौपदीगुणनिधान भीष्मद्रोणाकडेपाहे ६८
तुह्मींवडीलन्यायसागर अन्यायहोतोपरमदुस्तर इहींमजजिंकिलेंकायसाचार वदाउत्तरयेधवां ६९ भीष्मव
देतेक्षणी ऐकेंवोसद्गुणरत्नखाणी धर्मबोलेस्वमुखेंकरुनी जाह्मासपणींजिंकिलें ७० तेथेंआमचेंन्यायवचन
कोणमानीलसांगप्रमाण मगबोलेगुरुद्रोण भीडधरूनकौरवांची ७१ समुद्राहूनिअगणित धर्माचेंनगणवे
मातेंसत्व निर्मळअंतरशांतदांत वचनविपरीतनबोले ७२ कोणीभीडटाकुन नबोलेचियथार्थवचन हेंदेखो
निविकर्ण बोलताजालाउगेनियां ७३ द्रौपदीजिंकिलीह्मणतीलकोणी गळितकुष्टझडेलवाणी त्यासनिक
टआलीप्राणहानी येचक्षणींजाणिजे ७४ त्रिवारहाकफोडुनी ह्मणेंनाहींजिंकिलीयाज्ञसेनी हेअन्यायअ
स्थानी साधूकोणीनसेयेथें ७५ अंतरबाह्यधृतराष्ट्रअंध पुत्रलोभेंजालामंद अरेहेभीष्मद्रोणवृद्ध सत्य
येथेंबोलती ७६ कुळक्षयासकारण तोहाशकुनीआणिकर्ण अधिकाधीकदुर्योधन इहींबोधूनखवळिला
७७ राजाकेवळराक्षसजाण व्याघ्ररूपीअवघेप्रधान सेवकतेकेवळश्वान मगअन्यायवर्ततअसे ७८ दुर्यो
धनासस्फुरववाटत परिसमीपआलाअनर्थ द्रौपदीकेलीउभीयेथें भुललेमूर्खसर्वही ७९ गांजितांद्रौपदीवे

ल्हाळा परिहे प्रळयाग्निचीज्वाळा तुह्मापतंगासकळा भस्मकरीलक्षणार्द्ध ८० ऐकोनविकर्णाचीवाणी रुरवर्षती
दिव्यसुमनीं मस्तकआणितर्जनी डोलवितीआनंदें ८१ ऐसेंदेखोनिनेक्षणी कर्णकोपलाशतगुणीं धर्मबोलेंकरू
नपणीं याज्ञसेनीहरविली ८२ तेंअसत्यअवघेंकरुनी भलतेंविजल्पसीसभास्थानी तुजवधितोंयेचक्षणीं दु
खवेलमनींगांधारी ८३ शतमूर्खतूंनिशर्द्धी वडिलासशिकविसीबुद्धी येथेंकायजालाअविधी दासीसभेसिआ
णिल्या ८४ एकस्त्रीभ्रतारपांचजण कोणेंशास्त्रींकेलेंलेखन हेदोपखाणीजाणि करानग्नयेथेंआतां ८५
वस्त्रेंभूषणेंसंपूर्ण अवघींघ्यापांडवांचींहिरोन ऐसेंऐकतांपांचैजण वल्कलेंवेष्टूनबैसले ८६ जानुउघडीक
रून द्रौपदीसदावीदुर्योधन ह्मणेंबैसअर्धांगींयेउन पट्टराणीहोईतूं ८७ भीमेंगदाउचलोनिलवलाहें ह्मणें
अंधपुत्राइकडेपाहें तुझाअंकगदाघायें चूर्णकरीनजाणपां ८८ हेंजरीनकरवेमाझेनी तरिप्रसऊनवंध्याकुं
तीजननी लज्जालागलीसोमवंशालागुनी कृष्णदास्यत्वव्यर्थगेलें ८९ ऐसेंऐकतांचवचन प्रगटबोलेदुर्योधन
ह्मणेगेद्रौपदीयेउन बैसनिःशंकमांडीवरी ९० ऐसेंबोलतांदुर्योधन द्रौपदीबोलेतीक्ष्णवचन बळेंचचेतविला
प्रळयाग्न कौरवकूळजाळावया ९१ बळेंखवळिलाभुजंग किंशुंडेंपिळिलामत्तमातंग निद्रिस्तव्याघ्रसवेग ना
सिकावरीताडिला ९२ तैसीतेपांडवललना ह्मणेंचांडाळादुर्योधना गळितकुष्टभरोनिरसना झडोंदेतुझीपापि
या ९३ महाप्रळयसौदामिनी हिंसकापडोतुजवरीयेउनी तुझेदृष्टीचेकोळसेहोउनी भस्महोऊंदेदुर्जना ९४
भीमेंगदानेमिलीनवरी रणचत्वरींघेईमांडीवरी पंचप्राणघालोनिबाहेरी प्रळयलग्नलावीकां ९५ तुझास्त्री
याहृदयपिटुनी वाद्येंवाजवितीभयंकरवदनी रक्तमृत्तिकामिळोनी हळदीसहजचीलागेल ९६ मगतेगदाहृद
यींधरून समरमंचकींकरीशयन बंधूसमवेतयमसदन पावोनिकरीसांडेतेथें ९७ शब्दशस्त्राचेघायतीः
क्ष्ण लागतांखवळलादुर्योधन ह्मणेंइचेतुकडेकरून सर्षपप्रायदाकारे ९८ जिव्हाआणिनासाकर्ण दाकाह
स्तशस्त्रेंछेदून दुःशासनाफेडींवसन दावीनग्नसभेंत ९९ वामहस्तेंकेशकवळुन सव्यहस्तेंफेडीवसन नगर


लोकसभासज्जन झांकितीनयनअतिदुःखें १०० कृष्णासकरावयाश्रुत वेगेंपिटिलामनोदूत ह्मणेंमांडिलाथोर
आकांत धांवेंत्वरीतकैवारिया १ रुक्मिद्वाकारकेभवानी मूळपीठद्वारकाविलासिनी हृदयवृंदारण्यविहारणी
वेगेंकरूनधावेंकां २ खगवरकेतनाइंदिवरनेत्रा इंदिरावरासुजळजळगात्रा विश्वव्यापकात्रिनेत्रमित्रा सूत्रा
चामहिमानेणेतुझा ३ आतांयादवकुळमुकुटअवतंसा कंसांतकाक्षीराब्धिविलासा सच्चिदानंदामनोहरवेषा
शरणांगतातारिसीतूं ४ सनकादिवंद्याजगदोद्धारा पद्मजातजनकात्रिभुवनसुंदरा पांडवपाळकारणरंगधी
रा अतिउदाराश्रीरंगा ५ मायाचक्रचाळकानिरंजना महारजतपूर्णवसना मधुमुरकैटभभंजना जगज्जी
वनाधावेंकां ६ दशावतारचक्रचरित्रपाळका धांवअनंतब्रह्मांडनायका ब्रह्मानंदमुखमृगांका दावीएकदांयेवे
ळे ७ मुचकुंदोद्धारकागिरिधरा पंचशरजनकापरात्परा निगमागमवंद्याअनंतनेत्रा संकटमाझेंनदेखसी
८ अंधजातांघोरकांतारीं समागमीटाकोनिगेलेदूरी मगतळमळीनानापरी मजमुरारीतेविजालें ९ व्याघ्रें
पाडसधरिलेंवनी तेंदीनरजनीचिंताजननी वैकुंठपुरविहारिणी चिंतिलेंमनींतेवितूतें ११० प्रसूतसमयमा
ध्यान्हीं तृषिंतधेनूदग्धवनी तोंसहस्रव्याघ्रीयेउनी गर्जनाकरीतवेढिली ११ भक्तवत्सलास्नेहाळाहरी तेवीं
मजगांजिलेंदुराचारी कोठेंगुंतलासकैवारी कमळायतनाहृदयस्था १२ येसमईनयेसीकरुणार्णवा उणेंये
ईलकींबिरुदनावा भक्तवत्सलारमाधवा कंठबाहतांशोकलाकीं १३ गांजितीकौरवजनदुर्जन यावयाकांधरि
लाअभिमान पांचाळीश्रीरंगातुझीबहिण घोषगाजेत्रिभुवनी १४ कौरवकुबुद्धीसमुद्रांत बुडाल्येंहरीदेईं
हात दीनवदनजालेपंडुसुत बांधलेदृढकपटपाशें १५ कौरवपीडावणवादारुण जळतोकेशवावरुषेंघन
भीष्मद्रोणाचेंनचालेवचन म्लानवदनबैसले १६ कौरवसभाभूतमेळीं पडिलीतुझीदासीपांचाळी पंचास्य
रीतूंवनमाळी धावयेवेळींत्वरेनें १७ हरितूंकंठीरवदयाब्धी तुझीकन्यामीयेथेंद्रौपदी कौरवगजींवेढिलेंत्रिशुद्धी
आतांधांवआर्ताहाकदेत १८ चिंतारोगजडलादारुण धांवेंकृपारसपात्रघेउन तुजपासींधाडीनप्राण कुणप

येथेंटाकोनिहे १९ लपावयातुह्मेहृदयीं ह्मरीमजलागवदेंई लाजगेलियालवलाहीं मगकायउरेल २० करुणाक
रागोपाळा विलंबफारकांलाविला जालियाभगिनीचीअवकळा मगकायडोळांपाहसी २१ कामधेनूश्रीरंगमा
उली कोणतेवनीआजिगुंतली द्रौपदीवस्त्राविसंबली कौरवदृकसभेंत २२ आहाश्रीकृष्णायादवेंद्रा तुजकायला
गलीयोगनिद्रा द्रौपदीकंन्याएकसरा हाकफोडितांशोकली २३ आपणवादविलेंह्मणउन जडकापसतारीजीवन
पाळिलेंजातांबुडोन ब्रीदेंगळ गळोनगेलींकीं २४ यदुकुळकमळविकाशमित्रा पांडवमानसचकोरचंद्रा जगद्वंद्या
कृपासमुद्रा करीत्वरायेवेळे २५ द्रौपदीचेकरुणाशब्द हेचिउडालेप्रेममिलिंद श्रीकृष्ण कर्णकमळीसद्गद गुंजा
रवजाणविती २६ कौरवसभाकंटकस्थळ आणोनिद्रौपदीचेशब्दमराळ कृष्णमानससरोवरविशाळ आऊनते
थेंबैसले २७ स्वानंदरूप परियंक तेथेंपहुडलावैकुंठनायक चरणतळहातीतेथेंदेख ज्ञानकळारुक्मिणी
२८ अनुभवबोधस्वस्वर गातीनारदआणितुंबर तेथेंउद्धवआणिअक्रूर स्वगंधवायूजाणविती २९ सप्रे
मलक्ष जोडल्याकरीं उभासन्मुखतोसपर्णारी चरणतळहातीभीमककुमारी देखेंनखअंकुरींब्रह्मांडे ३० कौरवस
भाकाळभ्रईदारुण द्रौपदीचेंवस्त्राहरण करावयातस्करदुःशासन घालाघालूपहातसे ३१ तोंद्रौपदीचेशब्द
रूरेख तेहीद्वारकेंतघालितीहांक जागाजालावैकुंठनायक घा बरेपणेंविलोकी ३२ ह्मणे पाहेयादवेंद्र पांड
वभांडारींकौरवतस्कर द्रौपदीलज्जाधनअपार नेऊंपाहतीहरूनियां ३३ रुक्मिणीचेहातिंचाचरण अ
सडोनिउठिलाजगज्जीवन धांवघेतलीउठोन नबोलतांकोणासी ३४ पीतांबराचीरुळतकांस तोनसांवरी
वहृषीकेश मुकुटराहिलारुळतीकेश सुगंधस्वमनेंसांडती ३५ कौस्तुभमाळावैजयंती निकटनसांवरीश्री
पती खेदपावलाश्रीतनुमती कंठसद्गदजाला ३६ श्रीरंगाचावेगापुढें मनपवनकायसेंबापुडें चिंतिलि
यागतींजावेंगरुडें परितोहीमंदराहिला ३७ धांवाकेलाहेंभक्तिलक्षण परितोहृदयींचनांदेनारायण सर्व ४
व्यापकजगन्मोहन गमनागमननसेची ३८ नारदपुसेरुक्मिणीलागुन कांघा बरेपणेंगेलेजगज्जीवन ते

ह्मणेद्रौपदीगांजिलीह्मणउन नसांवरतधांवले ३९ इकडेद्रौपदीचेंवसन फेडूंपहातदुःशासन तंवतोपाठिसी
येउन उभागकलाकैवारी ४० जोपीतांबरआपला तेणेंझांकिलीद्रौपदीबाळा प्रकाशअसंभाव्यझळकला कौ
रवसभादचकली ४१ कृष्णवसनतेजाळसुवास तेणेंस्वगंधेंभरिलेंआकाश उभापाठिसींआदिपुरुष सद्भक्तीं
वदेखिला ४२ अल्हादलीपांचाळी ह्मणेंकैवारियावनमाळी मजगांजिलेंदुर्जनीसकळी हरीमाउलीनसतांतूं
४३ हरीह्मणेंद्रौपदीसी जेंजेंबोलिलेपापरासी तिहींतेंगांजिलेंदेवकीसी मींहेंमानसींभावितों ४४ आल्याजा
णोनिभगवंत धर्मबंधूसरवूणदावित नयनीवाहतीअश्रुपात कंठसद्गदितजाहला ४५ देखोनिपाठिसीदयार्ण
व विदुरासनावरतीअष्टभाव भीष्मद्रोणादिभक्तसर्व ब्रह्मानंदेंडोलती ४६ क्रोधनावरेदुर्योधना ह्मणेरेमंदा
दुःशासना भीडकायसीधरिसीवसना फेडींपाहूंदेसभेंत ४७ तेणेंआसुडिलेंचीर तोंआंतक्षीरोदकसुंदर
ह्मणतीअद्भुतस्त्रीचरित्र वस्त्रांतवस्त्रनेसली ४८ तेहीवोढितोदुर्जन तोंआंतदेखेरक्तवर्णवर्ण द्रौपदीझां
किलीसंपूर्ण चरणांगुष्टहीदिसेना ४९ सभाजालीतटस्थ ह्मणतीवस्त्रभारअसंख्यात अमोलीकजातेजा
द्भुत कोणंपुरवीनकळेहें ५० हांवेंचदोनिदुःशासने दोहीहातींफेडीतवसनें गणतीदशशतवदनें करितांगं
ईपडेना ५१ कनकवर्णवस्त्रवोढी तोंआंतदेखेजरीसाडी त्याआंतकुसुंबीचुनडी तेहीवोढीअपवित्र
५२ पाटाऊंओढीजरतारी तोंकल्हारवर्णत्याअंतरी जरिशिखीमराळपदरी तेंहीआवरीवेगेंतो ५३
कुसुमवर्णपदर करवीरवर्णकोविदार रक्तोत्पळवर्णसिंदुर चंपकवर्णसाजिरी ५४ केशरीहरिद्राकुंकु
मवर्ण तप्तकांचनलखलखीतपूर्ण अनंतजोतिचींकल्याणवसन वर्णाचींनिघतीअसंख्य ५५ दूर्वा
रंगजंबुचंदन रक्तपीतधवळकृष्ण समरंगेंरंगीतपूर्ण कनकीदळवर्णएकपैं ५६ मिलिंदवर्णअपार चंद्रसूर्यकळस
कुमार निराळवर्णेंपरिकर नक्षत्रठसेझळकती ५७ गुंजारंगअग्नवर्णे रंभागर्भकाश्मीरवसनें दुग्धवर्णकिल
कपर्णें जगज्जीवनेंपुरविलीं ५८ कंबुवर्णरजतहंस चामिकरवर्णेंपद्मकोश इंद्रगोपमाणिकरंगीवि

शेष द्वारकाधीश पुरवितो ५९ काशीकांतीअवंतिर्ची अयोध्यामथुरामायामाहुरचीं आभरणें आणिलीं द्वारके
चीं भगिनीलागीं श्रीधरें ६० भरतरमणीकविविधशाहिरण्य कीर्तिदाक्षहरीसुवर्ण यानवखंडीचीं वस्त्रें संपूर्ण
जगज्जीवन पुरवित ६१ जंबुशाकप्लक्षशालमली क्रौंचकेतश्वेतवल्ली यासप्तद्विपिचीं वस्त्रें वनमाळी पांचाळीतें
पुरवित ६२ अंगवंगदेशकलिंग कलिंदकाश्मीर भोजसुरंग सौवीरसौराष्ट्र श्रीरंग भरणीसवेग आणित
६३ बंगाल मागध माळवनेपाळ करेलचोळपांचाळ गौडमत्स्याळस्त्रीराष्ट्र सिंहळ द्राविडकर्नाटकआंध्रपें
६४ करहाटकमहाराष्ट्रघोरन घोटनाटपजंबुपुलिंदकुन भिल्लगांधारविदेहचेद्यजाण विदर्भविक्लकके
लय ६५ केशळकुंतळकिरात स्फरसेनसेवनसमस्त कोंकणगोकर्णमत्स्यसत्य मंदवशाल्वसीधांवती
६६ सैंधवपारसीकगुर्जर यवनबर्बरजालंदर छपन्नदेशिचीं वस्त्रें श्रीधर देत अपार पांचाळीतें ६७ चिन्न=
मुलतानलाहुर काबुलबैंगोरफिंगाणथोर खुरासनआणीकृष्णवस्त्र वस्त्रें तेथिचीं अपारपैं ६८ विष्णुकां
चीशिवकांचीकुंभकोण चिदंबरअरुणाचळमल्लिकार्जुन शेषाचळकिष्किंदापट्टन प्रतिष्ठानकरवीरपें ६९स्व
र्गमृत्यूनागलोक वैकुंठकैलासब्रह्मपदसुरेख सुरासहितशशिनायक वस्त्रीं मत्स्यहरेखिला ७० दशाव
तारअष्टदिग्पाळ चवदामनु लिहिले भूगुळ द्वादशमित्रएकादशरुद्रसकळ वस्त्रावरी पुतळे हे ७१ रामायण=
भारतभागवत शिवविष्णुचरित्रअद्भुत एकसहस्त्रनामेंमंडित कनकाक्षरीं रेखिलीं ७२ ऋषिमंडळीसिद्धिचार=
ण सोळासिद्धनवनारायण चौऱ्यासीं आसनें योगसाधन ऐसीं वस्त्रें निघालीं ७३ शक्रमहरस्थहस्तनापुर कु
रुक्षेत्रीं युध्यपुढें होणार रणीं पडिले कौरव पामर मेनें समग्र रेखिलीं ७४ मांडीवरी गदा घालुन भीमें मारि
ला दुर्योधन दुःशासनाचें वक्षस्थळ फोडुन रक्तपान केलें असे ७५ इतकें दुर्जन पाहती परि सावध कोणी न होती द्रौ
पदीचा कैवारी जगत्पती अनंतहस्तें नेसवी चीरें ७६ अनंतकोटिब्रह्मांडें भरलीं जवळी अक्षय दिंडें कृष्णनायका
चीं प्रचंडें वस्त्रें शेषा न गणती ७७ द्वारकेचा सभाग्य चाटा वस्त्रश्रेणी पुरवी अचाटा न कळे हें कौरवांचा थाटा का

हीं कुवेश न चालती ७८ रुईराहाटचिवटमाग काहीं न घालितां श्रीरंग अचाटपटश्रृष्टिसुरंग पुरवीत सेनेका
ळीं ७९ आपला पितांबर सेवटीं द्रौपदीस नेसवीत जगजेठी रत्नदर्शन रोऊन वोटीं सुदर्शन उचलिलें ८० ह्मणें=
यावें सनासलाविनां हान दग्ध करीन कौरव समस्त विदुर द्रोण गंगासुत ह्मणती अनर्थ मांडिला ८१ धृतराष्ट्रा=
स जाणविती मात सर्वांचा येथें मांडिला अंत दुर्योधन भयाभीत दुःशासना वारीतसे ८२ दुर्योधन ह्मणें वस्त्रभार
भांडारीं ठेवा हे समग्र तों एकही न दिसे साचार अभाग्यासी तेधवां ८३ तों अवचिन्हें जालीं बहुत गगनीं उठिले
त्रिविधकेत मेघरक्तधारा वर्षत भयाभीत कौरव पैं ८४ भक्तसाधूनगरजन द्रौपदीस करिती सप्रेम नमन कौ
रवांस निंदुन वर्णिती यश पांडवांचें ८५ दुर्योधनास ह्मणें भीमसेन तुझी मांडी मीं न करीं चूर्ण तरी पूर्वज पावती पत
न जीतची जाण मेतमीं ८६ गांधारी हृदयपिटिन भीम बोलले तें करील यथार्थ धृतराष्ट्रें पांडव समस्त द्रौ
पदीसहित बोलाविलें ८७ आलिंगून पांचहीजण ह्मणें चांडाळ हा दुर्योधन येणें तुह्मास कष्टविलें पूर्ण तें काहीं
आठऊं नका ८८ मी वृद्ध चक्षुहीन धर्मा करीं तूं माझें पालन तथास्तु ह्मणें भीमसेन ऐसेंच होईल सेवटीं
८९ द्रौपदीचा माथां हस्त ठेऊनि धृतराष्ट्र बोलत मायें तूं कुळतारक यथार्थ दुर्जनीं कष्ट दिल्हे तूतें ९०
इच्छा असेल मनांत तें तूं माग पुरवीन सत्य येरी ह्मणें पांडव मुक्त पणीं जिंकिले ते करावे ९१ शस्त्रें वस्त्रें
राज्य रथा देऊन बोळवावे इंद्रप्रस्था दासन ह्मणावे आतां इतकें चिंता ना देइजे ९२ तत्काळ चिके
लेमुक्त उपहास्तून कर्ण हांसत ह्मणें तुह्मीं पंडुरूत षंढ तील संसारीं ९३ बंदी पडिलां समस्त तेस्त्री
प्रयत्नें जालां मुक्त जारकर्म करूनि पाळित पती जैसी स्वैरणी ९४ अर्जुन ह्मणें मशका त्रषाकौळिकअन्नभ
क्षका कुळहीना सहस्त्रमूर्खा ऐक आतां प्रतिज्ञा हे ९५ आह्मी नपुंसक कीं रणशूर पुढें कळेल हें समग्र तुझें रणीं
छेदीन मी शिर तरीच पुत्र पंडुचा ९६ असो रथीं बैसोनि पांचहीजण माता कुंती द्रौपदी निधान सिबिकारूढ होऊन नग
रांतून चालिलीं ९७ पूर्व द्यूत संपलें आतां अन्य द्यूत आरंभिलें तें पुढें आहे कथिलें श्रवण केलें पाहिजे ९८ अंतरीं येऊन नेवेळां

श्रीरंगसकळांसीभेटला धांवोनिद्रौपदीवेल्हाळा मिठीगळांघालित ९९ नयनोंदकेंकरून केलेंकृष्णाचरणक्षाळ
न ह्मणेंश्रीरंगातुजवरून वोवाळूनजाईनमी १०० तुझेकायआठऊंउपकार आजीलाजरक्षिलीथोर पांडवकैवा
रीयादवेंद्र त्रिभुवनींथोरब्रीदगाजे १ श्रीपतीह्मणेंद्रौपदीमाय पांडवमजनाणाहुनिप्रिय संकटपडतांलवलाह्यं
ऐसाचियेईनक्षणक्षणां २ ऐसेंबोलोनिसद्गद द्वारकेसिगेलाब्रह्मानंद तोपांडुरंगपुंडरीकवरद भीमातीरींनांद
तसे ३ ब्रह्मानंदापांडुरंगा श्रीधरहृदयकल्हारभृंगा आदिपुरुषाअव्यंगा दिगंबराअविनाशा ४ सुरसपांडवप्रता
पग्रंथ सभापर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ एकविसाव्यांतकथियेला २०५ इतिश्रीपांडवप्रतापग्रंथस
भापर्वटीकाश्रीधरकृत द्रौपदीचेंवस्त्रहरणअद्भुत एकविसाव्यांतकथियेले २०६ इतिश्रीपांडवप्रतापग्रंथेसभापर्वे
एकविंशतितमोध्यायः श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु शुभंभवतु ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः संपदाराज्यसुखअपार देऊनिबोळविलेपंडुकुमर हेंदेखोनिकौरवथोर संतापलेमानसीं १ भया
भीतजालेमनीं सकळदुर्जनमिळोनी ह्मणतीमहासर्पदुखवोनी हृदयींकंठींधरियेले २ तैसेंवृद्धें केलेंनिश्चित
राज्यसेनाशस्त्रेंसहित पांडवसोडिलेजीवेंजित केलाअनर्थअंधानें ३ दुर्योधनदुःशासनकर्णशकुनी दुष्टमति
सांगतीयेउनी तुवांहेकायकेलीकरणी कुळहानीमांडिली ४ दोनडावउरलेअसती तेणेंपाठऊंवनवासामतीं अ
ज्ञातवासमागुती तेरावर्षीनेमावा ५ प्रकटजालियाकिंचित मागुतीतेरावर्षेंपर्यंत नष्टचर्यभोगितीयथार्थ पु
नःपुनःतैसेची ६ आतांपांडवआणितांयेथ धृतराष्ट्रह्मणेंदिसतोअनर्थ गांधारीह्मणेंयथार्थ बुडविलेंदुर्यो
धनें ७ सोमदंतबाल्हिकद्रोण भीष्मविदुरगुरुनंदन कृपाचार्यभूरिश्रवाविकर्ण ह्मणतीअनर्थपुढतीहा ८ दुर्यो
धनह्मणेंऐसीनीती वैरीवधावेनानायुक्ती अपाययोजोनिशुद्धती वनवासासिधाडावे ९ अंधह्मणेंअहोहो
णार काळत्रईनचुकेसाचार मगप्रातकाम सारथीपुत्र धांवडीसत्वरबोलाऊं १० तोधांवोनिपांडवांससांगत
फिरामागुतींखेळाद्यूत आपलीआणनिश्चित अंबिकासुतेंघातली ११ तुह्मासपितृवचनप्रमाण घ्यावेंपित
याचेंदर्शन मगबोलतीभीमार्जुन कांहोदुर्जनफिरविती १२ काययोजिलाअनर्थ कींकरूंपाहतीप्राणांत धर्म
ह्मणेंहेंअद्भुत श्रीकृष्णमायानेणवेची १३ उतरावयाभूभार अवतरलाहोयादवेंद्र पांडवकरूनिनिमित्तमात्र
दुष्टसंव्हारुइछित १४ कपटद्यूततुटले पुनःसांदावयाबोलाविले नेघेह्मणतांनसुटेवहिलें जेंकांलिहिलेंविधिनें
१५ अधर्मसभेसिपरतोन पांडवआलेपांचहीजण उभेठाकलेदुर्जन देऊनमानबहुवस १६ धर्मासह्मणे
शकुनी चलाडावखेळूं मागुतेनी आह्मासहारीआलीयेक्षणी नेमवाणीऐकपां १७ वल्कलेंमृगचर्मेंवेष्टुन
द्वादशवर्षेंवनवाससेउन तेरावेवर्षीजाण अज्ञातवासनिर्धारें १८ प्रकटजालियाअवधारा पुढतीवनवासव
र्षेंबारा मगयावेंआपल्यानगरा हाचिनिर्धारतुह्मांआह्मां १९ धर्मरावविचारीमनी जरिमाघारेघ्यावे येचक्षणीं त १
रिपुरुषार्थाहोयहानी आणीकहेकरणीईश्वराची २० धर्मदोनवेळांफांसेटाकित शकुनीजिंकिलेंरेधर्मा ह्म

णत दुर्योधनगदगदांहांसत एकराळीपीटिली २१ कर्णासुखअपार ह्मणेंध्वजउभारासत्वर जयवाद्यांचाग
जर राजभेरीठोकिल्या २२ कौरवगर्जतीजयजयकारीं राज्यजालेंएकछत्री दीनवदनतेअवसरीं पांडवदिसों
लागले २३ काळवंडलाआदित्य सुटलाक्रोधेंप्रळयवात थरथरांउर्वीकांपत उल्कापातजाहले २४ आकाशींहूनिअ
वधारा पडतीतेव्हांरक्तधारा दुष्टदुष्टह्मणतीधरा निर्वैरहोईलयावरी २५ पांडवांसह्मणेदुःशासन आतांक
रावनवासींप्रयाण अवदशाआलीतुह्मापूर्ण कायकारणनगरांत २६ फेडावस्त्रेंअळंकार वल्कलेंवेष्टावींसत्व
र काळींवदनेंकरूनसाचार रक्षालावासर्वांगीं २७ नपुंसकेंतुह्मीनिर्बळें जैसींतिळाचींशुष्ककोळें कींव्याघ्रचर्मेंवि
शाळें प्राणहीनेंपूरितें २८ अर्कतूलविगतधवावंध्याविधुर भग्नभाजनवृक्षखंकार स्मशानभूमीअकाळमेघ
निर्धार तैसेचिव्यर्थतुह्मींही २९ जैसेअजाचेगळ्लांगुळ तैसेतुह्मीदिसतांकेवळ कींवनीपडिलींविशाळ दरिद्री
याचींप्रेतेंपैं ३० द्रौपदीसह्मणेदुःशासन वनवासपरमकठिण दुर्योधनाचीस्त्रीहोउन शरीरअर्पीतयातेंअ
३१ आह्मींबंधूएकशत मनाआवडेतोवरीवरित नपुंसकदरिद्रीसमस्त पांडवदुरीकरीकां ३२ हेंऐकोनिभीम
सेन सिंहाऐसाबोलेगर्जोन हेबोलविषतरूचीं फळेंजाण प्राप्ततुह्मांहोतील ३३ मर्यादासोडोनियेथें बोलसीदु
ष्टाविपरीत तूंमाजलासिबहुतबळ्न शरीरपुष्टजाहलें ३४ द्वारावतीचीभवानी चतुर्भुजश्रीकृष्णरूपिणी ती
सनवसकेलाआजपासुनी वनींहूनआलिया ३५ द्वेषाग्निप्रज्वळेलप्रचंड रणमंडळतेंहोमकुंड तूंतेथेंबस्तखं
डविखंड गात्रेंतुझींकरीनमी ३६ प्रथमतुझेंअवदान मगएकापाठींएकशतजाण सेवटींहावस्तदुर्योध
न समर्पीनपूर्णाहुती ३७ पक्षपातीतुमचेसंपूर्ण गदाघायेंकरीनचूर्ण सूर्यसुताचेंसदन पाहोंधाडीनरस
मस्तां ३८ तुह्मीशब्दशस्त्रेंकशताडण लोहशस्त्रेंआह्मीफेडूंउसणं जिव्हाछेदूनउपडिन हस्ततुझेरणांगणीं ३९
याशब्दाचीआठवण देऊनघेईनतुमचेप्राण हेंहृदयपत्रींलिहुन ठेवातुह्मीराक्षसभहो ४० असोयावरीवेष्टूनिव
ल्कलें वनाजावयाउदितजाले नगरदुर्गीवरीचढिले कौरवकौतुकपहावया ४१ पांडवपाईंचालत गाईहेदे

पद्मींकौरवह्मणत पांचहीपोळधांवत गाईपाठीएकसरां ४२ मोकळेकेशसोडुनी रडतजातयाज्ञसेनी भीम
वारंवारपरतोनी कौरवांकडेपहातसे ४३ सिंहावलोकनेंकरुन परतोनिपाहतांभीमसेन दुर्योधनवांकडेपायक
रून उपहासितवृकोदरा ४४ सुयोधनासह्मणेंभीमसेन तुझेशिराचाकंदुककरून चेंडूफळीखेळेन निवेलम
नअंधाचें ४५ मांड्याभंगींभीमसेन दुःशासनाचाकंठफोडुन आधीकरीनरक्तपान उटीघेईनसर्वांगी ४६
तेंरक्तचर्चूनिहस्तीं पांचाळीचेकेशमोकळेरुळती मगदेईनत्यासिग्रंथी वीरगुंगीबांधेन ४७ सूर्यमार्गचु
केकरितांभ्रमण नेत्रीअंधत्वपावेलअग्न मशकाचीथडकालागुन जरीमेरूपडेल ४८ पाषाणप्रहारलागुन वा
यूपडेलमोडोनिचरण पिपीलिकाशोखीसिंधुजीवन विजुसधाउनमशकधरी ४९ भडभडीतअग्नज्वाळ क
र्पूरतुषारेंहोतीलशीतळ हेंहीघडेलएकवेळ परिवचनाचळनक्षेमाझ्या ५० यावरीआवेशेंबोलेपार्थ करीनक
र्णाचानिःपात शिरभेदवडीनआकाशांत तरीचरुतपंडुचा ५१ मागेंनिंदाबोलसीतोडें तरीकरीनशतखंडें
कौरवांचींउडतीलमुंडें कंदुकाऐसींआकाशीं ५२ मृगेंद्राचीनिंदादेख करितीमागेंजंबुक अळिकाह्मणतीवि
नायक धरूनिआणूंक्षणार्धें ५३ तृणपूतळेमिळोनिबहुत वडवानळासधरूंह्मणत हृदयींभावीखद्यो
त असडोनिआदित्यपाडुंखालीं ५४ शलभबहुतमिळोनी वीजघालूंह्मणतीवदनीं मृत्तिकेचागजधांवो
नी सागरशोषूंभावित ५५ परमकुमतीजोबळहीन मागेंनिंदाजल्पेरात्रंदिन समरभूमीसपळेउगेन
हेंतोंलक्षणश्वानाचें ५६ सहदेवबाहूपिटुन ह्मणेरेशकुनीसावधान मीचग्राहिकअसेजाण प्राणांसि
तुझ्यानिर्धारें ५७ बहुतफांसेटाळिलेजाण तितकेअंगींभेदीनबाण सुयोधनासहितसर्वहीजण समरींसं
हारीननिर्धारें ५८ शकुनीमीतुझाकाळ जरिछेदिनांशिरकमळ तरितेमाद्रीवेल्हाळ जन्मोनिव्यर्थश्रमवि
ली ५९ हिमाचलचळेलआसनी तेजसांडीलवासरमणी शीतळत्वटाकीलरोहिणी रमणजरीतत्वता ६० शेष २
सांडीलभूभार विषजरीवमीलकर्पूरगौर हेंहीघडेलपरिनिर्धार नेममाझाटळेना ६१ भुजापिटोननकुळबो

लत कौरवकुळसंहारीनसमस्त धान्यक्षेत्राचेंनिर्मूळकरित कृषिकजैसाएकसरें ६२ ऐसीप्रतिज्ञाबोलोन करि
तेजालेवनप्रयाण धौम्यअग्निहोत्रपात्रेंघेउन सहितकृशानचालिले ६३ दर्भपवित्रेंहातींघालित पितृसूक्तजप
तजात कौरवांचाहोईलअंत चिन्हपुढीलदावितो ६४ अजातशत्रुस्तूनधर्म समस्तांसपुसेसप्रेम ह्मणेंवडील
होपरम कृपाबहुतअसोंद्या ६५ तुमचाआशिर्वादेंकरून पुढतीपाहूंतुमचेचरण समस्तकौरवांसपुसोन
धर्मराजचालिले ६६ धर्मासह्मणेविदुर कुंतीवृद्धआपणासकुमार ज्येष्ठबंधुचीपत्नीनिर्धार मातामाझीअसोंदे
६७ माझियेघरींठेउन बारेवनवासाकरितूंप्रयाण मगवंदिलेकुंतीचेचरण साष्टांगेसिधर्मराजें ६८ विदुरह्म
णेधर्मराजा सोमवंशीविजयध्वजा श्रीकृष्णध्यानस्मरणपूजा प्राणांतेंहीनविसंबें ७० हृदयींध्यातांकंसारी क
दाभयनाहीकांतारी तोचिरक्षीलनानापरी दुःखतिळभरीइनगटेना ७१ धर्मह्मणेंविदुरासी तूंगुरुपितादेवआह्मासी
तुझीआज्ञावंदूशिरसि अहिर्निशींवर्त्तेन ७२ ऐसेंबोलतांयुधिष्ठिर धांवानिआलिंगीत्यासिविदुर अश्रुधाराश्रवतीने
त्र प्रेमसागरउचंबळला ७३ कुंतीसनिरऊनबहुत पांचहीविदुरासिनमित लक्षूनियांअरण्यपंथ जातेजालेतेध
वां ७४ पांचपांडवराजहंस हंसिनीद्रौपदीडोळस जीचेअंगींचासुवास वनामाजीफांकतसे ७५ एकवस्त्रेंद्रौपदी
स्नान मागेंपांडववल्कलेंवेष्टित कुंतीदेखोनिआक्रंदत हृदयपिटितहस्तकें ७६ अंगराकीनघरणी अगेवेल्ह
ळीयाज्ञसेनी पतिसमवेतनयनीं केव्हांनूतेंदेखेन ७७ अहानगरविलासिया कोठेंगुंतलासिविसांविया पांडवव्य
सनींपडलिया नेणसीहेंव्यापका ७८ कुरुकुळकुमुदावतंस पंडुराजतूंपवित्रपुरुष तुजकैसास्वर्गवास गोड
वाटेयधवां ७९ वनागेलियाश्रीरामचंद्र पाठींधांवेकौसल्यासुंदर तैसीगजपुराबाहेर कुंतीधांवेपुत्रामागें
८० अगेपांचाळीमायबहिणी प्राणसखेसांगानिर्णी वदनदाविगेपरतोनी मजटाकोनिजात्येसी ८१ सहदे
वआणिनकुळ तान्हींबाळेंगेकेवळ मजनिरऊनिवेल्हाळ माद्रीनिघालीस्वर्गातें ८२ नकुळसहदेवाचागळां
कुंतीमिठीघालीतेवेळां कौरवांचानारीसकळा देखोनिरडतीतेधवां ८३ ह्मणतीवैधव्यआह्मासआले भुललेकौ

रवकांहेंनकळे नगरवासीलोकतेवेळे शोककरितीअपार ८४ ह्मणतीनीतिसांगोनिअभिनव वनींदवडिलेवीर
पांडव कैकेयीनेंजैसारघुराव तैसेंयेथेंजाहलें ८५ कुंतीससांवरोनिविदुर ग्रहासनेनसत्वर सुभद्राआ-
णिसौभद्र द्वारकेसीपाठविलीं ८६ पांडवासबोळवीतविदुर अरण्यांतगेलादूर दुष्टकरंटेचांडाळकौरव मागुतीये
तस्वस्थळा ८७ इतरपांडवस्त्रियासुंदरा कुंतीपाठवीतमाहेरा वनवाससरल्यासुकुमरा मागुतीयावेंभेटी
तें ८८ द्रौपदीचेपंचकुमरां विदुरपाठवीपांचाळपुरां धृष्टद्युम्नद्रुपदअवधारा प्राणापरिसप्रियकरिती ८९
धृतराष्ट्रपुसेविदुरा पांडवगेलेवनांतरा विषादधरिलाअंतरा किंवासुखरूपगेले ९० विदुरह्मणेंझांकूनिवदन
धर्मेंकेलेंवनप्रयाण मुखींधरिलेंदृढमौन नबोलतकोणासी ९१ भुजाउभारोनिभीमसेन कल्पांतरुद्रक्रोधाय
मान गर्जतजैसापंचानन हुंकारततेविंगेला ९२ वाममुष्टीसिकताघेउनि सव्यभागेंविखरेमेदिनीं शिरसु-
कावितविपिनीं पार्थवीरप्रवेशला ९३ कर्दमेंलेपूनियांवदन गेलासहदेवमाद्रिनंदन जैसाआच्छादिलाअ
त्रेंकरून वासरमणीनिराळीं ९४ सर्वांगींमृत्तिकाचर्चोन नकुळगेलाबळसंपन्न जेविंसंसारमायाटाकू
न योगीजायतपोवना ९५ मोकळेकेशहस्तेंसारित हृदयींपेटलाअनळबहुत नेत्रोदकेंतोविझवित द्रौपदीगेलीव
नांतरा ९६ धौम्यदर्भधरूनिमुष्टी पढतगेलाअंत्यष्टी ज्येष्ठकनिष्ठनामेंअलोटीं तर्पणपुढेंकरावया ९७ वि
दुरासधृतराष्ट्रह्मणत पांडवींकायसूचविलाअर्थ हींलक्षणेंविपरीत कायकारणदावावया ९८ विदुरह्मणेंतो
अर्थ कासयापुससीतूंव्यर्थ पुत्रलोभेंतुझेंचित्त भ्रमीभूतजाहलें ९९ समरंगणींजीवअपार होईलब्र
ह्मसृष्टीचासंहार ह्मणऊनधर्मराजवक्त्र झांकूनिगेलानपाहवे १०० तेरावर्षांउपरी कौरवप्रेतेंपडतीलस
मरीं तींनपहावयादृष्टीभरी मुखझांकिलेंह्मणुनियां १ भुजाविलोकीभीमसेन मनांतसंकल्पिलेंहेंचिपूर्ण
दोर्दंडबळेंकरून कौरवप्रेतेंपाडीनमीं २ सागरींचीवाळूनगणवेजाण तैसेअसंख्यसोडीनबाण घेईन
कौरवांचेप्राण हेंचिअर्जुनचिंतित ३ फाल्गुनेंदाविलेंहें पूर्ण फाल्गुनमासींचेमंत्रसंपूर्ण जपतीलतुझेनं ३

दन येतांमरणसेवटीं ४ रक्तपंकमाजेलरणीं कौरवप्रेतेंपडतीमेदिनीं चिखलेंमुखेंजातीलभरूनि गीधघ
सोनिटोंचिती ५ हेंचिचिन्हसहदेवेंदाविलें धुळिनेंअंगभरिलेंनकुळें स्वरूपत्याचेंतेजागळें कामिनीभुलतीपहा
तां ६ यालागींमृत्तिकामळें शरीरझांकिलेंनकुळें चिन्हद्रौपदीनेंदाविलें अर्थऐकतियेचा ७ चौदावर्षांउप
रीजाणा हृदयपिटितीतुझ्यासुना मुक्तकेशायेतीलस्नाना अंत्यष्टिविधिपहावया ८ धौम्यहेंचिजाणवितकौ
रवांचीक्रियासमस्त करावयासिजपत अंत्यष्टिविधिआधींपैं ९ पांडवप्रवेशतांवनांतरीं दुश्चिन्हेंउद्भवलींकुंजर
पुरीं स्वप्नेंदेखतीकौरवनारी दुष्टदुःखदायकें १० विगतधवाकामिनी वोटीभरितीमृत्तिकाघेउनी मंगळसूत्रेंतो
डुनी काळपुरुषनेतसे ११ कृष्णवस्त्रवेष्टितनारी कौरवांचियाशिरावरी तेलसिंदूरघालितीझडकरी आरक्तपु
ष्पेंअनेक १२ पृथ्वीतसजालीबहुत सूर्यवन्हिवृष्टिकरित मेघरक्तधारावर्षत प्रळयवातसुटला १३ भयाभीत-
दुर्योधन विपरीतचिन्हेंऐकोन द्रोणासह्मणेकरीजतन गुरुवर्यायेथुनी १४ सुयोधनासह्मणेंद्रोण तुझि
याकार्जीवेचिनप्राण सर्वांगाहूं यशसाधिन एकापांडवांवांचोनि १५ कृष्णकृपेचावज्रपंजर पांचपांडवत्यांत
कीर सुखरूपखेळतीअहोरात्र निर्भयनिःशंकसर्वदा १६ माझींशस्त्रेंत्यांससमरीं नरूपतीचगानिर्धारीं जै
सामेघवर्षतांपर्वतअंतरीं दुःखकाहींमानीना १७ द्रुपदाचाकेलाअपमान तेणेंतेंवैरस्मरोन पुत्रजन्मवि
लाधृष्टद्युम्न अग्निवंशमजलागीं १८ त्याचेहातेंमजमृत्य होणारनचुकेबळवंत तरिमीएकसांगेनहितध
रिसींजरीमानसीं १९ तरिवैरभावसांडोनी पांडवआणावेपरतोनी शक्रप्रस्थीतेस्थापुनी सुखरूपनांदा
वें २० धृतराष्ट्रह्मणेविदुरासी जाऊनिआणीपांडवांसी समजाऊनतयासी शक्रप्रस्थापाठऊं २१ जरिते
नयेतीवनींहुनी तरिवस्त्रेंवाजीवारणभूषणीं अपारसंपत्तीनेउनी द्यावीत्यासीवनांत २२ मगबोलेवि
दुरवचन तेसर्वथानयेतीपरतोन तुझाकुळक्षयकेल्याविण समाधाननव्हेची २३ वाचेनेंविदुराचींवचनें
तिव्र ऐकतांग्लानचत्तेंअंतर अंधव्याकुळअहोरात्र चिंतार्णवींबुडाला २४ संजयह्मणेअंबिकानंदना पांडव

दवडिलें दुःखवना एकचि गांवासाना सवनाहें पुसपोसी ३५ लक्ष्मी आणि यश निर्दाळिलें आत्मा याचा ध्वंस
शकळा अगमागस कळेल पुढें आगळिपाठी ३६ पुजारसर यांरयवसानिश्चित आतां कावानें दुश्चित भाग्याभागीचकु
ल निवर्तादियस चकर्ती ३७ अंधस्वांचलामानसी म्हणें यांकाळिजीं रुद्रघालिसी विपरीत स्वावपांडवांसी
मांडलामानसीं ३८ मी धृतराष्ट्र धर्मच्छित पुत्र नमानितां वचनार्थ ऐश्वर्यमदें जालेमत्त नेणतांहितगुव
न ३९ पांडवमांडें अभ्युपेलें चितानीत मज लोटिलें काळपाशदाटिलें कर्तीमांडें संजया ३० स्वळाधर्मरांविला
माणी त्यांग उपभोग पावयं देउनी कल्यावरून लोटिला धरणी सुमन शेज काय त्या ३१ तें सर्पापांडवांसी वैरप
डलें आतां सत्वकाय पावे बांध कुळक्षय होईल सर्व ऐसें मज कळलें संजया ३२ संजय म्हणे तेवेळां कुळक्षय होसु वांच
केला पुत्रा सिंपावोला मार्जार वर्तलात वेळां ३३ गांवशि आणिली पांचाळी पुत्रां मन बोलसी तेवेळीं वस्त्रें फे
डिला हृदयकमळी सुखानुजवाटलें ३४ दुर्योधन दुर्योधनाशी बोलत कर्णशकुनी अनुमोदित तेंदंत भग्न करुनी
समग्र वर्तिलें नाहींतन तुज कीं ३५ पंच्यश्वनार दाकुनी निघेन आम चेमदनी तुम्हा पुत्र बोलिला वाणी उगा
स्वऐकोनी होतासी ३६ भीष्में विदुरें नीती पुज सांगीतली सद्बहु रीतीं परिनधरे चित्तें चित्तीं वाउग्या गोष्टी
काय आता ३७ आपल्या हातें पंकनिशस्त्रें फाळनाही छेदितशिरें बुद्धि विपरीत होतां निर्धारें काळक्षोभ जाणि
जे ३८ केल्या अन्यायाचा राशी व्यर्थ काय त्या गोष्टी बोलसी केलें तें फळ भोगिसी अल्प काळें चिंतवलीं ३९ म
हाराणी ते पांचाळी जिचा कैवारी वनमाळी अपार वस्त्रें पुरविलीं देखिलें सकळीं सभेंत ४० धृतराष्ट्र म्हणे सं
जयासी निनधन्याच गोष्टी बोलसी आल्या मजप्रत्ययासी सत्यसत्य सुजाणा ४१ पांडवांचा रक्षक पूर्ण असे दा
रकानायक ऐसें जाणता सर्व कैसा जाला संजया ४२ मा ऐसें प्रारब्ध परम गहन न कळे तयाचें विंदाण दुःखभोगवी
सं सपूर्ण ऐसें त्यावरें जाणिलें ४३ द्रौपदी सोशविली परम कौरवांहाती अवघे भस्म ईश्वरी मायेचें दुर्गम विंदा
णा चाटे मज लागीं ४४ पांडव गेले बाहेरी एकचि आकांत जाला नगरीं अक्रंदती सकळ नारी जाली बोहरी वंशा

ची ४५ द्रौपदी सकुशब्द बोलले मनांत ऐसें भाविलें जें श्रीधरें ऐकिलें शब्द लागले देवकीतें ४६ द्रौपदी नव्हे देवकी मा
उली दुर्जनीं सभेंत गांजिली सुदर्शन सोडोनि तेवेळीं शिरें छेदावीं कौरवांचीं ४७ परधीर जगन्नाथ क्षमा केली ते
व्हां बहुत द्रौपदीचें करूनि निमित्त कुळक्षय करील तो ४८ संजय म्हणे धृतराष्ट्रासी आतां गोष्टी आल्या प्रत्ययासी
वैशंपायन जन्मेजयासी कथा सांगे रसाळ ४९ सभापर्व संपलें येथें पुढें वनपर्व अद्भुत जें ऐकतां पापपर्वत भ-
स्म होती श्रवणें ची ५० भारत सरोवरीं निर्मळ सभापर्व त्यांत कमळ सज्जन मिलिंद सकळ अमोद सेऊं धांवती ५१
कीं भारत हा ब्रह्मगिरी सभापर्व निघाली गोदावरी प्रेमसहित सुरनारी स्नानालागीं धांवती ५२ भारत हा क्षीरस
मुद्र असंभाव्य भरला थोर तेथें ब्रह्मानंद श्रीधर क्षुधाक्रांत धांवला ५३ त्यांतील अंजुळी नेकिंचित घेतलें क्षुधा
निवारणार्थ तैसा सार भाग यथार्थ भारतांत निवडिला ५४ पाल्हाळ बोलतां अपार ग्रंथ होईल जैसा समुद्र बो
लतां ध्वनित अनुमात्र कथा विचित्र दिसेना ५५ संकोच पाल्हाळ टाकूनि समस्त मितरसाळ प्रगटला ग्रंथ रच
ना साहित्य पंढरीनाथ कर्त्ता येथें जाणिजे ५६ पांडवप्रताप ग्रंथ गहन पांडुरंग हें अभिधान नाम ठेविलें असे
लपूर्ण प्रीती करून सत्य पैं ५७ पुढें वनपर्व अरण्य वन दृष्टांत वृक्ष दाटले सघन साहित्य वन श्रीपूर्ण विराजमान
टवटवित ५८ ते च्छायेसी पंडितस्क मूर्त्ती सदा काळ घेती विश्रांती श्रीधर तेथें अहोरात्रीं चरणनख हतीन यांचे
५९ श्रीमद्भीमातट विलासा दिगंबरा पंढरीशा श्रीधरवरदा अविनाशा ब्रह्मानंदा दयाब्धी ६० स्वरसपांडवप्रताप
ग्रंथ सभापर्व व्यासभारत त्यांतील सारांश यथार्थ बाविसाव्यांत कथियेला ६१ इति श्रीपांडवप्रतापग्रंथ स
भापर्व टीका श्रीधरकृत पांडव गेले वनवासा प्रत सभापर्व संपविलें १६२ श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीमज्जगदीश्व
रार्पणमस्तु शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

सूर्य पांडवांस प्रत्यक्ष येऊन थाळी देत आहे
सूर्य
धर्म
भीम
अर्जु॰
नकु॰
सह॰

श्रीगणेशायनमः भवपंकजोद्भवपाकशासन सदावंदितीजाचेचरण चारीसहाअष्टादशगुण जाचेव दनीसर्वदा १
यदुकुळतिलकावतंस अनकदुंदुभीमानसहंस लीळाविग्रहींआदिपुरुष देवकीतनयजगदात्मा २ नंदहृद
यारविंदमिलिंद निजभक्तचित्तचातकजलद भैमीनयनाआनंद प्रकाशकमित्रजो ३ भयविदारककंठीरव
मुचकुंदोद्धारकरमाधव कंसचाणूरमर्दककरुणार्णव अभिनवजलदवर्णजो ४ उग्रसेनमानसविषादहरण
शिशुपाळांतकवृष्णिकुळभूषण अनंतकल्याणदायकपीतवसन शरणागतकुलीशपंजरजो ५ जननमरणविपि
नकृशान दानवकुळरश्मिनिकंदन नरवांकुरीमीनकेतन कोट्यानकोटीविंबले ६ मायाचक्रचाळकपुराणपुरु
ष लावण्यामृतसागरमनोहरवेष सच्चिदानंदपंढरीश मधुमुरनरकभंजनजो ७ दशावतारचरित्रचाळक
तोहापांडुरंगपांडवपाळक पंडुस्नुषालज्जारक्षक लीळाकौतुकदावितो ८ भूवैकुंठपांडुरंगनगर चंद्रभागा
मानससरोवर राजहंसतूंश्रीधर अतिउदारजगदात्मा ९ सत्यवतीहृदयरत्न वेदाब्जविकाशकचंडकीर्ण साठ
लक्षश्लोकजाण जेणेंनिर्मिलेंअवलीळा १० जेथेंलेखकपरमचतुर जालामहाराजनरकुंजर तेथीलसाहित्यरस
अपार मानवकेवीवर्णूशके ११ व्यासमति महारजतपर्वत वैशंपायनलाधलाकिंचित त्यांनीलसारांशसाहित्य
अलंकारप्राकृतहे १२ आदिपर्वसभापर्वपूर्ण श्रीधरमुखेंनिमित्तकरुन पांडुरंगरुक्मिणीजीवन ब्रह्मानंदव
दलाहो १३ मागेंसभापर्वसंपलें पुढेंवनपर्वआरंभिलें महत्पापेंकुंदेंसबळें श्रवणमात्रेंदग्धहोती १४ कांव
नपर्ववसंतवन सप्रेमश्रोतेवृक्षसघन वनपल्लवीविराजमान नवविधभजनेंसफळित १५ सभापर्वसंपतांसे
वटींवर्णिलीरूरसकथा द्रौपदीसभेसिविटंबितां जगन्निवासपावला १६ पुढेंकपटद्यूतखेळोन वनानिघा
लेपृथानंदन विदुरकुंतीसघेउन गजपुराप्रतिगेला १७ यावरीकैसीकथेचीरचना परिक्षितीसुतपुसेवैशं
पायना मांझेपूर्वजगेलेवना ज्ञानसंपन्नासांगातें १८ वैशंपायनह्मणेकुंभिनीनायका अष्टादशपर्वाची
हेनौकाव्यासवंशाचीरूरेखा सर्वजनांआश्रय १९ हेयष्टीधरोनिहातीं सर्वदाजेमुक्तविचरती तेआडख

१

ळोनिनपडती;भवगर्त्तेंततत्वतां २० दोषपशुशृंगेंउभारुन सर्वथानयेतीचवलाव्हेन अज्ञानरजनीतरक्षीजाण
अष्टादशपर्वयष्टी २१ असोवनानिघालेपंडुनंदन सवेंकृष्णभगिनीगुणनिधान मागूनआलाइंद्रसेन रथ
घेऊनपांचही २२ इंद्रसेनसमवेतसंपूर्ण सेवकआलेचौदाजण स्यंदनीआरुढलेपंडुनंदन तोंप्रजाधांवोनि
येती २३ गजपुरातूनप्रजाचेभार निघालेतेव्हांअपार कींप्रजासरिताचेपूर धर्मसमुद्राप्रतिजाती २४ विचार
करितीप्रजासमस्त कदांनराहवेगजपुरांत अरेहेभीष्मद्रोणवृद्धबहुत अधर्मरतसर्वही २५ कपटद्यूतनिर्मुन ल
टिकेचजिंकिलेपंडुनंदन दुर्योधनदुर्जनअग्न वंशकाननजाळिल २६ शकुनीदुःशासनकर्ण दुर्योधनाचेदु
ष्टप्रधान त्यासदुष्टबुद्धीसिकउन अधिकाधिकखवळती २७ धर्मसमागमेंकरून रूरखेंसेऊंआह्मीकानन ऐसें
बोलतप्रजाजन धर्माकडेधांवती २८ चारिवर्णसर्वप्रजा येऊननमितीधर्मात्मजा आह्मीतुजसवेंपंडुतनुजा
वनवासालागींयेऊं २९ शिल्पशास्त्रीपरमरूजाण सूत्रधारलोहकर्मीनिपुण कनकअलंकारींनिःसीमसुज्ञान असो
अपारपातले ३० ताम्रघडणारचतुर पाषाणमूर्तीकोरणार रत्नपरिक्षककरणार आलेसत्वरधर्मापासीं ३१
वणिजनानावस्तुरक्षक कुंभकर्तेतेल्हकारक रजकरंगारीगोळीसकळिक धर्मदर्शनापातले ३२ साळीमाळीसो
वनीचतुर दुसीभुसीनापिकअपार रूगंधतेलमृगमदकेशर विक्रयकारधांवती ३३ व्यापारीधनधान्यारक्षक
तडिदंबरेंविणतेपरिक्षक किरातगुरवचिकित्सक धनिकवेव्हारीधांवती ३४ कृषिकारकखनकचित्रकार मातं
गचर्मकअतिशूद्र धर्मदर्शनीप्रेमाअपार धरूनित्वरेंधांवती ३५ असोसर्वप्रजामिळोन धर्मापुढेंकरितीरुद
न गजपुरींराजादुर्योधन वासआमचेंनकरवे ३६ वनानिघतांभूजारमण दुःखेंव्यासपौरजनपूर्णकींअनक
दुंदुभीहृदयरत्न जातांगोकुळींचरफडती ३७ तैसेपांडवनिघतांवनांतरीं प्रजाबुडाल्याशोकसागरीं ह्मणती
धर्मात्मजाअवधारीं आह्मींगजपुरींनराहों ३८ राजाकेवळरजनीचर प्रधानतेमत्स्यव्याघ्र ग्रामसिंहसेवक
समग्र तरीप्रजाकेविनांदती ३९ प्रजारंजवीनिरंतर तोचिह्मणावाराजेश्वर अनीतीदासीचापदर जासनलो

गेकाळत्रयीं ४० सत्कीर्तिधर्मपत्नीसींरत निजप्राणऐसाप्रजापाळित अधर्मपंकेंजाचेंचित्त नमळेनिर्दोष
सर्वदा ४१ सुहृदप्रजाआणिभूसुर जाचेंकल्याणचिंतितीअहोरात्र उभारिलायशध्वजजेविचंद्र शरत्का
ळींचानिर्मळपें ४२ जोनिश्चयअंबरींध्रुवपूर्ण अचळनचळेसत्यवचन जेणेंस्वसत्तापटशुभ्रनेसउन
शृंगारिलीकुंभिनीहे ४३ साधुसंग्रहदुष्टनिग्रहसाचार शरणागतांकुलिशपंजर दानशस्त्रेंदरिद्र निव
टीगर्वयाचकाचें ४४ दानधर्माचींओझीं फार नेतांकंटाळतीयाचकविप्र दानमेघवर्षीनेनिर्धार याचकधु
ळीआईजाली ४५ हर्षांकुरेंपिकलीअवनी प्रजेचाआनंदनमायेगगनीं राजघनवाणीऐकतांश्रवणीं मन
मयूरनाचतसे ४६ यालक्षणींमंडिततूंपंडुनंदन आह्मासचिंतार्णवींलोटुन संतोषेंआदरिलेंतपोवन
आह्मीं दीनतुजवीणदिसों ४७ कपटद्यूतमेघधोर तूंदर्शीनपडसीधर्मचंद्र आह्मीप्रजाआर्तचकोर चिंताग्नी
तपडियेलों ४८ निष्कलंकतूंशशिशीतळ वियोगराहूमध्येंसबळ त्रयोदशवर्षेंशुद्धमंडळ वदनेंदुकधींवि
लोकूं ४९ कपटद्यूतकेतुपूर्ण धर्मझांकिलाचंडकीर्ण तेरावर्षीउपरिमुक्तस्नान तोंवरिउपोषणपडियेलें
५० त्रयोदशवर्षेंक्रमोनिरजनी कधींप्रकटेलस्वधर्मतरणी प्रजाकमळेंविकाशुनी तृप्तकरिसीधर्मराया
५१ शांतउदारतूंपंडुनंदन कपटद्यूतहाप्रभंजन दूरिनेलेंझडपोन जीवनेंवीणस्रुकलोंकीं ५२ पांचहीपां
डवराजहंस सांडोनिगजपुरमानस पाठविलेंकंटकवनास द्रौपदीसहितदुष्टानी ५३ अगोऐसाप्रजाचा
प्रेमा ऐकतांस्नेहदाटलाधर्मा ह्मणेघोरविपिनांजाणेंआह्मा येणेंतुह्मांनहोयतेथें ५४ भीष्मद्रोणविदुर व
डिलप्रज्ञाचक्षुराजेंद्र यामांनअसतांसाचार तुह्मांदुःखनव्हेची ५५ मजवरीकृपाकरुनी सुखेंनांदानिजस
दनी त्रयोदशवर्षेंक्रमोनी तुह्मांपासींमायेतों ५६ भीडधर्माचीगहन प्रजानदेतीप्रतिवचन धर्माचेंधरूनि=
यांचरण अधोवदनेंस्फुंदती ५७ दीनवदनेअत्यंत प्रजाप्रवेशलीनगरांत शक्रप्रस्थींचेजनसमस्त शोकक
रितचीपरतले ५८ इकडेभीष्मजननीचेतीर पांडवपातलेसत्वर विशाळन्यग्रोधतरुवर त्यातळींरजनी २

क्रमीयेली ५९ त्याहीजणीजलाहार तेदिवसींकेलानिर्धार भूमीवरीशयनसाचार वर्गअंबरपांघरावया ६०
उदयावरीआलेंरविचक्र तोंशक्रप्रस्थआणीगजपुर तेथिंचेआलेभूसुर धर्माजवळीसर्वही ६१ अग्निहोत्री
याज्ञिक चहुवेदांचेपाठक षट्शास्त्रवेत्तेदेख मुखोद्गतपुराणें ६२ पुरश्चरणीअधिक सामर्थ्येंखोळंबिती
अर्क शापानुग्रहसमर्थदेख असंख्यातमिळाले ६३ सुरआणीभूसुर यांसींभेदनाहींअनुमात्र धर्मासविन
वितीविप्र आह्मीयेऊंतुजसमागमें ६४ तुजसांगातींकंठूंकाळ धर्मातूंपुण्यशीळ तुजवरीभारनघालूंसकळ
अन्नआच्छादननमागों ६५ कंदमूळेंभक्षुन करूंसर्वदाअनुष्ठान चिंतूंतुझेंकल्याण नाहींकारणदुसरें ६६
वेदशास्त्रपुराण नानाइतिहासपुण्यपावन धर्मातुजकरऊंश्रवण जयकल्याणप्राप्तीसीं ६७ धर्मह्मणेंघोरव
नवास ब्राह्मणतुह्मीपावालक्लेश तेंमजनपाहवेनिःशेष निर्दोषयशनजोडे ६८ त्यामाजीशौनकनामाविप्र ह्म
णेयुधिष्ठिराऐकसाचार तुवांपूर्वीपूजिलेधरामर तेणेंनिर्भरजालोंआह्मीं ६९ धर्मातूंनकरीशोक सर्वपुरवी
जगन्नायक तूंगोब्राह्मणप्रतिपाळक अजातशत्रूधर्मात्मा ७० धनधान्यअसोनिगांठी जोरूपणताधरीपो
टीं हीनक्षेअवंचकहतवटी महाकपटीतोजाण ७१ जयापासींनाहींधन तरीतयाइतकेंचिभजन द्यावेंब्राह्म
णासअभ्युत्थान स्थूळासनआदरें ७२ उदकदानप्रियभाषण नमनआणिविप्रस्तवन इतकेनेहोयसर्वकल्याण सक
ळजनपावले ७३ मगधौम्यबोलेवचन धर्मातूंकरीपुरश्चरण प्रत्यक्षदेवतसूर्यनारायण अमितअन्नपुरविल
७४ विप्रपालनायथार्थ हाचिउपायजाणसत्य ऐकतांआनंदलाकुंतीसुत तपअद्भुतमांडिलें ७५ जितेंद्रियनिरा=
हार साधूनिग्सतमीरविवार प्राणायामकरूनीयुधिष्ठिर पूजाप्रकारसमर्पी ७६ नाभिपद्मपर्यंत सलिलींधर्मउ=
भाराहत त्रिरिचामंत्रजपत न्यासयुक्तयथाविधि ७७ एकमंडळपर्यंत धर्मरावतपकरित स्तवनमांडिलेंअद्भुत
ऊर्ध्ववदनेतेकाळीं ७८ सूर्यभजनसूर्यस्तवन पांचाळीकरीप्रीतीकरुन जेणेंप्रसन्नहोयनारायण सहस्रकी
र्णनमांतक ७९ जयतमनाशकासहस्रकीर्णा अंबरचूडामणीसूर्यनारायणा जीवमिलिंदवंदच्छंदना हृदयकम

रुविकाशकां ८० सर्वमंगलकल्याणकारणा रोगप्रशमनाआयुर्वर्धना नमोंमार्तंडादुष्टदमना हाटकवर्णावास
रमणी ८१ मित्ररविसूर्यभानुदिवाकरा खगपूषहिरण्यगर्भातमहरा मरीच्यादित्यसविताकभास्करा अमीततेज
नमोतुज ८२ आदिपुरुषानिर्विकारा हरिहरविरंचिरूपधरा काश्यपेयासहस्रकरा वसुधामराप्रियतूंची ८३
जन्ममृत्युजराव्याधिहरणा भयदरिद्रदुःखविध्वंसना काळत्रियासर्वकारणा विश्वनयनाप्रकाशका ८४ एकच
क्रकनकभूषितरथ सप्तसुखहयवेगबहुत निमिषार्धांमध्येंअपारपंथ क्रमोनिजासीमनोगती ८५ मुख्यदैवतसू
र्यनारायण सूर्यानुष्ठानेंश्रेष्ठब्राह्मण वरकडदैवनकल्पितपूर्ण चंडकीर्णप्रत्यक्ष ८६ सूर्यमंडळविलोकुन नित्य
नकरीजोकोनमन तोअभाग्यपरमअज्ञान अल्पायुषीजाणावा ८७ व्यासवाल्मीकऋषपाळ वर्णितीअद्भुतसू
र्यमंडळ सूर्यउपासकसदांरुशीळ यमकाळवंदीतया ८८ देखोनिधर्माचेंतपतीव्र मूर्तिमंतउतरलादिनकर
कर्णजनकतोसत्वर थाळीदेतधर्माप्रती ८९ द्वादशवर्षेपर्यंत उत्तमान्नजेंजेंइच्छित षड्रसचतुर्विधरसभरित
उत्पन्नहोतीलयांतुनी ९० कोट्यावधीजेवितांब्राह्मण परीनसरेकदाअन्न शेवटीतुह्मींद्रौपदीजेउन मगधुवू
नठेविजेही ९१ पांचाळीजेविलीयाजाण मगतेदिवसींननिघेअन्न माझेंहृदयींकरूनिस्मरण करापूजनथा
ळीचें ९२ सृष्टीचाउद्भवहोयकिती हेंनव्हेकदांगणती तेसीथाळीचाअन्नाचीमिती सहस्राक्ष्यानकरवे ९३ ऐसें
बोलोनिपद्मिनीनाथ अंतर्धानपावलात्वरित पुढेंकाम्यकवनप्रवेशत पांडवविप्रांसमवेतपें ९४ नित्यपंचपा
र्थउठोन करितीनमोतकाचेंस्तवन थाळीप्रसवेइच्छितअन्न अपारब्राह्मणजेविती ९५ विप्रभोजनपंचमहा
यज्ञ तेणेंकौंतेयआनंदघन रात्रदिवसपुराणश्रवण वेदाध्ययनशास्त्रचर्चा ९६ न्यायमिमांसासांख्याद्भुत पातं
जलिव्याकर्णवेदांत पंडितमुखेंपंडुसुत श्रवणमननकरीसदा ९७ महद्भाग्यहेंचिउत्तम अखंडजासीसत्समा
गम तीर्थाटनव्रतेंतपपरम मगकासयाकरावें ९८ सत्समागमसदाजास त्यासनित्यवैकुंठवास तरीपांडव
भाग्यविशेष वर्नीसमागमसंतांचा ९९ अद्भुतपुण्यजाचेपदरीं त्याचींचिन्हेंऐकाचारी उदारसत्पात्रींदानकरी



कदाकाळींविटेना १०० सर्वदाहीबोलेमधुर नवदेकदावचननिष्ठुर श्रीकृष्णींबहुतआदर कायावाचामानसें १ परमा
दरेंब्राह्मणपूजन देतधनधान्यआसनवसन यांचहेंचिन्हींमंडितपूर्ण तोचिअंशश्रीहरीचा २ ह्मणोनिधन्यपंडु
नंदन सर्वलक्षणीमंडितपूर्ण यावरीगजपुरींचेंवर्तमान सावधानऐकराया ३ प्रज्ञाचक्षुह्मणेक्षत्ता तुझेगंईअ
सेममना तरिमजकाहींसांगेंहिता कैसेंआतांकरावें ४ चिंतेचियाकूपांत पडिलेसर्वज्ञादेईहात आधिहावणवाजा
ळित विवेकमेघवर्षत ५ हृदयकुंडींक्रोधाग्न प्रदिप्तकरुनीपंडुनंदन वनागेलेप्रतिज्ञाबोलोन जेअलोटहरिहरा ६
त्याचादुःखेंप्रजादेख अहोरात्रकरितीशोक दारुणत्याचाशापपावक कौरवकाननजाळिल ७ नरींप्रजाभजनीजेणें
करून पांडवस्नेहहोयवर्द्धमान विदुराऐसेंबोलवचन तूंसर्वज्ञसर्वविषयीं ८ विदुरह्मणेंपुढती कितीसांगोआतां
तुजनीती आपलेकुमरधरूनिहातीं धर्मचरणावरीघाली ९ करुणाबोलोनक्षमाकरावी तुह्मींमागेंनिंदाकेलीआघ
वी आतांस्तुतीकरूनीबरवी तेविरवावीशुद्धमनें १० दुर्योधनदुःशासनशकुनीकर्ण यांसधर्माचेकरींदेउन पद
रपसरूनिप्राणदान घ्यावेंमागोनसत्वर ११ भीमाचेपोटांतडोईघालुन देईहातींदुःशासन दुर्योधनाचेंमस्तकीं
हस्तस्पर्शवघन धर्मरायाचाठेवर्वी १२ पार्थाचींपदाब्जेंनिर्मळ तेथेंस्पर्शविकर्णाचेंभाळ शकुनीहाकुटीळखळ स
हदेवचरणावरिघाली १३ तूंआपल्यानेत्रोदकेंदेख धर्मासकरीअभिषेक ऐसेंऐकतांअक्षयसुख ब्रह्मांडभरीतु
जहोय १४ तुझेंनऐकतीपुत्रवचन तरीगारुडीसर्पासकरीदीन तेंवीभीष्मद्रोणासरसांगोन आकळोनिबंदीघाली
कां १५ नासिकद्वारेंगुणवोवुन महावृषभकरितीदीन कींमत्तद्विरदआकळोन आकर्षुनीठेविती १६ कुपुत्रपोटां
तीलरोग छेदोनिकाढावासवेग हननरक्षणत्याग त्यांतीलएककरीवेगें १७ ऐसींवचनेंऐकोन क्रोधेंसंतप्तअं
बिकानंदन ह्मणेतुझेंसर्वज्ञान समजलेंपूर्णमजलागीं १८ पांडवांचेंकरितांस्तवन कधींचनधायेतुझेंमन
जेव्हांतुजपुसावेंजाण वारंवारहेंचिवदसी १९ तिहींहरऊनियांपण काननागेलेउठोन आह्मींचशतमूर्खपू
वावयातेवेळे आल्याघरातेधवां २४ डोंबपाणीमागत तोरितारांजणरवडबडित केशींधरूनन्हपनाथ
ताब्याहाणीतेसमई २५ विळभरीपाणीभरिले रांजणींकांहींनउरलें लाकुडमोळीचेंघेतलें पुटतीमारि

लेबोंडाने २६ ह्मणतीमांसरांधीवहिला रावचुलीपुढेंबैसला अग्निफुंकततेवेळा जळोनगेल्यादाढीमिशा
२७ सूर्यअस्तमानागेला कोरडेंधान्यतेवेळा दळूनघेउनआला भागीरथीतीरातें २८ स्नानसंध्यादिकर्मजा
लें पिष्टाचेपानगेंभाजलें दोनविभागकेले अतिथ्याचाआणिआपला २९ वेषपालटूनविश्वामित्र ह्मणेयज
मानाभूकफार तेअन्नसमग्र जेवीविप्रक्षणमात्रें ३० ब्राह्मणह्मणेतेवेळां कालचाउपवासमला अव
घेंअन्नजेविला मिटक्यादेततेधवां ३१ ब्राह्मणसवेंचगुप्तजाला ऐसाएकसंवत्सरक्रमला पोटबांधूनते
वेळा डोंबाघरीकामकरी ३२ हरिश्चंद्ररोडेला अस्थीचापंजरउरला महारीह्मणतीरोगयाला लागलासे
निर्धारें ३३ येणेअह्मासनागविलें दोनभारसुवर्णव्यर्थगेलें मसणरारवावयावहिलें डोंबतेव्हांठेविल ३४
ह्मणेतुवांमसणराखावें द्रव्याविणेजाळूंनद्यावें रावह्मणेबरवें आज्ञाप्रमाणअह्मासी ३५ सूर्योदयींकरि
तस्नान ह्रदईंआठवीवसिष्ठाचेचरण राखतबैसेश्मशान रात्रदिवसनृपवर ३६ यासघरासआणिलें
माणुसमरणेंराहिलें दुखण्यासकोणीनपडवाहल व्याधीदुःखगेलेंगावांतुन ३७ आमचेंहातचीडव्येंगे
लीं कारटीउपवासीमेली याचेंऋणेंदेणेंदिली दोनभारसुवर्ण ३८ इकडेकाळकोशिकाघरीं तारामतीभा
धेंकामकरी उसंतनसेदिवसरात्रीं नानापरीकरिकष्ट ३९ काळकोशिकाचेशिष्य यांतअसेरोहिदास
बत्तीसलक्षणीबाळडोळस जाईतुळसीआणावया ४० दर्भसमिधाकमळें आणावयापूजेचेवेळे
वनासअवघेनिघाले रोहिदाससमवेत ४१ पुष्पेंतुळसीतोडिती समिधादर्भखुडती तोसरोवरीं
कमळाप्रती रोहिदासपातला ४२ विश्वामित्रेंसर्पपाठविला तोकमळींजाउनबैसला रोहिदासतेवे
ळा कमळेंतोडीतानडी ४३ अकस्मातदंशिलाहातास हाकफोडीरोहिदास बत्तीसलक्षणीडोळस मू
र्छितपडिलाभूमीवरीं ४४ सकळआलेधावोनी तोरोहिदासपडलाधरणीं बाळरडतआक्रंदोनी ह्मणती
मातेसकायसांगूं ४५ रोहिदासह्मणेबाळांस मातापुसेलकोठेंरोहिदास माझानमस्कारमातेस जाउ

नियांसागाहो ४६ शोककरूंनद्यावाकाहीं त्यासेवाकेलीनाहीं तोझेडूआलातेसमर्यां प्राणसोडिलारोहि
दासें ४७ बाळेरडनआलींघरासी समाचारसांगतीमातेसी येरीमूर्छितधरणीसी पडलीकल्पांतओढ
वला ४८ उठोनिआक्रंदेतारामती पाहाकेसीकर्माचीगती एकबाळसुमती तेंहीनेलेंकाळेंहिरोन ४९ मा
जीआंधळ्याचीकाठीनेली कोणनेवर्नींपडली मजदरिद्र्याचीगांठसोडिली कोणेनिर्दयेंनकळे ५० मज
दुबळीचेअन्नकिंचित कोणीनेलेंहातोहात कल्पवृक्षमाझानिश्चित कोण्यानिर्दयेंउपडिला ५१ राजहंस
रोहिदास काळेंत्यावरघातलापाश मगह्मणंलेकरास कोठेंराजहंसगकिलारे ५२ त्यासस्नानासउदकठेवि
लें बाळअसेलभुकेलें कोणेवनींटाकिलें कायबोलिलेतेसागां ५३ मीकामकरितांआसमास ह्मणेमाते
तूंभागलीस मजह्मणेक्षणभरीबेस रगडीतोपायतुझेमी ५४ उठतीपोटींउमाळेप्रबळ भळभळांनेत्रींवा
हेजळ ह्मणेमजपापिणीसऐसाबाळ जिरेलकोठूनसांगपां ५५ म्यापूर्वींईश्वरपूजिला व्रतजपतपनेम
चालविला पूर्णनकरितांमधेंचटाकिला ह्मणोनीगेलारोहिदास ५६ मीकेलापंक्तिभेद कींकेलाहरिक
थेचाउच्छेद साधुसंताचादोषशब्द नेणतांबोललेंमी ५७ कींकेलापरद्रव्यअभिलाष कींभजलेंनाहींहरि
हरास कींकोणाचाभुरवींचाग्रास काढूनियांम्यानेला ५८ कींयतीश्वरआला भिक्षानदेतांदवडिला कीं
म्याविघडपाडला कुरंगिणीपाडसास ५९ कींहरिहरचरित्रेंउच्छेदिली कींवेदशास्त्रपुराणेंनिंदिलीं मातापु
त्रविघडलीं विघ्नकेलेंपरालां ६० जळतहृदयाभीतरी विप्रकीपलेघरीं ह्मणउनपुढतीकामकरी मध्य
रात्रजाहली ६१ राजसाकोठेंपडलासी कांपाडसाबोनदेशी मातेह्मणउनबोलसी गतीकेसीतुजजाली ६२
बारेत्वंभेटमजला मीयेऊनचुंबीनतुजला पक्षाहक्षींग हिंवरआला शोकऐकीनतुयेचा ६३ बारेमाझीयाडो
ळसा सख्यावोदेपाडसा कोठेंआहसराजहंसा रोहिदासासुकुमारा ६४ बारेत्वंनिष्टांवंतबाळक नपीशीधर्म
शाळेचेंउदक अंतरलाअयोध्यानायक हरिश्चंद्रतुजलागी ६५ चक्रंकडेवनीधांवत झाडेंकपाळाआदळत

घडिघडींअडखळोनपडत अश्रुस्रवाहेनकळेतें ६६ सरीवरींहोतेंप्रेत विश्वामित्रपुढेंटाकित सतीचेपायांस
लागत येरीपाहतचावपूनी ६७ पुत्रशेवओळखिलें मगनिडळानिडळमेळविलें ह्मणेबामजनपुसिलें टा
कूनिकेलेंपरदेशी ६८ सूर्यवंशमुकुटमणी बोलकांहींमजवाणी त्वंराजपुत्रयेउनी परदेशीहोऊनपडला
सी ६९ आडवेंघेतलेंप्रेत पाहातीसदरदराकूटत मुखींत्याचेस्तनघालित हृदयींहृदधरीतसे ७० मगरू
पपाल्टुनी विश्वामित्रपुढेंयेउनी ह्मणेत्वंकोणयेवनीं रडत्येसआक्रोशें ७१ तीह्मणेऐकद्विजा सर्पेंखं
डिलापुत्रमाझा तोहरिश्चंद्रमहाराजा त्याचापुत्रहाअसे ७२ ब्राह्मणह्मणेआतांचराती लोकरजाळीयाप्र
ती सूर्योदईडोबऐकती आळूंनदेतीतुजलागीं ७३ प्रेतउचलून त्याअवसरां येताजालाजान्हवीतीरा
काष्टेंअग्नीत्वरा घेउनिआलाआपण ७४ पुत्रघातलासरणांत ह्मणेत्वंरुदननकरीयेथ पहातोमसणरावि
त मगजाळू नेदीतुज ७५ ब्राह्मणतेथेंगुप्तजाला तारामतीनेआकांतमाडला कोल्हाळहरिश्चंद्रेंऐकिला
जाळदेखिलामसणांत ७६ धावोनिआलातिजपासी केशीधरूनओढिलेंतिसी मजनपुसतांजाळिसी कांनदेसीद्र
व्यातें ७७ तीसरागेंदिधलीलात उदकघालुनीमरणविझवित काष्टेंच हे कडेटाकित बाहेरप्रेतकाढि
लें ७८ सतीपुढेंप्रेतटाकिलें केशजळोनआंगभाजलें सर्वांगासफोडआले बिभित्सपडलेंलेकरूं ७९
मगह्मणेतारामती पहाकर्माचीकैसीगती सर्पदंशेंमरणअवगती अन्यजातिस्पर्शलाकीं ८० सर्पदंशमाबळ
ला रायहरिश्चंद्रकायजाला माझाप्राणकांउरला कायडोळांपहावेहें ८१ अग्निसंस्कारनहोतांपुरता बाहेरओ
ढीनकाढिलेंप्रेता रायाहरिश्चंद्राचासुता गतितत्वतांऐसीही ८२ हेंऐकतांउत्तर येऊनपुसहरिश्चंद्र साग
त्वंकोणसुकुमार जाळिसीपुत्रकोणाचा ८३ येरीह्मणेंकांपुससीव्यर्थ माझेंकर्मबळवंत अग्निसंस्कारनि
श्चित पुरतानाहींबाळकासी ८४ मगतोबोलेराजेंद्र तुझाकोणभ्रतार सत्यबोलतुजआणसाचार श्रीवि
श्वेश्वराची ८५ तारामतीबोलेतेक्षणीं मीरायाहरिश्चंद्राचीराणी सर्पेंपुत्रखंडिलावनीं त्यासअग्नीदेउं

आलें ८६ हें हरिश्चंद्रें ऐकोनी वक्षस्थळ घेत बडउनी मूर्छागत पडे धरणी मस्तक अवनीं आपटित ८७ मगह्म
णें तारामती तूं कोण सांग मज प्रती येरू ह्मणे चक्रवर्ती अयोध्येचा हरिश्चंद्र ८८ मग ह्मणे महासती त्याची सरी इं
द्रं न पावती तो केवळ मदनमूर्ती तेजें गभस्ती तैसा पैं ८९ काळ कौशिकें तुज घेतलें म्या डोंबा घरीं दास्यत्व केलें
एक वर्ष लोटलें अन्न नाहीं मज लागी ९० ऐकतां तें खुण एकमेकांचा गळ्या पडोन शोक केला दारुण तेसां
गतां हृदय फुटे ९१ घेउनी रोहिदासाचें मडें हरिश्चंद्र आक्रोशें रडे अहा बाळ माझें बापुडें होउन पडलें ये
रळीं ९२ सूर्यें पाडिला अंधःकार गेला रोहिदासा ऐसा कुमर उंच बळें शोकसमुद्र नसे पार तयासी ९३ ह
रिश्चंद्र ह्मणे तारामतीसी पुसोन येतों माझ्या धन्यासी आज्ञा घेउन येतों तयासी दहन करूं मग येथें ९४ राजा गेला
डोंब घरासी विश्वामित्र आला तिज पासी तुज लाग्नासील विवसी जाय वेगें येथुनियां ९५ तुझा भ्रतार येतो व
री बैसया देवळा भीतरी मग प्रेत घेउनि सुंदरी देवालयांत बैसत ९६ तिस दुःखनिद्रेनें व्यापिलें विप्रें प्रे
ताचें पोट फोडिलें आंतडीं काढूनि तें वेळें मुखीं लावी सतीचा ९७ देवालयांत मास विखरलें हात पाय च
हूंकडे टाकिलें रक्त तिचा मुखास माखलें बाहेर आला आपण ९८ विप्र करी शंखध्वनी लांव बाळ खाती ह्मण
उनी तो सरली रजनी लोक धावोन आले तेथें ९९ वेशींत होता महार त्यास हाक फोडी विश्वामित्र तुह्मास
लांव खाईल निर्धार कुळ तुमचें उरेना ३०० माझे पाठीं लागली म्या भयानें हाक फोडिली पळोन आलो
तुह्मा जवळी मग ती गेली देवालयांत १ देवालयांत ती जो आहे तों मारावील वला हे मग पुढें हातां न ये बाहेर गे
ल्या कोणासी २ तुह्मा देखून आंत गेली दिव ठीने उनी धरा वहिली मज ग्नासी ती ये काळीं परी वाचलों तुमचे
न ३ मग महार तेथें आले बळकट ते आंत गेले तीस केशीं धरून ओढीले प्रेत बांधिलें गळ्यां तिचे ४ माथा
रें हात बांधूनी सोटें मारिती ते क्षणी तें दुःख सांगतां धरणीं उलूं पहे सत्वर ५ डोळे तिचे बांधले राजद्वारीं घेउनी
आले लोक गल्लोगल्ली पळूं लागले लांव आली ह्मणोनियां ६ लेंकरें घेउनी घरांत पळती कित्येक कपाटें झा

किती धीट ते जवळ जाती पाहावयाला वेसी ७ एक ह्मणती कौशिक गृहीं ही होती कळलें नाहीं आतां खा
ईल सर्वही गांव ही उरेना ८ परवां दोघे ब्राह्मण मेले तेद्द पंचरवादले इसटे वितां नव्हे भलें जीवें मारा
आतां ची ९ मग वीरबाहू महार पाचारिला सत्वर ह्मणे यालावेचा संहार करी बाहेर नेउनी १० मग डोंबा
नें केश धरुनी बाहेर आणिली ओढूनी हरिश्चंद्रास बोलाउनी ह्मणे मारून टाकी इते ११ येरू ह्मणे आज्ञा
प्रमाण ओळखिलें तारामती निधान तिचे हातीं करविलें स्नान भागीरथीचें तेसमई १२ स्नान करून बा
हेर आली हृदई चिंतिला वनमाली मान नीट करी वहिली येरें पुसली शस्त्रधारा १३ तारामती ह्मणे तेधवां
जयजय विश्वनाथा सदाशिवा हरिश्चंद्रा ऐसा पती व्हावा जन्मोजन्मीं मज लागीं १४ रोहिदासा ऐसा सुन
वसिष्ठ ऐसा गुरुनाथ विश्वामित्रा ऐसा मागता सत्य जन्मोजन्मीं असो पैं १५ जयजय जगन्निवासा नारा
यण ह्मणउनी नीट केली मान ह्मणे आतां वेगें हाण एक घायें करूनियां १६ घायास उचलिला कर
तो भक्तकृपाळू परमेश्वर वैकुंठीहोन श्रीधर एकाएकीं धावला १७ हो हो रे ह्मणोनी ते वेळां जगन्निवासें क
रें धरिला चहूं भुजानीं आलिंगिला हरिश्चंद्रास भगवंतानें १८ चारी भुजा दिव्य सरळ वदन हास्य तमाल
नीळ वैजयंती आपाद माळ हृदईं झळके कौस्तुभाची १९ हरिश्चंद्र राजाचे कंठीं जगन्निवासें घातली मि
ठी रोहिदास अमृत दृष्टीं उठविला भगवंतें २० तारामतीस हृदयीं धरित शिरोमणी पतिव्रता त्वं सत्य वि
मानी सुरसमस्त पाहों आले तेधवां २१ शिवभवानी समवेत इंद्र आला शचीसहित सावित्री सत्यलोकना
थ पाहों आले तयांसी २२ आले सकल ऋषेश्वर आणि वाराणसीचे नारीनर पूर्णज्ञानाचा समुद्र वसि
ष्ठ सत्वर धांवला २३ विश्वामित्रें रूप प्रकट केलें हरिश्चंद्रास हृदयीं धरिलें तारामतीस आलिंगिलें क
डे घेतलें रोहिदासा २४ धन्य तुमचें सत्व पूर्ण केलें सूर्यवंश उद्धरण शोधितां ही त्रिभुवन उपमा नाहीं तु
ह्मातें २५ विश्वामित्रें तप केलें तें अक्षय हरिश्चंद्रास दिधलें ह्मणे तुझा पित्यास उद्धरलें तुज अर्पिलें तप पुण्य

२६ जालाएकचिजयजयकार धडकतुवाद्यांचागजर पुष्पवृष्टीकरुवर वारंवारकरिताती २७ लक्ष्मीसावि
त्रीपार्वती तारामतीसमेटती अक्षयवरदानदेती संतोषोनतयांला २८ वसिष्ठासदेखोन करिताजालासाष्टां
गनमन वसिष्ठदाटलाप्रेमेंकरुन धन्यह्मणेराजेंद्रा २९ आलावीरबाहुमहार केलात्याचाउध्दार पावोनदिव्य
शरीर स्वर्गालागीपाठविला ३० काळकौशिकब्राह्मण धरिततारामतीचेचरण ह्मणेमातेतुझेंदर्शन घेतांपा
पेंजळती ३१ विश्वामित्रेंहरिश्चंद्रासी गजरेंआणिलेंअयोध्येसी लोकधांवतीभेटावयासी आनंदआकाशींन
मावें ३२ दोघेस्थापुनीसिंहासनी आपलेहातेंवोसमरुनी रोहिदासासपुढेंबैसउनी अभिषेककेलाराजानें ३३
हरिश्चंद्रावरीधरिलेंछत्र आज्ञामागोनविश्वामित्र बद्रिकाश्रमासीअतिसत्वर गेलातेथेंतपातें ३४ साठसह
स्त्रवर्षेवरी हरिश्चंद्रअयोध्येंचेंराज्यकरी रोहिदासत्यावरी सिंहासनीस्थापिला ३५ सकळअयोध्यानगर
विमानींबैसवीहरिश्चंद्र सन्मानेंसकळांचाउध्दार केलावैकुंठींनेउनी ३६ यापरीअयोध्याउध्दरली क्षणेंवै
कुंठासनेली हरिश्चंद्रेंकीर्तीकेली ऐकतांपापेंसर्वजाती ३७ तीकथाकरितीश्रवण त्याससदांजयकल्याण
अंतींपावतीवैकुंठभुवन सत्यवचनव्यासाचें ३८ तीकथाअतिरुरस धर्मासंसांगेलोमेश युधिष्ठिरातूंही
विशेष सत्वधीरतैसाची ३९ पुढेंकथागोडगहन घोषयात्रेंजातीकौरवजन तेथेंगंधर्वनेतीलधरुन पाक
शासनआज्ञेंपैं ४० पांडवप्रतापनंदनवन कल्पवृक्षहरिश्चंद्रोपाख्यान सप्रेमभक्तपंडितजन श्रवणकरोत
सर्वदा ४१ श्रीनयांसनमस्कार साष्टांगेंघालीश्रीधर ब्रह्मानंदेंनिर्भर हेंचरित्रपरिसावें ४२ रुरसपांडव
प्रतापग्रंथ अरण्यपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ तिसाव्यांतकथियेला ४३ इतिश्रीपांडवप्रता
पग्रंथ वनपर्वटीकाश्रीधरकृत हरिश्चंद्राचेंआख्यानसमस्त लोमेशेंधर्मासंसांगीतलें ४४ इतिश्रीमहा
भारतटीकापांडवप्रतापवनपर्वेत्रिंशत्यध्यायः संपूर्णमस्तु शुभंभवतु श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः जन्मेजयबोलेसुखसंपन्ना वैशंपायनापरमसज्ञाना भारतकथारस
श्रवणा सुरसलागेतुझेमुखें १ करुनीतीर्थयात्रासमस्त द्वैतवनाआलेपंडुकुमर यावरीधृतराष्ट्रकुम
र कायकरितेजाले २ मगबोलेवैशंपायन एकत्रहोउनदुर्जन दुर्योधनशकुनीकर्ण विचारकरि
तीएकांती ३ आलीद्वादशवर्षेभरत तेराव्यांतपांडवहोतीगुप्त पुढेंयुध्दहोईलप्राप्त अतीअनर्थदि
सती ४ स्वर्गीहूनविद्याअद्भुत शिकोनआलाअभिमन्युतात समरंगणीकुतांत युध्दकरूनशकेचा ५ प्र
सन्नकरुनीत्र्यंबकेश अस्त्रविद्याशिकलानिःशेष तेसाचिवासवेंनिर्दोष विद्यात्याससमर्पिली ६ लोक
पाळप्रसन्नसर्व विद्यादिधलीअपूर्व निःशेषपुसिलागर्व निवातकवचाचा ७ शकुनीह्मणेनिर्वा
तेंजोनिजसुरेंआहत रात्रीसजाउनीअकस्मात करावाघाततयांचा ८ देखुकनिद्रस्थजाण मुखवटेचा
वेंघालूनपाषाण विषवल्लीजोंलाहन तोंउपटूनटाकावी ९ गोधनेंपाहावयानयनी घोषयात्रामिषकरु
नी शोधीतनकुटतांद्वैतवनी रजनीशत्रुवधावे १० आपलीवैभवसंपत्ती चातुरंगदळनमायजगती देदा
खवावेंपांडवांप्रती पाहातहोतीअधोवदन ११ दरिद्रवनांतपांडव वैभवत्यासदाउंसर्व हेंदेखूनगर्व ह
रेलत्यांचानिश्चयें १२ उदयपावतांवासरमणी उडुगणेलपतीगगनी दृष्टीदेखतांमहामणी मगगारांसी
कोणपुसे १३ मृगेंद्रआलाऐकोन वारणसोडितीप्राण तेसेपांडवआह्मादेखोन निर्लज्जहोतीनलगतां
१४ फावलेंनरटाकावेंवधून नाहींतरीवैभवबळदाउन यावेंगळेंपरतोन राष्ट्रआपलेविलोकी १५
ऐसेंबोलतांशकुनी दुर्योधनआनंदलामनी श्वानजैसेंवांतिदेखोनी परमआवेशेंधांवती १६ शिंदावन
देखतांबहुत मद्यपीजैसाआनंदत कींजागसप्राप्त मत्याळदेशजाहला १७ मनातऐसाउपजेहोस
कींशंखकरावेंबहुवस तोंआलाफाल्गुनमास गगनीहर्षनमाये १८ ऐसेंशकुनिचेंवचन ऐकोनतोष
लादुर्योधन अंधाप्रतीयेउन पुसताझालातेधवां १९ ह्मणतीघोषयात्राकरुन येउंराष्ट्रपाहोन मृगया

करितद्वैतवन येउंपाहोननेमेची २० इषयह्मणेपांचपांडव द्वैतकाननीचेकंठिरव तुह्मांइभतेथेंसर्व आ
डुलेंवैभवदाउंजातां २१ जागेनकरावेनिद्रस्थव्याघ्र चेतउनयेमाहाविखार तरीतुह्मांजाउंनसत्वर घोष
यात्रापाहोनयेइजे २२ देवव्रतभरद्वाजद्यारद्वत विदुरआणिद्यारद्वतीसुत कळोनेदितांमात सेनेसहित
निघाले २३ विदुरासससमजलेंतेह्मणी दुर्जनचाललेसेनाघेउनी परीगजबजनाहींमनी ह्मणेयाचेनका
यहोते २४ रुक्मिणीनयनाब्जविकाशकमित्र पाठिसीअसतांमित्र कायकरितीदुर्जनअमित्र दुःखपात्र
होतील २५ जोनिजजनहृदयमिलिंद जगदांकुरमुळकंद तोपाठिसीब्रह्मानंद पांडवघरींसर्वदा २६ असो
इकडेकौरवभार घोषप्रदेशींहोउंनिस्थिर घारोष्णपयपवित्र प्राशनकरितीमनेंछा २७ एकतप्तहोती
दधीसेउन एककरितीमद्यपान एकामेकांसआग्रहकरुन पाजुनमत्तजाहले २८ तुळ्यह्मणतीसुधा
रस मद्यपानअतिविशेष नानाफळेंभक्षुनसुरस बहुविलासदाविती २९ यावरीतेंदुष्टसकळी आ
ले द्वैतरण्याजवळी जावनीकेळीनारियेळी कर्पूरकर्दळीडोलती ३० कृष्णागरमलयागरचंदन सुवा
सेंभरलेंसंगगन जैसेंसज्जनाचेगुण नसांगतांप्रकटती ३१ खर्जुरकळंबरातांजन अंजीरओदुंबरसी
ताफळजाण अमृतवृक्षभेदितीगगन सूर्यकीर्णमाजीनपडे ३२ जेथंवसेसदाधर्म धर्मतेथेंसुखपरम
सुखतेथेंआराम सहजहोयसकळांतें ३३ आरामतेथेंवसतीसंत संततेथेंआरामबहुत आनंदतेथेंभ
गवंत सदारक्षितउभाअसे ३४ घालाघालंचालिलेरजनीत हेंजाणूननिर्जरनाथ गंधर्वपतीसप्रेरित कुंती
सुतरक्षावया ३५ मदेंधांवतकौरवभार तोवाटेसरमणीकसरोवर गंधर्वराजसहपरिवार चित्रसेनक्री
डतंदे ३६ इतधावतउन्मत्त गंधर्वासतव बोलत कोणतस्करतुह्मीयेथूं सोडापंथसत्वरें ३७ दुर्योधन
गजबजऐकोन इतांसदेईपुढेंपाटउन ह्मणेमार्गावरआहेकोण त्यांताडणकरुनसादवे ३८ गंधर्वपुस
तीरावकोण ह्मणेपृथ्वीपतीदुर्योधन लोकरउठावेंयेथून घेउनप्राणपळावेंगें ३९ गंधर्वांनीहेंऐकून

इतांस केलें ताडन जैसी बिडालकें धरुन श्वानें नेली तत्काळ ४० इत ह्मणोनि सांडलें जीत आले माघारें धा
वत अहीचे कवेदन अकस्मात मूषक जैसे पळाले ४१ दोंही हस्तें शंख करित सुयोधनासांगती वृत्तांत
पर्वततुल्य अद्भुत गंधर्व पुढें बैसले ४२ आह्मी प्रताप वर्णितां तुझा त्याहीं केली आमुची पूजा ऐसें ऐकतां
अंधतनुजा क्रोध अद्भुत नाटोपे ४३ निज भारें तें अवसरी दुर्योधन धांवे गंधर्वांवरी जैसे वृषभ सिंहाचे द
रीं माजी जावोन चवताळले ४४ गंधर्वांसहित चित्रसेन सरसावला युद्धालागुन वर्षाऋतूचा पर्जन्य कौर
वसैन्य खळियेले ४५ चित्रसेन पंचानना पुढें कर्ण सुयोधन जंबूक बापुडे मोहनास्त्र घालून वेडें केलें सर्व
एकदांची ४६ रथ तुरंग चाप तूणीर क्षणांत कर्णाचे केले चूर सुयोधनाचा स्यंदन सत्वर तिळप्राय के
ला हो ४७ एकएका कौरवाप्रती दशदश गंधर्व धरिती सुयोधन धरुनी बहुतीं हस्त माघारें बांधिले ४८
कर्ण पळे सत्वर घेतलें घोर दरकांतार मागें पुढें पाहे भयातुर चरणीं धांवों लागला ४९ यजमान परमसं
कटीं पडे देखून आश्रित पळती चहूंकडे तैसे दुर्योधनाचे वीर गाढे पळोन गेले अष्टदिशा ५० कीं तें श
स्त्र सांडुन आडमार्गें घेतलें रान नाना सोंगें घेउन पळते झाले तेधवां ५१ द्वैतारण्यांत धांवोन गेले कित्ये
क सेवक प्रधान धर्मराजा सवर्तमान सांगती रडोन ते वेळां ५२ भीमार्जुना शस्त्रें घ्यावीं तुमचे बंधू नेले
गंधर्वीं ऐकून हास्य केलें सर्वीं द्रौपदी धौम्य समवेत ५३ वृकोदर बोले स्पष्ट जेथें वसे कुटिळ कपट तेथें ई
श्वर करील तळपट अन्याय देखतां ची ५४ आमचा करावया वध येत होते हो उन्मित्त सिंधुजा आ
रविंदमिलिंद तेणें विपरीत केलें हें ५५ वैशंपायन बोलत कृष्णभक्तां जे विरुद्ध करित त्यास गती ही
च प्राप्त होय क्षणांत जाणिजे ५६ साधुसंत ब्राह्मण यांचा घात चिंतितां दुर्जन विप्रसमुदाय दारुण न
या वरी रिचवती ५७ श्रोतयांस ह्मणे श्रीधर सर्वांस विनवितों जोडुन कर भगवद्भक्तांसीं अणुमात्र
द्वेष सहसा न करावा ५८ अजातशत्रु युधिष्ठिर सकळ जीवांचें माहेर शत्रूचाही हितकर जो उदार

सर्वेसं ५९ शांति वैराग्य गिरिचा हिरा नररत्न वैराग्यवनीचा कल्पवृक्ष सुखें कमळपत्राक्ष अंतरबाह्य रक्षीज
यां ६० तेवि एकरत्नाचा कोशट ज्ञानमंदाकिनीचा लोट स्वप्नींही नेणे कपट अज्ञान जाण करीतसे ६१
क्षमावनीचें निधान कीं सदयतेचें उद्यापन ह्मणे नियां भीमार्जुन अज्ञान जाण करीतसे ६२ आह्मी पां
चतें एक शत मिळोन बंधु समस्त त्यांस गंधर्व धरुनि नेत पाहावें विपरीत केविं हा ६३ त्या आह्मां रा
ज संबंध ह्मणोन पडले विरुद्ध आणि कें करितां बाध आह्मी अवश्य धांवणें ६४ तरी तुह्मी लौकर
धांवा शत्रु उपकार करुनि रक्षावा यशोध्वज उभा करावा कौरवांसी सोडउनि ६५ मग बोले फाल्गुन
आह्मांस तों आज्ञा प्रमाण सिद्ध करून चार स्यंदन चौघे जण निघाले ६६ भीमार्जुन नकुळ सहदेव
समरा परी घेति धांव तों गंधर्वीं बांधोन नेले कौरव अंतरिक्ष तेधवां ६७ वृषभासि बांधिला दावणी कीं
तें तस्कर धरिले वनीं दीनमुख दुर्योधन नयनीं मागें पुढें विलोकी ६८ कृतांत मनीं वसे दचक तेंसी
भीमार्जुनें फोडिली हाक जळनाद ऐकतां देख गंधर्व चक्र कंपित पें ६९ ह्मणती काय आले काळ
कीं उतरले लोकपाळ तो अमर्याद शरजाळ भीमार्जुन सोडिती ७० पांडव आले देखोन खालीं पा
हती अंधनंदन परम निर्दय दुर्जन म्लानवदन जाहले ७१ गंधर्व बोलती परतोन कां करितां युद्ध कं
दन पार्थ ह्मणे बंधु धरुन कारण काय न्यावया ७२ तुह्मी गंधर्व तस्कर शरजाळें करून जर्जर साह्य
आली यानिर्जर करूं संहार सर्वांचा ७३ चौघे बंधु सोडितां बाण गंधर्व गिळिले संपूर्ण जैसे गपिच्छे
पसरून काननामाजी विचरती ७४ शरवर्षें चित्रसेन परिते न गणती पंडुनंदन जैसे अवळाचे
वचन रसहीन विद्वज्जन न मानिती ७५ शरवर्षती एकसरें तैसी पडती गंधर्व शिरें मग दृष्टी चेत
ती यपत्रे संहारास्त्र सोडिलें ७६ मग चित्रसेन पुढें होउन ह्मणे पार्था तूं मित्र प्राण नरोहं अस्त्र आवरु
न घेई त्वं मागुती ७७ नेत्रांतें अस्त्र मागुतें आवरिलें वीरपार्थें मग भेटले चित्रसेनातें चौघे बंधु ते ध

यां ७८ चित्रसेनह्मणेअंधकुमर महाकपटीदुराचार यांचाकांघेसीकैवार शिक्षाआचारकगर्वा ७९
त्रिदशेश्वरेंआज्ञाकरुन यांसआणविलेंधरुन हेतुह्मावधावयाजाण येनहोतेंजहृनियां ८० देघात
कीतस्करदुर्जन सांडायेनासिककर्णचरण अथवाशिरेंचछेदुन आतांशंकीननवआर्शे ८१ पार्थह्म
णेधर्माज्ञा अलोटआह्मासर्वज्ञा मगपांडवगंधर्वसेना धर्मापासींपातले ८२ कौरवबांधलेआकर्षु
न उभेकेलेपुढेंनेउन श्रीकृष्णभगिनीयेउन पाहतीझालीकौतुकें ८३ हांसोनपांचाळीबोले बरेंच
गंधर्वींकौरवपूजिले दुःशासनदुर्योधनतेवेळे अधोवदनेंपाहती ८४ धर्मह्मणेसोडासत्वर बंधूक
ष्टीजालेसमग्र तेंकौतुकऋषेश्वर भोवतालेविलोकिती ८५ गंधर्वींदिधलेंसोडुन धर्मरायाचीआ
ज्ञाघेउन स्वर्गींगेलाचित्रसेन निजविमानींबैसोनी ८६ पांडवकरेंगंधर्व पडलेहोतेतेसर्व उठ
विताजालावासव कृपादृष्टीकरोनी ८७ इकडेदुर्योधनासह्मणेधर्म हेंकांतुजआठवलेंकर्म त
स्करविद्येनेश्रम पावलासीफारतूं ८८ तूंजन्मोनकुरुवंशीं निंद्यकर्मआचरलासी नकुळसहदे
वद्रौपदीसी हास्यनाटोपेतेधवां ८९ पार्थह्मणेसमरींयेउन युद्धकरावेंहोतेंनिर्वाण नीचकर्मआच
रोन डागलाविलाकुळासी ९० भीमदुःशासनासह्मणत जयपावलांतुह्मीसमस्त आतांवाद्येंवाजवि
त गजपुरांतमिरवावें ९१ दुर्योधनह्मणेधर्मराया आज्ञादेईगुणालया युधिष्ठिरेंआलिंगुनियां समा
धानकरीतेधवां ९२ ह्मणेमनांतखेदनकरी काळहीआलातुजवरी तरीबंधुतुझेनिर्धारी पाठीराखेआह्मी
हो ९३ बंधुसहदुर्योधन चालिलाधर्मासपुसोन अपमानेअधोवदन चरणचालीजातसे ९४ मनां
तभावीदुर्योधन शत्रूनीसोडविलेंजाण कायव्यर्थवांचून द्यावाप्राणविषघेउनी ९५ गंधर्वीनेलें
बांधोनशिरेंटाकितेछेदुन तरीबरेंहोतेंतेणें अपमानह्मावाटे ९६ नीतपकरीनदारुण पांडवांचाघ्या ३
वयाप्राण अथवादेशांतरसेविन कायवदनदाखवुं ९७ दुर्जनासकरितांउपचार तीतक्काळमानीअ

पकार पयःपानविखार गुणआपलेटाकिना ९८ षोडशोपचारेंपूजिला कृशान परिपोळितांनकरी
अनमान दुर्जनावरीहितकेलेंपरम पडेपरतोंनदुरात्मा ९९ मार्गींमिळेपरिवार भेटेयेउनीसूर्यपुत्र
समाधानेकरितीसर्वत्र दुर्योधनाचेंतेधवां १०० लाभमृत्युआणिभय काळेंकरूनहोतजाय खेदनमा
नुनीपाहे धैर्यपुढतीधरावें १ कायाआहेजीत नसोडावापुरुषार्थ उद्यांजिंकूंपंडुसुत एकछत्रीराज्य
करूं २ मगबोलेदुर्योधन विदुरभीष्मद्रोणीद्रोण यासकायदाखवावेंवदन सेउंकाननयावरी ३ प
रमकांतारघोरांदर लक्षनयेकसरोवर तेदिवसींराहिलेधार्तराष्ट्र भोजनशयननाठवे ४ दुर्योधनचिंता
क्रांत रात्रींदुःखनिद्रादाटलीबहुत भूमीवरशयनकरित तोंअद्भुतवर्तलें ५ पाताळींदैत्यसमस्त दुर्यो
धनाचाजाणुनीवृत्तांत हेमानुनीअकस्मात कृत्यायेकपाठविली ६ तिणेयेउनीतेवेळां दुर्योधननेला
पाताळा भेटलादैत्यांसकळां सांगेवर्तलावृत्तांत ७ दुर्योधनाचेंसमाधान करितांसर्वदैत्यमिळोन अं
धपुत्रकरीरुदन ह्मणेमीनजाईगजपुरा ८ भीष्मद्रोणशारद्वत त्याचेंपांडवांकडेचित्त गंधर्वींनेलेंआह्मा
न दुःखमजवाटतें ९ पांडवींसोडविलेंपाहें तेंदुःखत्रिभुवनींनमायें येतीलपृथ्वीचेनृपवर्य हांसतीमजदेख
तां १० दैत्यह्मणतीएकवचन शारद्वतभीष्मद्रोण याचेअंगींसंचारुन पांडवसेनासंहारुं ११ ऐसेंकरून
समाधान पूर्वस्थळाघालविलानेउन दुर्योधनजागाहोउन सांगेस्वप्नकर्णातें १२ मगकर्णह्मणेयु
द्धांत तुजजयहोईलअत्यंत मगवाहनींबैसउनिसमस्त गजपुराप्रतीआले १३ सकळवाद्येंराहउनेग्रामां
तप्रवेशलेअधोवदन भीष्मविदुरद्रोण वर्तमानकळलेंनयां १४ पांडवरक्षकवैकुंठनाथ त्यांसकोण
करीलविपरीत ब्रह्मानंदपंडुसुत हेंतारणीविचरती १५ इकडेकर्णदिग्विजयकरुन द्रव्यआणिलें
मेळउन सकळराजेबोलाउन महायज्ञआरंभिला १६ मनीयोजिलीकुटिलयुक्ती बोलाउंपाठविलेपांड
वांप्रती द्यूतखेळोनमागुती वनवासासीपाठवावे १७ कींत्रयोदशवर्षेंभरल्याविण केंविग्रामांतबैस

तीयेउन यंगोष्टीचें दूषण लाउन आणीक वनवासयोजावा १८ पांडवांप्रतीगेलाइत ह्मणतीयागासचला
समस्त धर्मराज हांसूनबोलत आह्मींतयेंनयेउं कदां १९ त्रयोदशवर्षेंहोतांपूर्ण येउंबोलाविल्याविण
असोसमाप्तजालायज्ञ दुर्जनाचागजपुरीं २० एकाइकडेद्वैतारण्यांत मृगयेसीगेलेपंडुसुत द्रौपदीए
कलीआश्रमांत कौतुकएकवर्तलें २१ सेनेसहजयद्रथ शाल्वदेशालग्नाजात वाटेंआलाअकस्मात
पांचाळीदृष्टीदेखिली २२ जीचास्वरुपाचीसिमा जेअपर्णेचीअपरप्रतिमा दशास्यसुतअंबुजजन्मा ऐ
सीनिर्मूंनशकती २३ कमळगर्भाहूनरवंजन कुरवंडीकरावेंनेत्रावरुन अष्टनायकांचेंसौंदर्यपूर्ण
चरणांगुष्टेंनतुलेची २४ आकर्णनेत्रीनिर्मळमुखातें देखुनद्विजराजलज्जित मृगेंद्रदेखकटीत सुख
नदाखवीमतुच्या २५ परमसुकुमारघनःशामवर्णा वाटिलीइंद्रनीळगाळुनी दंततेजेंजिंकिल्याहिरेखा
णी बोलतांमेदिनीप्रकाशपडे २६ सर्वलक्षणयुक्त पृथ्वीचेनृपनाथ सुखेंकीर्तनिगशावाजवीत सौंद
र्यशाळाह्मणउनी २७ जीचाअंगीचासुवास जायअर्धयोजनाविशेष जयद्रथेंदेखूनतीस मानसजेव्यापि
ला २८ ह्मणेऐसीनवरीटाकुन कांकरुजावेंलग्न हातांआल्यादिव्यरत्न कैचीकारणगारेचें २९ सकळ
प्रमदाचीईश्वरी प्रतिमानसेउर्वीवरी ऐसीसांडुननवरी शाल्वदेशाकाजावें ३० तक्रमनीजोइछित हा
तासआलेंअमृत तेविंआह्मांजालेंयेथं पूर्वदत्तप्रसादें ३१ पांडवएकले वनांत त्यासवधीनएकक्षणां
त मगकोटिकनामदूत पांचाळीजवळधाडिला ३२ पांचाळकन्यासुरेख पांचसिंहांचीललनादेखती
सजयद्रथदेख त्यावयासिक्षजाले ३३ कोटिकेंनेयेंयेउन पांचाळीसह्मणेतूंकोण तुझेंरूपदेखुन देव
हीप्राणओवाळिती ३४ वदनपाहतांनिःकलंक नरनरेंद्रचकोरह्मणतीदेख देखतांश्रीमुखनारिक कादं
वपार्थिवजाले ३५ विद्युल्लताझळकेज्यापरी हारींउभीपांडवनारी अचळरूळनउर्वीवरी प्रकाशइरझ
ळकनसे ३६ द्रौपदीह्मणेमार्गस्थहूता मीपंडुस्नुषापांडववनिता पांचाळरायाचीदुहिता भगिनीमन्मथज

नकाची ३७ कोणआलाआहेराव सांगवनांतगेलेपांडव तेआतांयेतीसर्व आतिथ्यकरितीतुमचें ३८
कोटिकानेयेउन सांगीतलेंवर्तमान मगजयद्रथरथाखालींउतरून आश्रमद्वारांपतला ३९ ह्मणेलाव
ण्यरत्नराशी तूंचातुर्यसरोवरराजहंसी जरीतूंमाळघालिसी तरीपावसीसर्वसुख ४० तुजयोग्यभ्रता
र कदांनव्हतपंडुकुमर वनवासपरमघोर येथेंफारश्रमलीस ४१ मीसिंधुरायाचासुत माझेंनामज
यद्रथ तुजकारणेंआणिलारथ आरूढसत्वरयावरीं ४२ ऐसेंऐकतांगोरटी भ्रूमंडळांघातलीआंठी
ह्मणेप्रळयचपळावोटीं शलभकैसाआकळिला ४३ मशकभावीमानसीं पर्वतदावीनदादेसीं वृश्चिक
खदिरांगारासी ताडूनकैसावाचेल ४४ पंचपांडवप्रळयाग्न त्यांचीज्वाळमीदारुण तूंपतंगतीकवळुन कैसा
सांगवांचसी ४५ व्याघ्रनिजलावनांत त्याचीजिव्हापुढेंलोंबत तेशशकेंताडूनस्वस्थ केंवीपावेलगृहातें
४६ महाभुजंगाचेदशनेंदेखा पाडूनकेविवांचणेंमंडुका तृणाळीआत्मजाविनायका धरूनकैसाहानेईल
४७ इभमदेंगर्जनाकरी तोंदृष्टीनेंदेखेकेसरी प्राणघेउनपळेलौकरी पांडवआतांचियेतील ४८ जोर
णपंडितसतेज दृष्टीनपडेजोहरिध्वज भीमगदापाहतांनिस्तेज होउनपडसीमशका ४९ असोपल्लवींध
रुनजयद्रथ पांचाळीसबळेंचओढित नवतीअचळअंगझाडितलोटल्यापतितसतीनें ५० जयद्रथउ
लथूनपडला मागुतीउठोनधांवला बळेंचउचलूनराजबाळा रथावरींघातली ५१ त्वरितसहजयद्रथ
पळतनगराआपलेजात जयवाद्येंवाजवित मनाभावीआनंदती ५२ हिंसकवधीवरतविशेष जैसाभा
वीमनीहर्ष कींद्विजांपीडितांव्याधेश आनंदमानीमानसीं ५३ पांडवनामघेउनी हाकदेईश्रीकृष्णभगिनी
लं{पित}जालीकुंभिनी महासतीआक्रंदतां ५४ पक्षीधांवतीगगनीं हांकदेतीआक्रोशेंकरुनी पंडुपुत्रहो
धांवाये क्षणीं द्रुपदनंदिनीनेलीदुष्टें ५५ मृगयाकरूनपंडुसुत आश्रमाकडेत्वरेंयेत तोंधावतांदेखती
पुरोहित धौम्यनामात्वरेनें ५६ आणीकहीऋषीधांवती पांडवांसवेगेंपालविती मृगेंद्रहोतुमचीकार्नी

जंबुकजयद्रथनेनसे ५७ आश्रमींठेउनीधौम्याप्रती पवनवेगेंपांचहीधावती जैंविउरगाचामार्गखग
पती कादिनधावेत्वरेनें ५८ कींइभकोणेवनांतरी पहातधांवतीजैंविकेसरी तीसेंनेसहितलपतांझ
डकरी द्रथाकुमारींदेखिला ५९ गर्जनाकरितभीमार्जुन उभातस्करादावीवदन तुझेंमीनाककान
करचरणछेदितों ६० जयद्रथसेनेसहित बळेंउभाराहीत्वरित भीमगदाघेउनधावत जैसाकृतांत
महाप्रळयीं ६१ गजरथाचासंहार करीतेव्हांवृकोदर धर्मार्जुनसोडितीशर प्रळयचपळेंसारिखे ६२
सहदेवआणिनकुळ संहारितीपायदळ बाणभेदितीजैसेंव्याळ वाल्मीकांतरीप्रवेशती ६३ जयद्रथसीं
डींबाण वृष्टीकरींपर्जन्य परीतेनमानितीपंडुनंदन शिरेंतोडुनपाडिती ६४ धर्मेंअर्धचंद्रबाणलवला
हीं भेदलाजयद्रथाचेहृदयीं रथातळींतेसमयीं नकुळउतरोनधांवला ६५ वारणचक्रांतमृगनायक
एकलाचीनाळेनिःशंक तेसीअसीलताखेटक नकुळधांवेघेउनी ६६ शस्त्रेंपाडिजेकर्दळीस्तंभ तेसें
नकुळींपाडिलेंइभ तुरंगस्यंदनाचेंकदंब संहारिलेप्रतापें ६७ चपळातळपे जा परी तेंविफिरतसैन्य
सागरीं नकुळघटोद्भवेंतेंअवसरी सेनासिंधुप्राशिला ६८ संकट जाणूनजयद्रथ द्रौपदीससोडुनप
ळत पांचाळीह्मणेधरा त्वरित तस्करासीसोडुंनका ६९ मगपवनवेगेंकरुन धावलेतेव्हांभीमार्जुन मत्त
शार्दूळधरीहरिण तेंविआसडुनपाडिला ७० यथेष्ठमारुनलत्ताप्रहार बांधूनिआकर्षिलेमागेंकर स्वयें
मुखकाढूनिशार पांचपाटकाढिले ७१ दुर्योधनभगिनीदुःशिळादेख यासिदिधलीहाहोयशालक अ
र्धखांडमिसीनिःशंक भादरुनीचालविला ७२ धर्मेंद्रौपदीपुढेंत्वरित उभाकेलाजयद्रथ मगबोलेक्र
मद्राकांत यासवधावेजरीआतां ७३ तरीदुःखवेलगांधारी मगत्यासपुसतीतेअवसरीं घेउनद्रुपदरा
जकुमरी कांतूंपळतहोतासी ७४ मगह्मणतीतयास ह्मणेंपांडवांचादासानुदास धर्मआणिद्रौपदीस ५
नमुनजायदुर्जना ७५ जयद्रथासह्मणेधर्म ऐसेंनकरीकदाकर्म तोदीनवदनपरम धर्मरायाविनवित

७६ सत्यसांगतोधर्मात्मा अन्यायमाझाकरीक्षमा सोडिलातोपापात्मा अधोवदनेंजातसे ७७ ह्मणेज
नाकेंविदाखउंवदन मगगंगाद्वाराप्रतीजाउन करूनतपअनुष्ठान प्रसन्नकेलाव्योमकेश ७८ त्याप्र
तीह्मणेत्रिनेत्र मागतूंइछितवर ह्मणेपांडवांसीविजयसत्वर मजलागींदेइकां ७९ मगबोलेअपर्णानाथ
समीपनसतांक्रमद्राकांत तेव्हांजयतुजसमस्त क्षणएकहोईलपैं ८० ऐसाकरितांवनवास पांडवांचेमग
भरलेदिवस द्रौपदीसहआश्रमास विचारकरितीजाउनी ८१ इकडेस्वप्नींयेउनिकर्णास सांगताजाला
चंडांश कुंडलेंमागेअमरेश त्याससर्वथानद्यावी ८२ तींदेतांकर्णभूषणं आयुष्यतुझेंहोईलक्षीण मग
बोलेउदारकर्ण नेदींमाझेंननह्मणवे ८३ मगबोलेगभस्ती त्याकडेएकमागशक्ती असोकर्णमहा
मती अनुष्ठानाबैसला ८४ जपनास्वयेंउपस्थान शक्रआलाविप्रवेषधरुन ह्मणेमहाराजउदारकर्ण
कुंडलेंदेईंश्रवणाचीं ८५ कर्णह्मणेशचीरमण पूर्वींगेलासकवचघेउन आतांदेतोकर्णभूषण तूंप्रसन्नम
जहोईं ८६ अवश्यह्मणेविबुधपती कर्णह्मणेदेमहाशक्ती कुंडलेंकाढूनिनिश्चिती निर्जरेश्वरपूजिला
८७ महाप्रळयींचीमुख्यचपळा शक्रेंशक्तीदिधलीतेवेळा न्यासमंत्रप्रेरणकळा कृपेनेंसर्वसांगत ८८
ह्मणेहीनिर्वाणसांगातिणी महाशत्रूवरप्रेरुनी ऐसेंसांगूनतेक्षणी शचीरमणगुप्तजाला ८९ कवचकुं
डलेंदेउन तोषविलेपाकशासन कर्णाचेंउदारत्वदेखुन सुरसुमनेंवर्षतीं ९० हेंजाणूनवर्तमान
हर्षेंनिर्भरपंडुनंदन कौरवपरमदीनवदन ह्मणतीकर्णेंकायकेलें ९१ इकडेपांडवाश्रमासी धावत
आलेसमस्तऋषी ह्मणतीअरणीपात्रेंठेविलीउशीं तोंमृगएकपातला ९२ अरणीपात्रेंमृगघेउन घेउं
नगेला जैसापवन ऐकतांपांचपंडुनंदन चापघेउनधावले ९३ आटोपितीजवळमृग तंवतोजातअसेसवे
वेग वकुन करितांलाग नाकळेसमीपदेखतां ९४ सवेंचमृगजालागुप्त वटवृक्षाखालींपांडवबैसत हो
उनियांचिंताक्रांत ह्मणतीकायकरावें ९५ नकुळासह्मणेयुधिष्ठिर वृक्षावरचढेसत्वर तृषाक्रांतजालों

नीर पाहेंचहूंकडेविलोकुनी १६ कोणेपंथेंगेलामृग हेंहीपाहेंसवेगें मगतोमाझीहृदयारविंदभृंग व
शिचदोनसांगत १७ ह्मणेयेदिशेसउद्यान सरोवरेंउदकेंपूर्ण तेथेंचगुप्तअसेलहरिण तोशोधूनआणा
वा १८ खालेंउतरूनतत्काळ त्वरेनेजायवीरनकुळ पात्रनसेभरावयाजवळ तूणीरघेऊनधांवेला १९
तेथेंबैसलाहोताएकराक्षस गुप्तरूपेंह्मणेनकुळास माझेप्रश्नसांगसीनिर्दोष तरीसलिलपीमाझें २००
नसांगतांप्राशिसीजीवन तरीतत्काळपावसीमरण नकुळह्मणेमाझेप्राण उदकाविणजातातो १ धर्म
राजतृषाक्रांत उदकालागींवाटपाहत तुझेप्रश्नसांगावयायेथें मीरिकामानसेकीं २ जीवनप्राशितां
माशीरुत तेवेळेजालाप्रेत उशीरलागलात्वरित सहदेवपातला ३ नकुळाऐसेंहोउन तोहीपावला
मरण मगगेलाअर्जुन त्याचीहीझालीतीचगती ४ मगपातलाभीमसेन त्याहीतेणेंपुशिलेप्रश्न तो
हीबळेंपीतांजीवन गेलाप्राणतत्काळ ५ धर्मराजआलेतेथ तोंबंधुपावलेमृत्य यक्षासधर्मपुसत
सांगत्वरितप्रश्नमाझे ६ सांगसीलमाझेप्रश्न तरीबंधुउठतीलचौघेजण अरणीपाचेंगेलोघेउन तोमीच
जाणमृगवेषें ७ धर्मह्मणेमाहापुरुषा बोलेतुझाप्रश्नकैसा येरूह्मणेसूर्यआकाशा चढेकैसासांगतो
८ कैसापावतोअस्त कोठेंराहतोआदित्य यावरीप्रत्योत्तरदेत धर्मपुत्रधर्मात्मा ९ ह्मणेब्राह्मणदेतीअर्घ्य
दान सोडितीअस्त्रमंत्रुन त्यापुण्येंदैत्यवधून रवीचढेउर्वीपंथें १० धर्मकरितांबकुत सूर्यरूखेंपावेअस्त
त्यासमाजींराहत नमनेंचसत्यआदित्य ११ श्रोत्रीसांगतोकोण धर्मदेतप्रतिवचन वेदध्ययनअग्निसे
वन रुशीळपरमश्रोत्रीतो १२ बुधिवंतअसेकोण जोकरीलविप्रसेवन ब्राह्मणासदेवत्वजाण कोणअर्थेसांग
पां १३ तपआणिसत्य ब्राह्मणासयेणेंदेवत्व संततेकोणत्वरित मजसांगेसर्वज्ञा १४ तत्वजाणूननिश्चि
त तेजाणज्ञानीमहंत पापतेकोणअद्भुत परपीडापरनिंदा १५ पुण्यतेंकायसाचार तरीकरावापरोप
कार सांगकोणताअनाचार सत्कर्मत्यागजाणिजे १६ कोणपावतासांगमोद अनृणीअप्रवासीपावेआ ६

नंद आश्चिर्यकोणसांगविशद मजलागींधर्मात्मा १७ आतांसांगेपंथकोण जेवाटेनेगेलेसंतजन वार्ता
कायसंपूर्ण सांगमजयुधिष्टिरा १८ एकमृत्युपावतीदेख उरलेतेमानितीसुख आश्चिर्यहेंनिःशंक म
जवाटतेजाणपां १९ सकळभूतांकाळविपरीत हीवार्तामुख्ययेथें गुरुसांगनिश्चित सर्वज्ञदयाळउदा
सजो २० शिष्यकोणसांगसाचार भाविकप्रज्ञावंतउदार विषतेंकोणसांगसत्वर गुरुअवज्ञाकरणें २१
कार्यकरावेंसत्वर छेदावेंसंसरणदुस्तर मोक्षतरूचेंबीजसाचार क्रियेसहशुध्यज्ञान २२ कोणशुचिष्मं
तबोलविशुद्ध अंतर्बाह्यमानसशुध्य पंडितकोणनिर्द्वंद्व सद्विवेकज्यापासीं २३ कोणजन्माआलानिश्चि
त परोपकारीसदारत इंद्रियांसीकोणमोहित पंचविषयनिर्धारें २४ मद्याहूनकायमोहिक धर्मह्मणे
स्नेहदेख अंधकोणनिःशेष विषयअस्तांमूढतो २५ शुध्यकोणसायेथें स्त्रीलोचनबाणेनहेव्यथित
गहनकोणबोलेसत्य स्त्रीचरित्रजाणपां २६ दारिद्रतेंअसेंकेवळ ज्याचीनजायेहळहळ लघुत्वाचेंका
यमूळ परयांचाखटेना २७ निद्रस्तकोणसांगहट मतिमंदअत्यंतमूढ कुटुंबकाबाडनसुटेजा २८
रुखतेंकोणसांग तरीसर्वसंगकरीत्याग बधिरकोणमाहींवीरांग हितनाइयेतशिकविता २९ मळि
नपत्रावरीउदक तैसेंकायसांगक्षणिक यौवनधनआयुष्यदेख नसेभरवसासर्वथा ३० कोणावश्य
सर्वप्राणी जोनम्रसत्यभाषणी भूषणकायत्यावेंकर्णी हरिकथादानसमयोचित ३१ कोठेंकरावा
सांगवास संतनिकटकींकाशीस चारगोष्टीअतिसुरस कोणत्यासांगशेवटीं ३२ मधुरबोलोनकरी
दान गर्वरहितनिशीमदान क्षमायुक्तशूरत्वपूर्ण भाग्यआणीउदारत्व ३३ याचारगोष्टीदुर्लभतत्वतां
राक्षसह्मणेपंडुसुता कोणताबंधुआतां उठउंसांगप्रथमची ३४ धर्मह्मणेतूंदयाळ आधींउठवीमाझा
नकुळ सक्षसह्मणेपुण्यशीळ सत्यहोसीधर्मात्मा ३५ मगएकदांचचौघेजण बंधुबैसविलेउठउन
मगधर्मकरजोडुन तूंकोणदर्शनदेईं ३६ मगह्मणेमीतुझापिता यमधर्मआहेतत्वता तुझेंसत्वपहा

वेंआतां मृगवेषेंमीचआलों ३७ मगयमदेतदर्शन पांचैजणवंदितीचरण अरणीपात्रेंआणुन प्रीती
करुनदीधलीं ३८ तुह्मीकरितांअज्ञातवास कोणीनोळखेतुह्मास विराटनगरींक्रमावे एकवर्ष पुढेंराज्या
सपावाल ३९ ऐसेंसांगोनसूर्यनंदन तत्काळपावलेअंतर्धान पांडवआश्रमीयेउन देतद्विजाअरणीपात्रें
४० याउपरीपंडुसुत ऋषीप्रतीआज्ञापुसत अज्ञातवासत्वरित यावरीप्राप्तजाला ४१ येथूनसंवत्सरपर्यं
त व्हावेंलागेलआह्मासगुप्त कंठधर्माचादाटत शत्रूनिवटह्मणूनियां ४२ ऋषीसप्रेमहोउन धर्मासदेतआ
शिर्वचन लोकरप्राप्तराज्यासन तुजलागींजाणपां ४३ समस्तांचीआज्ञाघेउन तीभूमिकासोडूनिजा
ण एककोशपुढेंजाउन पांडवउतरले ४४ तेथेंबैसूनविचार करितीपंडुकुमर तेब्रंह्मानंदेरुक्मि
णीवर श्रीधरमुखेंवदेल ४५ अरण्यपर्वसंपलेंयेथें पुढेंविराटपर्वगोडबहुतें तेंश्रवणकरितांसमस्त पा
पतापदहनहोती ४६ जांचाऐकतांवनवास आपणासुखहोयविशेष संकटनिरसेनिःशेष त्यांचीकरु
णाऐकतां ४७ यापर्वींचेअध्यायसंस्कृत संख्याबोलिलेसत्यवतीसुत दोनशेंअध्यायसुरसबहुत एकु
नहात्तरबरवे ४८ एकादशसहस्र चौसष्टी इतुकीश्लोकांचीमूळगांठी सारांशकथागोष्टी पंडुसंगेंवद
विली ४९ नवआध्यायातसंपूर्ण वनपर्वजालेंनिर्वाण तेवीसाव्याअध्यायापासुन एकतीसपर्यंतजा
णिजे ५० येथुनचारअध्यायअपूर्व पुढेंपरिसाविराटपर्व महासंकटहरेसर्व श्रवणमात्रकरितांची ५१
ब्रंह्मानंदारुक्मिणीवरा श्रीधरहृदयकल्हारभ्रमरा तववरदेंजगदोध्दारा ग्रंथपुढेंचालीकां ५२ सु
रसपांडवप्रतापग्रंथ अरण्यपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ एकतिसाव्यांतकथियेला
५३ इतिश्रीपांडवप्रतापग्रंथ अरण्यपर्वटीकाश्रीधरकृत कर्णकवचकुंडलेंहरवित यक्षप्रश्नसंपविले ५४
इतिश्रीपांडवप्रतापअरण्यपर्वएकत्रिंशत्यध्यायसमाप्तः शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥ ॥

श्रीगणेशायनमः जगद्गुरू आदिपुरुष आदिमायेचा भ्रतेश ब्रह्माविष्णूमहेश बाळकेंपोटीं निर्मिलीं
१ सात्विकराजसतामस सृष्टीरचनाकरविली विशेष चवऱ्यैंशीलक्षयोनी बहुवस जीवभोगिती निज
कर्मे २ पडिलाअज्ञानअंधकार बहुत नदिसे कांहींवस्तुजात अडखळोनि क्षणक्षणापडत गर्भवर्तकु
जीवहे ३ कामक्रोधमदमत्सर हे थोर हिंडती तस्कर पुण्यधनसर्वत्र हिरोननेती क्षणार्धे ४ ऐसानिबिडत
मजाणोन तोसत्यवतीहृदयरत्न उगवला सूर्यनारायण वेदव्यासमहाराज ५ निगमकमळार्कजालाविशेष
त्राणीवर्तलेसत्कर्मास सत्क्रियाराहाटी निर्दोष आचरोनीयशपावती ६ कृपाळूतोवेदव्यास तारावयाजड
जीवास भारत निर्मिलें समरस कींपंचमवेदसुरसहा ७ व्यासशिष्यवेशंपायेन जैसादेवगुरूपरमनिपु
ण विराटपर्वदिव्यनिरोपण जन्मेजयाप्रतीसांगे ८ मागेंसंपलेंअरण्यपर्व जेथिंचारचनासुरस अपूर्व त
थूनिविराटपर्वसर्व यशदायक परिसीजे ९ जन्मेजयह्मणेवैशंपायना चातुर्यसिंधूगुणसंपन्ना विराटनग
रींपंडुनंदना वासजाहलाकोणेंपरी १० दुर्योधनदुर्जनबहुवस कैसाकेला अज्ञातवास द्रौपदीसती निर्दोष
गुप्त कैसीराहिली ११ वैशंपायनह्मणेंनृपती तुझापिता परिक्षिती याचापितामह निश्चिती पंडुपुत्रमहारा-
ज १२ अरण्यपर्वसंपलेंविशेष कथातेथें कथिली सुरस यमेंधरूनिमृग वेष अरणीपात्रेंपळविलीं १३ =
पुढेंवटवृक्षींराहून पांडवांसजाहलाप्रसन्न अरणीपात्रेंदेउन वरदानदिधलें १४ तयावरी पांचहीजण आ
श्रमा आले पंडुनंदन जाहलेजेवर्तमान सकळब्राह्मणांनिवेदिलें १५ अजातशत्रूधर्मनृपती बोलताझाला
बंधूप्रती अरण्यवाससतूसंगती द्वादशवर्षेंजाहलीं १६ आतांअज्ञातवासपूर्ण त्रयोदशवर्षपरमकठिण ना
मरूपपालटुन कोठेंक्रमावें सांगपां १७ बहुतदेशनिगुडस्थानें गुप्तविवरेंरमणीयवनें कींपांचाळविराटादिस
दनें गुप्तरूपेंसेवावीं १८ मगह्मणेवीरपार्थ देशराजेआहेतबहुत परिअज्ञातवासाप्रस्तुत विराटगृहाजाई
जे १९ नामेंरूपेंपालटुन परगृहींराहणेंकठिन धर्मात्मातूंधर्मपरायण कोणेंरीतीराहसी २० धर्मह्मणेंपार्था

ऐक मीआत्मनामठेवीनकंक अक्षकर्मींनिपुणदेख सभासतहोईनमी २१ द्यूतकर्मींपरमनिपुण दंतपाश
करींधरुन स्वगुणेंविराटमोहिन नानायुक्तीखेळोनियां २२ याबरीभीमबोलेअपूर्व मीह्मणवीनतेथेंबल्लव
सूपशास्त्रींप्रवीणसर्व षड्रसान्नेंनिर्मीनमी २३ चतुर्विधअन्नेंनिर्मीन जाचेंसुवासेंसंपूर्ण लाळघोटितीदे
वगण वसंतभुलोनजातसे २४ गजवृषभमल्लदारुण याशींबळेंझोंबीघेउन विराटाप्रतीसंतोषविन स्व
गुणेंधर्मराया २५ यावरीबोलेपार्थवीर शक्रगृहींहोतोंपांचसंवत्सर तेथेंउर्वशीपरमचतुर भोगकामापात
ली २६ तीसभोगनेंदीह्मणउन वदिलीतेंशापवचन एकसंवत्सरसंपूर्ण नपुंसकत्वपावसी २७ तरीमीबृहन्न-
डानामधरुन अंतःपुरामाजीराहिन स्त्रीवेषअवलंबुन मोहीनजाणसुधेष्णा २८ नृत्यगीतभेदशिकउन स
कळस्त्रियाकरीनप्रविण आपुलेंस्वरूपनामखुण अणुमात्रनकथिमी २९ यावरीनकुळबोलेकौतुक नाम
सांगेनग्रंथिक अश्वपरिक्षाशिक्षाअनेक करूनिनृपतोपवीनमी ३० अश्वव्यथाअंतरलक्षणें सर्वचातु
र्यमीजाणें सहदेवयावरीह्मणें तंतीपाळनाममाझें ३१ गाईवृषभह्मैशी याचीपरिक्षामीजाणेंकैसी वर्षतीजाणें
दुग्धरासी मजपासींविद्याअसे ३२ द्रौपदीह्मणेमीपुरंध्री नामसांगेनसैरंध्री सुधेष्णेपासींअहोरात्री सेवाक
रीनआदरें ३३ धर्मह्मणेमीतेथें ह्मणवीनपांडवांचासभासत कौंतेयजाहलेगुप्त ह्मणोनिआलोंतुजपासीं ३४
मगबोलेभीमसेन धर्मांचारसोयपाकीह्मणवीन अर्जुनह्मणेंस्त्रीवेषधरुन सखीह्मणवीनद्रौपदीची ३५ न
कुळह्मणेंतेवेळा धर्मरायाचाअश्वशाळा त्यावरहोतोंमीनृपाळा आलोंअसेंतुजपासीं ३६ सहदेवह्मणेंजा
ण विराटाशींबोलेनवचन मीपांडवखिल्लारीसंपूर्ण सेवाकरीनतुजपासीं ३७ द्रौपदीह्मणेंसुधेष्णेसीं मी
द्रौपदीचीदासी गुप्तजाहलेपांडववनवासी जाहलीगतीऐसीआह्मां ३८ ऐसाकरूनिविचार धौम्यासः
ह्मणेंयुधिष्ठिर अरणीपात्रेंअग्निहोत्र घेउनिजावेंतुह्मीआतां ३९ पांचाळपुराजाउन रहावेंअग्निशुश्रुषा
करुन द्वारकेसइंद्रसेन रथआसुचेनेईल ४० सर्वहीबोलावचन पांडवगेलेअह्मांटाकुन कोणेंरुळींरा-

हिलेजाउन हेंनकळेंसर्वथा ४१ यावरी महाराज धौम्य धर्मासिबोलेसप्रेम नित्यप्रवासकष्टपरम त्याहोनः
श्रमपरगृहीं ४२ राजगृहींगह्रणेंकठिन बहुतनकरावेंसंघट्टन जैसीअग्निसेवाडुरुन याचककरितीसप्रेमें
४३ पांचजणमिळुन द्रौपदीसकराजतन समयोचितबोलावचन जेणेंसमाधानरायाचें ४४ वेदाचें अंतर पद्म
नांसन्यूक कुटनी जैसेंशास्त्राचेंतर्क तेवीरायाचेंचित्तपाहोनिदेख कार्यभागकरावा ४५ नबैसावेंगधासंमु
ख पाठीनबैसावेंदेख बहुतसमीपनिःशंक नयेसावेंसंघट्टनी ४६ बहुतदूरजाउनी नबैसावेंराजा गमनीं क्षे
पक्षणानलागावेंकानीं मंत्रीमनीविटनील ४७ वामअथवासव्यपाहुनी अंतरबैसावेंजाउनी राजावश्यस्म
णउनी भलतीगोष्टनसांगावी ४८ नृपसर्पक्रुशान तेमित्रस्मणोनयेजाण गवजाहलाजरीप्रसन्न तेंसुखहीन
मानावें ४९ रायेंदिधलीवस्त्रें भूपणें तींचरायादेखतालेणें आणिकाचीनसिरवणें स्तुतीनकरणेंइतरांची ५०
तांबूलचर्वणबहुभाषण क्षणक्षणानथुकावेंउठोन मर्यादेनेंबैसावेंआटोपुन वीरासनघालावें ५१ बहुत
नघ्यावाआहार वायूआकर्षावासमग्र राजगृहींनिरंतर कदांवासनकरावा ५२ राज पर्यंकराजा सन गज
तुरंगसुखासन तेथेंनकरावेंआरोहण मर्यादापूर्णधरावी ५३ अंतःपुरींयेकांतीं बैसलेअसतांनृपती आ
पणप्रियकरनिश्चिती स्मणोनतथेंनरिघावें ५४ राजस्त्रियेसीमैत्री कदांनकरावीचतुरी स्त्रियांचेंएकांतः
विचारी सर्वथाहीनबैसावें ५५ मीविद्यावंतसुर नबोलावेंवारंवार प्रत्युत्तरदेउनन्याहार राजवस्तूनपहावी
५६ बहुभाषणबहुहास्य कदांनकरावेंविशेष ग्रामनिंदापरदोष राजश्रवणींनघालावें ५७ रायवस्त्रेंभूषणलें
त तींआपणनलेवावींनिश्चित राजाअसेंव्यथाभूत आपणऔषधनघावें ५८ रायासमोरकरितीस्तुती
इतरस्थळींनिंदावदती तेतत्काळफळेंनृपती ते पावतीअपमान ५९ एवंसर्वार्थसुजाण पांडवतुह्मीपांचही
निपुण अज्ञातवासकरुन मगसर्वेंचप्रकटावें ६० हेंधौम्यबोलेसत्वरा तेगेलेपांचाळनगरा इंद्रसेनघेउन
त्वरा द्वारकेप्रतीपावला ६१ आश्रमीहोतेसमस्त ब्राह्मणांवाटतीपंडुसुत रात्रींविप्रजाहलेनिद्रस्थ साहाही २

जातीलेवेळां ६२ निघोनजातीपंचप्राण कदानव्हतीदृश्यमान तैसेपांडवनिघालेतेथून कोणासहीनकळतां ६३
धनुष्यघेउनमहामती तूणीरपृष्ठीसींआकर्पिती गोधांगुळेंघालितीहस्तीं अंगत्राणेंबांधली ६४ कालिंदीवो-
लांडुनीत्वरें निघतेजालेदक्षणतीरें आडवाटेगिरिकंदरें वोलांडितीरात्रींत ६५ चरणचालीत्वरेंजाती आपुलें
राष्ट्रचुकविती पांचाळदेशनिश्चिती वामहस्तेंटाकिला ६६ दशार्णवदेशटाकुन सुरसेनदेशचुकउन दक्षणदिशे
पाहोन अपारमार्गक्रमियेला ६७ दिसतीपांचहीविवर्ण रूपेंगेलींपालटुन जैसेशशिचंद्रकीर्ण अभ्रपडलेंझां
कलें ६८ चिखलमाखलाअनर्घ्यरत्नोंकिंमराळघोळलेधुळीनीतेवींतेसाहाहीनिघोनीजातीत्वरेंनेंनिरंजन ६९
जिचास्वरूपावरुनी सुरललनाटाकिजेवोवाळुनी तेद्रुपदराजनंदिनी चरणचालींश्रमलीहो ७० स्मणेपाईतु=
ह्मींसकुमार चरणींचालतांश्रमलोंफार माझेननचालवेपदपात्र प्राणसंकटजाहलें ७१ शुंडादंडेंकरुन कम
कउचलीवारण तैसेंद्रौपदीसस्कंदींघेउन सव्यसाचीचालिले ७२ विराटनगराजवळी पांडवआलेतेवेळीं वि
शाळशमीवृक्षातळीं स्थीरावलेनावेक ७३ शमीसकरुनिप्रदक्षणा करितेजालेतिचेंस्तवना तुजवंदूनिर
घुनंदन गेलारावणवधावया ७४ स्मणतीशस्त्रेंघेउनिकरीं कैसेंप्रवेशावेंनगरीं लोकतर्कपरोपरी देशांत
राजाईल ७५ गांडीवचापविशाळ कल्पांतविजेहोनतेजाळ कींउगवलेंसूर्यमंडळ तैसीप्रभातयाची ७६ मग
पांचचापेंपांचतूणीर तृणपर्णेंगुंडुनिसत्वर शमीवरनकुळवीर ठेवीदृढआकर्षुनी ७७ वर्षतांफारघन न
भिजेअणुप्रमाण त्याभोंवतेंस्मशान भयंकरपाहाहो ७८ पडिलेंहोतेंस्त्रियेचेंप्रेत पांडववृक्षासींबांधीत
तेंभयानकदिसत नयेतेथेंअन्यकोणी ७९ तोंउगवला प्रभाकर गोरक्षकविलोकितीदूर रक्षणारगाईचेभा
र कौतुकपाहतीदुरुनी ८० पांडवचालिलेतेथुन पुसतीगोरक्षकत्यालागुन प्रेतकांबांधलेनेउन भीमवचन
बोलत ८१ आमुचाकुळधर्मदुर्धर वृक्षीबांधावेंकलेवर तेथेंकोणीजातांसत्वर जळोनमरेलक्षणार्धें ८२ अ
सोपांडवचालिलेतेथून वोळखावीअंतरखुण नामेंठेविलीपालटुन नूतनचीदुसरी ८३ जयजयंतविजय

जयत्सेन जय द्वळपाहे मालिनीहेंनाम निश्चयें द्रौपदी सठेविलें ८४ नगरांत प्रवेशले पंडुनंदन तोंदेखिलें
दुर्गास्थान धर्मराजकरीस्तवन जगदंबेचें तेधवां ८५ जयजय दुर्गे भुवनेश्वरी यशोदागर्भसंभवकुमारी
इंदिरारमणसहोदरी नारायणी चंडिकांबिके ८६ जयजय जगदंब विश्वकुटुंबिणी मूळस्फूर्ती प्रणवरूपि-
णी ब्रह्मानंदपददायिनी चिद्विलासिनी अंबिके ८७ जयजय धराधरकुमरी सौभाग्यगंगे त्रिपुरसुंदरी हेरं
बजननी अंतरी प्रवेशें तूं आमुचा ८८ भक्तहृदयारविंदभ्रमरी तुझे कृपाबळें निर्धारी अति मूढ निगमार्थ-
विवरी काव्यरचना करी अद्भुत ८९ तुझी येंकृपा अवलोकनें गर्भांधासी येतील नयन पांगुळ करील गमन
दूर पंथें जाउनी ९० जन्मादारभ्य जो मुका होय वाचस्पतीसाम्य बोलका तूं स्वानंदसरोवरमराळिका होसी भा
विकां प्रसन्न ९१ आत्मानंदें आदिजननी तवकृपेची नौका करुनी दुस्तर भवसिंधू उल्लंघुनी निवृत्तीतटा जा-
ईजे ९२ जयजय आदिकुमारिके जयजय मूळपीठनायके सकळसौभाग्यदायके जगदंबिके मूळप्रकृती ९३
जयजय भार्गवप्रियभवानी भयनाशके भक्तवरदायनी सुभद्राकारके हिमनगनंदिनी त्रिपुरसुंदरी महामा-
ये ९४ जयजय आनंदकासारमराळिके पद्मनयन दुरितवनपावके त्रिविधतापभवमोचके सर्वव्यापके मृडा-
नी ९५ शिवमानसकनकलतिके जयचातुर्यचंपककळिके शुंभनिशुंभदैत्यांतके निजजनपाळके अपर्णे ९६
तवमुखकमळशोभा देखोनी विबुधबिंब गेलें विरोनी ब्रह्मादिदेव बाळें तान्हीं स्वानंदसदनीं निजविसी ९७ जीव
शिव दोन्ही बाळकें अंबे त्वां निर्मिलीं सकौतुकें स्वरूप तुझें जीव नोळखे ह्मणोनि पडला आवर्ती ९८ शिवस्मरणी
सावधचित्त ह्मणोनि तें नित्यमुक्त स्वानंदपद हातायेत तुझे कृपेनी जननीये ९९ मेळउन पंचभूतांचा मेळ त्वां
रचिला ब्रह्मांडगोळ इच्छापरतां तात्काळ तूं निर्मूळ करिसी हो १०० अनंत बाळ आदित्यश्रेणी त्वत्प्रभेमाजी
गेल्या लपोनी सकळसौभाग्यशुभकल्याणी रमारमणवरप्रदे १ षड्रिपुहारकवल्लभे त्रैलोक्यनगरारंभस्तं
भे आदिमाये आत्मप्रभे सकळारंभे मूळप्रकृती २ जयकरुणामृतसरिते भक्तपाळके गुणभरिते आनंदब्र- ३

ह्मांड फळांकिते आदिमाते अन्नपूर्णे ३ सच्चिदानंद प्रणवरूपिणी चराचर सकळव्यापिनी स्वर्गस्थित्यंतका
रिणी भयमोचनी ब्रह्मानंदे ४ ऐकून धर्माचें स्तवन दुर्गा जाहली प्रसन्न ह्मणे तुमचे शत्रुसंहारिन राज्यीं स्थापीन ध
र्मातें ५ तुह्मीं वास करा येथें प्रकटों नेदीं जनांत शत्रुक्षय पावती समस्त सुख अद्भुत तुह्मा होय ६ त्यां जे स्तोत्र के
लें पूर्ण जे त्रिकाळ करिती पठण त्यांचे सर्वकाम पुरवीन सदा रक्षीन अंतर बाह्य ७ त्यावरून युधिष्ठिर येकला
विराटसभे प्रती चालिला वस्त्रांत गुंडाळून तेवेळां अक्ष घेतले कक्षेसी ८ अक्षवेडे येतें जाळ वरी लोहित सुवर्णसु
ढाळ कुरुवंशराज नृपाळ विप्रवेषें चालिला ९ विराटें देखिलें दुरून जेवि मूर्तिमंत चंडकिर्ण सीतळ जैसा रोहि
णीरमण कीं गाचिवर उतरला १० सकळ पृथ्वीचे करभार घेणार वाटे राजेश्वर तंव येऊन सभे समोर आशिर्वाद
देत रायातें ११ विराट बोले स्वच्छवचन भस्में आच्छादिला हुताशन तैसा विप्रवेष घेउन केवीं येथें आलासी १२
धर्म ह्मणे आह्मीं ब्राह्मण स्वेच्छा करूं पृथ्वीभ्रमण अक्षय ज्ञानी निपुण सभासत धर्माचा १३ पांडवीं केला वनी
वास नेणों कोठें जाहले अदृश्य गावनाहीं आह्मास ह्मणोनि आलों तुजपासी १४ माझें नाव कंक जाण पीडलों
दरिद्रें करून धर्में आमचें पालन केलें बहुत राजेंद्रा १५ विराट ह्मणे मी त्वांतें प्रसन्न सर्व राज्य तुज आधीन त्वं सां
गसी तें ऐकेन मज लागी माग कांहीं १६ धर्म ह्मणे तें अवसरी खेळतां मज आली हारी केलें पणाचें द्रव्य निर्धारी
मज पासीं न मागावें १७ म्या जिंकिलें स्वभावें तरी पणाचें द्रव्य घ्यावें विराट ह्मणे अवश्य घ्यावें मा कां दिधलीं ते
सींच १८ राव ह्मणे कंका प्रती जे तुझे आज्ञेत न वर्तती त्यांस दंड करीन निश्चिती सत्यवचन जाण हें १९ तुझे आ
ज्ञेत न वर्तती जे ब्राह्मण त्यांस बाहेर घालीन उरले क्षेत्री वैश्य जाण जरी तुझें वचन मोडिती १२० तत्काळ त्यास
वधुन तुझें स्वरूप मजसमान मग वस्त्रें भूषणें देउन रायें जवळी बैसविला २१ यावरी दुर्गेस नमुन भीम चालिला
स्वरूप पालटोन विराटें दुरून देखोन तटस्थ जाला पाहतां २२ दिसे पुरुषार्थी बळवंत भुजा वळें लोंवील पर्वत
सिंह शार्दूळ धरून जीत येकें दावणी बांधिल २३ अजानबाहू अति विशाळ वृषभाक्ष आरक्त तेजाळ हाके ग-

जवीब्रह्मांड गोळ तैसासबळ दिसत २४ भी महनुमंत रेवतीरमण नैसादिसेबळसंपन्न पृथ्वीचारायांआक
र्षण क्षणमात्रेंकरील २५ वपींदर्विपाक हातीं धरिले सुरेख कृष्णवासवेष्टीत देख येतांसन्मुखदेखिला २६
शेवकांसांगेनृपवर कोणकोठील ध्यासमाचार दूतधांवतीसत्वर पुसतीवृत्तांततयांसी २७ तोह्मणेमीसूपशा-
स्त्रींनिपुण बल्लवमाझेंनामाभिधान शेवकसांगतीयेउन तोंसमीपपातला २८ रावपुसेत्यालागुन दिससीजे
वींविधूमअग्न उर्वीचेराज्यसंपूर्ण भोगावयायोग्यदिससी २९ तोंबोलेवृकोदर मीधर्मरायाचाकिंकर स्वय
पाकीपरमचतुर शाखाउत्तमकरूंजाणे १३० माझाहस्तीचेभोजन राजाधर्मकरीजाण पांडवीसेविलेंकानन
आलोंशरणतुजलागीं ३१ आणीकरेकनृपती सिंहशार्दूळमतहस्ती महामल्लभद्रजाती त्यासीझोंबीघेई
न ३२ जोकोणासअनिवार त्यासीक्षणांतकरीनजर्जर संतोषोननृपवर वस्त्राभरणेंगौरवी ३३ स्वयंपाकी-
जेसर्व त्यांतश्रेष्ठकेलाबल्लव यावरीवेषपालटुन अपूर्व सैरंध्रीवेगेंपातली ३४ जीसकळस्त्रियांचीस्वामिनि-
णी नीलपयोधरतनुचीभगिनी तीकेंशमोकळेकरुन सव्यहस्तेंआवरित ३५ येकवस्त्रनेसलीमळीन चा-
ललीराजगृहालागुन धांवतीनगरजन स्वरूपतिचेंपहावया ३६ सभोंवतेचारीकोश फांकेअंगसुवास
इंद्रनीळकुंकळप्रभेस उणेंआणीनिजवर्णें ३७ जीचेंवदनपाहतांसुंदर नृत्यकरीपुढेंपंचशर तीनेसलीम-
ळीनवस्त्र सैरंध्रीवेषधरियेला ३८ जेथेंसुधेष्णापट्टराणी तिकडेजातयाज्ञसेनी मागेंधांवतीजनश्रेणी ध
णीनपुरेपहातां ३९ गोपुरावरराजपत्नी भद्रद्वारेंपाहेनयनीं तोंहातीधरूनिफणी लावण्यखाणीयेतसे १४०
पुढेंदासीपाठउन जवळीआणिलीबोलाउन सकळपृथ्वीचीस्वामिण तीसकोणह्मणउनपुसे ४१ तीह्मणे-
मीसैरंध्री पांडवांचीपुरंध्री द्रुपदराजकुमरी तिचीसखीजवळीलमी ४२ कमलोद्भवतातपरमात्मा त्याची
ललनासत्यभामा तिचास्नेहबहुतआह्मा वरहोताजाणहें ४३ तीसमीवारंवार देतअसेंश्रृंगार तेदेखोनया
दवेंद्र तीसबहुप्रीतीकरी ४४ सुमनाचेअलंकार पुष्पवस्त्रेंसकुमार चंदनलेवउंजाणेंविचार अंजनप्र-

कारनेत्रींचा ४५ मजमागूनिसत्यभामेसी पांचाळीठेवीआपणापासीं तीसश्रृंगार अहर्निशी तेथेंविवशीआ
ली ४६ द्यूतहारउनपण पांडवींसेविलेंकानन यासंवत्सरांतगुप्तहोउन कोठेंगेलेकळेना ४७ मीहोउनिअना
थ तुझेपायापासीआलेंत्वरित मगसुधेष्णाबोलत एव्हढेंस्वरूपअद्भुततुझें ४८ मजवाटेमानसीं देवांग-
नातुझादासी समुद्रवलयांकितपृथ्वीची स्वामिणमजवाटतसे ४९ तूंबोलतांवदनीं द्विजझळकतीमहा
मणी तुजमीठेवितेंसदनीं परिमनीभीतसें ५० विराटजाईलभुलोन तूंघालसीत्याजवरमन मगम्याद्या
वाप्राण नचलेअन्यउपाय ५१ याविषयींदेशीलभाष्य तुजपाळीनअवश्य सैरंध्रीह्मणेपरिस वृत्तांतमाझा
तूंमाये ५२ पांचगंधर्वमाझेपती तेअंतरिक्षविचरती मजकोणीअभिलाषीपापमती त्यासीमारितीक्षणार्धें
५३ मजपाहेजोविषम तोतत्काळहोईलभस्म दीपकलिकेप्रतिक्षेम पतंगदेउंशकेना ५४ मीगेलियाप्राण
नकरीकोणाचेंचरणक्षालन अंगमर्दनउच्छिष्टभोजन सर्वथाहीघडेना ५५ सहवासेंबहुत कळेलमाझावृ
त्तांत पंचगंधर्वसमस्त राहतीमाझेअंतरिक्ष ५६ गंधर्वपांचवेगळेकरून पुरुषमजपित्यासमान तरुण
तेबंधूसमान बाळकेंजाणधाकटे ५७ सुधेष्णाह्मणेयावरी अवश्यराहीमाझेघरी इकडेदेवीनमुनझडक
री वेषपालटीअर्जुन ५८ षंढपणअवलंबुनी स्त्रीवेषधरीतेक्षणीं केशआकर्षुनवेणी लघुकर्णींकुंडलें ५९
अकस्मातसभेसमोर देखेंविराटनृपवर ह्मणेस्त्रीवेषधरूनइंद्र वाटेमजउतरला १६० रमावरउमावर स्त्री
वेषधरिलासुंदर सन्मुखदेखेनृपवर विचारिततयातें ६१ नावकाय,तूंकोण सांगेसर्ववर्तमान श्रीकृष्ण
सखातोकृष्ण ह्मणेनामबृहन्नटा ६२ धर्मरायाचेघरीं मीहोतोंअंतःपुरीं नृत्यगायनकळाकुसरी शिकवी
नारीसर्वही ६३ पांडवगुप्तजालेवनांतरी राहोंइच्छीतुझेघरी विराटह्मणेउत्तराकुमरी आणिकनारीआसती
६४ गायननृत्यकळाकुसरी शिकवीराहेअंतःपुरी गौरऊनतेअवसरी निजमंदिरीठेविले ६५ सहदेवदेवीस
नमुन निघेवेषपालटुन विराटेंसन्मुखदेखोन तन्मयहोउनपुसत ६६ जैसेंसुधापानेंनिर्जर तैसेंतुझेंस्वरू-

पसुंदर नामसांगेपवित्र होतासकोठेंआजवरी ६७ तोबोलेतेअवसरी मीधर्माचाखिलारी गोवृषभपरिक्षाक
री नामतरीतंतिपाळ ६८ दुग्धेंस्रवती गाईह्मेसी हीविद्यामजपासी शिक्षालावीनवृषभासी रथालागींजुंपा
वया ६९ खडाणागाईदुभवीन वांझसवत्संकरवीन अंतरव्यथाओषधपूर्ण सर्वजाणेंपशूचें १७० पूर्वसमु
द्रापासूनथोर मर्यादापश्चिमसागर एव्हढेंथोरखिल्लार धर्मात्मयाधर्माचें ७१ द्यूतेंहारविलापण कौरवीं घेत
लें हिरोन गुप्तजालेपंडुनंदन आलोंह्मणोनतुजपासीं ७२ मगवेतनकरूनपुष्कळ खिलारीठेविलातंतिपाळ
मगवेषपालटुननकुळ देवीनमुननिघे ७३ विराटसभेसमोरयेत अश्वशाळाविलोकित तोदेखताअक
स्मात ह्मणेहायेथेंकोण ७४ त्यासपाचारीराव पुसताजालानांव ह्मणेत्वंनव्हेसमानव प्रत्यक्षदेवभाससी
७५ ह्मणेरायापरियेसी होतोंधर्मअश्वशाळेसी ग्रंथिकनामनिश्चयेसी जाणरायासुजाणा ७६ घोडातोश्याम
कर्ण पुच्छपिवळेंअंगशुभ्रवर्ण प्रवाळमण्यासमान चारीखुरजयाचे ७७ आरक्तरेखानयन श्यामवर्णशा
मकर्ण दांडीअयाळजैसेंसुवर्ण गतीजाचीतिहिंलोकीं ७८ क्षीरसागरींहोनीनिघालें कींचंद्रकीर्णेघडिलें सू
र्यलोकींचेउतरले धुतलेजान्हवींत ७९ शुध्यरजताचेढवळ कींनवनीताचागोळ हेश्यामकर्णबहुसाल पा
ळिलेत्याधर्माचे १८० सप्तद्वीपीचेतुरंगभले नवखंडीचेतेजागळे छपन्नदेशीचेवेगळे लक्षणेंमींसर्वजा[illegible]
८१ बाहात्तरखोडीतत्वतां जाणेंतुरंगाचासर्वव्यथा ओषधप्रकारनृपनाथा सर्वठावकेंमजलागीं ८२ संतो
षोननृपनाथ वेतनकेलेंबहुत अश्वशाळेंठेवित ग्रंथिकपरमकुशळ ८३ पणाचेंद्रव्यफार कंकाग्रदेतनृप[illegible]
र चोंघांवंधूंतेंयुधिष्ठिर वांटूनदेतगुप्तरूपें ८४ भक्ष्यभोज्यषड्रसान्नें भीमदेतचौघांकारणें अंतरींवर्तती [illegible]
पणें बाहेरवोळखनदेती ८५ ऐसेलोटलेचारिमास विराटघरींसंतोष एकदांमल्लबहुवस देशोदेशीचेपात
ले ८६ त्यांतमुख्यजीमूतिमल्ल तेणेंझोंबीघेउनिसकळ सहस्त्रएकसबळ मल्लजिंकीविराटसभे ८७ जीमूतें
मर्दिलेसकळमल्ला रायेंबल्लवबोलाविला क्षणनलगतांआला हांकेंभरलामंडप ८८ देखोनजीमूतिवारण

बल्लवधांवेपंचानन हस्तेंहस्तधरून झडतीघेतीपरस्परें ८९ वर्मकळादडपितीसबळ हांकेंगाजविलीब्र
ह्मांडगोळ चारीघटिकातुंबळ मल्लयुध्यजाहलें १९० भीमेंजीमूतिचरणोंधरिला शतवेळभोंवडिला आपटु
नीमारिला प्राणमुकलातत्काळ ९१ संतोषोनिविराटराव बल्लवासदेतबहुतगौरव स्त्रियाविलोकितीसर्व बळ
अद्भुततयाचें ९२ सिंहव्याघ्रभद्रजाती आणूनिबल्लवासभिडविती त्यासआपटूनिक्षिती मारूनिटाकीक्षण
मात्रें ९३ यावरिएकांतींरावबेसत नारीचेंनृत्यगायनसमस्त बृहन्नटाकौशल्य दावित विद्याकैसीशिकवि
लीतें ९४ लास्यआणितांडव दावितीनृत्याचेभाव भावगायनऐकतांअपूर्व शक्रतटस्थहोयपैं ९५ रागउपराग
भार्यासहित मूर्छनाग्रामरकंपित जेंगायनऐकतांतटस्थ शेषआणित्रिभृंग ९६ रावऐकतांतोषला[illegible]
बृहन्नटागौरविलीअपार वस्त्रेंआणिअलंकार अमोलिकदिधलें ९७ अश्वआणूनिसमस्त ग्रंथिकपरि
क्षादावित पाहतांतुरंगमाचेंनृत्य लोकतटस्थजाहले ९८ पवनसांडूनिमागें तुरंगपळवीवेगें चक्राकार-
वामसव्यमागें फेरितांदृष्टीठरेना ९९ संतोषोनीभूपाळक गौरविलाग्रंथिक खिलारिचेंकौतुक तंतिपाळेंदा
विलें २०० ह्मैसेवृषभसमस्त रायापुढेंझुंजवित वस्त्रेंभूषणेंबहुत रावदेततंतिपाळा १ पांचाळीनेंदेखूनसम
स्त मनांतखेदवाटेबहुत हाहाकर्मकेसेंपंडुसुत सेवाकरितीपरघरीं २ पृथ्वीचेराजेशरण पुढेंउभेकरजोडुन
येथेंसेवकहोउन नीचकर्मआरंभिलें ३ ऐसेंक्रमितांपांडवांस पूर्णजालेदाहामास द्रौपदीनिशीदिवस सु
धेष्णेतेंशृंगारी ४ सुधेष्णेचाबंधूकीचक माहाचांडाळहिंसक तोसेनापतीदेख विराटेंकरूनठेविला ५ सु
धेष्णेच्यागृहांत कीचकआलाअकस्मात पांचाळीसीपाहूनकाममोहित भगिनीतेंविचारी ६ कोणहेसुंदरनारी
मजवाटेंभ्रमदेतईश्वरी लक्ष्मीकिंवागौरी कींशारदेचीउपमाजे ७ सुधेष्णेसह्मणेतेक्षणी हेकरींमाझीरा
णी इचास्वरूपावरूनी वोवाळीनप्राणहे ८ सेवेयोग्यसुंदरी तेंनव्हेनिर्धारी पांचाळराजकुमरी गेलीझडक
रीस्वस्थाना ९ मगद्रौपदीचेमंदिरांत किंचकयेऊनिबोलत हेवैभवतुझेंसमस्त मीदासहोईनतुझा १० तु

इंदिरेचीप्रतिमा रंभाउर्वशीतिलोत्तमा तुझ्झादासी आह्मां असेंवाटे अंतरीं ११ कामानळें तापलों थोर तव स
मागमें सुरतसागर मेघवर्षे शिरिंधार मीसीतळ होईन १२ मृगांकवदनें कुरंगनेत्रीं तुजन विसंबे अहोरात्रीं
सकळस्त्रियानिर्धारी तुझ्झादासी ह्मणवीन १३ माझ्झास्त्रिया तुझ्झादासी करीन जाण लावण्यरासी जिंकून स
कळरायासी पुढें उभे करिन १४ तूं सौंदर्यजाळें पसरुन माझें मानस धरिला मीन तुझें मुखकमळीं माझें मन
मिलिंद होऊनि गुंजत १५ तूं चातुर्यसरोवर मराळिका कीं लावण्य चंपक कळिका सकळकामिनीची नायक
अभय देई मज लागीं १६ यावरी पंडुराजस्नुषा तीक्ष्ण गोष्टी बोले कैशा स्वस्छकरूनि मानसा पंडितीश्रवणक
रावें १७ पांडवप्रतापग्रंथ विराटपर्व परमाद्भुत ग्रंथ करितां सत्यवतीसुत लेखक जेथें गजानन १८ पुढील अ
ध्याई सुंदर रस उचंबळेल अपार ते श्रीधर मुखें रुक्मिणीवर ब्रह्मानंदें बोलेपैं १९ सुरस पांडवप्रतापग्रंथ
विराटपर्व व्यासभारत त्यांतील सारांश यथार्थ बत्तिसाव्यांत कथियेला २२०० इति श्रीपांडवप्रतापग्रंथ वि
राटपर्व टीका श्रीधरकृत पांडव विराटगृहीं अज्ञात कीचकभाषण द्रौपदीसीं १ इति श्री पांडवप्रताप विराटपर्व=
द्वात्रिंशत्यध्याय समाप्त· ७।। ७।। ७।। ७।। ७।। ७।। ७।। ७।। ७।। ७।। ।।



श्रीगणेशायनमः अग्निसंभूतयाज्ञसेनी जीसाक्षांतअवतरलीभवानी कीचकबोलिलापापवाणी प्रति
वचनत्यासदेत १ मीकदातुजयोग्यनाहीं पडंनकोव्यर्थप्रवाहीं परदाराभिलाषेंपाहीं प्राणेंजारीदुरात्म्या
२ परांगनापरधन येथेंरमेजाचेंमन तोसर्वांचाद्वेषीपूर्ण आलेंमरणजवळीत्या ३ मीदासीनव्हेनिर्द्धार
माझेगंधर्वपंचभ्रतार माझाअभिलाषधरीजोपामर त्यासिमारितीक्षणाई ४ टाकूनियास्वधर्मपथ आड
मार्गेचालरीयथार्थ तरीसमीपआलाअनर्थ कीचकातुजनिर्धारें ५ आगोष्टीनेअनर्थथोर होयस्वकुळाचा
संहार ऐसियाविचारींचतुर सहसाहीनप्रवर्ते ६ समर्थासीविरोधकरिती आपलेंकल्याणचिंतिती ते
अपायनदींतबुडती नकाढीकोणीतयातें ७ याकरितांविचारी परतोनिजायस्वमंदिरीं तोसूतपुत्रयाव
री कीचकबोलेदुरात्मा ८ मीस्वर्गकोसळल्याजाण नाटोपेकोणाप्रळयाग्न सकळराजेंमजआधीन मीक
रीननेंचहोय ९ विराटमजआधीन माझेनत्याराज्यासन एकशतपांचपूर्ण बंधुमाझेपाठिराखे १० भी
मआणीहनुमंत मीजिंकीनएकक्षणांत तुझेपंचगंधर्वदावींत्वरित मारूनटाकीनक्षणाई ११ द्रौपदीह्मणे
सिंहकन्यका कैसीप्राप्तहोईलजंबुका राजहंसासदिखा कागकैसानेइल १२ दीपासआलिंगितांपतंग
तत्काळहोयप्राणत्याग मजस्पर्शतांसवेग तेचिगतीतुजसाच १३ माझातरीकरितांअभिलाष शाहाणान
जायगृहास होईलतुझाप्राणनाश उभानराहेंक्षणभरी १४ गंगापुरभरलातुंबळ परपाराकेवी
जायबाळ गगनींचेंसूर्यमंडळ मानवाहातीनयेची १५ रत्नराशीपडिलीथोर ह्मणोनिभरीखदिरां
गार कींहानवरत्नाचाहार ह्मणोनिविखारधरूंनको १६ महाविषभक्षून प्रचितपहावयाकोण ब्रह्मद्रोहें
करून कोणकल्याणपावला १७ माझाअभिलाषधरितांचित्तीं तेचिहोईलतुजगती ऐसेंऐकतांतोमंदम
ती सुधेष्णेचागृहागेला १८ तीतिलाह्मणेसैरंध्रीसी बोधूनिपाठवीमजपासी नाहींतरीमीप्राणासी त्यागीन
आतांजाणपां १९ मगसुधेष्णाबोलेवचन मीतिजहातींपाठवियेअन्न तूंतिजलाआकळून बळेंचिभोगीं १

कीचका २० कीचकगेलामंदिरासी सवेंचप्राप्तजालीनिशी बोलाऊनसैरंध्रीसी ह्मणेअन्नहेंनेई २१ कीच
कासहेंअन्नदेई सुराउत्तमघेऊनयेई येरीह्मणेसहसाही मीनजायत्यास्थानां २२ कीचकमहादुरात्मादेख
मींनपाहेंत्याचेंमुख मजस्पर्शतांतोमूर्ख भस्महोईलजाणपां २३ अतिसहवारेंकरून माझेंगाउकेंतुज
लक्षण आणिकाहातींदेपाठऊन मजकारणेंयोग्यनव्हे २४ येरीह्मणेमीपाठविल्यावरी तोसहसातु
जकाहींनकरी परमखेदमानूनिसैरंध्री निघतअन्नघेउनी २५ नयनीवाहतीअश्रुधारा हंसगतीजात
पांडवदारा ह्मणेश्रीकृष्णायादवेंद्रा परमसंकटींरक्षीतूं २६ मीसत्यपतिव्रतापूर्ण श्रीकृष्णभजनीअसेल
मन तरित्याचीशक्तिहोऊनक्षीण मजदुर्जननातळे २७ वाटेनेजातांसत्वर द्रौपदीवदेसूर्यस्तोत्र ह्मणेहे
भास्करदिनकर रक्षींमजतूंआतां २८ सकळनेत्रप्रकाशका अमरचूडामणित्रैलोक्यदीपिका दिनकरा
तरणीतमांतका सर्वव्यापकादिनमणी २९ जाणोनिद्रौपदीचेंमानस सूर्येंपाठविलाएकराक्षस तोरक्षी
तद्रौपदीस गुप्तरूपेंचालिला ३० द्रौपदीयेतांकीचक उभाठाकलाहास्यमुख ह्मणेहेंभाग्यतुझेंसकळिक हो
यस्वामिणीसर्वस्वें ३१ येरीह्मणेउत्तमसुरा सुधेष्णेनेआणविलाशूरा कीचकह्मणेत्याअवसरां आणिकाहा
तीं पाठवितें ३२ ऐसेंबोलोनीसव्यहस्तीं धरिलीद्रौपदीमहासती ह्मणेंभुललासपापमती व्यभिचारिणीमी
नव्हे ३३ द्रौपदीनेआसुडिलाहस्त कोसळोटिलाकीचकतेथ तवराक्षसेंअकस्मांत पाडिलागुप्तधरेवरी ३४
वृक्षउन्मळोनिपडिला तैसाउताणाआपटला तेथूनिधांवतद्रुपदबाळा राजसभेसीपातली ३५ राजाआ
णिकंक बैसलेप्रधानसभानायक तवमागूनकीचक धावतसभेपातला ३६ केशीधरूनउन्मत द्रौपदीस
मारिलीलात तोराक्षसहोताजोगुप्त तेणेंकीचकधुमसिला ३७ गुप्तरूपेंलत्ताप्रहर कीचकासदिधले
अपार भूमीवरीपाडिलादुराचार भोवंडीनेत्रमूर्च्छेनें ३८ तेव्हांसभेसहाताव्रकोदर रागेंदशनेरगडिला
अधर खदिरांगारकेलेनेत्र भोवयांगाठीघातल्या ३९ उठोनियांभीमसेन कीचकाचाघेऊंपाहेप्राण धर्मेंभ्रू

संकेतदाउन ह्मणेनव्हेवेळहे ४० दिवसउरलेकिंचित प्रकटहोईललोकांत ऐसेंजाणोनिस्वस्थ भीमवैसलाउगा
सवा तुह्मी ५ सुरस पांडवप्रतापग्रंथ कर्णपर्व व्यासभारत त्यांतील सारांश य
थार्थ एकुणपन्नासाव्यांत कथियेला ६ इतिश्री पांडवप्रतापग्रंथ कर्णपर्व ए

ऊणपन्नासआध्यायसमाप्तः॥ शुभंभवतु॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीः॥ छे॥

पां०प्र० श्रीगणेशायनमः पंढरीदक्षिणद्वारका तुजआवडे रुक्मिणीनायका सांडुनियांवैकुंठ अ०
१ त्वरा पुंडलिकालागींआलासी १ समचरणसमकटिकर उदारवदनआकर्णनेत्र ५०
तोचितूंब्रह्मानंदयतींद्र भीमातीरविहारी २ मागेंसंपलेंकर्णपर्व आतांअपूर्वशल्य
पर्व एकचआध्यायातसर्व सुरसकथावर्णिली ३ जन्मेजयासह्मणेवैशंपायन सं
जयेंकथिलीधृतराष्ट्रालागुन रणींपडिलावीरकर्ण दुर्योधनशोककरी ४ दुःखसा
गरींदुर्योधन बुडालानाठवेकांहींस्मरण नेत्रींवाहेअश्रुजीवन कर्णकर्णह्मणउनि
यां ५ मागेंपडिलेभीष्मद्रोण इतुकानाहींकष्टीदुर्योधन कर्णावरीतेंप्राण ठेविले
होतेसर्वस्वें ६ शारद्वतकृपयासहित शकुनीकृतवर्मामहानाथ आणीकहीवीरसम
स्त दुर्योधनासमजाविती ७ दुर्योधनह्मणेशल्या बलभद्रसमुद्रपरमकुशळा तुज
विणरक्षितारा हिला कोणअसेअह्मातें ८ सेनापतीजैसाषडानन तैसात्वंभाससी
मजलागुन यावरीतोशल्यपूर्ण पुरुषार्थबोलेआपुला ९ मारुनीपंडुपुत्र तुजव
शीमीधरीनछत्र माझेंयुद्धविचित्र विलोकींतूंयावरी १० अभिषेकुनशल्यवरिष्ठ
देतसेनापतीरणपट वस्त्रेंअळंकारअतिश्रेष्ठ देताजालातेधवां ११ उरलीघेउनी
अवघीसेना शल्यनिघालासमरंगणा लागलीरणतुरेंनाना घोषनादेंगर्जती १२
इकडेसिद्धजालेंपांडवदळ वाजतीवाद्यांचेकल्लोळ प्रतापतेजाळसकळ बाहिनी
दिसेवक्र १३ दाहादिवसपर्यंत भीष्मेंयुद्धकेलेंअद्भुत द्रोणाचार्यगुरुनाथ दिव
सपांचत्याचेजाले १४ दोन दिवसकर्ण केलेंतेणेयुद्धदारुण एवंचजालेसत्रदिन १
अठरावाएकउरला १५ त्यांतशल्याचाअर्धदिन अर्धकरीलदुर्योधन त्यावरी

युद्धसंपूर्ण समाप्तमगजहजची १६ सुयोधनह्मणेशल्याजाण तुवांआपुलेभगिनीसु
तसोडुन सात्यजालासिआह्मालागुन तुजकल्याणहोआतां १७ धर्मोह्मणेइंदिराजीव
न तूंयुद्धकरीनिर्वाण हेआजशल्याचापण भरीलत्रिभुवनपुरुषार्थें १८ दुर्योधनसं
गेवीरांसमस्तां शल्याचीपाठराखाआतां मागेंराहीलत्याचामाथां पंचमहापातकेंप
डतील १९ सैन्यकरूनिअवघेंगोळा शल्येंव्यूहरचियेला व्यूहस्थानीआपणराहिला
डावेकडेकृतवर्मा २० उजवेकडेशारद्वत पाठीराखाद्रोणसुत मधेंदुर्योधनविरा
जित इंद्रजितनयापरी २१ कृतवर्मावरीपार्थ धांविलाजैसाप्रळयकृतांत लक्षुनि
यांशारद्वत वृकोदरलोटला २२ शकुनीवरीसहदेवसबळ उलुकावरीधांविलान
कुळ संजयह्मणेरायादळ थोडकेंआतांउरलेंसे २३ दोनलक्षअश्वस्वार इभउरले
दाहासहस्त्र पंचदशसहस्त्ररहंवर पायदळतीनकोटी २४ आतांपांडवदळउरलें
किती तेहीरायाऐकगणती साहासहस्त्रउरलेरथी हस्तीपंचसहस्त्र २५ लक्षअ
श्वस्वारउरलाअसे कोटिएकपायदळदिसे असोसंग्रामआतांआवेशें मांडलाते=
व्हांरणमंडळीं २६ उष्णीषकुंडलासमवेत शिरेंउडतीअसंख्यात वीरपाणीचंदन
चर्चित बिरुदांसहितचरणपडिले २७ पांडववीरांचाथोरमार पळोंलागलेंकौरव
भार यावरीतोशल्यवीर धर्मावरीधांविला २८ तोरथावरीधर्मपवित्र मस्तकीं
विराजेआतपत्र तपनपत्रेंअतिविचित्र मकरबिरुदेंपुढती २९ चित्रसेनकर्णसु
त नकुळासमवेतयुद्धकरित तेणेकरूनीपुरुषार्थ केलाविरथनकुळतेव्हां ३०
मगनकुळपायेंधांवोन मगअसिलताघेउन चित्रसेनासमीपजाउन शिरछेदि

लेंपुरुषार्थें ३१ किरीटकुंडलेंसमवेत कौरवदळींशिरवाकित आणिकेरथींनकुळबै
सत वीरसमस्तमानवती ३२ कृसेनआणिसत्यसेन आलेनकुळावरीधांवोन
अद्भुतयुद्धमाद्रीनंदन करितांजालातेधवां ३३ कृसेनसत्यसेनलक्षून नकुळेंटाकिलेदि
व्यबाण दोघांचींशिरेंउडऊन आकाशपंथेंधाडिलीं ३४ कृतवर्म्याचीवाहिनी पार्थें
संहारिलीतेक्षणीं इकडेशल्यधर्मरणांगणीं निकुरेंकरूनिभिडती ३५ तोंगदाघेउ
नीवृकोदर शल्यावरीधांविलासत्वर तोंमद्रराजेंचोदातोमर भीमावरीभिरकावि
ले ३६ रथासहितस्यंदन भीमेंकेलारणींचूर्ण मगशल्यगदाघेऊन चरणचालीं
धांविला ३७ गदायुद्धाचीखणखणाटी होऊंलागलीअग्निवृष्टी गदाघायेंशेवटीं
शल्यमूर्छनापावला ३८ सवेंचशल्यउठोन दुजेरथींबैसलायेउन मागुतींधर्मासीं
दारुण युद्धतेणेंमांडिलें ३९ शल्यतेव्हांशतबाणीं धर्मखिळिलासमरंगणीं ऐसेंवि
परीतदेखोनी वीरउठलेअवघेची ४० गदाबाणशक्तीतोमर असिलतापरिघअ
पार शल्यावरीसकळवीर वर्षावकरितीतेधवां ४१ तितुक्यांचींहीशस्त्रें शल्येंछे
दिलींक्षणमात्रें कृष्णार्जुनासीगुरुपुत्रें युद्धनिकुरमांडिलें ४२ संवत्सरसंख्यावाणीं
पार्थासभेदितांजालातेक्षणीं पुराणसंख्यामार्गणीं चक्रपाणीभेदिला ४३ पांडव
सेनेचासंहार गुरुपुत्रेंकेलाअपार पडिलेप्रेतांचेघोरभार मार्गानेरथचालेना
४४ यावरीपार्थेंरणरंगीं गुरुपुत्रखिळिलासर्वांगीं पंचसहस्त्रवीरवेगीं विज
येंमारिलेतेधवां ४५ गुरुकृतलोहमुसळ अर्जुनावरीटाकिलेंतत्काळ मगतेए २
कबाणेंसकळ छेदूनियांटाकिलें ४६ सवेंचतेणेंपरिघटाकिलें पार्थेंतीनबाणीं

छेदिले पंचबाणतेवेळे किरीटीकाटीविजुऐसे ४७ सर्पसंचरतीवारुळांत तैसेबाण
अंगींगुप्त मूर्छनायेऊनिगुरुकृत ध्वजस्तंभींटेकला ४८ इकडेशल्यनिजबाणीं ज
र्जरकेलीपांडववाहिनी कौरवांचीवरूथिनी पार्थतिकडेसंहारी ४९ शल्यावरीसब
ळ धर्मेंघातिलेंबाणजाळ भीमसहदेवनकुळ पाठीराखेधर्माचे ५० धर्मह्मणे
चक्रपाणी आजिशल्यमारीनसमरंगणीं माझाअभिनवयेक्षणीं सिद्धीपाववीश्री
रंगा ५१ केशवह्मणेयुधिष्ठिरा करीआतांवकुतत्वरा आजिसमग्रयेशचतुरा दे
वपाववसीनिर्धारें ५२ समरंगणींधर्मभूपाळ दिसेकौरवांकेवळकाळ युधिष्ठिरेंब्र
ह्मांडगोळ हाकेसरसागाजविला ५३ सिंदूरेंचर्चिलानगदेख आरक्तपुष्पमाळाकीं
र्तिप्रत्यक्ष अनंतविजयशंख धर्मराजेंत्राहाटिला ५४ शल्याचींचापेंसमरंगणीं धर्मेंश
तछेदिलींतेक्षणीं बाणबाणाचेसंघट्टनीं पावकज्वाळावर्षती ५५ बाणजाळेंकौरव
अनेककरणीं जर्जरकेलेसमरंगणीं मद्रराजसहस्त्रबाणीं धर्मराजेंविंधिला
५६ चापअलातचक्रापरी भ्रमतीदोघांचाहस्तावरी वर्मेंलक्षूनिपरस्परीं बाण
भेदितीरणशूर ५७ धन्ययोद्धायुधिष्ठिर मानितीविमानीसुरवर शतधनुष्यश
ल्यचेपवर धर्मांचींछेदितांजाला ५८ धर्माचेंउणेंदेखोन पुढेंधांविलाभीमसेन बा
णघातेंकरुन कवचछेदिलेंशल्याचें ५९ धर्मेंशक्तीकाढिलीबाहेरी जीचीप्रतिमा
नाहींदुसरी जीधर्मराजेंदिव्यमंत्रीं अर्चिलीत्रिकाळपूजूनियां ६० तीकाळशक्तीप
रमप्रबळ किंवाकाळसर्पाचेंगरळ कींप्रळयाग्निचीकराळ मुखज्वाळाप्रगट
ली ६१ सप्तकोटिमंत्रांचेंतेज जीचेठाईंवसेसहज घंटापताकातेजःपुंज पाहातां

सूर्यझांकोळे ६२ दिव्यरत्ने तेजपुंज गईंदाईं तीसरूबंध विधात्यानें सामर्थ्यबहुवि
ध वेचूनरचिली होतीती ६३ तेब्रह्मशक्तीअनिवार वाहेरकाढीयुधिष्ठिर जपोनियांअ
थर्वणमंत्र न्यासध्यानादिसर्वही ६४ सहस्रविजांचेंतेजअद्भुत धर्मेंसोडिलीअकस्मा
त पर्वतपडेवज्रघातें तैसीहृदयींसंचरली ६५ शल्याचेंहृदयफोडोननिघाली शक्ती
पृथ्वीमाजीसंचरली पाताळउदकींविझाली जाउनियांतेधवां ६६ तैसाशल्यपडलाः
रणीं जयजयकारगर्जेपांडववाहिनी जयवाद्यांचेतयेक्षणी मंगळघोषलागले
६७ शल्यबंधुमहावीर धर्मावरीधांविलासत्वर त्याचेंहीक्षणमात्रेंशिर उर्ध्वपंथें
उडविलें ६८ कौरवदळींहाहाःकार अष्टदिशापळतीवीर रक्तगंगेचेपूर लवणपा
होधांवती ६९ धर्माचेंशूरत्वपूर्ण वाखाणितीदेवशचीरमण भूतळींचेराजेकृष्णा
र्जुन ह्मणतीधन्यवीरहा ७० शल्याचेंउरलेंदळ स्वदेशाचालिलेंतत्काळ तेंदुर्यो
धनेराहविलेंसकळ प्रार्थूनियांआदरें ७१ गदाघेउनिवृकोदर प्रळयतेणेंकेला
थोर एकवीससहस्रवीर रणांगणींमारिले ७२ मकरालयजैसाविशाळ तैसें
रणपडिलेंपुष्कळ यावरीशाल्वनामासबळ म्लेंछपतीउठला ७३ हस्तीवरीबैसो
न तेणेंयुद्धकेलेंनिर्वाण ऐरावतासमान गजतयाचाफिरतसे ७४ पांडवसेनेचासं
हार म्लेंछेंकेलाअपार त्यावरीधृष्टद्युम्नमहावीर शरसोडिताजाला ७५ युयुधान
शतबाणीं इभजर्जरकेलारणीं गजबाणभयेंकरुनी रानोरानपळतसे ७६ सात्य
कीनेगदाघालुन गजमारिलानलागतांक्षण सर्वेंचिबाणटाकुन शिरछेदिलेंशा ३
ल्वाचें ७७ तेंदेखोनिदुर्योधन पुढेंधांविलावर्षतबाण एकअर्जुनवेगळाकरून

सर्ववीररखिळियेले ७८ सुयोधनेंशतबाण धर्मावरीटाकिलेनिर्वाण दशबाणीं
भीमसेन विंधिलाक्रोधेंकरुनियां ७९ मगगदाघेउनीभीमसेन दुर्योधनासहा
करेउन रथसमरींकेलाचूर्ण सुयोधनपळाला ८० तोंद्रौपदीचेपंचसुत त्या
हींवेढिलाशारद्वत जेविंइंद्रियांनिसाधुसंत करिजेजैसेघाबिरें ८१ यावरीसातश
तरथीजाण धर्मावरीपाठविलेसुयोधनें तेदेखोनिपांडवसैन्य अवघेंचउच
लेंत्यावरी ८२ सहासहस्रघेउनिस्वार शकुनीधांवलाकपटसागर परिति
तुक्यांचासंहार पार्थेंकेलातेधवां ८३ रणांगणींशतरथी तत्काळमारीसुभद्रापती
दोनसहस्रस्वारशतहस्ती प्रेतेंकरुनिपाडिलीं ८४ पायदळतीनसहस्र केलातया
चासंहार शकुनीलक्षोनसमोर पार्थवीरबोलत ८५ माझेंराज्यरत्नशकुनी तुवांने
लेंकपटेंकरुनी तुजमारुनसमरंगणीं आणवीनसर्वही ८६ कौरवस्त्रियावेग
ळ्याकरुन समस्तांसिदाखवितोंयमसदन तोंसुशर्मावर्षतबाण पार्थासमोरपा
तला ८७ अष्टादशबाणेंकरुन भेदिताझालापाकशासन तेणेंसर्वेंचिऐशींमार्गणें
सुशर्माहीरखिळियेला ८८ घालूनिबाणजाळ संहारिलेंसुशर्म्याचेंदळ जैसेंखांडव
नअनळ जाळूनियांभस्मकरी ८९ चारघटिकापर्यंत युद्धजालेंअद्भुत मगबा
णकाढिलाइंद्रदत्त प्रळयकृतांतजैसाकां ९० तोशरयोजिलागुणीं ओढूनलाविला
दक्षणश्रवणीं सुशर्मासंसारापासूनि मुक्तजालातेधवां ९१ त्याचेपंचदशपुत्र
होतेपितयासमानशूर त्यांचींशिरेंसमग्र पार्थेंछेदिलींतेधवां ९२ सुदर्शनसत्य
सेन तेहीकौरवदोघेजण फाल्गुनेंशिरेंछेदुन तत्काळत्याचीटाकिलीं ९३ उलूकश

कुनीचानंदन तोनिःशंकधाविलावर्षतबाण नकुळासीयुद्धदारुण बहुतकेलेंते
धवां १४ मगशकुनीनिर्वाणशर उलुकाचेंउडविलेंशिर त्याचादुःखेंशकुनीवीर रु
दनकरितअतिशोकें १५ विदुराचींवचनेंमनीं आठविताजालाशकुनी मगखड्ग घे
उनी क्रोधेंकरुनिधांविला १६ तोंसहदेवेंशकुनीबाण खड्गपाडिलेंछेदुन शकु
नीगदाघेउन धांवताजालातेधवां १७ सहदेवपरमपुरुषार्थी गदातोडुनपाडि
लीक्षिती शकुनीनेंटाकिलीशक्ती तेहीकेलीत्रिखंड १८ सहदेवबोलेगर्जोनी ह्म
णेकपटियाशकुनी केलेंजेंमुळीहुनी त्याचेंफळभोगीहें ९९ माझीद्रौपदीनेलीहरु
नी तेंकपटसत्वरआणी तुझेहातपायखंडुनी टाकीनरणींपाहेंआतां १०० ध्वज
सारथीआणिस्यंदन छेदूनपाडीमाद्रीनंदन शकुनीखालींउतरोन त्रासघेउन
चालिला १ तोंसहदेवेंसोडिलेदोनबाण धरापदैवतयमकृशान दोनीभुजाछेदु
न शकुनीचाटाकिल्या २ सवेंचदोनशरयोजिले दोनीचरणतेणेखंडिले मगसू
र्यमुखबाणेंतेवेळे शिरउडविलेंशकुनीचें ३ भुजापिटोनगर्जेसहदेव वरूनपुष्प
वर्षावकरीवासव जयवाद्यांचाघोषअपूर्व पांडवदळींगर्जती ४ चौघेबंधुयेउ
न सहदेवासिदेतीआलिंगन वासुदेवह्मणेधन्य शकुनीकपटीवधियेला ५
शकुनीचेंसैन्यउरलें तेंपार्थानेंअवघेंमारिलें अक्षौहिणीदळसगळें सर्वआटलें
कुरुक्षेत्रीं ६ जैसेंतडागभरलेंविशाळ त्याचेचौपाळीफुटलेंजळ कींप्राणगेलिया
सकळ निश्चेष्टितइंद्रियें ७ मनाचेंगणेंउठिलेंनिश्चिती मगतेथेंकासयाराहेल ५
प्रीती तेंविभीष्मद्रोणादिपडतांरणक्षितीं मावळेसर्वदळ ८ पांडवदळहीओ

टलें त्यामाजींकिंचितउरलें त्याचेंगणितकेलें वैशंपायनानेऐकातें ९ दोनसहस्र
रहंवर आणिसातशतकुंजर पांचसहस्रस्वार पायदळसहासहस्र १० दुर्योधन
तेसमईं गदाहस्तीएकलाचपाही संहारिलेसर्वबंधुही एकहीउरलानाहीं ११
बैसावयाएकवसन एकलाचिपळेदुर्योधन मगद्वैपायनडोहपाहोन उडीत्यांत
टाकिली १२ विदुराचींवचनेंआठउनी शोकेंआरंबळेनयेक्षणीं आटलीसर्वकौ
रववाहिनी चौघेत्यांतजितउरले १३ दुर्योधनकृतवर्मागुरुसुत चवथाउरलाशा
रद्वत संजयह्मणेत्यायुद्धांत मीहीरायागेलोहोतों १४ मीआतांचआलोंजाउन मज
वरहीखड्गघेउन सात्यकीआलाधांवोन मजलागीवधावया १५ मगप्रगटलेव्यास
देव त्याणेंसोडविलामाझाजीव म्याशस्त्रकवचटाकुनीसर्व कोशभरिधांवलों
१६ तोंदुर्योधनतेथें एकलाचदेखिलारडत मीहीदुःखेंदाटलोंबहुत मगत्यासी
पुसिलें १७ कृतवर्माशारद्वतगुरुनंदन हेगेलेमहावनापळोन मगबोलिलादु
र्योधन सांगजाउनधृतराष्ट्रा १८ याकृष्णद्वैपायनडोहांत मीएकलायेथेंआहेंगु
प्त मजहीदशाजालीप्राप्त पूर्वदत्तकृतेंना १९ मगजळस्तंभकरुन त्याडोहींराहिला
दुर्योधन पुढेंआलोंतोंतिघेजण मजपुसोंलागले २० कोठेंआहेदुर्योधन म्यासां
गीतलेंह्रदाचेंस्थान महादुर्धरवनींजाण तिघेराहिलेवटाखालें २१ अस्ताचळा
गेलाआदित्य इकडेपांडवसेनाधांवत दुर्योधनासशोधित कोठेंलपालाह्मणोनि
यां २२ दुर्योधनाचीशिबिरेंनिश्चिती रितींअवघींभणभणिती कित्येकवीरपळती र
डतजातीरानोरान २३ कींत्यालावण्यहरणी प्रळयकरितजातीकाननीं कौरव

गेलेह्मणउनी युयुत्सुएकउरला २४ वैशंपायनह्मणेजन्मेजया युक्तकधर्मा
सिपुसोनियां गजपुरासआलालवलाह्या तोंविदुरत्यासपुसे २५ कायवर्तलासां
गसमाचार ह्मणेंजालासर्वसंहार विदुरकरीहाहःकार कायउत्तरबोलिला २६
युयुत्सवात्वंउरलासी यशीएवढीतरीअंधासी त्वंसत्वरजाधर्मापाशीं तुजकोणी
नशीमारील २७ गजपुरींहाहःकार शून्यदिसेअवघेंनगर कळाहीनराजमंदिर कळ
सझोलोनपडियेले २८ वैशंपायनह्मणेंजन्मेजया इतुक्यानेंशल्यपर्वजालेंराया गदापर्व
येथूनियां तेंहीश्रवणकरीपुढें २९ शौनकादिकमहामुनी श्रवणकरितीनैमिषार
ण्यीं वेदव्यासप्रसादेंकरुनी सूतसांगेतयातें ३० ब्रह्मानंदेंश्रीधर पंडितांस
विनवीजोडुनिकर गदापर्वसुरसफार येथूनश्रवणपुढेंकरा ३१ श्रीमद्भीमा
तीरविहारा श्रीधरवरदात्रिभुवनेश्वरा श्रीब्रह्मानंदायतींद्रा बोलवीपुढेंयेथू
नियां ३२ सुरसपांडवप्रतापग्रंथ शल्यपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशय
थार्थ पन्नासाव्यांतकथियेला ३३ इतिश्रीपांडवप्रतापशल्यपर्वपंचदशाअ
ध्यायसमाप्तः ॥ शुभंभवतु ॥ श्रीः॥ ७॥ श्रीः॥ ७॥ श्रीः॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ ७॥ श्रीः॥

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः श्रीपांडुरंगापंढरीशा पांडवपाळकापुराणपुरु
षा पद्मजनकापयाब्धिवासा पंकजनेत्रापरात्परा १ तुझेंचरित्रजें वर्णिलें पूर्वीध्या
यींशल्यपर्वसंपलें येथूनगदापर्वकथियेलें वैशंपायनेंजन्मेजया २ धृतराष्ट्रम्हणेसं
जयाप्रती दुर्योधनासपांडवशोधिती मजखेदवाटताचित्तीं पुढिलकथावर्तमान
३ संजयम्हणेपांडवसेना चहूंकडेशोधितीदुर्योधना शिबिरेंसदनेंपाहतीजाणा
हुडकूनियांसर्वही ४ तोंकृतवर्माकृपयाकृत कृपयाबंधनिजात्मासत्य तोदुर्योधना
शोधित हृदाजवळीपातले ५ म्हणतीबाहेरयेईंदुर्योधना युधकरूनमारूंपृतना
अथवाजाऊंसायोज्यसदना समरंगणींझुंजोनियां ६ ओंतूनदुर्योधनबोलत मीं
श्रमलोंअसेंअत्यंत उदईंकयुधकरूंयथार्थ जिंकूंसत्यपंडुसुतां ७ तोंभीमाचेपा
रधीजाण जातहोतेश्वापदेंमारुन तिहींतेशब्दऐकोन जाऊनभीमासांगीतलें
८ द्वैपायनडोहामधून तिघांसिबोललासुयोधन ऐसेंपांडवींऐकोन पारध्यां
सवस्त्रेंदिधलीं ९ पांचपांडवआणिकेशव उरलीपृतनाधांवेसर्व धृष्टद्युम्नसा
त्यकीपांडव द्रौपदीचेधांवती १० तवतेतिघेजणरथीं पळोनगेलेवनाप्रती पांड
वहृदासमीपयेती परीगुप्तनबोले ११ गदाजवळीघेउन जळींआहेसुयोधन पां
डवांसम्हणेमधुसूदन कपटपहाकैसेंयाचें १२ मगधर्मबोलतेसमयीं दुर्योधना
तूंबाहेरयेई आतांलपोनव्यर्थकाहीं डागलागेलक्षत्रियधर्मा १३ एवढातुझाअ
भिमान आजिकोठेंटाकिलानेउन युधकरीबाहेरयेउन समरंगणमाजवीं १४ १
कायकरिसीवांचोन राज्यअथवास्वर्गभुवन एकघेसाधूनजळामधून बाहेरये

वकरयेईंतूं १५ दुर्योधनम्हणेंमींविरथ श्रमलोंएकलाआहेंयेथें मगम्हणेतो
पंडुसुत आम्हींबहुतश्रमलोंआहों १६ दुर्योधनम्हणेमाझीपृतना आटूनगेली
स्वर्गभुवना धर्मामीजायीनवना तूंराज्यकरींआपलें १७ धर्मम्हणेंतुवांदिधली ते
मीउवीनेघेंकदाकाळीं पूर्वींआम्हींमागीतली परिगोष्टीऐकिलीनाहीं १८ देवाधि
देवनारायण शिष्टाईकरूंआलाजाण तूंबोलिलासीकायवचन मनामाजींआठ
वींतें १९ सुईचाअग्रींमृत्तिकाजाण इतकीमींनेदींयुद्धाविण तरीबाहेरयेईंमाज
वीरण दोहींतूनएकसाधी २० तुवांघालूनिविषघोर मारितहोतासीवृकोदर
अग्निलाऊनलाक्षामंदिर दग्धकेलेंआम्हांतें २१ दुःशासनेंद्रौपदीचेकेश धरून
आणिलींसभेस करूनियांकपटपाशा राज्यमाझेंहरविलें २२ रात्रींघालाघाला
वया आलांआह्मासिमारावया असोकितीम्हणूनियां अन्यायतुझेसांगावे २३
तरियेतूंआतांझडकरी समरींधर्मयुधकरीं सुयोधनम्हणेनिघतांबाहेरी अव
घेमिळूनमाराल २४ धर्मातुझ्यावचनेंकरून मींआतांबाहेरयेइन परिमाझें
अधर्मांगलक्षून कदाताडणनकिजे २५ धर्मम्हणेंतूंयेझडकरी मानेलतैसें
चयुधकरीं आह्मींहीपायींचनिर्धारीं एकचींजाणयुधकरूं २६ वादेंन
वाजऊंरणीं हाकानफोडुंकोणी भोंवतेउगेचउभेराहूनी आम्हींयुधपहातों
पैं २७ भीमम्हणेमींतूंदोघेजण युधकरूंसमरींनिर्वाण भुजंगनिघेवारुळां
तून तेवींसुयोधननिघाला २८ क्रोधेंनेत्ररक्तांबर दिसेखवळलाजेंसाव्या
घ्र इंद्राहातींजैसेंवज्र तैसीगदावरीझळके २९ धृष्टद्युम्नसात्यकीबळी हस्त

यरीहस्तह्मणितीतेवेळीं गदगदांहांसतीसकळी देखोनबोलेसुयोधन ३० हास
ताबहुतमिळोन परिगदाघायेंकरीनचूर्ण व्याघ्राचाचेष्टाकरुन वृषभकैसावां
चेल ३१ एकएकउठोन करामजसींयुध्दकंदन धर्मातूंधर्मपरायण साक्षहो
ईयागोष्टी ३२ एकावरीबहुतजण नउठावेंहाधर्मपूर्ण पार्थम्हणेतरीअभिमं
न्य कैसामारिलासमरंगणीं ३३ आतांतूंसांगसीस्वधर्म मगबोलेराजाधर्म
तेवेळेकांकेलाअधर्म बाधवीरगुंठीसावरूनी ३४ तूंपाचांतएकासमारी तुजहें
राज्यदेऊंनिर्धारीं ऐकतांरागआलाकेसरी भीमअंतरींदचकला ३५ श्रीरंगम्ह
णेंतेवेळे नेमवचनकायकेलें तुवांपूर्वींचऐसेंबुडविलें द्यूतप्रसंगखेळोनी
३६ नकरितांप्रधानासींविचार नृपेंनबोलावेंउत्तर तेणेंएकासजरीमारिलेंसत्वर
तरिमगराज्यद्यावेंकीं ३७ आपणासनाहींबुध्दिसाचार दुसरीयासनपुसेविचार त
रितोअनर्थींपडेलनिर्धार यांतसंदेहनसेची ३८ भीमबळेंचआहेसबळ दुर्योध
नबळकटकुशळ कैसेंसंपादेलबळ मजचिंताजाळीतसे ३९ भीमह्मणेंकंसांतका
तूंअसतांआह्मांपाठिराखा यादुर्योधनामशका जिंकावयाक्षणनलागे ४० भी
मगदाघेऊनउठिला हाकेंब्रह्मकटाहगाजविला दुर्योधनसरसावला जरासंधा
सारिखाची ४१ वृकोदरम्हणेतेवेळीं शकुनीचाबोलेंकर्मेंकेलीं तींदुःखफळेंस
गळीं भोगींआतांपापिया ४२ भीष्मद्रोणकर्णवीर रणपंडितजैसेदिनकर तेतु
वांमारविलेसमग्र तूंचएकटाराहसी ४३ दुर्योधनह्मणेंवल्गना कितीकरसी
लभीमसेना जीवनेंवीणमेघगर्जना व्यर्थजैसागडगडी ४४ आतांतुह्मांघेई

नप्राण गजपुरींचेंराज्यपावेन तोंबळिरामतीर्थेंकरुन अकस्मांततेथेंआला ४५
सर्वींकेलेंत्यासीनमन बाविसांदिवसांआलापरतोन परियुध्दाचाअठरावादिन
निश्चयपूर्णजाणावा ४६ भीमसेनदुर्योधन बळिरामाचेशिष्यजाण रेवतीवराचे
वंदितीचरण प्रार्थूनयुध्दपहाम्हणती ४७ बळिरामम्हणेएकामात शमपंचकथो
रतीर्थ युध्दकरितांमोक्षप्राप्त चलातेथेंअवघेही ४८ मगसर्वहीउठोन आलेश
मपंचकतीर्थालागुन सरसावलेदोघेजण देवगणविलोकिती ४९ सिंहावरीसिंह
जैसा वृकोदरचपेटलातैसा हाकादेतीतेणेंआकाशा कंपवाटरूटलापैं ५० पूर्वीं
जरासंधभीमसेन कींसंदोपसंददोघेजण कींवाळीआणिसूर्यनंदन तैसेदोघेभि
डतीपैं ५१ कींमेरुआणिविंध्याचळ तेसेदोघेदिसतीसबळ हाकेसरिसाब्रह्मांड
गोळ डोलूंलागलातेधवां ५२ धर्मासह्मणेंदुर्योधन तुम्हींयुध्दपहासर्वबैसोन
अवघेअवश्यह्मणोन धरणीवरीबैसले ५३ भयेंकांपतसेक्षिती पाताळभोगी
दचकलाचित्तीं कूर्मवराहकांपती रिचवतीमगणेंतेव्हां ५४ कायश्वापदांचेपाळे
स्थानेंसाडूनपळोंलागले पर्वतशिखरेंतेवेळें कोसळतीउर्वीवरी ५५ सप्तसमुद्र
उचंबळती मेरुमंदारआदळती असोभीमसेनेंचित्तीं पूर्वदुःखआठविलें ५६
क्रूरकरांखाऊनदांत म्हणेकैसेंजाळिलेंजोहरांत विषघालूनिगंगेआंत बुडवि
लेंमजलागीं ५७ द्रौपदीसभेसआणुन अंकदाखविलाउघडाकरून तेमांडीआ
जिचूर्ण करीनहेंसमरंगणीं ५८ गोंगोःम्हणोनीवचन बोलिलासकींदुर्गावरुन
षंढतीळपंडुनंदन ह्मणूनियाबोलिलासी ५९ रात्रीनसनांअन्न तुवांपाठविला

अत्रिनंदन तांटद्दकलूनजगज्जीवन आलाधांवोनतेधवां ६० सुयोधनअन्या
यीथोर ठावनाहींत्यावेयाउत्तर म्हणेंमीमातुझेंआजिकलेवर प्राणविरहितक
रीनमी ६१ तोंभीमेंगदाघाई दुर्योधनताडिलाहृदयीं तववतेणेंलवलाहीं भीम
वीरताडिला ६२ कुंकुमें माखलाअचळ कींपळसफुललेबहुसाल तैसेअशुद्धेंबं
बाळ आरक्तवर्णदिसतीपैं ६३ एकदक्षिणेकडेदाविती एकउत्तरेकडेचालती
विजेऐसेसवेंचफिरती हाणितीमर्मपाहूनियां ६४ गदेसिंगदाझगटती महा
ज्वाळतेथेंउमठती दोघेहीमागेंनसरती भयचित्तींनवाटेची ६५ मांडेखुटीये
उन सवेंचघेतीऊर्ध्वउड्डाण एकएकाचाघायेंकरून मूर्च्छनायेऊनपडताती
६६ भीममूर्च्छासांवरून पाहेदुर्योधनाविलोकुन तवतोव्याकूळदेखोन उगारा
हिलाक्षणभरी ६७ सवेंचउठोनदुर्योधन मागुतीमवतेंकडाडलागुन जगदीश्व
रासीम्हणेअर्जुन युद्धदारुणपरमहें ६८ जयकोणासप्राप्त हेंमजनकळेनिश्चि
त हरिम्हणेमायनेअद्भुत मारूनियांटाकावा ६९ पंदाप्रतिपंदेपण करूनघ्या
वात्याचाप्राण भीमासहरिदाखवीखुण मांडीवरीहाणानियां ७० मैत्रेयाचा
शापदारुण मांडीवरीगदाघायपडोन संगरीतूंजासीलमरून जाणेंमधुसूद
नवर्महें ७१ द्रौपदीचाहीशापपूर्ण भीमाचेंतेंचनेमवचन त्यावरीपापदारुण दु
र्योधनआचरला ७२ येरवींदुर्योधनयोद्धाकुशळ कुलिशाऐसीगदासबळ समरंगणीं
आलाअखंडळ त्यासहीहारीआणिलीता ७३ असादोघांसीयुद्धहोत सकळ ३
वीरांभोवतेपहात नानामंडळेंउड्डाणघेत हाकाफोडितीअनिवार ७४ उफराटी

उडीघेतदुर्योधन तेवेळेंवरतेजालेचरण तोंभीमेंगदाउचलून वामांकावरीघा
तली ७५ फळपक्कहोयपूर्ण तैसीमांडीगेलीविदारून वृक्षपडेउन्मळून तैसाभू
मीवरीपडियेला ७६ जालेनानाउत्पात गगनींउठिलेत्रिविधकेत धराजालीकं
पित मेघवर्षतबहुतेव्हां ७७ सुमनवृष्टीभीमावरी निर्जरकरितीतेअवसरीं अ
सोसुयोधनाचामुकुटझडकरी भीमहाणींलातेनें ७८ शिरावरीपायदेउन रगडू
नियांकेलेंचूर्ण आम्हासपदतोळजाण बोलिलासकैसातूं ७९ धर्मम्हणेंभीमापा
हीं अनुचितकर्मकेलेंयेसमयीं हेंसर्वरायामानलेंनाहीं मागेंपुढेंनिंदितीतूंतें ८०
अकराक्षोणींदळाचापती छत्रधरदुर्योधननृपती अहाकर्माचीकैसीगती पडिला
क्षितीदुर्योधन ८१ अजातशत्रुधर्मखरा नयनीवाहतीअश्रुधारा म्हणेदुर्योधनाकौ
रवेश्वरा कैसेंप्राक्तनतुझेंहें ८२ खेदनधरींहृदयकमळीं तुझीक्रियातुजफळासि
आली तुझ्यास्त्रियारडतीलसकळी तेंमीश्रवणींकेविऐकों ८३ तोंक्रोधयुक्तबो
लेबळिराम भीमाधिकधिकतुझापराक्रम अधर्मागनताडावेंहानेम त्यावरीहेंक
र्मविशेषकेलें ८४ पृथ्वीपतीसुयोधनवीर त्याचेंलत्तेनेंमर्दिलेंशिर क्रोधेंउचलून
मुसळनागर बळिभद्रउठिलापैं ८५ मगधांवोनचक्रपाणी मिठीघातलीमागूनधां
ऊनीं समाधानतेक्षणीं करितज्येष्ठबंधुचें ८६ तुम्हीआम्हींधरिलाअवतार हरा
वयापृथ्वीचाभार त्याचिपाठिराखावासाचार पितृभगिनीसुतहेकीं ८७ त्याचाशा
पहोवहिला तोत्याचात्यासफळासआला आणिकलियुगाचाआरंभजाला स्वधर्म
चालिलाबुडतपैं ८८ भीमापासूनपडिलेंअंतर आतांधर्माकडेपाहूनसाचार क्षम

करावीनिर्धार नाहींविचारदुसरापैं ८९ रथीं बैसोनरेवतीवर द्वारकेसगेलासत्वर
मगधर्माचें समाधानश्रीधर नानापरीकरीतसे ९० असाजयवाद्यांचीघाई एकची
लागलीतेसमयीं सिंहनादेंसर्वही वीरगर्जतीआनंदें ९१ सर्वराजेमिळोन क
रितीभीमाचेंस्तवन धर्मद्वेषीदुर्योधन बरामारिलाचांडाल ९२ कृष्णाकडे दुर्योधन
क्रोधेंपाहेविलोकुन म्हणेतुवांकंसाचाप्राण कपटेंकरूनघेतला ९३ तुवांचहेंकरवि
लें कपटेंराजेमारविले जरासंधासवधविलें कपटबुद्धीकरूनियां ९४ आणीकही
काळयवन गोवळ्यामारविलेकपटेंकरून धर्ममुखेंअसत्यबोलऊन घेतलाप्रा
णद्रोणाचा ९५ शिखंडीतुवांपुढेंघालून व्यसनीपाडिलागंगानंदन चक्रकाढाव
यागुंतलाकर्ण त्याचाप्राणघेतलातुवां ९६ माझाकर्णवीरएकला त्रैलोक्यासवि
स्मयजाला काळरूपतूंगोवळा तुवांचगिळिलेसमरंगणीं ९७ धर्मयुद्धकेलेंनाहीं
कपटेंचमारिलेसर्वही हरिह्मणेंआलोंजेसमयीं मानिलीनाहींशिष्टाईकां ९८ तु
वांजेअन्यायकेलेबहुत तेचफळाआलेसमस्त केशींधरूनचोदित माझीबहिण
सभेनेली ९९ तुह्मीकपटीचांडालदुर्जन तुमचेंऐसेंचकरावेंहनन मीअवतारध
रिलापूर्ण याचकार्यालागुनी १०० नानाप्रकारेंकरुन मारावेअवघेदुर्जन सद्भक्तां
चेंप्रतिपालन करावयालागींपैं १ उतरावयाधराभार मींअवतरलोंसर्वेश्वर रा
मावतारींरजनीचर पूर्वींचम्यामारिले २ नानाअवतारधरुन केलेंदुष्टांचेंनिर्दलन
हिरण्यकशपुमर्दन प्रल्हादम्यारक्षिला ३ वेदतुल्यवडिलांचेंवचन तेंतुजवाटलें ४
विषासमान गुरुद्रोहकेलेदारुण त्याचेंफळभोगींहें ४ सर्षपबिजपेरिलेंबहुत

परिगोधुमकैसेहोतीप्राप्त दुष्टकर्मआचरत तेपरलोककेवींपावती ५ असोश्री
रंगाचेंस्तवन पांडवकरितींकरजोडून तूंब्रम्हांडनायकमनमोहन भक्तजनरक्षि
ता ६ पांडवपालकगोविंद हेंत्रिभुवनींगर्जेब्रिद तेंसाचकरूनविपद दुदुर्भीत
व्हांठेकिल्या ७ तरियावरीपीतवसना ब्रह्मांडनायकाजगन्मोहना नीलोत्पल
दलवर्णा शिबिराप्रतीचलाआतां ८ दुर्योधनाचींशिबिरेंथोर जडितस्तंभवरीरत्न
कळस कनकवर्णदिसतीराजस अतिउदासभणभणितपैं ९ कर्णद्रोणगंगासु
त त्यांचिहीशिबिरेंभणभणित एवंथोरअवघेंसमस्त नाहींरक्षककोणीही १०
दिव्यास्तरणेंमृदुमवाळ चोळंगणेगादियातेजाळ कोशसदनेंविशाळ भणभणि
तपडियेलीं ११ गांडीवासगवसणी घालीतेव्हांपाकशासनी तूणीरठेविलाटोपुनी
जोकल्पांतींसरेना १२ कोणीसेवकउरलेकिंचित तेधर्मासजालेशरणागत म्हण
तीपाळिलेंआजिपरियंत यावरीधर्मारक्षीतूं १३ असाजयवाद्येंवाजवित स्वस्थळा
गेलेपंडुसुत अर्जुनाचाविजयरथ जगन्निवासेंसोडिला १४ उभयकृष्णउतरलेस
वेग तेतक्षणींसोडिलेनसतांतुरंग अंजनीहृदयारविंदभृंग पुसोनगेलाश्वेतवंधा
१५ खालेंउतरतांभगवान् धडधडांजळेरथजाण जळावयाकायकारण जन्म
जयपुसतसे १६ मगबोलेवैशंपायन द्रोणकर्णगंगानंदन याहीं अस्त्रेंसोडिलीं
दारुण पार्थप्राणहर्तींजीं १७ परिश्रीरंगआणिमारुती अर्पितेजालेनिजशक्ति
जीब्रम्हांडजाळूंशकती होतीभोंवतीतळपत १८ तींकार्यसरलीयासमय रि
तादेखोनरहंवरें प्रळयाग्नितुल्यसत्वर चहूंकडूनधांवली १९ धडधडांजळाला

रथ पांचपांडव आश्चिर्यकरित धर्मभीमआणिपार्थ श्रीवल्लभागीपुसनीपैं
२० कांजळालास्वामीस्यंदन हास्यमुखेंबोलेराजीवनयन अर्जुनाचाध्वजावरीयाप्रा
ण अस्त्रदेवताजपतहोत्या २१ कार्यसरल्यावरीसमग्र आह्मींउतरलोंहरिह
र रागेंअस्त्रेंधावलींसमग्र रहंवरजाळिला २२ गांडीवचापअक्षयतूणीर पार्थे
कादिलीं होतींअगोधर त्यांचींज्याउतरलीनिर्धार कृष्णइच्छेकरूनियां २३
एवंसर्वज्ञजगज्जीवनेंरक्षिलें हेंपांडवांसपूर्णकळों आलें अभिमानसर्वांचेगळाले
अहंकर्तव्यपणाचें २४ सूत्रधारकसर्वेश्वर हेंप्रत्ययाआलेंसमग्र मगकृष्णास्त
वनअपार करितेजालेसंभ्रमें २५ आदिपुरुषापरात्परा सत्यज्ञानअगोचरा स
र्वरक्षकात्रिभुवनेश्वरा वेदशास्त्रांअगम्यतूं २६ अनंतजन्मेंतपकेलें तेंएकदां
चफळाआलें सोयराहोऊनयेवेळें सोयआमचीराखिली २७ करूनियांपुण्याचा
राशी बहुतदिवसभाकेंगोंविलासी नीचकर्महृषिकेशी सारथ्यतुवांअवलंबिलें
२८ तुझियाउपकाराचेंऋण आह्मींकोणेंकाळींहोऊंउत्तीर्ण पृथ्वीचेंपत्रकरूनजा
ण लिहितांगुणनसरती २९ ऐसीश्रीकृष्णलीलाअगाध पांडववर्णितांहोनीसद्ग
द मगत्यांसीहृदयींधरूनमुकुंद समाधानकरीत्यांचें ३० असापांडवयावरी राहि
लेदुर्योधनाचेशिबिरीं सर्वसंपत्तीनिर्धारीं घेतेजालेआनंदें ३१ यावरीतोजगन्निवा
स जाताजालाहस्तनापुरास रथींबैसोनपरमपुरुष धृतराष्ट्रासभेटला ३२ गांधा
रीसबोलाउन करीउभयांचेंसमाधान बहुतशास्त्रपध्दतीसांगोन मनत्यांचेंमाही
तसे ३३ पुढिल टाकूनकार्यभाग कांतथेंगेलाश्रीरंग नरिगांधारीपतिव्रताअभंग 

शापदेईलपांडवां ३४ जाळूनियांकरीलभस्म हेंजाणोनभक्तमनोभिराम तीचेंस
माधानपरम नानाप्रकारेंकरीतसे ३५ एकमुहूर्तपर्यंतजाणा गांधारीसआलीदुः
खमूर्च्छना मगसावधहोऊनत्याक्षणा पुत्रदुःखेंआरंबळे ३६ श्रीधरम्हणेंगां
धारी मीशिष्टाईसआलोंतेअवसरीं दुर्योधनासीसिकविलेंनानापरी परितो
नायकेकोणाचें ३७ मैत्रेयविदुरसत्यवतीनंदन शारद्वतभीष्मद्रोण बहुतांचें
नायकेवचन तरीपांडवांवरीदोषनाहीं ३८ आतांतुम्हींएकाएकावें पांडवआ
पलेम्हणावे तुम्हांदोघांचेकणवें धर्मशोककरीबहु ३९ अंबेसोवळीतूंपतिव्रता
पूर्ण पूर्वींबोलिलीहोतीसवचन जेथेंधर्मतेथेंजयकल्याण तेंवचनखरेंजालें
४० तोंजगद्गुरुपाराशरकृत प्रकटलातेव्हांअकस्मात त्यांचेंसमाधानकरित म्ह
णेंपांडवसुततुमचे ४१ श्रीकृष्णात्याप्रतीपुसोन वेगेंचालिलापिटितस्यंदन अन
र्थकरीलद्रोणनंदन म्हणूनजातत्वरेनें ४२ आलादेखोनजगज्जीवन आनंदले
पंडुनंदन श्रीरंगेंअवघेंवर्तमान जालेंतितकेंकथियेलें ४३ इकडेराजादुर्योधन
धुळींतलोळेदीनवदन केशपसरलेचहूंकडून तेस्वहस्तेंआकर्षित ४४ श्वासोश्वा
सघालूनबोलत हेअवस्थाकींमजप्राप्त तोंसंजयआलाधांवत स्वेदेंस्फुंदत
उभापुढें ४५ दुर्योधनबोलेदीनवदन माझींमायबापेंवृध्दपूर्ण कोणासजाती
लशरण आम्हांसपाळाम्हणउनी ४६ पहिलामाझालक्ष्मण नेठेवीयावरीकदाप्रा
ण अरेसंजयासांगेंजाउन गुरुकृनातिघांतें ४७ संजयजाऊनवनांत तिघांसी
सर्वकेलेंश्रुत मगकृतवर्माकृपयारकृत आलेधांवतबैसोनरथीं ४८ तोंदुर्योधन

पडिलारणमंडळीं मुर्छीसर्वांगींमाखली धूळी गदाघायेंतळमळी हुंकरेवळींक्ष
णक्षणा ४९ जादुर्योधनाचेंकपाळ केंशरकस्तुरिनें शोभेविशाळ तेथेंपार्थाचेंसायक
सबळ बैसोनरक्तवाहतसे ५० जोकुसुमशेजेचेकमलावरी भ्रमरमंचकींपहुडेमंदिरीं
तोगदाघायेंधरत्री वरीलोळतपडिलाहो ५१ जोअकराक्षोणीदळाचानाथ त्याभों
वतींभुतेंबैसलींबहुत भूतेंमांसवाटणींकरित पाहेतटस्थउगाची ५२ क्रिमिम
क्षिकाबहुततोडिती हातहालवावयानाहींशक्ती आहारेकर्माचीकैसीगती रुदत
पुढतींबोलतसे ५३ तोंतेतिघेजवळीयेउन स्फुंदस्फुंदोनिकरितीरुदन ह्मणतीदु
र्योधनातूंनिधान चालिलासकींयावरी ५४ लक्ष्मीहेपरमचंचळ मरिचीजलन्या
येंसकळ क्षणक्षणायेतोकाळ कैसानेईलकेधवां ५५ तवदुर्योधनबोलत तुम्हीं
पुरुषार्थकेलेअत्यद्भुत आह्मांजालोंदेवहत ऐकोनबोलतअश्वत्थामा ५६ हातचोळ
नसत्वर दशनीरगडिलेंअधर माझाशपथनिर्धार यावरीपरिसराया ५७ पांडे
वआणीपांचाळ यांचींशिरेंआणितोंनलगेवेळ हेंआतांचनकरींतत्काळ तरिमी
द्रोणजकदानव्हे ५८ दुर्योधनमनींहर्षला उदकाचाघटआणिवला अश्वत्थामाअ
भिषेकिला सेनापतीह्मणूनियां ५९ मगदुर्योधनाचीघेऊनआज्ञा तिघेगेलेपुढ
तीवना वटवृक्षातळींजाणा जाऊनियांराहिले ६० आतांयावरीगुरुसुत पांड
वशिबिरांतकरीलअनर्थ रात्रींजाऊनअकस्मात प्राणघेईलबहुतांचा ६१ ए
काचअध्यायामध्येंजाण गदापर्वसंपलेंसंपूर्ण पुढेंसौप्तिकपर्वगहन रसआतां
परिसिजे ६२ पांडुरंगब्रम्हानंद जोसाधकहृदयारविंदमिलिंद श्रीधरवरदप्रसिद्ध



घोषगाजेबहुतपैं ६३ सौप्तिकपर्वपावन श्रीधरमुखेंकरून बोलेलकैसेंरुक्मिणीर
मण ब्रम्हानंदेंपरिसातें ६४ स्फुरसपांडवप्रतापग्रंथ गदापर्वव्यासभारत त्यांतील
सारांशयथार्थ एकावन्नाव्यांतकथियेला १६५ श्रीकृष्णार्पणमस्तु श्रीमज्जगदीश्व
रार्पणमस्तु शुभंभवतु ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥

॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥

॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥



पां०प्र० श्रीगणेशायनमः मागेंगदापर्वसंपलेंदेख पुढेंआरंभिलेंसौप्तिक वैशंपायनव अ०
१ क्ताकृरेख. जन्मेजयाप्रतिसांगे १ गदाघायेंकरुन आरंबळतदुर्योधन सिथ्रजा ५२
लाजावयाप्राण परीआंगवणनसोडी २ एकादशाक्षोणीदळसंहारिलें कृतवर्माकृ
पाचार्यवहिले त्यांततिघेजणेउरले तिसराअश्वत्थामा ३ सेनापतित्वगुरुसुता
दुर्योधनजालादेता शपथकरुनितत्वता तिघेवीरनिघाले ४ इतुकाजालागतक
थार्थ पुढेंसावधऐकौतपंडित कर्णपितापावलाअस्त आंधारतेथेंपडियेला ५
पांडवसेनेसमीपजाण तिघेगुप्तयेउन जेंसेंधनाढ्याचेलक्षुनिसदन तस्करपा
ळतीपाहती ६ तोंविरांचाहोतगजर जयवाद्यांचानादथोर शस्त्रकादितीनलवा
र दीपिकाअपारदिसती ७ लागनचलेतेथेंकाहीं तिघेनिघालेलवलाहीं न्यग्रो
धतळींयेउनितेंसमयीं रथसोडिलेक्षणभरी ८ अंतरींचिंतनेंकष्टीबहुत सुयो
धनाचादुःखेंआरंबळत क्षतेंपडलींतेणेंसमस्त गात्रेंतिङकाह्मणिती ९ उतरों
नगेलारणमद पराजयाचापरमखेद ह्मणतीपांडवांचाअपराध ब्रह्मांडांतनसा
मवे १० वटवृक्षजैसापर्वत सहस्त्रशाखानीमंडित त्याखालीतिघेजणचिंताक्रां
त श्वासोश्वासटाकिती ११ संध्याकरुनक्षितीवरी तिघेनिजलेशेजारीं दुःख
निद्राते अवसरीं दोघांजणाआलीयां १२ कृतवर्माआणिगौतमनंदन निद्रार्ण
वीजालेनिमग्न परीकृपयासुतदुःखेंकरुन आरंबळतनयेनिद्रा १३ महासु
र्पजैसाधुसधुशीत तैंविवेळोवेळांश्वासटाकित घोरनिशीहोतांप्राप्त श्वापदें १
पक्षीवाहाती १४ पिंगळीयांचेकिलकिलाट शिवातेथेंभुंकतीसेराट उलूकांचेश
ब्दअचाट भुतांचेथाटहिंडती १५ बाहेरनिघालेमहाफणी मस्तकींझळकतीदिव्यम
णी यक्षपिशाचराक्षसिणी सैरावैराहिंडती १६ मिठ्याघालुनीरिस वृक्षींबैसले
सावकाश जान्हवीजळावरुनिप्राणेश स्पर्शीतळयेतसे १७ ऐशीतेनिशाकाळीं
कींकाळपुरुषाचीकांबळी कींकाजळाचीउटीघेतली पृथ्वीआणिआकाशें १८ जा
गातेथेंद्रोणसुत तोंत्यावटावरीनिद्रस्थ सहस्त्रकागकुटुंबासहित सुखेंकरुनी
असती १९ तोंतेथेंआलादिवाभीत परमविशाळअतिउन्मत्त वृक्षावरीवेगेंचढत त
स्करगतीनेंतेधवां २० उलूकेंख्यातीकेलीतेक्षणीं सहस्त्रकाकांचामानामोडुनी वृक्षा
तळींटाकुनीं गेलानिघोनीक्षणार्धें २१ द्रोणीतटस्थपाहेतेवेळे ह्मणेएकेंसर्वसंहारि
ले हेंआह्मासगुरुत्वजाहलें दीक्षाआतांहीचकरुं २२ त्यादोघांसजागेकरुन आतां
उगनलावावास्तण उलूकगुरुयेउन दीक्षाआह्मासदिधली २३ पांचाळआणि
पंडुकुमर यांचाऐसाचकरीनसंहार चलानलगतांक्षणमात्र संहारुनयेउंत्यांसी
२४ मगह्मणेशारद्वत नकळतकेंविकरावाघात क्षत्रियधर्मयेथ कोठेउरेलसां
गपां २५ गुरुसुतह्मणेतेवेळां तींहींधर्मकोठेंसांभाळिला याऐशादुष्टांसकळा गु
प्तरूपेंमारीनमी २६ कृतवर्माह्मणेनिश्चित लोकहसतीलसमस्त गुरुपुत्रदुष्टय
थार्थ केलाघातनिद्रस्थांचा २७ अश्वत्थामाह्मणेबोल तुमचेवाटतीविशाळतुल्य
पूर्वींम्यानिश्चयअटळ केलातोतुह्मीजाणताकीं २८ पांचाळपांडवमारितांसाच
नकोटीकदाअग्निकवच दुर्योधनाचेप्राणपांच तळमळतीत्याहिलोकीं २९ पृ
थ्वीपतीदुर्योधनवीर त्याचामस्तकींचादिव्यकोटीर भीमेहाणोनीलत्ताप्रहार के

साचूर्णकेलासांगणां ३० त्याचामस्तकींपददेउन मर्दूनतेणेकेलाचूर्ण मांझ्यांवरी
गदाहाणुन अधमेंकेसेंमारिलें ३१ परमक्रोधेंगुरुसुत कडकडांदंतखात ह्मणें
तुह्मींबैसायेथ एकलातेथेंजातोमीं ३२ रथारूढहोउन वेगेंचालिलागुरुनंदन
मगतेहींदोघेजण सरसेंचजातेजाहले ३३ मनासमागेंटाकुन शिबिराजवळीजा
उन उभेंठाकलेजाण तिघेहीकाळतेधवां ३४ सकळसेनानिद्रस्थ कोणीजा
गेनाहींतेथें एकपाथेंवळीदेउननहंत माहारुद्ररक्षापिलाअसे ३५ परमस्वरूपभयं
कर कृतांताऐसेंपसरिलेंवक्त्र केशऊर्ध्वपिंगटशरीर भस्मचर्चिलेंसर्वांगीं ३६
सिंदुरगंगावाहत तैसीजिव्हालळलळीन त्रिशूलादिआयुधेंसमस्त भयंकरझळ
कति ३७ विश्वग्रासीलसंपूर्ण ऐसेंपसरिलेंतेणेवदन महद्भुततेंदेखोन अश्व
त्थामादचकला ३८ ह्मणेहेंतोंआलेंविघ्न महद्भुतअत्यंतदारुण मगसोडिताजा
लाबाण अतितीक्ष्णतेजाळ ३९ जाबाणघायेंकरुन महानगहोतीलचूर्ण तेश
रतलगतांक्षण मुखपसरुनिगिळीतसे ४० शरनदीचेपूर गिळिताजालाशंकर
तूणीरसरलासमग्र गुरुपुत्रनटस्थराहे ४१ शक्तीटाकिलीदारुण तीहीचूर्णके
लीचाउन गदादिलीभिरकाउन तेहीगिळिलीतेधवां ४२ खड्गहाणेसुभट ते
हीदंतानेकेलेंपिष्ट गुरुसुतपरमधीट नानाशस्त्रेंवर्षतसे ४३ द्रोणिचेपाठि
सीभयाभीत कृतवर्माआणिशारद्वत अश्वत्थामाचिंताक्रांत ह्मणेहेंभूतकैंचिआव
रे ४४ म्याअधर्ममांडिलादारुण ह्मणोनहेंप्रगटलेंविघ्न मजवारितहोतागोतम
नदन परिम्याऐकिलेंनाहीं ४५ मगअद्भुतशिवस्तवन करिताजालागुरुनंदन

ह्मणेहेंकाळरूपविशाळवदन काळात्मियाकाळरूपा ४६ हेभवभवांतकाभवनी
वरा भाळलोचनभस्मासुरहरा भस्मोद्धूलितभयंकरा भद्रकारकापशुपती
४७ त्रिगुणातीतत्र्यंबका त्रिशूलधारणात्रिपुरांतका त्रिदोषरहितात्रितापमोच
का रूपाकरीयेवेळे ४८ कामांतकाकामरहिता विरूपाक्षाक्षयवर्जिता दक्ष
मखविध्वंसकाअपरिमिता गजास्यजनकागजारे ४९ यक्षाधिपमित्रामृडानीशा
मृत्युंजयस्मशानवासा वामदेवानागभूषा अंधकप्राणमोचका ५० भूताधिपती
विश्वेश्वरा विश्वपाळकामहत्पापहरा अनादिसिद्धादुष्टसंहारा विश्वव्यापकाज
गद्गुरो ५१ ऐसेंस्तवनकरुन वेदिकात्यापुढेंनिर्मून करिताजालाहवन महारुद्रमी
त्यर्थ ५२ तोंभुतांचेअपारपाळे भयंकररूपेंमुखविशाळे हाकादेतीपसरितीआ
वाळे चालितीत्याकडेपाहावेना ५३ गुरुसुतदाकितआकुती ह्मणेजयजयशंकर
उमापती आतांह्यावेदीमध्येंपूर्णाहुती माझीटाकितोंभक्ताका ५४ सरसावलागुरुनंदन
उडीटाकितोहेजाणोन प्रगटलातेथेंउमारमण पंचवदनदशभुजजो ५५ मगकांहीं
जालाप्रसन्न यावरीबोलेगुरुनंदन म्याजेंआरंभिलेंकारण सिद्धीपाववीसमस्त
५६ यावरीबोलेकैलासपती सिद्धीपावेलधरिलेंचित्तीं दिव्यखड्गदिधलेंहातीं कृ
तांतजिव्हेसारिखें ५७ पायवंदुनिसत्वर पुढेंगेलेनिर्घनस्कर शारद्वतकृतवर्माद्वार
रक्षितितेव्हांसादरें ५८ गुरुसुतह्मणेंअवधारा जोबाहेरनिघेलत्यासमारा पाहूनका
ळहातेथोरा मगटसंहारासर्वेही ५९ जैसीधर्मधेनुवरी गळांबैसेवक्रसुरी झगटमी
कळीहोयगायत्री तेचिपरिकरातुह्मीं ६० ऐसेंत्यांप्रतिसांगोन आंतप्रवेशलाद्रोणनंदन

जैसामूषकबिळींअहिदारुण घुसधुसीतसंचरला ६१ कींकुरंगनिद्रस्थअसतां ते
थेंव्याघ्रआलाअवचिता कींशुष्कतृणपर्वतां ज्वाळमाळीजाळित ६२ मत्स्यांचा
कोगराएक विभांडिननिघेएकबक तैसातोगुरुसुतदेख आधींशोधितधृष्ट
द्युम्नाप्रति ६३ जाशिबिरींहांताधृष्टद्युम्न तेथेंचगेलागुरुनंदन लत्ताप्रहारहाणोन
केशींधरोनजागाकरी ६४ घाबिरापाहेगुरुसुत तोकाळरूपीद्रोणीदिसत आपु
लेगळांपाशघालित येरुयेतकाकुळती ६५ ह्मणेहेआचार्यपुत्रअवधारीं मज
आतांशस्त्रानेमारीं आपदाकरुनकोयेअवसरीं बोलेयावरीगुरुसुत ६६ त्वांगुरु
हत्याकेलीपापमती तुजकैंचीउत्तमगती धृष्टद्युम्नाचायुवती जाग्याझाल्यातेध
वां ६७ शोककसमस्तपळती नितंबिनीवक्षस्थळेंबडविती गळांपाशघालुनिक्षिती
मारूनियांटाकिला ६८ ऐसेंघोरकर्मकरुन तेथूननिघालाकृपयानंदन धृष्टद्यु
म्नाचास्त्रियामिळोन माहांशब्दगाजविती ६९ लोकजागेजालेसमस्त द्रोणीधृष्ट
द्युम्नाचारथींबैसत मगउत्तमौजासमारिलेतेथ क्षणमात्रनलगतां ७० विधा
मन्युधांविलातेथें गदाघायेंहाणित येरेंखड्गकाढूनीशिवदत्त तोहीक्षणांतमा
रिला ७१ आणीकनिजलेहोतेपांचाळ तेतेथेंचमारिलेतत्काळ सहस्रांचेसह
स्त्रसकळ संहारिततेधवां ७२ हत्तीघोडेपायदळ संहारितजायसकळ खड्
गधारातेजाळ घायेंउरीनउरेची ७३ जैविरूपीकारकूणसेंजाण तैसींचशिरेंद
कींछेदुन तोंद्रौपदीचेपंचपुत्रधांवोन शस्त्रेंघेउनीभांडती ७४ प्रतिविंध्याश्रुतसो
म श्रुतकर्माशतानीकनाम श्रुतसेनपांचवापरम युद्धकरितांतेधवां ७५ शि

३

खंडीउठलातिकडुन तेणेयुद्धकेलेंएकक्षण परितोकाळगुरुनंदन त्यावरीखड्गहा
णिलें ७६ शिखंडीचेंशिरकमल खड्गेंछेदिलेंतत्काळ तरीपांचहीतेद्रुपदीचेबाळ
अनिवारभांडती ७७ तेप्रतिपांडवधैर्यउनिप्रास युद्धकरितीआसमास सकळश
स्त्रेंतामस छेदितांजालाएकदांची ७८ रथाचींचाकेंघेउन टाकितीद्रुपदीचेनंद
न आणीकशस्त्रेंदारुण वर्षतेजालेअपार ७९ परीतोकाळरूपीद्रोणी पांचहीमा
रिलेतेक्षणीं शिरेंटाकिलींछेदुनी नाळविरहितजेविकमळें ८० सोमकराजेप
वित्र विराटाचेकित्येकपुत्र एवंमारिलेसर्वत्र कोणीउरलानाहींच ८१ पांडवांचे
रक्षक नानापरीचेसेवक कोणीउरलानाहींहाक फोडावयाकारणें ८२ निजल्यास
ईमारिलेफार तोंमोकळेसुटलेकुंजर रगडीतचालिलेजिवमात्र तुरंगसहित
धांवती ८३ प्रेतेंपडलींअपार भूतावळीधांवल्यासमग्र मांसग्रासतीसत्वर
मिटक्यादेतांभक्षितां ८४ मनुष्यांचीकाढुनीआंतें आग्रहेंदेतीएकमेकातें आ
नंदेंकरूनितेथें हाकादेतीएकदांची ८५ इकडेकुंजरमातलेबहुत शिबिरेंमो
डुनीजीवरगडित शुंडेनेस्यंदनभिरकावित कित्येकत्याचघायें ८६ कज्जलेंब्र
ह्मांडगोळचर्चिला तैसाघोरआंधारपडला त्यांतसवेंगवायुसुटला धुरोळानिघो
डनगणवे ८७ कित्येकउरलेनिश्चिती तेआपल्याआपणचिमारिती पुत्रासमीप
तोळखती हाणितीपाडितीपृथ्वीवरी ८८ कोणीशिबिराबाहेरनिघत तोकृतव
र्माआणिशारद्वत शस्त्रघायेंसंहारित जालाअंतसर्वांसी ८९ मगशिबिरासला
विलाअग्न उजेडेंमारिलेअवघेजण रक्तानेनिम्नगाभरुन लवणपाहूनधांव

ती ९० प्रेतेंपडलींबहुत धरणीरितीनदिसेतेथ एकह्मणतीयेथ राक्षसयेउनपडि
येलें ९१ भुतेंझोटिंगधांवती रक्तमज्जामांसभक्षिती एकएकाचेंहातिचेंघेती
हिरोनियांविनोदें ९२ पांडवनवतेतेस्थळीं अगाधजाणोनिवनमाळी कटकाबाहेर
एकांतस्थळीं शिबिरएकदिधलेंहोतें ९३ तेथेंपांडवसात्यकीश्रीकृष्ण विचारींबैस
लेसातहीजण कींतेसमरऋषीनिर्वाण. एकांतगुहेंतबैसले ९४ लीलाविग्रहीश्रीध
र तोचअवघेंनाचवीसूत्र एवंवाचलेपंडुपुत्र वरकडसंहारजाहला ९५ सातक्षौ
णीदळ संहारोनिगेलेंसकळ आपणासहितसातनिर्मळ उरउनिठेविले ९६ अ
सोइकडेतिघेजण एकत्रहोउनीगेलेनिघोन स्यंदनावरीबैसोन पवनवेगेंचा
लिले ९७ कलीकर्मेंतींनिश्चिती एकएकाप्रतिसांगती इकडेदुर्योधनपापमती का
सावीसहोतसे ९८ हातपायखोडित परीप्राणनजायत्वरित तोंतिघेपातलेअकस्मा
त रक्तेंचर्चितसर्वांगा ९९ शिबिरांतनसतांपंडुनंदन निजलेयाआलेमारुन जैसेंसंग्र
न्यघरींवाण नेउनियांदिधलें १०० असोदुर्योधनत्यासिदेखत आलापरमहर्षयुक्त
तिघेवृत्तांतसांगत संहारिलेसर्वही १ एकपांडववेगळेकरुनी उरलानाहींतेथेंको
णी पांडवकोणतेस्थानीं पळोनगेलेकळेना २ शोधिलींसर्वस्थानें परीतेकादु
निनेलेश्रीकृष्णें सांपडतेंतरीतत्क्षणें मारुनियाकितों ३ दुर्योधनपहुडलासितीत
ळीं जवळीगदाविशाळपडली जैसीकांताजीपहुडली पट्टराणीप्रातीतें ४ त्यांक
डेपाहेंदुर्योधन ह्मणेमीआतांसोडीनप्राण माझेंजालेंसमाधान उत्तमकार्यतुह्मीं
केलें ५ तोंतेतिघेजणह्मणती धन्यतूंदुर्योधनक्षिती पांडवपरमपापमती तुजऐ

धर्मेंमारिलें ६ तूंजातोसस्वर्गलोकसदना तुझावियोगदुःखसोसवेना आह्मासप
र्थ्वीतवदेइना यावरीऐसेंवाटतें ७ आह्मीपापकेलेंदारुण निजलींआलोंमारुन
पांडवांभयेंरान आह्मीकोणतेंघ्यावेंआतां ८ तूंजासीलस्वर्गाप्रती तुजभीष्मद्रोण
कर्णभेटती आह्मीसर्वमारिलेंहीख्याती सांगत्यांप्रतीतत्वतां ९ त्यांचेउरलेंसात
आह्मीतिघेउरलोंयेथें दुर्योधनह्मणेमनोरथ माझेपूर्णतुह्मीकेले १० यावरीति
घेबोलिले आमचाकष्टचेंसार्थकनजालें तूंवांचतासयेवेळे तरीसर्वबरेंहोतें
११ तिघांचेनेत्रींअवधारा स्रवत्याअश्रुचियाधडुधारा हाहादुर्योधनानृपवरा
जातोसआह्मांटाकोनियां १२ ऐसेंबोलतीतिघेजण तोंसुयोधनेंवटारिलेनयन
हुंकारुनिसोडिलाप्राण हरिस्मरणकेंचेंत्यासी १३ त्रिभुवनीचानरकसार करुनिघा
तिलाएकत्र कृष्णाहूनपाहुराचार त्याचामुखींनामकैंचें १४ संजयह्मणेकुरुनाथा
मीसर्वपाहोनआलोंआतां तुमचीक्रियातत्वता तुह्मासफळाआली १५ सौप्तिक
पर्वसमाप्त येकाअध्यायांतजालेंयेथें पुढेंअसिकपर्वपंडित श्रवणकरोतआ
दरें १६ ब्रह्मानंदपंढरीनाथ श्रीधरवरदअद्भुत तोजेकर्णींसंगत तेंचियेथेंलिहिलें
असे १७ स्वरसपांडवप्रतापग्रंथ सौप्तिकपर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ
वाचन्ताव्यांतकथियेला १८ इतिश्रीपांडवप्रतापसौप्तिकपर्वद्विपंचाशताध्यायस
माप्तः ॥

अ०५३
अश्वत्थामा
श्रीव्यास
श्रीमहादेव
माधव
अर्जुन

श्रीगणेशायनमः श्रीसरस्वत्यैनमः जयजय क्षीराब्धिहृदयविहारा मत्स्यरूपियावेदोद्धा
रा महाकपटियाशंखासुरा वधूनधर्मवाढविला १ मंदरागिरिधरूनिपृष्ठीवरी चतु
र्दशरत्नेंकाढिलींक्षीरसागरीं कूर्मवेशधरूनमधुकैटभारी भक्तकैवारीतूंसाच २ रसा
तळासृष्टिजातां सकलदेवांधांवाकरितां वराहवेषपरमानाथा पृथ्वीदंतावरीधरियेली ३
स्तंभभेदूनएकसरां विदारिलेंमहाअसुरा प्रल्हादरक्षकासर्वेश्वरा नरहरीवेषधारका ४
दानेंतपेंव्रतेंवळी त्यापारसीयाचकतूंवनमाळी त्रिभुवनतुवांआटिलेंपायांतळीं वामनवे
षाकमळेशा ५ सबकसदनूपृतनानाहीं तीनसप्तकेंनिर्वरमही करूनसर्वदातूंविजयी
अद्यापीपाहींनादरी ६ वधूवणबंधदशास्य वंदीघातलेत्रिदश मगवांधरूनरामवेष
अदितीपुत्रसोडविले ७ तोचितूंआनकदुंदुभीसुत द्वारकाधीशमन्मथतात तांडवदाख
ऊनअद्भुत पांडवरक्षिलेनिजबळें ८ कलयुगींलोकधनाढ्य जाहींजवळीरक्षिलेकाम
क्रोध तयासीतूंनबोलसीबोध्य लीलाअगाधदाखविसी ९ पुढेंम्लेंछमाजतीलदारुण
टाकितीसत्कर्मधर्ममोडून मगतूंकल्कीवेशभगवान तुरंगवहनीप्रकटसी १० तोचितूं
सर्वेशभीमातीरीं दोनीकरठेऊनिकटावरी अद्यापीनादरीपंढरीं ब्रह्मानंदाजगद्गुरू
११ मागेंपर्वसंपलेंसौप्तिक पुढेंनावऐषिक वैशंपायनवक्तासुरेख जन्मेजयाप्रतिसां
गे १२ कृतवर्माअश्वत्थामाशारद्वत हेनिशीमाजीकरूनगेलेअनर्थ जालादुर्योधनाचादे
हांत इतकागतकथार्थजाहला १३ पांडवसेनामारिलीसमस्त धृष्टद्युम्नाचासारथीउ
रलातेथें तोअट्टहास्यगर्जनाकरित गेलाधांवतपांडवांपासीं १४ ह्मणेउठाउठारेसत्व
र जळोतुमचाएकांतविचार इकडेआकांतजालाथोर कुलसमग्रसंहारिलें १५ कृतव 

र्माकृपाचार्यद्रोणसुत तिघानींयेऊनकेलाघात पंचकुमरआणिसेनानाथ धृष्टद्युम्नमा
रिला १६ शिखंडीआदिथोरलहान सेनाटाकिलीसंहारून सर्वशिबिरालाविलाअग्न
चतुरंगदळसंहारिलें १७ मीएकुलाचुकलोंमरणा धांवलोंकरितगर्जना उठाउठाभीमाअ
र्जुना सर्वयशबुडालें १८ ऐसेंऐकताधर्मभूपाळ धवधवांपिटीवक्षस्थळ मूर्छनायेऊन
तत्काळ पडोनउठेमागुती १९ अट्टहास्येंरडेभीमसेन आक्रोशेंहाकफोडीअर्जुन नकुळ
सहदेवदोघेजण कपाळधरणीआपटिती २० श्रीकृष्णासहितपंडुसुत शिबिराप्रतीधांवत
तोंप्रेतेंहोऊनसमस्त पडिलेआप्तपुत्रमित्र २१ नकुळेंघेऊनियांरथ उपलव्यागेलाधांवत
द्रौपदीसुभद्रास्त्रियासहित घेऊनआलात्वरेनें २२ द्रौपदीसकळानंदीमात रथपवनवेगेंपि
टित पांचाळीसुभद्रापुसत कायवृत्तांतसांगाआह्मां २३ येरूह्मणेचलासत्वर वर्तमानकळे
लसमग्र श्रीरंगभगिनीसकुमार चिंतानळेंआहाळली २४ शिबिराजवळीआलारथ कानीं
एकिलाएकचीआकांत समाचारकळलासमस्त पुत्रबंधुपडियेले २५ गडबडांलोळेयाज्ञ
सेनी ललाटआदळीमेदिनी मृत्तिकाघेऊनघातलीवदनीं भीमदृढधरीतीतें २६ वक्षस्थ
ळपिटोनद्रुपदकुमारी धर्मरायाआतांराज्यकरी निर्वंशकेलीधरत्री करींएकछत्रीराज्यकीं
२७ प्रतिविंध्यादिपंचकुमर कोठेंदाखवामाझासौभद्र कोठेंआहेतोघटोत्कचवीर पुत्रमाझा
दावाकां २८ कोठेंधृष्टद्युम्नपाढिराखा दाखवाद्रुपदमाझियाजनका हेंदुःखरूपराज्यदेखा
पहावेनासर्वथा २९ द्यावयासआह्मांसतिळांजुळी कोणीउरलानाहींएकेमूळीं कायपाहसी
कृष्णवनमाळी अंधारकुळींपडियेला ३० पांडवांचेंहृदयपाहें मजवाटतेंवज्राऐसेंआहे अ
र्जूनकांतुझ्याहृदयाद्रवनये पाहतोसकायचहूंकडे ३१ सुभद्राशोकेंव्याकुळ ह्मणेसातजण

माझेबाळ त्यांतएकतरीनिर्मळ वदनत्याचें पाहेनमीं ३२ द्रौपदी ह्मणेआपला प्राण आ
तांचमीयेथेंदेइन महाविषभक्षिन घालूनघेईनगळपाश ३३ निद्रिस्थसांडूनकुमर कायक
रावयागेलाविचार तुमचाविचारेंसमग्र कुळक्षयजालाकीं ३४ समरंगणीं पडते बाळक तरी
मजइतकानवाटताशोक शिबिरांतकोंडूनदेख केसेनिद्रिस्थमारिले ३५ धुंडाळितांहें त्रिभुव
न अभिमन्याऐसेंनाहींरत्न येउत्तरेचेंवदन कुंकुमहीनकेविपाहूं ३६ तोअश्वत्थामाचां
डाळ बाळहत्यातेणेंकेल्यासकळ त्याचेंशिरछेदूनतत्काळ उठाआणाआतांची ३७ नाहीं
तरीजिव्हाछेदुन येथेंचआह्मीं देऊंप्राण ऐसेंएकताभीमसेन क्रोधेंकरूनउठिलापैं ३८
भीमबैसलारथीं नकुळजालासारथी मगबोलेकमळापती पार्थाप्रतीतेधवां ३९ ब्रह्म
शिरास्त्रदारुण अश्वत्थामादेईलटाकुन तेव्हांकेचाउरेलभीमसेन भस्महोयीलक्षणा
र्द्ध ४० तरीअर्जुनाधांवसत्वर बैसावयानाहींरहंवर मगश्रीकृष्णरथींसुभद्रावर धर्मराजही
बैसला ४१ धुरेवरीबैसलाइंदिरावर भीमासआटोपीतसत्वर तोनाटोपेवृकोदर पवनवेगें
धांवतसे ४२ तोंजान्हवीचातीरीं व्यासदेवदेखिलेतेअवसरीं ऋषिमंडळी निर्धारीं भों
वतींतेव्हांविराजती ४३ व्यासाचेपाठीलपोन बैसलासेद्रोणनंदन भीमासदुरूनदेखोन
भयाभीतजाहला ४४ पाहूनभीमाचाआवेश वाटेयेतोकाळपुरुष भीमेंहांकफोडिलीवि
शेष तेणेंब्रह्मांडगर्जिलें ४५ मगक्रोधायमानगुरुपुत्र काढिलेंनिर्वाणीचेंअस्त्र ज्याचेंनिवा
रणहरिहर विधिपुरंदरकरूंनशकती ४६ तेंअस्त्रद्रोणपुत्रासदिधलें जरीबहुप्राणसंकट
पडिलें तेचवेळेहेंसोडवहिलें कार्यचिंतिलेंकरणार ४७ तेंअस्त्रद्रोणीजपोन ध्यानमंत्रन्या २
सकरून मगदर्भशिखाघेऊन संकल्पकरूनसोडित ४८ ह्मणेहेंमहाप्रळयास्त्र येणेंसंहा

रोतपांडवसमग्र त्याचेपोटींअसेलसाचार गर्भजरीकोणीही ४९ गर्भांतअसेलजरि
पुरुष तोहीयाअस्त्रेंपावेलनाश मगतोदर्भसोडितानिःशेष चपळेऐसाचालिला ५०
श्रीरंगह्मणेअर्जुनासी त्वराकरींकायपाहसी संकटपडिलेंभीमासी ऐसेंअस्त्रयेतसे
५१ ब्रह्मशिरोनामअस्त्र तूंसांडीआतांसत्वर तेणेंचापालाऊनशर त्याचप्रकारेंसोडिलें
५२ प्रळयकरितजाततेक्षणीं दोनींअस्त्रेंमिळालींगगनीं त्यातेजावरतेशेषतरणी बुचक
ळ्यादेऊंलागले ५३ प्रळयींचाविजासहस्त्र एकदांचकडकडिल्यासाचार तैसीं अस्त्रेंमि
ळालीं एकत्र प्रळयथोरवर्तला ५४ ब्रह्मांडतडाडिलें तेकाळीं नवखंडें कंपितझालीं स
मुद्राचीउदकेंतापलीं उकडोंलागलींजळचरें ५५ सप्तपाताळेंहडबडिती भोगेंद्रसोडूंपा
हेक्षिती मेरुमंदारआंदोळती मुनीभावितीअंतजाला ५६ व्यासदेवबोलेतेसमयीं अ
स्त्रेंआवरारेदोघेही हींमनुष्यावरीसहसाही सोडूंनयेतत्वता ५७ पार्थह्मणेस्वामीस
मर्था तुह्मीआज्ञामाझियामाथा महाअस्त्रक्षणनलगतां आवरोनियांआच्छादिलें ५८
परीद्रोणपुत्रासिजाणा द्रोणास्त्रकदाआवरना उपायकेलेनाना आटोपेनाकदाही ५९
द्रोणीह्मणेभीमभयेंकरूनी म्यासक्रोधेंसोडिलेंसंकल्पुनी परिहेंकदामाझेनी सहसा
हीआटपेना ६० म्यांपापेंकेलींबहुतजाणा हेंअस्त्रमजआटोपेना अस्त्रआटोपेलअ
र्जुना पुण्यवंतह्मणउनी ६१ तरिमाझेंअस्त्रअनिवार गर्भाचिआदिकरूनसमग्र उरोंने
दीपांडवसाचार हानिर्धारचुकेना ६२ मगबोलेगोविंद विप्रानींदिधलाउत्तरेसीआशि
र्वाद यद्वांतींदिव्यपुत्रप्रसिद्ध परिक्षितीनामेंहोयीलपैं ६३ द्रोणीह्मणेंमाझेंअस्त्र उप
लव्यासजायीलसत्वर नलगतांहीक्षणमात्र गर्भच्छेदीलउत्तरेचा ६४ मगह्मणेंचक्रपा

णीं तूंबाळहत्यारापापखाणी तीनसहस्त्रवर्षेंघोरवनीं पिशाचहोऊनविचरेपैं ६५ तु
जभरेलगलितकोष्ट पूयश्रोणींतवाहेलयथेष्ट तूंहोसीलकर्मभ्रष्ट कोठेंठावनमिळेतु
तें ६६ कोणीसत्पुरुषब्राह्मण त्यांचेंतुजनहोयदर्शन जेसंदीपाचेपोटीं काजळरूलक्षणें
द्रोणउदरींतैसातूं ६७ पांडवांसमीआहेंरक्षक तूंत्यांसकायकरिसीमशक घुंघुरडेंकोप
लेजरीनिःशंक तरीपर्वतकेविंगिळवे ६८ आताउत्तरेचाळदिरीगर्भ तरीत्यासरक्षीनमी
पद्मनाभ गोकुळरक्षिलेंस्वयंभ प्रळयशिळावर्षतां ६९ द्वादशगांवेंलागलाअग्न मीगि
ळनरक्षिलेगोकुळजन प्रल्हादगांजितांदारुण म्याचरक्षिलानानापरी ७० परिक्षितीरक्षीन
नीनापरी तरीचमी भक्तसाह्यकारी साठसहस्त्रवर्षेंनिर्धारीं राज्यकरीलपुण्यपुरुष ७१ कृपाचा
र्यापासोन पावेलविद्यासंपूर्ण उपजलानसतांजाण भविष्यकेलेंजाणहें ७२ व्यासनार
दश्रीकृष्ण ह्मणतीमणीदेमाथांचाउतरून अर्जुनासयेईंशरण वांचवीप्राणआपुला ७३
मगबोलेगुरुनंदन तरितोमणीमाझाकेवळप्राण सर्वरक्षकबहुतगुण नवर्णवतीतया
चे ७४ मणीमाथांचादेनाजाण माझाशिरच्छेदकेलापूर्ण मगअर्जुनासजयकल्याण सह
जचीप्राप्तजालें ७५ मगपार्थंबाणसोडुन मणीमस्तकींचाघेतलाछेदून सीमंतकमणी
समान कींकौस्तुभदुसरापैं ७६ पिशाचहोऊनगुरुसुत गेलउत्तरदिशेप्रतीरडत ब्रह्म
राक्षसहोऊनहिंडत श्रीकृष्णशापेंकरूनियां ७७ सर्वांगींकुष्टगळतें दुर्गंधीसुटलीअ
रण्यात मणी छेदिल्यातेथूनस्रवत पूयश्रोणीतसर्वदा ७८ नव्हेसत्पुरुषांचेंदर्शन न
मिळेराहावयाएकस्थान असोइकडेपंडुनंदन विजयीहोऊनपरतले ७९ तोमणीदि
व्यघेऊनी देतेजालेयाज्ञसेनी पांचहीजणमिळोनी समाधानकरितीतियेचें ८० धनं

जयह्मणेहोद्रौपदी अश्वत्थामामारितोंयुद्धीं परितोकदाकाळींकुबुद्धी चापहातींधरीना
८१ लपालाव्यासाचेपाठिसीं उभानराहेयुद्धासीं मगमणीछेदूनत्यासीं रमानायकेंथापि
लें ८२ यावरीतोद्रौपदीनेमणी दिधलाधर्मरायालागुन मुकुटींबांधिलातेचक्षणीं धर्म
राजेंतेधवां ८३ धर्मह्मणेजीचक्रपाणी त्रिपुरवधींदेउनी रुद्रस्थापींपाकशासनी आवाह
नूनिमूर्तिमंत ८४ तेरक्षणअसतांमह्क्षुन केसाप्रवेशलागुरुसुत हरिह्मणेएकबहुत त
णेंकेलींशिवासीं ८५ करूनस्तवनहवन पूर्णाहुतीचसमयींजाण आपलेंदेतोबळिदान
शिवप्रसन्नजाहला ८६ तेणेंत्यासीखड्गदिधलेंअद्भुत मगतेंघेऊनगुरुसुत निजेलसंहारीस
मस्त दुष्टकुबुद्धीदुरात्मा ८७ द्रौपदीचेंसमाधान करितीबहुकृष्णार्जुन ह्मणतीअश्वत्था
मागुरुनंदन आणिब्राह्मणत्यावरी ८८ आणिहोयचिरंजीव त्यासमारूनशकेवासव ज
गद्गुरुव्यासदेव तेणेपाठिसींघातला ८९ हातींनधरीधनुष्यबाण दिधलेंशिवास्त्रसोडून
मगमस्तकींचामणीप्रभाघन घेतलाछेदूनबळेंची ९० शिरच्छेदाहूनआगळेंजाण दुःखजा
लेंत्यासहिगुण मणीकाढिलातेथून पूरक्तश्रवसदा ९१ तरीआह्मींमणीघेतलाबळें तेव्हां
चत्याचेंशिरच्छेदिलें ऐसेंबोलोनतेवेळे बुझाविलेंपांचाळिसी ९२ ज्ञानीपाहेशतपत्रनेत्र
तोंगुरुपुत्रेंसोडिलेंअस्त्र तेउत्तरेचागर्भपवित्र छेदावयाधाडिलें ९३ उपलेंव्याहूनउत्त
रादेवी आणिलीहोतीसवेंतपूर्वी परिअस्त्रशोधितउर्वी तियेजवळीपातलें ९४ तवतो
जगव्यापकपरमपुरुष जाणमुर्गाचेंहीमानस लीलाविग्रहीआदिसर्वेश तीचागर्भी
प्रवेशला ९५ अंगुष्टमात्रपुरुषहोउन शंखचक्रगदाघेउन किरीटकुंडलेंमंडितजाण
धरिलेंस्वरूपतेणेंहें ९६ उत्तरेचागर्भांतप्रवेशोन हातींघेऊनसुदर्शन घरटीघालीभग

वान मनमोहनरूपत्याचें ९७ तवतोगर्भपुण्यवंत अभिमन्युचेंदिव्यरेत आठवामासपूर्ण
तीसमाप्त आनंदभरितउत्तरा ९८ गर्भांतीलपुरुषपरमज्ञानिया ह्मणेमजअस्त्रआलेंमा
रावया परियेथेंहाकोणरक्षावया मजकारणेंपातलारे ९९ जिकडेजिकडेफिरेभगवंत ग
र्भातिकडेपाहेपरिक्षित अस्त्रभयविसरलासमस्त न्याहाळीतपरमपुरुष १०० गदाहातीं
घेउन अस्त्रावरीधांवेभगवान् एवंअस्त्रनिष्फळकरुन टाकीतिलनक्षणाई १ सवेंचि
भगवानजालागुप्त गर्भचहूंकडेन्याहाळित ह्मणेमजहोतारक्षित तोंकोणीकडेगेलापें २
मगउत्तराजालीप्रसूत बाळसूर्याऐसाउपजलासुत परीबाळपरिक्षाकरित वदनेंन्या
हाळीतसर्वांची ३ जोंकोणीदृष्टीपडे न्याहाळूनपाहेत्याकडे ह्मणेमाझेंवारिलेंसांकडें
कोणीकडेआहेतो ४ भोंवतारक्षिलानिश्चित नावठेविलेंपरिक्षित जोआजानबाहूदिव्य
वंत अभिमन्युदुसरापैं ५ त्याचेजन्मकाळींसोहळा धर्मराजेंबहुतकेला वरुधामरतेवे
ळां सुखीकेलेसर्वदानीं ६ द्रौपदीसुभद्रायेउन बाळपाहतीआनंदघन तोंबाळासनाहीं
दुसरेंध्यान पाहेन्याहाळूनसर्वांकडे ७ आल्यागेल्यावरीपरिक्षित जडलाहरिरूपींसदोदि
त पांडवआश्चर्यकरित ह्मणतीहद्गतकाययाचें ८ सर्वांचीपरिक्षाकरित नेणवेकोणास
धुंडित असोपुढिलकथार्थ समयोचितकथियेला ९ सिंहावलोकनेंकरुन परिसामागी
लअनुसंधान धृतराष्ट्रगांधारीजाण शोकार्णवीपडती १० तेथेंनानाप्रकारेंकरुन संज
यकरीसमाधान आश्रिकपर्वयेथुन एकाचअध्यायींसंपलें ११ पुढेंविशोकपर्वसंपूर्
णें श्रवणकरोतपंडितजन जेंजेंबोलेवैशंपायन तेंचयेथेंकथियेलें १२ दंतकथासांडूनस
कळा व्यासभारतआश्रयधरिला मणवजाकथानिर्मळा निरोपिल्यात्याचयेथें १३ सां






तीलकथानाहींसोडिली दंतकथानाहींदुसरीयोजिली प्राकृतकविचीकांसधरिली नाहीं
सहसापांडुरंगें १४ तोक्षणक्षणायेउन जागेंकरीथापटून ह्मणेंश्रीधराऊठकरींलेखन कृ
र्णातुजसांगतोंमीं १५ कैसीघेतलीमाझीपाठी आठऊनेदीदुसरीगोष्टी उभायेऊनिराहेह्म
णेउठीं व्यासभारतकथियेलें १६ सकळपाल्हाळटाकुनी सारांशअर्थसांगूनिकानीं तोचि
तोपत्रींलिहूनी ठेविकांमजनावडे १७ हावरदग्रंथजाण करीलपुढेंबहुतांसीपावन पर
मजबाळअज्ञान येणेंचकरूनतरतील १८ आदिपर्वापासूनिजाणावें आश्रिकपर्वहेंबा
रावें पंढरीनाथेंदयार्णवें अतिअपूर्वकथियेलें १९ श्रीधरवरदादीनोद्धारा ब्रह्मानंदापरम
उदारा भीमातटविहारादिगंबरा अभंगभजनदेईतू २० सुरसपांडवप्रतापग्रंथआश्रिक
पर्वव्यासभारत त्यांतीलसारांशयथार्थ त्रेपन्नाव्यांतकथियेला १२१ श्रीकृष्णार्पणमस्तु
श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु शुभंभवतु ॥ ॥ ॥ ॥


अ०
५४
व्यास
धृतराष्ट्र
द्वारपाल
कौरवस्त्रिया

श्रीगणेशायनमः वैशंपायनह्मणेजन्मेजया कथाऐकेंनृपवर्या दुर्योधननिमालि
या धृतराष्ट्रसोबळीस्करवी १ अंधपडिलाधरणीवरी मस्तकआपटीनेअवस
रीं माझेंपारवछेदिलेंनिर्धारीं वृक्षपर्णासहमूळ २ माझाडोळाआजिफुटले
माझेंधैर्यदुर्गआजिपाडिलें माझेहातपायतोडिलें मत्सरशस्त्रेंकरूनियां ३
माझीआंधळियाचिकाठी नेउनीठेविलीस्वर्गकपाटीं मजदरिद्रियाचीगांठी
सोडुननेलीपूर्वकर्में ४ माझेंशतहीराजबळी कैसेंमारिलेंरणमंडळीं धृतराष्ट्र
घेउनीधुळी मुखींमस्तकींघातली ५ मजकृष्णेंपूर्वींसांगीतलें व्यासनारदेंसाक्ष
पेंकथिलें विदुरेंबहुतशिकविलें परिम्याऐकिलेंनाहीं ६ भीष्मद्रोणशारद्वत
संजयक्षणक्षणासांगेहित मैत्रेयऋपिनेंबहुत सांगतांऐकिलेंनाहीम्या ७ मग
बोलेगांधारी संजयागोष्टीअवधारीं पुत्राआधींएकरात्रीं स्वप्नम्यादेखिलें ८
म्याबैसलेंअसतांमंदिरीं कृष्णवसनवेष्टितविधवानारी मृत्तिकाघेउनीझडु
करी ओटीभरिनमाझी ९ घृताचेघटस्थानेंफोडिती उताणीपडुनखाती पिं
जन्यांनलेरावेमारिती विडाळेंयेउनियां १० दुर्योधनाचीकामिनी निचेकंठींच
मणी कृष्णवर्णपुरुपयेउनी नेलातोडुनीस्वप्नांत ११ शतहीमाझासुना दे
खिल्यास्वप्नींकुंकुमहिना बंधुसमवेतदुर्योधना माडीवरीदेखिलामी १२ पू
र्वींमीईश्वरपूजिला व्रतनेमफारचालविला मजकडुनअपराधकायजाला
नकळेचीमलातो १३ त्याचदोषेंकरुन गेलेशतपुत्रमरोन किंवाद्वेपिलेसंत ३
ब्राह्मण ह्मणोनीफळआलेंहें १४ किंवापंक्तिभेदघडला कींक्षीतेनरंगउच्छे

दिला कींगुरुद्रोहघडला मजपासूनीपूर्वींहो १५ कींपरद्रव्यअभिलापिलें
कींदातादानदेतांविघ्नकेलें कींहरिहरनिंदिले अपमानिलींकुलदेवता १६
कीणाचेंसुखींचाग्रासजाण म्यांपूर्वींघेतलाहिरोन कींमायबापअन्नाविण
पिडुनीमारिलींपूर्वजन्मीं १७ कींगुरुनिंदागुरुहत्या पूर्वींवडिल्यामाझामाथां
कींपात्रींविषमलाअसतां दवडिलाब्राह्मणबाहेरी १८ यतीश्वराचीनिंदा केलीमी
पूर्वींअमर्यादा कुरंगिणिपाडसाकरूनिभेदा पूर्वींम्यांविघडलीं १९ कींवेदशास्त्र
पुराण हरिहरचरित्रेंपावन उच्छेदिलींम्यांदेखुन ह्मणोनिऐसेंजाहालें २० किं
वास्त्रीआणिपुरुष मातापिरिपित्यास कींगुरुआणिशिष्यास विकल्पघालुन
विघडिलें २१ पोटांतूनउमाळेउठती भडभडांअश्रुवाहती असोयावरीसंजय
स्मतां धृतराष्ट्रासीबोलत २२ ह्मणेकुरुनायकाविचक्षण वहुततुजजालेंश्र
वण श्रीव्यासप्रसादेंकरुन बहुतेशास्त्रेंऐकिलीं २३ बहुतपुराणेंइतिहास
ऐकिलीभगवद्गीतानिर्दोष बहुतऋपिमुखेंस्मरस दिव्यनिरोपणेंऐकिलीं
२४ सनत्कुजाननहाराजआलो दिव्यज्ञानामृतवर्पला आतांत्यंयेवेळा शो
कहरकरीकां २५ लटकींहेंसंसारमाया मरीचीजलवत्जालिया सत्पुरुषां
चागोष्टीहृदया माजीआठवीतूंसर्वही २६ प्राणीजितुकेआकारआले नितुकेलया
सिगेले आतांपुढेंराहिले त्याचाहाहाचगती २७ राजापूर्वींचेतुझेसकळी त्यांहीं
नागपुरींचीसंपदाभोगिली तीकोठेंउरलीवंशावळी तुजपर्यंतसांगपां २८ ये
थींचेंस्मरवक्षणीकजाण जैसेंविपाचेंशीतळपण कींसावचोराचेंगोडवचन

असत्यपूर्णसर्वेही २९ आरशांतीलमिथ्याधन कींअभ्राचीसाउलीसघन कीं
शत्रूचाआदरपूर्ण क्षणांतप्राणघेईल ३० संसारदुःखदारुण क्लेशनरूचेंउद्या
नवन जेंविमृगांबुलहरिसघन दिसतीपरंतुक्षणिक ३१ विद्युल्लतेचीप्रभाक्ष
णिकसाचार दाविसर्वेंचपडेअंधार परीत्याप्रकारेंव्यवहार वर्तेणुकघडेना
३२ रश्मीवरीअहिदिसत शुक्तिकेवरीभासेरजत स्थाणूचेठायींचोरभासत
मिथ्यापाहतांसाचार ३३ राजापाहातांब्रह्मादिकां सर्वदाकाळनाहींसारिखा
माघेंभरिल्याजाघटिका पुढेंसर्वथानयेती ३४ भरलादिसेगंगापूर परीपाह
तांतेंलोटिलेंनीर मागुतयेतेंतेंहीजाणार क्षणभंगुरसर्वही ३५ तैंसेपरीहें
दिसतसेंशरीर परीआयुष्यसरलेंतेणंनर जैसाराजणीचामकर ह्मणतीर
वहुआहे ३६ पर्जन्यकाळींचीओलदेखोन दानवेंह्मणतीध्रुवासमान तैसेंगेले
भुलोन विषयभानदेखोनियां ३७ कींहिंसकरक्षदिवस सुखभोगीह्मणवीभा
ग्यवंत परीपुढेंमरणआलेंजवळीवकुन तेणवेचित्तींनयातें ३८ द्विजस्केंदावहन
देउन नहुषविकुभाविलेंकल्याण परीपुढेंअनर्थदारुण तेंत्यासकदानेणवे
३९ मेदिनीगर्भरत्न तेतांसुखावलाद्वादशनयन परीपुढेंकुळक्षयपूर्ण तेंत्या
सकदानेणवे ४० तेंसंजीवभुललेसमग्र पुढीलदुःखनेणतीपामर चौऱ्याशीं
लक्षयोनींथोर कितीह्मणोनीभोगाव्या ४१ कुऱ्हाडीचाघायांगणित तरुचागा
भंजायतुटत. तेविकुठारपाणीयेथ छेदितीआयुष्यवृक्षातें ४२ अहोपरवां दे २
खिलाबाळ तरुणहोतावेल्हाळ सर्वेंचजरानेंघातलीमाळ पडिलाव्याकुळहोउ

नियां ४३ सर्वेंचगेलामरोन भोगिलेकुंभपाकदारुण सर्वेंचगर्भींतराहिलाये
उन पावलाजननमागुती ४४ ऐशाजन्ममरणाचापंक्ती प्राणीअसंख्यभोगि
ती परीत्रासकनुपजेचित्तीं पडिलिभ्रांतीमूर्खत्वें ४५ ह्मणोनिप्रज्ञाचक्षुअवधा
री पहइसद्विवेकमंदिरीं शोकमोहदूरकरीं निजसुखीबुडीदेंकां ४६ शास्त्रें
कासयीजवळीरक्षावीं कींनिर्वाणकार्यीयावीं तैसींशास्त्रश्रवण करावीं अंती
विवेकासाठींतीं ४७ जवळिकासयारक्षावेंयोद्धण कींघायपडतांपुढेंरक्षण तैसें
शोकमोहपडिलेयेउन तेदूरकरीआतां ४८ तुझेंकुळसंहारिलें पांडवांचेंतरी
कोठेंउरलें द्रोणीनेंसर्वआटिलें रात्रीमध्येंयेउनियां ४९ आतांपांडवतुझेंकुम
र त्यावरीस्नेहकरीअपार तुजतिळांजुळीसाचार तेचदेतीलपुढेंही ५० आतांप्रज्ञा
चक्षुयावरी उत्तरकार्यपुत्रांचेंकरी अंधह्मणेतेअवसरीं मीजाईनवनवासा
५१ संजयह्मणेरायादेख आपलीक्रियातारकमारक तैसींदुर्योधनाचींकर्मेंदे
ख त्याचींत्यासफळाआलीं ५२ आपल्यागृहासआपण अग्निलाविलाआणून
कींरुईचीकघालुनीनयन बळेंचकरुनीदवडिले ५३ आपलेंशस्त्रआपण पोटीं
ठेविलेंखोउन विखारविळीं जाउन बळेंचहातघातला ५४ तैसेंदुर्योधनेंपांड
वछळिले कैंचेंकपटद्यूतमांडिलें घडिलीवारितांनऐकिलें कुळक्षयकेलाआ
पुला ५५ विदुरह्मणेहोणार तेंकाळत्रयींनचुकणार जरीघरांतलपलानिरंत
र तरीमृत्युसोडिना ५७ रायाहाचदृढविचार आदिअंतींअव्ययईश्वर मध्यें
जीवहेंसमग्र मिथ्यासर्वआहेहें ५८ जैसाबीजांपोटींतरूवर तरुतअग्निआहे

साचार मधेंदिसेकाष्टथोर तेंविप्रपंचसबळहा ५८ जपतपतीर्थहोमदान सर्वां
होमश्रेष्ठज्ञान रायाहेंहृदयींधरुन शोकदूरकरीकां ५९ पूर्वजन्मींचापरिवार
कोठेंतोसागरसमुद्र त्याहोनपूर्वींचेंकुटुंबसाचार सुखीकींदुःखीकोठेंआहे ६०
यौवनधनआयुष्यदेख विद्युप्रायअवघेंक्षणेक यामायाचक्रींचेंकौतुक इं
द्रजाळवत्‌असे ६१ शरीरहास्यंदन मनाचेतुरंगजुंपिलेजाण त्यारथींचीचक्रेंच
रण पूर्वकर्मसारथीपुढें ६२ तोसारथीओढीलजिकडे शरीररथधांवेतिकडे
एवंप्राक्तनाधीनघडे वर्तणुकसर्वही ६३ कर्मानुसारबुद्धी प्राणियासउपजे
त्रिशुद्धी पदरींदोषतैसीआधिव्याधी कळवितीबहुसक्रोधें ६४ पापपुण्यहोय
समान तेंव्हांकर्मभूमीसहोयजनन जरीविशेषदोषदारुण तरीपतननर्कीं होय
६५ बहुतजालापुण्यउत्कर्ष तरीसहजचहोयस्वर्गवास पापपुण्यसमानता
निःशेष नरयोनीसतरीयेतो ६६ तरीएकासबुद्धीजाणप्राप्त एकपापेंकरूनहो
तीलिप्त ऐसेंव्हावयाविपरीत कारणकायऐकेंपां ६७ एकाचेंपुण्यसबळ पा
पचाराचुराकेवळ तोनरहोयपुण्यशीळ बुद्धीअढळसत्कीर्ती ६८ एकाचेंपाप
अचाट पुण्यपदरींनाहींनीट तरीपापबुद्धीहोयप्रगट हरिद्रकष्टभोगितो ६९ ऐसें
विदुरबोधित तोंकृष्णद्वैपायनआलेतेथ ह्मणराजामनांत खेदकांहींकरुनको
७० वृथाद्रव्यदारासदन वृथापुत्रस्नुषाआप्तजन अवघीमोहाचीचोरटींजाण
जातीठाकुनसर्वस्व ७१ येथेंमानावयाहरिख तीलमात्रनाहींसुख खदिरांगा
रिंशयनदेख सुखनिद्राकेविलागे ७२ गर्भवासिचेंदुःख कुंभीपाकाहोनअधिक

मळमूत्रदाथरीदेख सुखनिद्राकेविलागे ७४ उपजतांपरमकष्टदेख बाहेरआलिया
नाहींसुख याचानाहींरडेसुख मातातर्कबहुकरी ७४ नेक्षुधेनेरडतसाचार ह्म
णेयाचेंदुखतेंउदर मगगळिंघालितीतीक्ष्णभर भाजेअंतरनेणती ७५ जरीपोट
दुखोनरडत ह्मणेबाळआहेक्षुधाक्रांत मगबळेंचक्षीरपाजित एवंअनर्थबाळ
पणीं ७६ तरुणपणींअतिउन्मत्त चवडाचालेवरीपाहत काममदेंमुसमुसीत
आपपरनेणेकांहीं ७७ मायबापासीनिर्भिछित गुरुससदाचाळवित केलेंस्त्रीआ
धीनजीवित हाअनर्थतरुणपणीं ७८ यावरीवृद्धपणींतत्वता दंतपडिलेगेलेदिगां
ता कर्णमुजलेबोधितां बोलतांबोंबडीबळेवाचेची ७९ डोळांनदिसेकांहीं चरणन
चालतीसर्वथाही नत्रनासिकींमुखींपाहीं प्रवाहचालेजळाचा ८० खोकितांखो
